म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २६९९



REFBK-0022347

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 DEC 1978
20 DEC 1978
27 DEC 1978
17 JAN 1979
24 JAN 1979
15 APR 1979
23 MAY 1979
30 MAY 1979
6 JUN 1979
18 JUL 1979
25 JUL 1979
8 AUG 1979
19 SEP 1979
30 SEP 1979
14 OCT 1979
2 MAR 198
5 DEC 1981
6 DEC 1981

(कृ.मा.प.)

9362
223406
9।1।9607
2eee
निबंध



प्रे स्टी ज
प्र का श न

मोकळं आकाश | रवींद्र पिंगे

©
सौ. शुभदा (कमल) पिंगे
७७ जय हनुमान सहनिवास (६)
हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०००५७

मुद्रक :
सर्जेराव जी. घोरपडे
प्रिंटेक्स्ट
सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
प्रेस्टीज प्रकाशन
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

प्रथमावृत्ती
८ एप्रिल १९७८
गुढीपाडवा, शके १९००

किंमत
बारा रुपये

गेली वीस-बावीस वर्षं मी हौसेनं ललित लेखन करीत आहे. थोडं आत्मचरित्रात्मक. वरंचसं प्रत्यक्ष पाहिलेल्या बाहेरच्या दुनियेबद्दल. वारेमाप लिहिलेल्या त्या ढिगाऱ्यातून अठरा लेख त्यातल्या त्यात उजवे म्हणून निवडले. 'मोकळं आकाश' म्हणजे डोक्यावर कसलंही बंधन न घेता केलेलं मनमोकळं लेखन. जसं सुचलं तसं मी एकटाकी लिहिलं. दुसऱ्यांचे देखणे कित्ते कटाक्षानं दूर ठेवले. माझ्या पायवाटेनंच मला गेलं पाहिजे ह्याचं भान मला सतत असतं.

आकाशवाणीचे माझ्यावर लक्ष उपकार आहेत. एरव्ही अन्यत्र दृष्टीलाही न पडते असे अनेक अनुभव मला आकाशवाणीतल्या वरच्या पातळीवरल्या नोकरीमुळं दैववशात लाभले. दोन घास अन्न कुठंही मिळालं असतं. मिळतच होतं. पण युद्धनौकेवरून हिंदी महासागरात प्रवास करायला मिळाला असता? आणि तोही कॅप्टनच्या शेजारी उभं राहून? क्रांतिकारकाच्या मुलाशी गाठभेट झाली असती? हिप्पीकडे निवळलेल्या नजरेनं पाहता आलं असतं? रानोमाळ हिंडता आलं असतं? तृप्तीच्या दिशा गवसल्या असत्या?
ही अवधी देवाची कृपा.

हे लेख माणूस, किर्लोस्कर, मनोहर, राजस, वसंत, सह्याद्री, बहुश्रुत वगैरे नियतकालिकांकडून आणि त्यांच्या दिवाळी अंकांतून प्रथम प्रसिद्ध झाले होते. त्या त्या संपादकांचे आभार.

वीर वासुदेव बळवंत फडके आणि हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्यासंबंधीचे दुर्मिळ दस्तऐवज मला श्री. ह. वि. मोटे यांनी मोठ्या विश्वासाने लेखनात वापरण्यासाठी दिले. त्यांचे आभार. ती सगळी माहिती मराठीत आज प्रथमच पुस्तक रूपानं प्रसिद्ध होत आहे.


सर्जेरावांनी माझ्या लेखनाचा बहुमान केला. इथून एक नवं नातं सुरू झालं.

कवी मंगेश पाडगावकर हा माझा फार दिवसांचा जुना मित्र. सलामीच्या माझ्या पहिल्या लेखापासून तो माझ्या आसपास आहे. त्याचं मी एक पाहून ठेवलं आहे: गरज असो– नसो, आपलं म्हणणं आरडत ओरडत दुसऱ्याच्या कानीकपाळी घालणं हे त्याचं आणखी एक अभिजात अवतारकृत्य आहे. मजेखातर त्याला किल्ल्या मारता मारता त्याच्यापासून मी बरंच काही टिपूनही घेतलं. त्यानं आनंद दिला; धीर दिला. म्हणून माझं हे सातवं पुस्तक मी मंगेशला अर्पण करीत आहे.

रवींद्र पिंगे

अनुक्रम

माझ्या लेखनाचा श्रीगणेशा	९
शुकशुकाटाचे दिवस	१५
वीर वासुदेव बळवंतांचा अस्त	२३
क्रांतिकारकाची जबानी	२८
श्रीरमणमहर्षींच्या सहवासात सॉमरसेट मॉम	३२
घायाळतळी अश्विनी	४१
गँग	४७
हिप्पींचा सहवास	५७
एका अलौकिक ग्रंथाचा खडतर प्रवास	६२
युद्धनौकेवरला एक दिवस	६९
एका प्रेमवीराची अवतार-समाप्ती	८३
फिल्मी एक्स्ट्रॉंचं कुलूपबंद जग	९१
क्रांतिकारकाचा मुलगा	१०७
विरंगुळ्याचे ते अफलातून दिवस	११४
एक अप्रतिम आत्मचरित्र	१३३
प्रार्थना	१४३
नऊ ऑगस्ट	१४७
एका प्रेमप्रकरणाची शताब्दी	१५४



माझ्या लेखनाचा श्रीगणेशा

पन्नाशीची वेस आता फार दूर आहे अशातला बिलकुल भाग नाही. त्या वेशीपलीकडची उन्हं आज नाही उद्या मला अंगाखांद्यावर घ्यावी लागतीलच. समोरून तुफान दौडत येणारा भविष्यकाळाचा रथ छाताडाला अगदी भिडू पाहात आहे. अशा वेळी दिलासा कसला वाटेल ? ऊन लख्ख पडलं होतं ह्याचा, की उन्हाचा डोंब आजूबाजूला उसळलेला असताना आपल्याला अंगापुरती घनदाट सावली लाभली त्याचा ? पायाखालच्या वाटा नियतीनं साफसूफ करून ठेवल्या होत्या ह्याचा, की आसपासच्या सुखद पायवाटा माझ्या पायवाटेला आपण होऊन भिडल्या त्याचा ? निर्णय करता येत नाही. एक गोष्ट मात्र नक्की, झाला तो सारा सुखसोहोळाच होता.

काळ सलग आहे. त्याचे कपचे वेगवेगळे काढता येणार नाहीत. सगळ्या घटना एकमेकींत गुंफल्या आहेत. पूर्णपणं अलग, स्वतंत्र, बंदिस्त, अशी कालांकित घटना नसते. पंधराव्या वर्षी मास्तरांनी भर वर्गात बाकावर तासभर उभं केलं, ते तेवढ्यावरच संपलं नाही. त्यातला उनाड उन्माद, त्यातली किंचित खंत, मास्तरांच्या मनातली निरुपायाची भावना, सवंगड्यांना झालेला घोर आनंद, ह्या साऱ्याचं मिश्रण आजपर्यंत थेंबथेंब पुरतं आहे. म्हणजे, बाकावर उभं राहण्याची घटना संपलेली नाही. अजून अस्पष्टशी चालूच आहे. इतरांना ती दिसत नाही इतकंच. माझ्यापुरती मी ती भोगत आहे. निरनिराळ्या बाकणांवर तृप्त हात हातात दिले-घेतले. ते भावविश्व काय हवेत विरून गेलं ? असं होत नाही. त्यातला संजीवक दिलासा चंद्रबिंबासारखा शान्त, स्थिर संगत अजूनही देत आहे. पुढच्या मुक्कामात आणखी प्रसन्न वळणं लागणार आहेत, ह्याचं निःशब्द आश्वासनही जुन्या अनुभवातूनच आपसुख मिळतच असतं. मागच्या घटना पुढच्या घटनांची सूचना देत असतात. म्हणजे, सगळ्याच घटनांचं जळ पुढंपुढं पसरत असतं. सगळ्या घटना मिळून एक पुण्याई बनते. एक आयुष्य बनतं. त्यात खाडाखोड करता येत नाही. जे झालं ते जसंच्या तसं ऊनसावलीसह स्वीकारावं लागतं. अविरत पानगळ आणि अक्षय

फुलोरा ह्यांची एकत्र जुडी नियती हातात देते. प्रज्ञा आणि प्रयत्न ह्यांच्या कक्षेबाहेरच्या नियतीच्या तालावर आपल्याला नाचावं लागतं. तेच आपलं संपन्न परंतु पराधीन आयुष्य. पुढं पुढं वाहात जाणारं.

त्या भोगलेल्या वाटचालीतल्या ह्या एक-दोन पुसट पाऊलखुणा :

तीस वर्षांपूर्वीची मुंबई किती शांत शांत होती! आम्ही गिरगावातल्या सदाशिव गल्लीत राहात होतो, तिथं दिवेलागणीनंतर रातराण्या स्वच्छंद घमघमायच्या. दूरच्या देवळामधल्या घंटांचे कापरे आवाज माजघरात ऐकू यायचे. ऐन पावसाळ्यात तर उफाळलेल्या समुद्राची गाज बंद तावदानांतून झिरपत झिरपत कानी पडायची. कंटाळलेला रखवालदार रात्री अपरात्री दोहे गायचा. त्याचा शब्द न् शब्द माझे कान टिपून घेत. अशा त्या शान्त निवान्त काळात मी भटवाडीतल्या आणखीनच शांत आणि गार वातावरणात वसतीला आलो. तिथं शेवग्याची झाडं होती. माड होते. फणस होते. प्राध्यापक-मजकुरांचा तिथला ब्लॉक पराकोटीचा शांत आणि अव्वाच्या सव्वा अफाट होता. त्यात ते, त्यांची म्हातारी बायको आणि एकुलता एक चंट तरुण मुलगा, अशी अवघी इनमिन तीन माणसं राहात. वृद्ध प्राध्यापक नेहेमी बाहेर-बाहेर असत. घरात त्यांची बायको नि मुलगा असे. त्यांना ओकंओकं वाटे. मी पुस्तकं वाचतो असं प्राध्यापकांना कुणी तरी सांगितलं. त्यांची तब्बेत एकदम खूष झाली. मला बोलावून घेऊन म्हणाले, 'उद्यापासून तू आमच्याकडेच राहायला ये. बाबूला सोबत होईल. शिवाय त्याला वळणही लागेल. मला वेळ मिळाला तर मी तुम्हां दोघांचंही इंग्रजी घेईन.'

मला तरी आणखी काय हवं होतं? राहायला ऐसपैस जागा, चहापाण्याची निश्चिती, आणि वाचायला भरपूर पुस्तकं, इतकं आमिष मला खूप होतं. पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी भटवाडीत प्रोफेसरमजकुरांच्या माडीवर माझा बिस्तरा अंथरला. दोन वेळा आयतं जेवण्यापुरताच घराचा संबंध राहिला. बाकीचा सारा दिवस मी प्राध्यापक-पुत्राचा सत्संग भोगू लागलो. त्यानं मला बघताबघता अनेक विद्यांची दीक्षा दिली. मटणाचा रस्सा आणि ताटभर खिचडी-पुलाव ग्रँटरोडवरचा मोगल पाच आण्याला देतो, ही ताजी खबर मी प्रथम त्याच्या तोंडूनच ऐकली. त्यानंतर मोगलाकडे आम्ही अनेक एकत्रित वाऱ्या केल्या. रात्री हातावर पाणी पडलं रे पडलं की अर्ध्या तुमानी घालून चौपाटीवर भटकायला जायचं नि मध्यरात्री मांजराच्या पावलानं झोपायला परतायचं, हीसुद्धा बाबूचीच शिकवण. तो चतुर गुरू, मी आज्ञाधारक शिष्य, असा संप्रदाय बरेच दिवस चालला होता. रात्री अंथरुणावर पडल्या पडल्या आमची टकळी बराच वेळ चालू असे. विषयांना बंधन असायचं कारण नव्हतं.

असंच एकदा गप्पा मारीत पडलेलो असताना बापू मध्येच म्हणाला, "तू मला एका बाबतीत मदत करू शकशील काय?"

"कुठल्या?" मी विचारलं.

"मला एक फक्कडसं प्रेमपत्र लिहून दे."

" म्हणजे ? " मी चाट होऊन उद्‌गारलो.

" म्हणजे असं, की ह्या टर्मला आमच्या कॉलेजात एक कंड्रा पोरगी आलीय. मला तिला खूप करायची आहे. पत्र प्रत्यक्ष तिच्या हातात द्यायचं मी धाडस करतो. पण पत्रलेखन मला जमण्यासारखं नाही. पत्र साधं नको. मस्तपैकी आलंकारिक भाषेत हवंय. तेवढं काम तू कर. पुढचं मी पाहून घेतो."

" अरे, पण ओळखदेख असताना पत्र लिहिलंस तर ती भडकेल रे."

" ते विसर. बाईमाणूस स्तुतीला नक्कीच वश होणार. तू फक्त पत्र तेवढं लिहून दे."

बाबूला फिदा करू शकलेली ही सौंदर्यवती कोण ते मी त्याच्या तोंडूनच काढून घेतलं. घाऱ्या डोळ्यांची, कुरळ्या केसांची, गोऱ्या रंगाची, ठेंगणीठुसकी अशी ती ब्राह्मण-कन्या होती. तिचे आईवडील व्यवसायानिमित्त दूर दक्षिण आफ्रिकेत राहात होते. ती मुंबईत हॉस्टेलमध्ये एकटीच राहात होती. आसपासच्या परिसरावर मधाळ नजरेनं गारुड करीत होती. तिला मी एकदा ओझरतं पाहिलं नि माझेसुद्धा तंबोरे झंकारू लागले. मी बाबूला सांगितलं, " बाबू, यार तू डरना नही. मी तुला एकच काय, एक डझन प्रेमपत्रं रोजच्या रोज खरडून देईन, पण तू हिला गटवच गड्या."

बाबू आरपार पालवला. म्हणाला, " ते माझ्याकडे लागलं. बघता बघता तिला गटवतो बघ. पण तू मात्र आयत्या वेळी कच खाऊ नकोस. मी पत्र मागितलं रे मागितलं, की तुझ्याजवळचा प्रेमपत्राचा खजिना तू बाहेर काढ. मी प्रेमपत्राचा पाऊस पाडून दाखवतो हिच्या दारात."

चार ओळींच्या प्रेमपत्रात इतकं अगाध सामर्थ्य असतं हे मी प्रथमच ऐकत होतो. ह्याअगोदर मी धड दोन ओळीसुद्धा लिहिलेल्या नव्हत्या. मग बाबूनं लेखनाची ही आडगिऱ्हाइकी माझ्या गळ्यात कोणत्या आधारावर अडकवली ? नि मी तरी ती कोणत्या बळावर पत्करली ? काही पत्ता लागत नाही. मात्र जेठा मारून मी प्रेमपत्र लिहायला बसलो हे खरं. एकदा लिहायचं ठरवल्यावर मग आणखी काय हवं होतं ? सुचले ते सारे अलंकार धारण करून अखेर आमचं पहिलं प्रेमपत्र ऑर्डरबरहुकूम तयार झालं. मी ते मित्रवर्य बाबूला दिलं. वाचल्यावर त्याचीसुद्धा कळी खुलली ! म्हणाला, " अरे, काय मार डाला लिहिलंस रे ! आता ती पोरगी मला मिळालीच म्हणून समज."

मी लिहिलेलं, त्याच्या सहीचं ते पत्र त्यानं छातीचा कोट करून तिच्या हातात दिलं. मजकूर वाचल्यावर तिचंही मन आरपार मोहरून गेलं. भडकणं वगैरे दूरच राहिलं; उलट, तिच्या नजरेत फुलपाखरं फडफडली. अर्थात, मला त्याच्याशी कर्तव्य नव्हतं. कुणी ऑर्डर दिली तर मी हुकुमेहुकूम लिहू शकतो. एवढंच माझ्यापुरतं सत्य होतं.

बाबूच्या गरजेनुसार मी त्याला पाचपन्नास मधाळ प्रेमपत्रं लिहून दिली, प्रत्येक वेळी मी मायना बदलायचा. कधी, " माझ्या प्रेमळ प्राणा—" तर कधी " माझ्या हृदयवीणे ! " असे प्रकार आलटून पालटून केले. सतत सहा महिने मी असा खलबत्ता कुटीत होतो.

पुढं एकदाचं त्या दोघांचं शुभमंगल झालं, आणि माझ्यामागं हात धुवून लागलेलं

प्रेमपत्र लेखनाचं दळण सुटलं !

माझ्यापुढं दोन प्रश्न निर्माण झाले.

मी लिहू शकेन आणि माझ्या लेखणीला यशही येऊ शकेल असं बाबूला कशाच्या आधारावर वाटलं ? लेखक म्हणून त्यानं नेमकी माझीच का निवड केली ? नि, लेखन-प्रपंचाचा साधा श्रीकारही न टाकलेल्या मला भसाभस प्रेमपत्रं लिहिण्याचा हुरूप तरी कुठून आला ?

दुसऱ्यासाठी जर मी मागणीप्रमाणं प्रेमपत्रं लिहू शकलो, तर आपण स्वतःच कुणाला तरी प्रेमपत्र लिहावं असं ऐन जवानीत असूनही मला कसं सुचलं नाही ? प्रेमपत्रांचं एक मरो, पण आपण निदान कुणावर तरी प्रेम करावं असा विचार माझ्या मनात कसा काय अंकुरला नाही ?

ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरं " नियतीची तशी इच्छा होती." इतकीच आहेत.

बाबूचं लग्न झाल्यावर मी लेखणी पुनरपि उचलायचं काही सबळ कारण नव्हतं. पण मी लिहू शकतो, मनात आणलं तर किरकोळ यशही मिळेल, असं मला आतल्याआत वाटायला लागलं. ती भावना मला वल्ही संथ ठेवून बसू देईना.

बाबूचं लग्न झाल्यावर मी त्याच्या घरी झोपायला जाणं प्रशस्त दिसेना. माझ्या स्वतःच्या घरी गर्दी फार. म्हणून मी समाजवादी पक्षाच्या कचेरीत झोपायला जाऊ लागलो ! तिथं सोबतीला वामन भिडे असायचा. आम्ही ॲडव्होकेट सुशील कवळेकरांचे निवडणुकीचे गुळगुळीत पोस्टर्स अंथरून त्यावर गारेगार निजायचो ! कचेरीत पुस्तकं असायची. पहाटे जाग आल्यावर मी तीही वाचू लागलो. त्यातून युसुफ मेहेरअलीच्या लेखनाशी परिचय झाला. मेहेरअलीचं लेखन मला तृप्त करून सोडायचं. त्या वेळी ज्याच्या त्याच्या तोंडी मेहेरअलीचं नि छगलांचं कौतुक असायचं. पुढं योगायोगानं मेहेरअलींशी प्रत्यक्ष परिचय झाला. त्याच्या पारदर्शक विनम्र व्यक्तिमत्त्वानं माझं अवघं काळीज काबीज केलं. मी त्याचाच झालो. त्यानं मला काय नि कसं वाचायचं ते नीट सांगितलं. त्यानं अगत्यानं सांगितलं ते मी मोठ्या उमाळ्यानं वाचून काढलं. युसुफ मेहेरअलींच्या संपर्कानं मी निश्चितच संपन्न झालो. माझी सामाजिक जाणीव तीव्र झाली. पुस्तकप्रेम वाढीला लागलं.

आणि कळी फुलाला येते न येते इतक्यात मेहेरअलीच पैगंबरवासी झाले. माझ्या पायाखालची भुई सरली.

इथं मला माझ्या झोपी गेलेल्या लेखणीची अचानक आठवण झाली ! वाटलं, मेहेर-अलींविषयी आपल्या भावना आपण कागदावर उतरून काढाव्यात. पण धीर होईना.

करता करता वर्ष सरायची वेळ आली. त्याचा पहिला श्राद्धदिन समीप येऊन थडकला. लिहायचं तर हीच एक शेवटची संधी. ती हुकली तर सगळंच ओंफस होणार होतं.

त्या वेळी द्वा. भ. कर्णिक " मौज " साप्ताहिकात ' उपेक्षितांचे उपेक्षित पुढारी '

ही अगदी मार डाला लेखमाला लिहीत होते. तिची मी पारायणं केलेली होती. त्यांच्या लेखनधाटणीचा कित्ता समोर ठेवला नि दोन आण्यांचे बारा कागद विकत आणून एका झटक्यात मेहेरअलींवर लेख लिहून काढला.

माझा पहिला लेख सिद्ध झाला; पण प्रसिद्धीचं काय ?

जिवाचा हिय्या करून मी तो लेख " मौज " साप्ताहिकाकडे वळवायचं ठरवलं. पण ओळखीपाळखी नव्हत्या. खरं तर माझ्यापाशी चांगले कपडेही नव्हते. तरी लेंगा-शर्ट घालून मी निघालो. गिरगावातल्या दूधवाल्या पुरोहितांच्या दुकानापाशी मात्र माझं सगळं अवसान गळून पडलं. पाऊल पुढं टाकायची हिंमत होईना. मग तिथंच रेंगाळलो. पंधरा-वीस मिनिटं फूटपाथवर विसावा घेतला. पुरोहितांकडे कपभर दूध प्यावं असंही वाटलं. पण प्रश्न दोन आण्यांचा होता. तेव्हा तो सुखोपभोग शक्यच नव्हता. शेवटी पुरोहितांच्या दुकानातल्या दरांच्या सगळ्या पाट्या फूटपाथवरून पुन्हापुन्हा वाचून तिथून पाय काढता घेतला नि सेंट्रल सिनेमापर्यंत मजल मारली. पुन्हा तिथं अडखळलो. पावलं जड झाली. पण पुन्हा पंप मारला नि एका तिरीमिरीतच " मौज " साप्ताहिकाच्या कचेरीत जाऊन थडकलो.

तिथं एका डेस्कासमोर अगदीच पोरसवदा दिसणारे श्री. पु. भागवत धोतराचा काचा मारून बसलेले होते. मी प्रत्यक्ष पाहिलेला हा पहिला संपादक ! लक्षात इतकंच आलं, की ह्याचे निळे डोळे हसू शकतात, आणि हा माणूस वरपांगी साधा गरीबगुरीब दिसत असला, तरी ह्याच्या शर्टाला सोन्याची बटणं आहेत !

बोलण्याचा काही प्रश्नच नव्हता. मी कागद त्यांच्या हाती दिले नि पाठच्या पावली परत आलो. मनातून फार ओशाळलो होतो. पश्चात्तापही झाला. बाबूच्या उमलणाऱ्या बायकोवर लेखणीनं भुरळ घालणं आणि निळ्या डोळ्यांच्या वेरक्या संपादकांना लेखन पसंत पडणं ह्यात फरक आहे हे जाणवलं. नको त्या अंधारात आपण उडी मारली असं वाटलं. झालं गेलं विसरावंसं वाटलं. पण विसरता येईना.

मग बहुत कष्टी करून सोडणारा आठवडा लोटला आणि " मौज "चा अंक बाजारात विक्रीसाठी आला,– माझा लेख पहिल्या दर्शनी पानावर मिरवत. माझा डोळ्यांवर विश्वासच बसेना. माझ्यापाशी दोन आणे शिल्लक होते. मी त्या अंकाची एक प्रत चक्क विकत घेतली. फूटपाथवरच लेख उभ्याउभ्या वाचून काढला. मी लिहिलं होतं ते सगळंच्या सगळं डिट्टो छापून आलं होतं.

चार जुलै एकोणीसशे एकावन्न, हा तो पुण्यवान दिवस !

दुसऱ्या दिवशी तरंगत तरंगत ग्रंथालयात गेलो. हेतू, माझा लेख लोक कसा अधाशासारखा वाचून काढतात ते पाहणं ! गेलो आणि कोपऱ्यात तासभर खोळंबलो, पण एक वाचक माझ्या लेखाजवळ स्थिरावेल तर हराम ! प्रत्येकजण अंक घेई, माझा लेख असलेलं पाहिलं पान न बघताच उलटी, आणि आतलं सोमणांचं फलज्योतिष वाचून अंक बंद करी ! असं ओळीनं पंधरावीस जणांनी केल्यावर मी जमिनीवर आलो !

तेव्हापासून गेली पंचवीस वर्षं मी जमिनीवरच आहे! लिहितो, पण डोक्यात भ्रम न बाळगता, आणि गळ्यात गहिवर न साठवता.

माझा तो पहिल्या पानावरचा लेख कुणीही वाचला नाही. निदान मला कुणी तसं भासू दिलं नाही. अपवाद फक्त मंगेश पाडगांवकराचा. त्याला तो लेख आवडला होता. तेव्हापासून, म्हणजे माझ्या पहिल्या लेखापासून मंगेश पाडगांवकर हा मात्र सतत आसपास असतोच!

आता मागं वळून पाहतो तेव्हा अचंबाच अचंबा वाटतो. मी निघालो कुठून आणि येऊन ठेपलो कुठं? प्रियेला खुष करण्यासाठी मित्राला भाडोत्री प्रेमपत्रं लिहून देणारा मी...

पण आजही मी जवळपास त्याच उंबरठ्यावर उभा आहे. आकाशवाणीवर मी ऑर्डरप्रमाणं संवाद बेतून देतो, म्हणजे दुसरं काय करतो? आकाशवाणीसाठी मी दत्ताची गाणी लिहिली, भूपाळ्या लिहिल्या, म्हणजे दुसरं काय केलं?

आनंदाची बाब इतकीच आहे, की मी प्रेमपत्रांचा कृत्रिम मजकूर सजवला आणि मित्रवर्य बाबूच्या डोक्यावर अक्षता पडल्या; देवादिकांची गाणी लिहिली, पंचवार्षिक योजनेवर नाटुकली लिहिली आणि माझी चूल पेटती राहिली; आणि फारसा अधिकार पदरी नसताना चालीचालीनं जे अवसानरहित ललित लेखन केलं त्यानं चारचौघांत नाव करून दिलं. लेखक-लोकांच्या गावकुसाबाहेर माझं नाव फारसं दौडलेलं नाही ह्याचं भान मला आहेच आहे. पण ह्याचंही भक्कम भान आहे, की जीविताची सगळी सूत्रं नियतीनं आपल्या अदृश्य हातात लपवून ठेविली आहेत, आणि देवाच्या अपार कृपेचा दिवा कुठं तरी कोपऱ्यात तेजाळतो आहे!

२

शुकशुकाटाचे दिवस

दिवस बर्फाच्या खड्यासारखे होते. एका बाजूनं वाफा मारत होत्या. दुसऱ्या बाजूनं कमालीचा थंडपणा. काय करावं कळत नव्हतं. नकळत असं म्हणता आलं नाही, तरी स्वातंत्र्याचं दान अपेक्षेपेक्षा चार दिवस अलीकडेच मिळालं होतं. एका अखंड देशाचे तीन चिरे काढले गेले ह्याचं दुःख भारी होतं. तरीही, अखेर स्वातंत्र्य मिळालं ह्याचा म्हणून आनंद होताच. मात्र नंतर चमत्कार झाला. जे मिळावं म्हणून घसे खरवडले तेच मिळाल्यावर आम्ही करण्यासारखं असं काही उरलेलं नव्हतं. देश पुन्हा अखंड व्हावा, फाळणी रद्द व्हावी, सिंधू हिंदुस्थानात यावी, असं मनापासून वाटे. मात्र तसं स्पष्ट बोलण्याची सोय नव्हती. म्हणून आम्ही जागच्या जागी थंड बसलो. आचार्य जावडेकर वगैरे मंडळी फार मोठे मोठे शब्द वापरायची. असं असता कामा नये, तमुक झालं पाहिजे, पथ्य पाळलं पाहिजे म्हणायची. सत्याग्रहाचं शास्त्र सांगायची. पुस्तकांची नावं तोंडावर ओल्या वाळूच्या गोळ्यांसारखी फेकायची. ते सारं ज्ञान बगळ्याच्या थव्यासारखं आमच्या डोक्यावरून जायचं. कशात काही राम वाटेना. ब्रिटिश गेले खरे, पण आमच्यासारख्या साऱ्या देशभक्तांना रातोरात बेकार करून गेले. ह्या देशातलं आपलं काम संपलं ह्या भावनेनं आम्ही आतल्याआत नळीसारखे पोकळ झालो.

फक्त भाऊ रानडे तेवढे जोरात होते. पाहावं तेव्हा ते जोसात सायकल हाणताना दिसायचे. यदुनाथ सांगे, 'मागचा सायकलवाला आपल्या पुढं गेला हे भाऊंना सहनच होत नाही. म्हणून ते सतत वेगात असतात.' मला प्रश्न पडे, ह्यांना इतका अचाट उत्साह कसा? आणि भाऊंना खंत वाटे, हे लेकाचे स्वतःला तरुण म्हणविणारे गद्धे नुसतं लोळून दिवस कसा काढतात? ह्यांचा जीव दलकार्यात रमत का नाही? स्वातंत्र्याच्या प्रभातकिरणांत हे अश्व भरधाव रपेट का करीत नाहीत? गुरुजी ह्यांच्यापुढं काय रडणार? ह्यांचं ह्यांनाच नको काय कळायला?

तसा देहानं मी शाखेवर जात होतोच; पण तिथल्या खेळांत नि बौद्धिकांत मन

रमत नव्हतं, हा खरा वांधा होता. आचार्य भागवत, केदारनाथजी वगैरे बड्या पंडितांना नेमकं काय म्हणायचं आहे याचं आकलन आपल्याला नीट होत नाही, त्याचीही खंत पोटात होती. मन कसं पावसाळी संध्याकाळ असावी तसं आरमळलेलं होतं. ना धड वारा होता की ना धड प्रकाश. अंगावर कोसळणारा एवढा मोठा दिवस जाणार कसा, असा प्रश्न पडे.

अर्थात, दिवस कुणासाठीच थांवत नसतात. तसे ते माझ्यासाठीही थांवले नाहीत. मी मात्र सुस्त पडून होतो. नानासाहेव गोऱ्यांची फर्मास भाषणं ऐकणं, पाध्यांचे अग्रलेख वाचणं आणि सोजिरांनी सोडून दिल्यामुळं फूटपाथच्या आश्रयाला आलेली पेंग्विन पुस्तकं चार-सहा आण्याला विकत घेऊन पडल्यापडल्या वाचणं हाच माझा कार्यक्रम असे. जोडीला समुद्रावरची निरुद्देश भटकंतीही असेच. पाय दमले आणि उन्हं तापली की चर्नीरोडच्या वागेतल्या सुरूच्या झिरझिरीत सावल्या आश्रय देत. हे सर्व करून घरी परतल्यावर प्रभातफेऱ्यांचे दिवस आठवत. गावदेवीच्या गल्ल्या आठवत. सेनापतींची सुवक सोज्ज्वळ गाणी आठवत. सत्याग्रह्यांनी भरलेल्या पोलिसांच्या लॉऱ्या आठवत. पाठीवर गट्ठे मारलेले खादीविक्ये आठवत. जीव व्याकुळ होई. मी घरातल्या घरात एकट्यानंच जुनी प्रभातफेरीची गाणी म्हणे.

माझा एक घडीचा चरखा होता. एकदा मी त्याच्यावर सूत कातत असताना तोंडानं गाणं म्हणत होतो. गाणं म्हणजे नाटका-सिनेमातलं नव्हे. साने गुरुजींचं. इतक्यात डॉ. अंबिके दारात दत्त म्हणून हजर झाले.

अंबिके माणूस शिस्तीला पक्का होता. ठाकठीक होता. खादीचे स्वच्छ घडीदार कपडे. स्वच्छ, कलती सफेद टोपी. वळकट शरीर. खणखणीत आवाज, आणि रेसच्या घोड्यासारखे सदैव सिद्ध अवस्थेत. डॉक्टरकी वाजूला सारून ते सहकुटुंब देशाच्या कामाला लागले होते. अंबिके म्हणजे दल आणि दल म्हणजे अंबिके, असा सिद्धान्त होता.

मी गूळपाणी दिलं.

'वरं, एक कामगिरी आहे तुझ्याकडे.' अंबिके मला म्हणाले.

'कोणती?'

'हैद्राबादेकडे धामधूम सुरू झाल्याय. वाचतोस ना?'

'हे काय विचारणं झालं अंबिके? आपले शिरूभाऊ त्याच उद्योगात आहेत. आज ना उद्या शिरूभाऊ निजामाची दाढी कापून आणणारच. माझे शब्द लक्षात ठेवा. शिरूभाऊ स्वस्थ वसणाऱ्यांपैकी नक्कीच नव्हेत.'

'शिरूभाऊंचं काम शिरूभाऊंना करू दे. तो अट्टल माणूस आहे. तुझ्याकडे वेगळी जोखीम आहे.'

'म्हणजे?'

मांजरीला आपल्या सुधाकर मायदेवाचा फार्म आहे. आपल्याला पुढंमागं तसे

प्रयोग अख्ख्या देशात करायचे आहेत. एरव्ही मिळालेल्या स्वातंत्र्याचा अर्थ काय?'

'मायदेवांचं ठीक आहे अंबिके; पण सहकारी शेतीबिती माझ्या गळ्यात नका अडकवू. माझी ती लाइन नाही.'

'तू दलात आलास नं? मग आता तुझे हिताहित आम्ही पाह्यचं आहे. आमचं काम आम्हांला नीट करू दे.'

'पाहा बुवा.'

'पाह्यचं काय? आमचा सगळा विचार पक्का झालाय. तू आता मोगलाईत रचनात्मक कार्याला लाग. शिरूभाऊंची एक ॲक्टिव्ह पोलिटिकल फ्रंट आहे, तशी त्यांना साथ देणारी आपली रचनात्मक कार्यकर्त्यांची फ्रंट. डॉक्टरांचा तसा थेसिसच आहे. क्रांतीला दोन फाळ असतात. एक जमीन उकरतो. दुसरा तिची मशागत करतो.'

'कुठले डॉक्टर म्हणता तुम्ही?'

'राममनोहर लोहिया.'

'मग आम्ही काय आर्ग्युमेंट करणार?'

'आणि केलंस तरी ते हवंय कुणाला? तू निमूटपणं मोगलाईत जायचं आहेस. माळुंब्र्याला.'

'माळुंब्रं तर मी अजून नकाशावरसुद्धा पाहिलेलं नाही.'

'तू माळुंब्रं पाहिलेलं नसल्याचं सांगतोस. मी तर पुणंही पाहिलेलं नव्हतं; पण अखेर तिथंच करतोय नं मी काम? तेव्हा एखादं शहर पाहिलेलं असणं–नसणं ही मामुली बाब आहे.'

'हे सारं माझ्या शक्तीबाहेरचं आहे हो अंबिके. मी तर नुकताच रेशनिंगमध्ये अर्ज टाकलाय!'

'रेशनिंगचा कॉल आला तर तू माधारी फीर आणि रेशनिंगमध्ये जा. माझी ना नाही. मात्र तोपर्यंत तू माळुंब्र्याला कोऑपरेटिव्ह फार्म चालव.'

'तुम्ही बापू काळदातेला का नाही सांगत? त्याचा भाऊ मस्तपैकी मोसंबी काढतोय मोगलाईत. त्याला त्या भागातला इंच नि इंच माहिती आहे.'

'मग आम्ही जी चारजणांनी डोकी झुंजवून योजना तयार केली ती कशासाठी?'

'त्यापेक्षा मी कोकणात अधिक उपयुक्त ठरेन. श्रीवर्धनापासून थेट तेरेखोलपर्यंत सर्वत्र माझे मित्र आहेत. शिवाय, ती माझी भूमी आहे.'

'तिथं भाऊ तेंडूलकर नि श्याम कोचरेकर आहेत. तुझी खरी गरज मोगलाईत आहे.'

'माझ्या बाबतीत तुम्ही मंडळींनी पुनर्विचार केला पाहिजेसं मला वाटतं. माझी आवडनिवड, माझी सोय-गैरसोय काही लक्षात घ्याल की नाही?'

'हे फारच होतंय. पिंगे, दीज आर ऑर्डर्स! तू मोजून अठ्ठेचाळीस तासांच्या आत मुंबई सोडायची आहेस.'

माळुंब्र्याचा अवतार पाहून माझ्या डोळ्यांसमोर साक्षात काळोखी आली.

वडावरचे चार कावळे, पिवडी फासटलेल्या चावडीवरला बुट्ठा निझामी पोलिस, माळावरची चार सपाट छपरं, आणि कापूर उघड्यावर ठेवला तर तत्काळ पेटेल असलं भगभगीत ऊन, हा मोगलाईच्या सीमेवरल्या त्या गावाचा संसार होता. सोलापूर सोडून उस्मानाबादेची दिशा पकडल्यापासूनच मनाचा चुरा व्हायला लागला होता. मोगलाईतले भगभगीत बोडके माळ चौफेर होते. जागृतीची सोडा, पण साधी मानवी अस्तित्वाचीही चाहूल दिसेना. सर्वत्र शून्य शुकशुकाट.

कॅट्री मोटरीनं धूळ तुडवीत माळुंब्र्यापर्यंत आलो होतो. वडाखाली टेकलो. ब्रह्मांड आठवलं. अण्णासाहेब सहस्रबुद्धयांची भडभडून आठवण आली. कसे बुवा ते त्या ओरिसाच्या ओसाड भूमीत रमतात ?

इतक्यात एक खेडुत आला. आदाबअर्ज झाल्यावर म्हणाला,

'इकडे कामाला पाठवलंय ते माणूस तुम्हीच काय ?'

मी चरकलो. हा माणूस पोलिसांचा खबऱ्या तर नसेल ? ठोकून दिलं,

'नाही. मी माताजीच्या यात्रेला चाललोय. मला निशाण ठेवायला जागा हवी.'

'ओळखलं, ओळखलं. निशाणाची भाषा काढील तो आपला माणूस. मी अक्कलकोटे. मीच तुमचा इथला यजमान. चला आपल्या वस्तीवर.'

माझी वळकटी अक्कलकोट्यांनी उचलली. ते पुढं नि मी मागं असे मातीची गरम ढेकळं तुडवीत निघालो.

'हे तुमचं माळुंब्रं फारच उजाड आहे हो.' मी हताशपणं म्हणालो.

'माळुंब्रं अजून दूर आहे. ही तामळवाडी. हे हद्दीवरचं ठाणं. दस्तुरी.'

'मग मी निशाण कुठं ठेवायचं ?'

'तूर्त ह्या तामळवाडीतच. मांडवाची जमवाजमव झाल्यावर माळुंब्र्याला पालखी हालवू.'

ही सांकेतिक भाषा होती. आम्हाला आमचे अर्थ कळत.

तामळवाडी ह्या हैदराबाद संस्थानाच्या प्रवेशद्वारावर फारफार तर दोनचार कावळे आणि घारी असतील. बाकी सर्वत्र सुन्न शुकशुकाट. पाहावं तिकडे बोडके माळ भरमसाठ पसरलेले आणि डोक्यावर हवं तितकं आकाश. वेळ तर नुसता खायला येई. पृथ्वी विराट आहे, आकाश अनंत आहे आणि काळ निरवधी आहे म्हणजे नेमकं काय, ते आयुष्यात प्रथम मला तामळवाडीनं सांगितलं. पुस्तकं सांगतात की निसर्ग माणसाला चमेलीच्या झेल्यांसारखा फुलवतो. माझा रोकडा अनुभव वेगळा आहे. तामळवाडीच्या निसर्गात मी ओलं पोतेरं झालो आहे असं सारखं वाटत राहिलं.

अक्कलकोटे धीमा माणूस. क्रांतिकार्यात उतरलेला. भाकरतुकडा घशाखाली घातल्यानंतर म्हणाला,

'आमची सर्व हयात अशी सूर्यचंद्र बघण्यात गेली बघा. जमीन आणि आपण.

अधेमधे कुणी नाही. आता हे सगळं काम आम्ही तुमच्यावर सोपवणार नि आम्ही लातूरला निघून जाणार.'

माझ्या माथ्यावर वीज कोसळली.

'अहो, असं करू नका अक्कलकोटे! माझी इथं ना ओळख कुणाशी, की ना मला कळते इथली भाषा. मी इथं एकटा काय करणार?'

'सांगतो. हा फार्म तुम्ही ताब्यात घ्या नि माणसं मिळवून चालवा. धीर सोडू नका. ह्या भागात मराठी सर्वांनाच कळतं, आणि मुख्य म्हणजे तुमचा सगळा दिवस शेतीतच जाईल.'

'म्हणजे मी मेलोच समजा! माझं ऐका. तुम्ही वस्ती हालवू नका. तुमच्या संगतीत मी इथली सगळी परिस्थिती अगोदर निरखून घेतो. जिथं आपल्याला रचनात्मक कार्य उभारायचं आहे तिथला भूगोल तरी नीट जाणून घेऊया.'

'तो कळेलच तुम्हाला आस्तेआस्ते. अगोदर घट्ट जोंधळा काढा. पैसे सुटले तर त्यात शेअर्सचं भांडवल गुंतवून विहीर खणून पंप बसवा नि मोसंबी काढा. इथलं हवापाणी मोसंबीला उत्तम आहे; आणि तंबाखूच्या भानगडीत पडू नका. ती करणी अगदी अंगाशी येते. तुम्ही मोसंब्यांवर जोर द्या.'

'अहो, सांगता काय अक्कलकोटे? माझा नि मोसंब्यांचा संबंध काय? अति झालं तर मी माझा चरखा उचलीन नि सरळ मुंबईला निघून जाईन आल्या वाटेनं.' मी तळमळून सांगितलं.

'असा अविचार करू नका पिंगे. माझं ऐका. ही आमची शेती म्हणजे सोनं आहे. कसा आणि अनुभव घ्या. मोसंबीच तुम्हांला तारतील. काश्मीरपेठपासून थेट गुंटकलपर्यंत सर्वत्र मोसंबी खपतात. मोसंब्यांना मरण नाही.'

मी घटाघटा पाणी प्यालो आणि छपराबाहेर उभं राहून आसमंत पाहू लागलो.

पुढचे आठ दिवस नुसतं हेच केलं.

पाखरांच्या अगोदर जाग येई. मग चूळ भरून गुळाचा चहा. तो झाल्यावर चरखा-मैत्री. नंतर 'गीताई' वाचन. तोपर्यंत आभाळात रंग भरत. छपराबाहेर येऊन रंगांचा तो खेळ पाह्यचा. भुकेलेल्या कावळ्यांच्या झेपी पाह्यचा. थोडासा शेतावर फेरफटका. तोपर्यंत अक्कलकोट्यांची गरम भाकरी तयार होई. दही, कांदा, मीठ आणि भाकरी ही न्याहारी. नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत नुसती स्वस्थता. काहीही करायचं नाही. आसमंत तापताना नुसतं अलिप्तपणं पाहात राह्यचं. दोनला जेवण येई. भात, तुरीची तिखट आमटी, कांदा, मिरची. नंतर झोप, संध्याकाळी पुन्हा शेतातून फेरफटका. रात्री आल्या-आल्या जेवण. कांद्याचं पिठलं, परातभर भात, गुळाचा खडा, कांदा, फोडणीची मिरची. बस्स. दिवस असा उगवायचा, असा मावळायचा.

आठ दिवस असे ढकलल्यावर मी म्हणालो,

'अक्कलकोटे, आम्ही मुंबईत ऐकत होतो की हैदराबादेत मोठा लढा चाललाय

म्हणून. पण इथं तर सगळं पाच हजार वर्षांपूर्वी होतं तसंच शांत आयुष्य चाललंय. एक माणूस इकडे फिरकायला कबूल नाही. मग मला कशाला बोलावून घेतलंत तुम्ही ?'

'आम्ही बोलावलं ? कोण म्हणतो ?'

'तुम्ही बोलावलं नसतं तर मी आलो असतो का ?'

'ह्यात आमचा काही संबंध नाही. आम्ही गप्पगप्प होतो. तुमचीच माणसं वार्शी-हून आली नि म्हणाली, निजामाला गाठू. को-ऑपरेटिव्ह फार्म चालवू. लोकांना आदर्श घालून देऊ. ह्यावर आम्ही काय म्हणणार ? आम्ही म्हणालो, आमच्यापाशी लागेल तितकी जमीन आहे. माणसंच नाहीत. तुम्ही द्या पाठवून. आपण फार्म चालवू. मोसंबी घेऊ. तशी ते म्हणाले, आमच्यापाशी भक्कम मनुष्यबळ आहे; पण जमीन नाही. तेव्हा आम्ही माणसं पाठवू. म्हटलं पाठवा. तर, पहिलं पार्सल तुमचं आलं. म्हटलं या. राहा. तामळवाडीत दोन वेळच्या अन्नाला मरण नाही.'

'पण फार्म चालवायला माणसं ? गुरं ?'

'ती तुम्ही धुंडा. आम्ही कुठवर पुरं पडणार ? आमच्यापाशी लागेल तितकी जमीन आहे. बस्स. आता तुम्ही हिंडा. फिरा. आळंद, इंडी, गुलबर्गा, अशी एक फेरी चक्कर मारा. माणसं मिळवा. शेअर्स खपवा. जमीन आपली आहेच. ती तुमच्याकडे देतो.'

'आणि तुम्ही काय करणार ?' मी विचारलं.

'तुमचा फार्म सुरू झाला की आम्ही लातूरला जाणार. तिकडे रझवी वकिलानं उच्छाद मांडलाय, शिवाय स्वामींची माणसं तिकडे टक्कर देताहेत. इकडे ती तकलीफ नाही.'

ह्यावर काय बोलावं मला सुचेना. आळंद कुठं आहे ? इंडी कुठल्या दिशेला आहे ? गुलबर्ग्याला कसं जायचं ? कानडी कसं कळणार ? मी हताशपणं म्हणालो,

'मी अंबिक्यांच्या पत्राची वाट बघतो. निझामीत आमचे कार्यकर्ते घुसल्याचं मुंबईत ऐकलंवतं; कदाचित तेही येतील.'

'ह्या बाजूला कुणीही घुसलेले नाहीत. कुणीही येणार नाहीत. माझं ऐका. तुम्हा-लाच माणसं शोधत फिरावं लागेल; नि तेही रात्रीच्या वेळी. दिवसाढवळ्या गेलात तर पोलिस पकडतील नि हालहाल करतील. त्यापेक्षा इथंच रहा. निदान तब्बेत ठीक राहील. देवाच्या दयेनं आपल्याला इथं भातभाकरीला काही कमी नाही. शेतात कांदा पिकतोय, जोंधळा पिकतोय, तूर पिकतेय नि मिरची पण पिकतेय. आणखी काय हवंय ?'

म्हणजे अखेर मी कांद्याचं पिठलं नि जोंधळ्याची भाकरी तोडायला इथं आलो तर ! आणि क्रांतिकार्याचं काय ? रचनात्मक कार्याचं काय ? स्वामी रामानंदतीर्थ कुठं आ हेत ? शिरूभाऊ कुठं आहेत ? अंबिक्यांचं पत्र कुठं आहे ?

मी तामळवाडीत स्वस्थ बसलो. पण चंद्रसूर्य तरी किती वेळ पाहणार ? एकदा वाटलं, प्राथमिक शाळेचा एखादा वर्ग काढून पाहावा; पण अक्कलकोटे म्हणाले, इथं आजूबाजूला पाच मैलांवर वस्तीच नाही. मग मुलं येणार कुठून ? नि पाटी पेन्सिली

आणायला नलदुर्गापर्यंत जायला लागेल. नलदुर्ग कुठं आहे ? किती लांब आहे ?

तोही रस्ता बंद झाला.

महिन्याभरानंतरचा प्रसंग. दुपारचं जेवल्यानंतर मी ताणून दिली होती. इतक्यात एक फेटेवाला शिडशिडीत माणूस वर्स्तीवर आला. अक्कलकोटेंच्या तो चांगलाच परिचयाचा दिसला. त्याला शिवेपर्यंत पोहोचवून अक्कलकोटे परत आले नि म्हणाले,

'माझ्या नावाचं पत्र आलंय. मुंबईचा शिक्का आहे. पण मला कोण कशाला पत्र पाठवणार ? माझं मुंबईला कुणीच नाही. तेव्हा पत्र तुमचंच असणार. घ्या.'

ते पत्र मला माझ्या घरून आलेलं होतं. लिहिलं होतं, तुला रेशनिंगमध्ये इन्स्पेक्टर म्हणून निवडलाय. लवकर ये. पगार एकशे वीस.'

मुंबईला माघारी फिरण्याचा निश्चय केला. चरखा बांधला. सामान बांधलं, अक्कलकोटे कोसळले. म्हणाले, त्या लोकांनी तुम्हाला निष्कारण भरीला घातलं. इथं रचनात्मक कार्याला यायचं म्हणजे माणसानं किमान पाच वर्षांच्या बोलीनं यायला हवं. आमचं संस्थान हे असं. भूमी ही अशी; आणि लोक हे असे. आमचे खापरपणजोबा ह्या तामळवाडीत जे आयुष्य जगले ते नि आता आम्ही जगतो आहोत ते आयुष्य ह्यात तसूभरही फरक नाही.

मोजून एकोणतीस वर्षांनंतर टेप-रेकॉर्डर घेऊन मी तामळवाडीच्या स्टँडवर दाखल झालो आहे. आता मी हपीसर आहे. माझी जीप सडकेवर उभी आहे. माझ्या आयुष्यातलं सेवादल-पर्व केव्हाच संपलं. डॉ. अंबिके आकस्मिक गेले. खूप झिजले बिचारे. एका अलीकडच्या भेटीत म्हणाले होते, 'मूळचा डॉक्टर माणूस मी, पण माझ्या पदरात काय पडलं ? इतरांचे बंगले झाले, मोटरी झाल्या. त्यांची पोरंबाळं फॉरिनला गेली; नि मी ? पुण्यात एका हाउसिंग सोसायटीत दोन रुमांचा ब्लॉक मला मिळत होता; पण सोसायटीचा सभासद व्हायला सुरुवातीचे अडीचशे रुपये भरायला नव्हते म्हणून ह्या डॉक्टराला तो ब्लॉक सोडावा लागला ! माझ्या ध्येयवादाचा हिशोब हा असा आहे. तू वेळेवर सुटलास ते बरं झालं.'

तामळवाडीच्या स्टँडवर एक चहाचं झोपडीतलं हॉटेल उगवलं आहे. तिथं चहा घेऊन झाल्यावर विचारलं,

'इथं अक्कलकोटे नावाचे बागाईतदार कुठं जवळपास राहतात काय ?'

माणसं एकमेकांकडे बघू लागली. आपापसांत कानोसा घेऊ लागली. कुणालाही अक्कलकोटे ऐकूनसुद्धा माहिती नव्हते. त्यांचा शेतमळा माहीत नव्हता. एकानं अंदाज व्यक्त केला, रझाकारांच्या बंदुकीनं त्यांना मागंच उडवलं असेल ! दुसरा म्हणाला, असे कैक फालतू शेतकरी रझाकारांनी नाकाम खतम करून टाकले. त्यांची गणती कुठवर करायची ?

मग आता मी रेडिओसाठी मुलाखती कुणाच्या घ्यायच्या ? ग्रामीण भागात झाली आहेसं म्हणतात त्या हरित क्रांतीची कल्पना लोकांना कशी करून द्यायची ? लॉगबुक कसं भरायचं ?

पेच निर्माण झाला. मग विचार केला, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एका आडबाजूच्या खेड्यात कसा बदल होत गेलाय त्याचं टिपण करावं. माणसं जमतील त्यांच्यापाशी विषय काढू. शाळा कशी निघाली, वस्ती कशी वाढली, संकरित बियाणं कसं आलं, ऊस कसा बेतला, सोसायटी कशी आली, गावकऱ्यांची पोरं कॉलेजात कशी गेली, त्यांचा अंदाज घ्यावा; त्यातून एक प्रोग्राम ठोकावा.

जीप सायडिंगला काढली. झाडाखाली उभी केली. कोट उतरवून ठेवला. जरा मोकळ्या जागेत जाऊन सावलीत उभा राहिलो. आसमंत निरखलं.

झोपडीतल्या हॉटेलातली माणसं उठली; पण माझ्या बाजूला त्यांतले कुणीच फिरकले नाहीत. माणसं दूर निघून गेली. सामसूम झाली. मधूनच एखादी बैलगाडी जाई. बाकी जाग नाही. हळूहळू किरण निमाले. पाखरं परतली. बघता बघता रात्र उतरली. सगळीकडे चिडीचूप झालं. अंधार दाटला. मग अंमळशानं पुन्हा दिशा उजळल्या. चंद्रमा सरसर वर आला. चांदणं बरसलं. लांबवर पसरलेले बोडके माळ चांदण्यात उजळून निघाले. निष्पर्ण, लांबच लांब पसरलेले काळपट माळ. निर्मनुष्य पृथ्वी. तिच्यावर फक्त पाखरांचं आणि चंद्राचं सनातन राज्य.

एकोणतीस वर्षांपूर्वी अक्कलकोट्यांच्या फार्मवर पाहिला होता तोच निसर्ग पुन्हा आपलं तेच ते शांत सनातन रूप दाखवत होता. एक काडी इकडची तिकडे झालेली नव्हती. क्रांती वगैरेची तर नावनिशाणीही नव्हती. बदल झालाच असेल तर इतकाच की, बांधांवरल्या झुडुपात गवगार पडलेल्या पाखरांची पिढी बदललेली असेल नि पावसाळे पालटल्यावर रानफुलांना नवेनवे बहर आले असतील; इतकंच.

वीर वासुदेव बळवंतांचा अस्त

कोकणचा काळपट हिरवा समुद्र मागं पडला. शाईसारख्या स्वच्छ, नितळ निळ्याशार अरबी समुद्राचं पाणी बोट कापू लागली. लांबच लांब डेकवर उभं राहून मी धुक्यात मावळलेल्या भारताच्या किनाऱ्याकडे पाहात होतो. बोट पश्चिमेच्या रोखानं पुढं पुढं जात होती. कृष्णाची कांती मोत्याळ निळी होती म्हणजे नेमकी कशी होती ते सागराचं निळं अलौकिक रेशमी रूप पाहून लक्षात आलं होतं. तो कृष्णरंग मी डोळ्यांनी पोटभर प्यालो. मी निळी कमळं पाहिली होती. कमळासारखे निळे डोळे पाहिले होते. निळे लोलक पाहिले होते. निळंभोर आभाळ निरखलं होतं. निळे पंख पाहिले होते. पण अरबी समुद्राची पारदर्शक निळाई काही वेगळीच वाटली. त्या निळेपणात एक मंत्र होता. त्याचा अंमल मनावर पडला होता. इतक्यात जहाजावरचा एक तरतरीत अधिकारी डेकवर शेजारी येऊन उभा राहिला. मी विचारलं, 'सगळा अरबी समुद्र असाच निळाभोर आहे?' तो उत्तरला, 'हो. थेट एडनपर्यंत हा एकच एक निळा रंग पसरलेला आहे. आपली बोट आता एडनच्याच दिशेनं चालली आहे.'

एडन! एडनच्या त्या अनपेक्षित उल्लेखानं माझी तंद्री भंगली. दीड हजार मैलांचा निळा गालिचा ओलांडून मन थेट एडनच्या रखरखीत खडकाळ भूमीवर पाखरासारखं उडून गेलं. वैराण, निष्पर्ण अरबी भूमीचा किनारा दिसू लागला. नुसती पिवळी धगधगीत तापलेली वाळू. वरून सूर्य आग ओकीत होता आणि खाली सागरतीरावर भडाग्नीच्या कराल ज्वाला ध्वजांसारख्या फडफडत होत्या. त्या अग्निशिखांनी बंडवाल्या वासुदेव बळवंतांच्या राजयक्ष्म्यानं पोखरलेल्या निश्चेष्ट देहाला कवेत घेतलं होतं. भारतीय क्रांतिकारकांच्या एका अग्रदूताची अखेरची भस्मक्रिया त्या उजाड, तापलेल्या वाळूत चाललेली होती. अखेरच्या साक्षीला होते खडकांवर बसलेले पाच-पंचवीस आफ्रिकन कावळे आणि बगळे!

काळजाचा दिवा करून जन्मभर ज्यानं मातृभूमीच्या स्वातंत्र्याचं एकमेव स्वप्न

कलम : दरोडेखोरी, ३९५

प्रत्येकाला दहा वर्षांची सजा होऊन ठाणे येथे त्यांना १३-११-१८७९ रोजी आणण्यात आलं आणि १८-११-१८७९ रोजी त्यांची अलीपूर तुरुंगात बदली करण्यात आली.

ठाणा १८७९

तक्ता क्रमांक ३

१८७९ साली ठाणे तुरुंगात सजा भोगीत असलेल्या कैद्यांची माहिती देणारी खतावणी.

१. क्रमांक	२६७१
२. कैद्याचे आणि त्याच्या पित्याचे नाव	वासुदेव बळवंत फडके
३. जात, वंश किंवा समूह	ब्राह्मण
४. धर्म	हिंदू
५. वय	३२
६. उंची	५ फूट १० इंच
७. पावलाचं माप	११ इंच
८. छातीचा घेरा	३४ इंच
९. मस्तकाचा घेरा	२० इंच
१०. कैद्याचे वर्णन, विशेषतः न पुसटता येणाऱ्या खुणा किंवा चेहरेपट्टीवरील किंवा एकूण ठेवणीतील वैशिष्ट्ये.	छातीवर सहा तीळ; पोटावर एक तीळ; पाठीवर पंधरा तीळ; खांद्यापासून खाली दोन इंच अंतरावर डाव्या हातावर खुणेचा एक पूर्ण व्रण आणि एक अर्धवट व्रण.
११. रहिवासाचे ठिकाण	शहर किंवा गाव : ठाणे जिल्ह्यातील शिरढोण, आता पुणे जिल्ह्यात अंतर्भूत. तालुका–पनवेल. जिल्हा–ठाणे.
१२. पूर्वीचा व्यवसाय	कारकून.
१३. लिहिता वाचता येते काय ?	लिहितो आणि वाचतो.
१४. पूर्वीच्या शिक्षा आणि गुन्हे	काही नाही.
१५. कुठल्या गुन्ह्यासाठी शिक्षा	१२२, १२१ अ, १२४ अ, ३९५ आणि ४०० कलमान्वये
१६. शिक्षा फर्माविणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव आणि पद	एन. एच. न्यूहॅम सेशन्स जज, पुणे
१७. शिक्षेची तारीख	७ नोव्हेंबर १८७९

१८. तुरुंगात आगमनाची तारीख	१२ नोव्हेंबर १८७९
१९. शिक्षेच्या स्वरूपाचा तपशील	जन्मठेप
शिक्षेची मुदत, दंड वगैरे	आजन्म
जन्म	४ नोव्हेंबर १८४५
एडनला बदली	५ जानेवारी १८८०

क्षयाच्या विकाराने एडन जेलमध्ये १७ फेब्रुवारी १८८३ रोजी दुपारी ४ वाजून २० मिनिटांनी देवाज्ञा.


तुरुंगाधिकाऱ्यांनी केलेली शाईची नोंद इथं संपते. ती वाळलेली आहे. मात्र, मातृभूमीच्या स्वातंत्र्याला आणि ते मिळविताना मध्येच गाठणाऱ्या मृत्यूलाच आपलं मंगलधाम मानणाऱ्या ह्या आद्य क्रांतिकारकाची, आता स्वातंत्र्य भोगणाऱ्या सामान्य भारतीयांच्या हृत्पटलावर झालेली रक्ताची नोंद, कालत्रयीही वाळण्यासारखी नाही. वासुदेव बळवंतांच्या नावाला एक उग्र, उत्कट असा गंध सतत येत राहणार.

वासुदेव बळवंतांना जेमतेम पस्तीस वर्षांचं आयुष्य लाभलं. त्यांतली पंधरा वर्षे त्यांनी ब्रिटिश सरकारची कारकुनी करण्यात काढली. मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजातही ते कारकून होते. कारकुनी करीत असताना आजारी आईच्या सेवेसाठी त्यांना रजा मिळाली नाही. तिथं पहिली ठिणगी पडली. मग त्यांना एकूण साहेबी राज्याबद्दलच घृणा उत्पन्न झाली. हत्यारबंद रामोशांना हाताशी घेऊन त्यांनी शस्त्रबळावर इंग्रजी साम्राज्य उलथविण्याचा घाट घातला. स्वतःच्या तरुण पत्नीलाही बंदूक चालविण्याचं शिक्षण दिलं. फौजफाटा जमा केला. तिच्या खर्चासाठी श्रीमंत सावकारांवर डाके घातले. पण वासुदेव बळवंतांच्या सहकाऱ्यांना त्यांचा ध्येयवाद कळू शकला नाही. स्वातंत्र्यापरतं अंतिम हित दुसऱ्या कशात नाही आणि ही बंडाळी अखेर एका महान मंगल क्रांतीला जन्म देणार आहे, हे वासुदेव बळवंतांचं मूलतत्त्व त्यांचे रामोशी आणि धनगर साथीदार आकलन करू शकले नाहीत. त्यामुळं वासुदेव बळवंतांची फार पळापळ झाली. मद्रास राज्यातल्या कर्नूल जिल्ह्यातल्या शैलमल्लिकार्जुनाच्या मंदिरात कंटाळून ते शेवटी अनुष्ठानास बसले. ह्याच मंदिरात बसून त्यांनी स्वतःच्या जीविताची हकीगत लिहून काढली. तिथं पोलिस मागावर आले, म्हणून वासुदेव बळवंत निजामीत शिरले. निजामीतच त्यांना २९ जुलै १८७९ रोजी गिरफ्दार करण्यात आलं. १८ फेब्रुवारी १८७९ ते २९ मे १८७९ ह्या कालखंडात यांनी रोजनिशी लिहिली होती. ती आता अभ्यासकांच्या सोईसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

कुठं पनवेलच्या शीवेबाहेरचं हिरव्यागार वृक्षात गुरफटलेलं शांत गाव शिरढोण नि कुठं अरबी समुद्राच्या पलीकडल्या वालुकामय तीरावरचं रखरखीत, खडकाळ निष्पर्ण शहर एडन ! वासुदेव बळवंतांची घोर फरफट मात्र शिरढोणपासून थेट एडनपर्यंत, म्हणजे जन्मापासून थेट मृत्यूपर्यंत झाली. माणसं जातात. मग ती धोपटमार्गी असोत की झपाटलेली







[illegible]

[illegible] [illegible] [illegible] [

तेव्हापासून माझं आयुष्य आमूलाग्र बदलून गेलं. माझ्या चुलत्यांच्या घरी मी माळ्यावर एकटाच बसलो होतो. प्रकृती ठाकठीक होती. पण अचानक मला मृत्यूच्या भीतीनं ग्रासून टाकलं. मला वाटलं मी आता मरणार. अशी भीती मला का वाटली ते मी आता सांगू शकत नाही. त्या वेळीही मला कारण कळलं नव्हतं. मला वाटलं की क्षणात मी मरणार. पण मी वैद्याकडे किंवा वडीलधाऱ्या माणसांकडे धावलो नाही. मला वाटलं की मृत्यूच्या भीतीचा हा प्रश्न माझा मलाच तत्काळ सोडवला पाहिजे. मृत्यूच्या भीतीमुळं मी आत्मकेन्द्रित झालो. मी मूकपणं माझं मलाच सांगितलं, 'अरे, मृत्यू तर आता येऊन ठाकलाच. मरणाचा अर्थ काय? मृत्यू कशाचा होणार आहे? फक्त हा देह मरेल.' तावडतोब मी शवासन घातलं. श्वास रोखून धरला. मी स्वतःलाच सांगितलं, 'पाहा, हा देह आता मृतवत पडला आहे. हे शव उचलून लोक त्याला मंत्राग्नी देतील. देहाची राख होईल. पण देह जरी नष्ट झाला तरी 'अहं' म्हणजेच आत्मा कधी नष्ट होईल? माझा देह आणि माझं आत्मतत्त्व भिन्न नाहीत काय? हा देह आता थंड निपचित पडलेला आहे, परंतु माझी सर्व आत्मशक्ती आतून उचंबळून आलेली आहे. 'अहं' हा शब्द माझ्या रक्तपेशींतून निनादत आहे. तेव्हा, 'अहं म्हणजेच आत्मा' तो जन्ममरणांच्या फेऱ्यातून मुक्त असतो. देह मर्त्य आहे. शरीर मरतं; आत्मा अमर आहे. मृत्यू त्याला स्पर्श करू शकत नाही. अहं म्हणजे अमर आत्मतत्त्व.'

तेव्हापासून रमण विरक्त झाले. त्यांचं खेळावरून, अभ्यासावरून, खाण्यापिण्यावरून चित्त उडालं. ते सारखे ध्यानस्थ बसू लागले. घरात कटकटी सुरू झाल्या. परीक्षेत नापास झाले. भाऊ रागावून म्हणाला, 'अशी थेरं करणारानं घरात कशासाठी रहावं? दाही दिशा मोकळ्या आहेत की!' असले अनेक टोमणे रमणांनी आजवर पचवले होते. पण आज जाग्रती आली. तो शनिवारचा दिवस होता. २९ ऑगस्ट १८९६ ही तारीख होती. रमणांनी विचार केला की भाऊ म्हणतो त्यात तथ्य आहे! आपण संसारात कशासाठी गुरफटून रहायचं! रमणांना अचानक अरुणाचल डोंगराची आठवण आली. जणू अरुणाचलानं रमणला हाक मारली. रमण गुपचूप घराबाहेर पडला. भावानं ते पाहिलं. भाऊ म्हणाला, 'जातो आहेस तर ते माझ्या खिशातले पाच रुपये घे नि परस्पर माझी फी भर पाहू.' रमणला हाही शकुनच वाटला! कारण अरुणाचलाला आगगाडीनं जाण्यासाठी तीन रुपये पडत होते. रमणनं त्या पाच रुपयांतले तीन रुपये स्वतःसाठी प्रवासखर्च म्हणून घेतले व दोन रुपये ठेवून त्यानं घर कायमचं सोडताना भावाला चिठ्ठी लिहिली, 'ज्याने मला जन्म दिला त्या जगन्नाथाच्या शोधात मी त्याच्याच आज्ञेवरून निघालो आहे. ही एका शुचिर्भूत पर्वाची सुरुवात आहे. म्हणून माझ्या जाण्याचा कुणी शोक करू नये. माझा शोध घेऊ नका; त्यासाठी नाहक पैसा खर्चू नका. तुझी फी भरली नाही. दोन रुपये शिल्लक उरले ते ठेवले आहेत.' ह्या चिठ्ठीखाली रमणांनी सही केली नाही. ह्याचं कारण त्या क्षणापासून ते स्वतःला विवक्षित व्यक्ती न मानता, चराचर व्यापून राहिलेल्या परमेश्वरी तत्त्वाचा अनामिक अंश त्रयस्थपणं मानू

लागले. रमण स्वतःच्या देहाचा 'मी', 'माझं' असा उल्लेख न करता 'तो', 'त्याचं' असे अलिप्ततादर्शक उल्लेख करू लागले.

कमालीचे कष्ट सहन करून तरुणपण-विरक्त रमण अरुणाचलावर पोचले. तिथं त्यांनी कसलीही तमा न बाळगता घोर तपश्चर्या केली. त्या तपश्चर्येचा आश्चर्यजनक तपशील मॉमनं लिहिला आहे. पाश्चात्य वाचकांना त्याचं कौतुक वाटेल. हिंदूंना ते सामान्य प्रकरण वाटेल; कारण तपोनिष्ठाला यातना सहन कराव्याच लागतात, देह वाळवावाच लागतो, नातेवाईक आणि हितचिंतक त्याला परावृत्त करण्यासाठी पराकाष्ठेचा प्रयत्न करतात पण त्यांच्याकडे कठोर मनानं पाठ फिरवावी लागते, ह्याचे लक्ष दाखले आपण पुराणकथांमधून ऐकलेले असतात. रमणांची आई त्यांना जंगलात भेटायला गेली. रमणांनी तिला ओळखही दिली नाही. इतके ते जगापासून मनानं अलिप्त झाले होते. ती पुढं तिथंच मुलाजवळ राहिली. रमणांनी तिला सांगितलं, 'फक्त तूच नव्हेस तर जगातल्या सर्व स्त्रिया माझ्या माता आहेत.' तिच्या मृत्यूनंतर रमणांच्या भक्तांनी तिथं वृंदावन बांधलं. गणेशशास्त्री, पलाईस्वामी नावाचे व्युत्पन्न भक्त त्यांना लाभले. ह्या गणेशशास्त्र्यांना रमणांनी झोपेत साक्षात्कार देऊन आपल्याकडे बोलावून घेतलं होतं. रमणांची साधना चमत्कारांनी बहरलेली आहे. त्यांनी कपड्यांचा, केसांचा, जानव्याचा त्याग केला. फक्त एक लंगोटी लावीत. ते सतत ध्यानस्थ असत. त्यांना साप, विंचू डंख करीत, पण त्यांचं चित्त विचलित होत नसे. समाधिसुखात ते तल्लीन असत. भीक मागून मिळेल त्या अन्नावर ते समाधान मानीत. पुढं पुढं त्यांची आई सर्व भक्तांसाठी शिधा रांधी. रमणांचा धाकटा भाऊही शिष्य झाला. त्यानंही संन्यास घेतला. आपल्या आईच्या वृंदावनाच्या दर्शनासाठी रमण रोज खेप टाकीत. पुढं ते कायमचेच तिथं मुक्कामाला आले. तिथं मुळात काहीच नव्हतं. मग भक्तांनी आश्रम बांधून दिला. पण रमण दान स्वीकारीत नसत. आश्रमात एकदा चोर आले. भक्त भयभीत झाले. रमण भक्तांना म्हणाले, 'त्यांचं कर्म त्यांना करू दे. तुमचं कम तुम्ही करा. त्यांच्या कर्मात लुडबुडण्याचं आपल्याला काहीही कारण नाही.' एवढं बोलून रमण शिष्यांना घेऊन आश्रमातून शान्तपणं बाहेर पडले. चोरांनी आश्रम लुटला, पण काहीही मिळालं नाही म्हणून भक्तांना यथेच्छ बडवलं. त्यातच रमणांच्या मांडीवर मार बसला व ते तेव्हापासून लंगडू लागले. ह्या धक्काबुक्कीत एका भक्तानं पळून जाऊन पोलिसाला बोलावून आणलं त्या वेळी रमण शांत स्वरात भक्तांना आध्यात्मिक प्रकरणाचा उलगडा करून देत बसलेले होते. रमणांना लोक त्यांची अद्वैतात पूर्णपणं रमलेली वृत्ती पाहून महर्षी म्हणू लागले. त्यांच्या आश्रमात अस्पृश्यांना विशेष उमाळ्याची वागणूक मिळे. महर्षी त्यांच्यावर विशेष अनुग्रह करीत. स्वतः स्तोत्रं रचणं, दुसऱ्यांनी केलेली स्तोत्रं ऐकणं, पोथ्यांचे अर्थ उलगडून सांगणं, उपदेश करणं, पत्रावळी लावणं, अन्न शिजवणं, अशी अनेक कामं महर्षी स्वतः करीत. बहुधा ते मूकव्रतीच असत. तासन्तास ते समाधिस्थ असत. प्राणि-जगतावर त्यांचा खास लोभ होता. कुत्र्यांना तर ते आश्रमाची अपत्यंच समजत. पक्षी

त्यांच्या खांद्यावर बसत. त्यांच्या हातचं खात-पीत. माकडांचा आणि मधमाशांचाही महर्षींवर फार जीव होता. सर्प त्यांच्याजवळ येत. सर्व सृष्टीलाच जणू महर्षींनी अभयदान दिलं होतं.

महर्षी पहाटे तीनला उठत. नित्यकर्म उरकून पहाटेस ते मंचकावर ध्यानस्थ बसत. सहा वाजता भक्तांना त्यांचं दर्शनसुख लाभे. सात वाजता ते तांदळाची पेज पीत. महर्षी नंतर सभागारात येऊन व्याघ्रांबरावर बसत. लेखन करीत. त्यांनी खूप रचना करून ठेवली आहे. नंतर रसोड्यात भाजी चिरत. भांड्यांची घासपूस करीत. हातात धरायच्या काठ्यांना पुसून चकचकीत करणं हा त्यांचा एक छंदच होता. अकरा वाजता ते हलकी न्याहारी घेत. मग थोडी विश्रान्ती. तीनला पुन्हा हलका फराळ. नंतर दर्शनोत्सुक मंडळींची रांग लागे. तो विधी संपला की ध्यान. दिवेलागणीला जेवण. नऊ वाजता झोप. असं साधं, सरळ, शांत, शुचिर्भूत जीवन अखेरपर्यंत चाललं. महर्षी निर्मम होत चालले. लोक त्यांना भगवान म्हणू लागले. पण भगवान झाला तरी म्हातारपण त्याला थोडंच सोडणार होतं? देह तर विसावणारच होता. भगवान रमणमहर्षींच्या त्या अखेरच्या काळाचं मॉमनं फार मनोज्ञ वर्णन केलेलं आहे. ते मॉमच्याच शब्दांत मांडतो :

'महर्षींचं पिकलं पान झालं. ते सत्तरीला टेकले. बराच काळ त्यांनी कोंदट गुहांमधून काढला होता. त्यामुळं संधिवाताचं दुखणं त्यांना जडलं होतं. त्यांची दृष्टी अधू होऊ लागली. अठ्ठेचाळीस सालाच्या अखेरीस त्यांच्या डाव्या खांद्यावर एक गाठ दिसली. गाठीचं रूपान्तर ठणकणाऱ्या फोडात झालं. ते गळू कापावं लागलं. जखम भरून निघाली. पण थोडा वेळ उलटतो न उलटतो तोच दुसरी गाठ दिसू लागली. कॅन्सरचं निदान ठरलं. दुसरी शस्त्रक्रिया आवश्यक वाटू लागली. सर्जन म्हणाले की, महर्षींना वाचवायचा फक्त एकच मार्ग आहे— तो म्हणजे खांद्यापासूनच त्यांचा हात तोडण्याचा. महर्षींनी सक्त नकार दिला. मंद स्मित करीत ते म्हणाले, 'गडबडून जाण्याचं काहीच कारण नाही. देह हीच एक व्याधी आहे. तिचा नैसर्गिक शेवट होऊ दे. आपण देहाला छिन्नविच्छिन्न कशासाठी करायचं?' त्यांची प्रकृती फार खालावली. रोग आटोक्यात यावा म्हणून लोकांनी जंग जंग पछाडले. मधूनच त्यांना गुणही आला. नंतर आणखी एक गळू टरारून आलं. आणखी एक शस्त्रक्रिया झाली. नंतर दंडाखाली आणखी एक गाठ आली. नंतर ती भरभर सुजली. तेव्हा मात्र डॉक्टरांनी हात टेकले. फक्त वेदना कमी करण्याचे औषधोपचार सुरू झाले. महर्षींनी भयानक वेदना सोसल्या, मात्र वेदनांपासून ते अलिप्त झाले. ह्या सर्व दुखण्यात आपण जणू त्या गावचेच नव्हेत असे ते वागले. औषधोपचार करून घ्यायला त्यांनी संमती दिली ती केवळ शिष्यांना बरं वाटावं म्हणूनच. ते म्हणाले, 'विचारलंत तर आजवर जे सांगत आलो आहे तेच पुन्हा सांगेन, की कसल्याही औषधोपचाराची ह्या देहाला गरज नाही. गोष्टी आपण होऊन बडतील तशा घडू द्यात.' आपल्या एका इमानी शिष्याला ते एकदा म्हणाले, 'आपलं जेवण झाल्यानंतर ज्या केळीच्या पानावर जेवलो ते खरकटं पान आपण तसंच ठेवतो

काय ?' दुसऱ्या एका वेळी ते त्याला म्हणाले होते, 'ठरल्या ठिकाणी बोजा नेऊन उतरवला की हेलकऱ्याला जसा आनंद होतो तसाच आनंद देहाच्या जंजाळातून सुटल्यावर ज्ञानी माणसाला होतो.'

ही जीवघेणी व्याधी दोन वर्षं टिकली. ह्या पर्वात त्यांना शक्य होतं तितका काळ त्यांनी आपली दैनंदिन कामं चोख उरकली. सूर्योदयापूर्वी एक तास ते स्नान आटपत. भेटायला येणाऱ्या भक्तांना ते नंतर दर्शन देत. त्यांच्या खालावलेल्या प्रकृतीची बातमी सर्व भारतभर पसरली. शेकडो भक्तगणांची रीघ लागली. त्यांचा एकाहत्तरावा वाढदिवस नेहमीप्रमाणं पूजाअर्चा होऊन साजरा झाला. भक्तांनी त्यांच्या सेवेसाठी म्हटलेली स्तोत्रं त्यांनी ऐकली. अरुणाचल मंदिराचा हत्ती दारात आला. महर्षींना त्यानं प्रणिपात केला. जरासा थांबला. मग आपल्या सोंडेनं महर्षींच्या पावलांना स्पर्श करून त्यानं त्यांचा निरोप घेतला. महर्षी आता फार काळ जगत नाहीत हे उघड होतं. एकदा त्यांना छाती भरून आल्यासारखं वाटलं. डॉक्टर आले. परंतु महर्षींनी त्यांना परतून लावलं. महर्षी म्हणाले की, 'आता थोड्याच अवधीत सर्वकाही यथास्थित होईल; औषध पाण्याची गरज नाही.' नंतर त्यांनी भक्तांना निरोप घ्यायला सांगितलं. त्यांना एकान्तवास हवा होता. त्याच दिवशी संध्याकाळी दर्शनासाठी गर्दी करून बसलेल्या आपल्या भक्तांना त्यांनी गादीवरून पडल्या-पडल्याच आपले अखेरचे आशीर्वाद सांगितले. सूर्यास्ताच्या सुमाराला त्यांनी आपल्याला ध्यान करण्याच्या पवित्र्यात बसविण्यास सांगितलं. तसं ते बसले. त्यांच्या समोरच्या खोलीत बसून भक्तगण महर्षींची अरुणाचल स्तोत्रं गाऊ लागले. त्यांच्या गालांवरून आनंदाश्रू वाहू लागले. हृदयाची धडधड थंडावली. महर्षी एकान्तात विलीन झाले ! त्याच क्षणी आकाशात एक धूमकेतू उगवला. क्षितिजावर चढत चढत तो नेमका अरुणाचलगिरीच्या माथ्यावर आला आणि अदृश्य झाला. लाखो लोकांनी तो चमत्कार पाहिला. एका महान आत्म्याच्या निर्वाणाशी त्यांनी त्याचा संबंध जोडला.'

घायाळतळ अश्विनी

मुंबई म्हणजे घाई, गर्दी, गोंधळ आणि गोंगाट. तिची घोंघावणारी दक्षिण हद्द कुलाब्याच्या आर. सी. चर्चपाशी संपते. तिथून पुढं विलक्षण शांत, विनवर्दळीची प्रसन्न मुंबई सुरू होते. पाच पावलं अलीकडे येऊन म्यूझियमच्या चौकात उभं राहिलं तर पलीकडे दक्षिणेला निवान्त, रम्य असा मुंबईचा काही मोकळा भाग असेल याची कल्पनाही येत नाही. पण आहे; आर. सी. चर्चच्या गेटापलीकडे, रानात तळं असावं तसा लष्करी वसाहतीनं व्यापलेला अगदी नीरव नि शांत, मोकळा असा वाऱ्याचा टापू आहे. खूप मोठी मोकळी मैदानं आहेत. त्यांच्या कडेला प्रशस्त दगडी इमारती आहेत. त्यांचा तोंडवळा लष्करी परंपरेशी मिळताजुळता आहे. उंच वाढलेली वडाची झाडं आहेत. प्रशस्त सडका आहेत. वर निळंभोर आभाळ आहे. ऐन मुंबईत आभाळाकडे कुणाचंच लक्ष जात नाही. कुलाब्याच्या दांडीच्या या खडकाळ परिसरात प्रथम लक्ष जातं ते आभाळाच्या निळ्या विस्तीर्ण घुमटाकडे. आभाळाचा इतका मोठा तुकडा इतर कुठंच हाताला लागत नाही आपल्या. इथं त्याचं ते निळं सोंग आपल्या सोबतीलाच असतं.

ती सोबत घेऊन मी सडक तुडवीत एका लष्करी गेटापाशी येतो. गेटाला खेटूनच एक आंबा आरपार मोहरून आला आहे. माझं लक्ष त्या दाणेदार तांबुस मोहरानं खेचून घेतलं आहे. गेटापलीकडे गर्द झाडीत झाकलेल्या दगडी इमारती आहेत. पांढऱ्या सफेत गणवेषातल्या नर्सेसची धावपळ इमारतीच्या कॉरिडॉर्समधून चाललेली आहे. ढकलगाड्या, ॲम्ब्युलन्स गाड्या, स्ट्रेचर्स— सर्व काही दिसतंय. हे इस्पितळ आहे हे कुणी वेगळं सांगण्याची गरजच नाही. पण ती असो अगर नसो. पाटी लावलेलीच आहे— I. N. H. S. ASVINI.

अश्विनी हे नौदलाचं इस्पितळ मुंबईतच कुठं तरी आहे, इतपत ओझरती माहिती होती. नावही वर्तमानपत्रात भेटायचं. अलीकडे तर वारंवारच. एकदा वाटलं ही नौदलाची तरंगती नौका बंदरातच कुठं तरी नांगरून ठेवलेली असेल आणि तिच्यावर नौदलाचं

तरंगतं इस्पितळ असेल. ती कविकल्पनाच ठरली. कुलाब्यातल्या जमिनीवरल्याच एका इस्पितळाचं ते नाव आहे. फक्त ते नौदलाच्या अखत्यारीत असल्यामुळं त्याला इंडियन नेव्हल हॉस्पिटल शिप अश्विनी, असं नौकासदृश नाव दिलेलं आहे. देहूरोड, खडकी वगैरे भागात जशा उग्र भासणाऱ्या लष्करी इमारती आहेत, तशाच हव्या प्रशस्त आणि गार इमारती आहेत. लांबून त्यांची भीती वाटते. पण तशा त्या घरेलू आहेत. कुणाही नागरिकाला गेटावर रीतसर परवाना काढून आतल्या रुग्णांना भेटता येतं; रुग्णांपाशी धीराचे चार शब्द बोलून त्यांना दिलासा देता येतो; नव्हे, आपल्यांतला माणूस अजून शिल्लक आहे याचा दिलासा घेता येतो.

वाटाड्यानं चुकून मला थेट अश्विनीच्या गच्चीत नेलं! त्याचे पुनःपुन्हा आभार. कारण त्यामुळंच सभोवारच्या निसर्गाचं विहंगम दर्शन अनायासं घडू शकलं,— जे एरव्ही केवळ दुष्प्राप्यच आहे. एका बाजूला मावळतीच्या उन्हाचा तवंग अरबी सागराच्या गढूळ फाळावर पसरलेला आहे. इमारतीच्या पिछाडीला खडकाळ चौपाटी आहे. दुसऱ्या अंगाला गर्द झाडीत झाकलेली निर्मनुष्य मैदानं आणि बराकी आहेत. गच्चीच्या वर आजूबाजूच्या झाडांच्या गच्च फांद्या डोकावल्या आहेत. त्यांच्या हिरव्या जर्द पर्णराजीत पोपटांची वस्ती आहे.

मी जड मनानं खाली येतो. इस्पितळातले प्रशस्त गाळे कॉलेजच्या जुन्या दगडी इमारतीतल्या वर्गाच्या प्रशस्त खोल्यांसारखे ऐसपैस नि काळोखी वाटतात. एक गोष्ट मात्र जिवाला दिलासा देते. ती म्हणजे, नाताळच्या सणाची संधी साधून रुग्णांना भेटायला येणाऱ्या मंडळींनी सर्व गाळ्यांना रंगीबेरंगी तोरणं बांधली आहेत. कलाबुतीनं मढवलेल्या हिरव्या रंगाच्या 'ख्रिसमस ट्री' कोपऱ्यात उभ्या केल्या आहेत. एरव्ही, इतरत्र इस्पितळांत असतं तसंच मन नाउमेद करणारं वातावरण आहे. घायाळ जवान अंगावर पांघरुणं ओढून घेऊन दुतर्फा खाटांवर पडले आहेत.

दुःख, विषाद एकाच्याही चेहऱ्यावर नाही! पण मी पाहतो आहे, चौदा दिवसांच्या प्रतापी युद्धाचा जबर तडाखा प्रत्येकाला बसला आहे. बहुतेकांच्या पायांना इजा झाल्यामुळं गुडघ्याखालच्या नळकांड्यापासून पाय कापले आहेत.

'तुमचं नाव काय?'

'जाधव.'

'कुठले राहणारे?'

'कोल्हापूर.'

'पायाला काय झालं?'

'सुरुंग लागला. मी पायदळात जवान आहे.'

'सुरुंग कसा असतो?'

'हपीसर लोकांच्या टेबलावर टाचण्या टोचायचं पिन-कुशन असतं ना, तसा त्या आकाराचा लहानसा सुरुंग असतो.'

'तो जमिनीत पुरून ठेवतात?'

'नाही, जमिनीवर नुसता टाकून ठेवतात. दगडधोंडे जमिनीवर जसे पसरलेले असतात, तसेच सुरुंगाचे गोळेही पसरून ठेवलेले असतात. त्यांना पाय लागला की स्फोट होतो आणि पाऊल घोट्यापासून निखळून तरी पडतं, किंवा त्याच्या चिंध्या तरी होतात. तत्काळ माणूस बेशुद्ध पडतो. खरं म्हणजे नेमकं काय झालंय ते कळतच नाही. सबंध अंग रक्तानं माखून निघतं.'

'तुम्ही नीट जपून पावलं का टाकली नाहीत? सुरुंग ओलांडून जायचं की पाय वाचला असता तुमचा.'

'आगेकूच रात्रीची करताना पावलं सुरुंगावर पडतात. रात्री मिट्ट काळोखात पायाखालचं काय दिसणार?'

'आगेकूच करताना समोरून शत्रूचा गोळीबार होईल अशी धास्ती वाटत नाही?'

'छे! धास्तीचं काय काम? आम्हांला समोर शत्रूचा तळ दिसत असतो. संगिनी रोखून त्यांच्यावर चाल करीत राहायचं एवढंच आपलं काम.'

'तुम्हाला नेमक्या कुठल्या दिशेनं आगेकूच करायची आहे हे कसं कळतं?'

'प्रत्येक तुकडीबरोबर वायरलेस सेट घेतलेले जवान असतात. ते अधिकाऱ्यांशी सतत दळणवळण ठेवत असतात. शत्रू नेहमी वायरलेस सेट निकामी करण्यासाठी गोळीबार करीत असतो. तो चुकवायचा.'

'नुसतं पायदळच आगेकूच करीत असतं?'

'तो एक व्यूह रचलेला असतो. पण बहुधा पायदळच मुलुख पादाक्रान्त करीत पुढं पुढं जात असतं आणि त्यांच्यावर विमानं संरक्षणासाठी तरंगत असतात. समोर शत्रूचे रणगाडे असतात. विमानं त्या रणगाड्यांवर झेप घेऊन जोरदार बॉम्बफेक करतात.'

'पायदळांच्या डोक्यावर आपली विमानं किती उंचीवर असतात?'

'अगदी जवळ असतात. कधी कधी चाळीस-पन्नास फुटांवरही घोंघावत असतात. प्रचंड आवाज होत असतो. आम्हांला त्यांच्या सावलीत पुढं पुढं जायचं असतं. आम्ही आमचा दारूगोळा घेऊन आगेकूच करीत असतो.'

'तुमच्या जेवणाखाणाची काय सोय असते?'

'प्रत्यक्ष लढाई चालू असताना जेवण-खाण कुणाला सुचणार? जे काही हाती लागेल ते आम्ही तोंडात कोंबतो. सुकं तर सुकं; ओलं तर ओलं.'

'तरीसुद्धा सैन्याची म्हणून काही व्यवस्था असेलच.'

'असतेच. जेव्हा आम्ही आगेकूच करतो, तेव्हा मागं स्वयंपाक रांधणारं पथक असतंच. ते भराभर खंदक खणतात आणि खंदकात चुली पेटवून रात्रीच्या वेळी पोळी-भाजी तयार करतात.'

'रात्री का?'

'कारण दिवसा-उजेडी स्वयंपाक केला तर शत्रूला धूर दिसेल आणि तो गोळी-

बार करील. रात्री खंदकात जेवण केल्यामुळं आगीच्या उजेडाचे किरण लांबून दिसत नाहीत. म्हणून आघाडीवरला स्वयंपाक रात्रीच्या काळोखातच तयार होतो.'

'आघाडीवर प्रकाशबंदी सक्त असेल, नाही?'

'साध्या सिगरेटचा झुरका रात्रीच्या काळोखात मारला तरी ठिणगीचा नेम टिपून शत्रू समोरून गोळी सोडतो! मग प्रकाश दिसला तर काय होईल?'

'पाय दुखतो आहे?'

'थोडासा. पण चार-आठ दिवसांत बरा होईल.'

'घरी मंडळींना कळवलंय?'

'नाही. निष्कारण त्यांची धावपळ होईल.'

ही सारी उत्तरं एकाच जवान जाधवाची नाहीत. अनेकजण एकाच वेळी बोलत होते, त्याची ही गोळाबेरीज आहे. जायबंदी झालेले जवान अनेक आहेत. पण त्यांच्या धमन्यांतल्या रक्ताची रग एकच आहे. डरपोक कुणीच नाही. बहुतेक पश्चिम आघाडीवर जखमी झाले आहेत. जखमी झाल्यावर मागच्यांनी त्यांना ट्रकमध्ये घातलं, सरहद्दीमागं प्रथमोपचार केले. आता अवघड शस्त्रक्रियांसाठी अश्विनीत आणलं आहे. सर्वांवर उत्तम औषधोपचार झालेले आहेत, होत आहेत.

प्रत्येक खाटेजवळ मी विचारपूस करीत हिंडतो आहे. बहुतेकजण पंजाबी आहेत. सर्वांच्या खाटेशेजारी बारकेसे कपाट आहे. कपाटावर जेवणाच्या चकचकीत थाळ्या आहेत. एखादं फळ आहे. शुभेच्छा-कार्ड आहेत. मी ती कार्ड पाहतो. मुंबईतल्या शाळा-कॉलेजांतल्या मुलांमुलींनी अनामिक जवानांना ती अगत्यानं पाठविली आहेत. अनेकां-जवळ माझ्यांना हाकलून देण्याचे पंखे आहेत. पन्नास-साठ जवानांपैकी फक्त एकजण वाच-नात गर्क आहे. त्यातल्या ओळींवरून ते बहुतकरून धार्मिक पुस्तक असावं. आणखी एकाच्या शेजारी गीता आहे. एकाच्या हातात हिंदी कादंबरी आहे. विव्हळणं वगैरे अजिबात नाही. मात्र एक जवान डोक्यावरून गरम पांघरूण ओढून घेऊन उपडा पड-लेला आहे. आपल्या वेदना इतरांपासून लपवून ठेवण्याची त्याची ती धडपड पाहून मी सुन्न होतो.

'तुमचं नाव काय?'

'भट्टाचार्य.'

'कुठं जखमा झाल्यात?'

'दोन्ही दंडांत मशिनगन्सच्या गोळ्या घुसल्याहेत.'

'दुखतंय?'

'नाही.'

'भीती वाटते?'

'भीती काय म्हणून वाटेल? ही काय पहिली वेळ थोडीच आहे? मी तीन युद्धं पाहिली आहेत. डरनेसे क्या होगा?'

'बरं झाल्यावर पुन्हा पलटणीत जाणार?'

'घेतलं तर जाणारच.'

'तुम्ही कुठं लढत होता?'

'बांगला देशात.'

'काय अनुभव आला?'

'पाकिस्तानी सैनिक फारच क्रूर आहेत. ते हालहाल करून मारतात. त्यांनी बाया-बापड्यांना नागवं करून कोंडून ठेवलं. आमच्या तुकडीतल्या शीख जवानांनी त्यांना अब्रू राखण्यासाठी आपले फेटे दिले!'

'तुम्ही काय केलंत?'

'पुरेपूर ठोक दिला एनिमीला.'

'आणि, तुम्ही कुठले?'

'बेळगावचा.'

'तुम्हाला कुठं लागलंय?'

'पोटात.'

'गोळी काढली?'

'गोळी नव्हती. बॉम्बचा तुकडा पोटात घुसला.'

'दुखतंय?'

'त्या वेळी जाम कोसळलो. आता बरं आहे.'

'बरं झाल्यावर पलटणीत जाणार?'

'दोन वर्षांसाठी गेलंच पाहिजे.'

'म्हणजे?'

'माझी तेरा वर्षांची सेनेतली नोकरी झालेली आहे. आणखी दोन वर्षं काम केलं की पंधरा वर्षं पुरी होतील. सेनेत पंधरा वर्षांच्या सर्व्हिसनंतर पेन्शन मिळू शकतं.'

'तुम्ही पेन्शनीत जाणार तर.'

'हो. आमची जमीन आहे. मुलंही हातातोंडाशी आली आहेत. तेव्हा आपण आपले घरी जाणार नि शेती करणार शांतपणं.'

'काही हरकत नाही. तेही देशाचंच काम आहे.'

घायाळ रुग्णांची चौकशी करीत मी हिंडतच आहे. काही जवानांच्या भोवती त्यांच्या गरीब नातेवाइकांची कोंडाळी आहेत. कुणाचेच कपडे धड नाहीत. सगळेच गावाकडचे खेडुत वाटतात. पण बहुतेकांनी येताना केळी, मोसंबी आणली आहेत. एका पाय तुटलेल्या जवानाजवळ त्याचे म्हातारे आई-वडील बसलेले आहेत. तो जखमी पाय दाखवून त्यांना काही तरी समजावून देतोय. चेहऱ्यावर विषादाची अस्पष्ट छटासुद्धा नाही. आई-वडिलांचे डोळे सुकलेले आहेत. मला त्यांच्याकडे फिरकवत नाही. पण कुठं तरी मला खोलवर खात्री वाटते आहे, की हा बेटा लाकडी पाय जोडून पुन्हा कामाला लागणार!

असे सुमारे शंभरेक आहेत. कुणाकुणाशी म्हणून बोलणार ? काय बोलणार ? सर्वांच्या वेदनांची भाषा एकच आहे. एनिमीची मान मुरगळण्याची सर्वांनाच तहान लागली आहे. एक सिंधी म्हातारी बाई सर्वांच्या समाचाराला आली आहे. ती एका जवानाला सांगते आहे, ' दादाची इच्छा असेल तसं होईल. माझा मुलगा वासष्ट सालच्या लढाईत शत्रूच्या हल्ल्यातून वाचून परत आला आणि युद्ध संपल्यानंतर विमानतळावर विमानाचा पंखा लागून गेला ! '

काळोखाचा खिन्न पक्षी अश्विनीच्या अंगणात उतरत आहे. जड अंतःकरणानं मी बाहेर पडत आहे. मी घराकडे निघालो आहे— मन मागं ठेवून. वर आभाळात पौर्णिमेचा प्रफुल्ल चंद्र उगवला आहे. आकाश उजळलं आहे. मात्र मला कशातच काही रस वाटेनासा झाला आहे. मी हा जो इतका सुरक्षित आहे, त्या सुरक्षिततेचा संदर्भ काय आहे, हा प्रश्न मला छळतो आहे. लष्करी छावणीतल्या शांत सडकेवर गोंधळलेला मी मुंबईच्या गोंधळात एकरूप होत आहे. हे शंभरेक घायाळ त्या तिथं दूरवर काळोखात होते म्हणून मी या चांदण्यातून हात हालवीत घरी सुखरूप परतू शकतो आहे, याचं भान मला आलं आहे.

गँग

सेवादलाकडे पाठ फिरवून पकडलेली माझी नेव्हीतली सोन्यासारखी नोकरी मी आपखुषीनं सोडली, असं जे मी सरसकट सर्वांना सांगत असतो, ते सर्वस्वी खरं नाही. नेव्हीतल्या नोकऱ्या छान असायच्या. इतरांना शनिवारी अर्धा दिवस सुट्टी असे. रविवारी सबंध दिवस. नेव्हीचा एक पाय पुढं होता. बुधवारीही नेव्हीत अर्धा दिवस नोकरी असे. हेतू : कमांडर लोकांना बुटांना, बकलांना पॉलिश लावायला भरपूर वेळ मिळावा; खरेदी करायला मिळावी. कारण नेव्हीवाले सदान् कदा सफरीवर असायचे. शिवाय नेव्हीत पगारही पाच-दहा रुपयांनी चढा असे आणि कॅन्टीनमधल्या वस्तू कमालीच्या पडत्या भावात मिळत. उदा.— कॅडबरीचा बार अवघ्या तीन आण्यांना मिळायचा, आणि सिंगापुरी कोकोचा मोठा डबा दहा आण्यांना. पाच आण्यात मासळी–भाताचा डीग मिळायचा. तो रगड व्हायचा. अशी ती नामी नोकरी. ती मिळावी म्हणून मंडळी नवस बोलायची. बशिले लावायची. मग अशी नवलाख नोकरी मी आपखुशीनं कशी सोडणार ? शिवाय कुणालाही फुलं न बांधता ती मला मिळालेली होती. राऊत नावाचा दुधासारखे सफेद कडे घालणारा माझा मित्र होता. त्यानंच माझा अर्ज खरडला आणि नेव्हीत हाती नेऊन दिला. नंतर मी इंटरचा शेवटचा पेपर एलफिन्स्टन कॉलेजात लिहीत बसलो होतो, तिथं तो उगवला. मी पेपर टाकून चहासाठी बाहेर पडणार इतक्यात तो म्हणाला, ' चल, नोकरीला लाग.' मी म्हटलं, ' कुठल्या ? ' तर म्हणाला, ' नेव्हीतल्या. नोकरी तयार आहे. अजून दीड वाजायचाय, ते दीड वाजेपर्यंत माणसं घेतात. तू चल.' मी गेलो. नाही म्हणायचं कारणच नव्हतं. इंटरव्हयू-बिंटरव्हयू कुणीही घेतला नाही. मी कामावर रुजू झालो. पटावर सही केली.

युद्ध संपल्यानंतरचे दिवस असल्यामुळं नेव्हीत शुद्ध आनंद होता. काम म्हणून कसं ते कुणालाच नसे. रुपयातला पंधरा आणे स्टाफ बिगरमराठी होता. बहुसंख्य केरळी होते. त्यांच्याशी बोलायचं म्हणजे इंग्रजीत. ते लफडं नको म्हणून आम्ही मराठी मंडळी

आपल्याआपल्यांतच असू. गोडबोले, विद्वांस, गुप्ते, वडके, देवधर, वगैरे. तीच आमची गॅंग. आमचं छान चाललं होतं.

जुन्या चर्चगेट स्टेशनाबाहेर नेव्हीचा एक अजस्र बोडका ट्रक उभा असायचा. आम्ही लोकलवाले त्यात चढायचे. सगळे आले की ट्रक चित्त्याच्या वेगानं कुलाब्याच्या दांडीकडे निघायचा. स्ट्रॅंड सिनेमाच्या पलीकडे माणसांनी फिरकायची तेव्हा रीतच नसायची. गर्द झाडी, हिरव्या पारंब्या, हिरवीगार मैदानं आणि मिलिटरीच्या बराकी, असं कुलाब्याचं रूप होतं. पाहावं तिथून दोन हातांवर समुद्रपाणी दिसे. पाखरं सलगी करीत. पटावर सही ठोकली की आमची गॅंग खडकावर बसायला बाहेर पडे.

पायापाशी फेसाळणाऱ्या स्वच्छ सागरलाटा. बसायला तुळतुळीत खडक. डोक्यावर प्रसन्न उन्हं, आणि चौफेर उदंड निश्चिंती. असे माझे गॅंगमधले दिवस फार छान चालले होते.

एक दिवस वडक्यानं मला एकट्याला गाठला. कॅंटिनमध्ये नेऊन ग्लासभर चहा पाजला. वर एका पैशाची 'पासिंग शो' सिगारेट दिली नि म्हणाला,

'पिंगे, तुला हल्ली काय मिळतं?'

'साडेब्याऐंशी रुपये.' मी छाती फुगवून सांगितलं.

'तुला सांगतो, तुला शंभर मिळण्याचा चान्स जमून आलाय; पण तू जरा धाडस दाखवलं पाहिजेस.'

दरमहा शंभर रुपये म्हटल्यानंतर माझ्या डोक्यात वाफ–वाफ झाली हे नाकारण्यात अर्थ नाही. पदवीधरांना रेशनिंगमध्ये पासष्ट मिळत. बॅंकेत साठ. रेल्वेत साडेबावन्न. पोस्टात पन्नास. तेही मोठ्या मुष्किलीनं. त्यामानानं मला इंटरवाल्याला शंभर म्हणजे साक्षात चंद्राच्या दिशेनं उड्डाण होतं. मी नाही म्हणणारच नव्हतो. क्षणात मला माझ्या घरचा परिसर आठवला. बाबांची पाच मैलांवरची शाळा. आम्ही सात भावंडं. सगळी शिकणारी; आणि महागाईनं तर अंत पाहिलेला. सहा आणे शेरवाल दूध चक्क दहा आणे शेरावर गेलेलं; आणि दोन आण्यांची राइस-प्लेट सरसकट चार आणे झालेली. सगळीकडे भाव भडकलेले. फक्त पारश्यांची ट्रॅम कंपनी तेवढी सत्त्वाला जागलेली होती. त्यांचा 'कुठंही जा—एक आणा' दर जागच्या जागी होता. बाकी सगळीकडे लोक शंख करीत होते. लंचसाठी घरचा पोळी–भाजीचा डबा न्यायची पद्धत सुरू होत होती. इराण्याकडचा 'पावणा चहा, अर्धा बुनमस्का' जवळजवळ नामशेष झाला होता.

'शंभर रुपये? कसं काय शक्य आहे बुवा?' मी विचारलं.

'तेच तुला सांगतो. ऑडिटरची एक जागा सॅंक्शन झालीय. पगार शंभर. मेननसाहेब तुझ्यावर डॅम खूष आहे. तुलाच ती मिळेल!'

'मेनन माझ्यावर कशाला खूष असेल?' मी आश्चर्यानं विचारलं.

'तुझं अक्षर!'

हे ऐकल्यावर मीच माझ्यावर खूष झालो. त्या काळात माझं अक्षर खरंच

लफ्फेदार होतं !

'पण तू जरा धाडस कर. तू त्रागा कर मेननजवळ, नि प्रमोशन मिळणार नसेल तर मी राजीनामा देतो म्हण. मग तो विरघळेल नि आपोआप तुला प्रमोशन मिळेल!'

'मला पटलं. वडके खरा शक्कलबाज! मी पांढरा स्वच्छ कागद घेतला नि त्याच्यावर माझा राजीनामा लफ्फेदार अक्षरात लिहून काढला. तो कागद घेऊन वडके मेननकडे गेला. वेळ संध्याकाळची होती.

दोन मिनिटांत मेननकडून मला वर्दी आली. मी छाती पुढं काढून गेलो. मेननसाहेब म्हणाले,

'सो यू आर रिझायनिंग ? ऑल राइट, आज संध्याकाळपासून तुला मी सेवामुक्त केलाय. आमच्या सर्वांच्या शुभेच्छा. यू मे गो!'

माझ्या पायाखालची भूमी दुभंगली तर बरं, अशी वेळ आली. मी धावाधाव केली. वडके कुठंच दिसेना. सगळ्या बराकी धुंडाळल्या, पुन्हा पुन्हा धुंडाळल्या, वडके नाही तो नाहीच! बरं, इतरांना कुणाला मध्यस्थी करायला घालीन म्हटलं तर जो तो आपापला पोळी-भाजीचा डबा घेऊन परतीचा ट्रक पकडायच्या तयारीत!

संध्याकाळी ठीक पाच वाजता माझ्या नेव्हीतल्या नोकरीची अशी अवसानघातकी समाप्ती झाली.

नंतर अवघ्या दोन दिवसांनी मला दिव्य ज्ञानप्राप्ती झाली की माझ्या रिकाम्या झालेल्या जागेवर वडकेनं आपल्या धाकट्या भावाला लावून घेतला!

मीही विचार केला, असले दीडदमडीचे गळेकापू भिडू जिथं आहेत त्या गॅंगमध्ये राहण्यात काय अर्थ आहे ? थूः त्यांच्यावर!

नंतरचे माझे दिवस कसोटीचे गेले. पोस्टात सॉर्टर्स घ्यायचे आहेत म्हणून कळलं. जी. पी. ओ.त गेलो. तिकडे नन्ना! फक्त एका खिडकीत वा. रा. ढवळे तेवढे ओझरते दिसले!

भाइंदरच्या पुलाखाली मिठागरांमध्ये जकात-कारकून घ्यायचेत म्हणून कळलं. तिकडे सकाळी आठपासून संध्याकाळी पाचपर्यंत उन्हात तळप-तळप तळपलो. पाणीही न पिता. पण इंटरव्हयू घेणारा सर्कल इन्स्पेक्टरच उगवला नाही! दुसऱ्या दिवशी परत नेटानं गेलो. पुन्हा तोच प्रकार! शेवटी भाइंदरच्या मिठागरांना सुक्या गळ्यानं नमस्कार केला आणि पाठ वळविली.

त्या काळात अमेरिकेहून तांबडा मिलो यायचा. खंडीवारी. सर्वजण झक मारत त्याच्याच चपात्या खात. मिलोचे ते अमेरिकन डोंगर ठेवायचे कुठं ? म्हणून बोरिवलीच्या परिसरात सिमेंटचे घुमट बांधायचं घाटत होतं. तिकडे कुठं चान्स मिळतो काय ते पाहायला म्हणून लोकल पकडली. ती गोरेगावच्या जंगलात अडकून पडली. पुढंही जाईना की मागंही हटेना. एक तास गेला, दोन तास गेले. चार तास गेले. गाडीचं गोरेगाव एके गोरेगाव चालू होतं. शेवटी वैतागलो. उडी मारून उतरलो. गोरेगावचं जंगल तुडवून

काढलं. सगळीकडे घाण नि गोठे. उग्र दर्प. शेवटी निर्णय घेतला की ज्या नोकरीच्या नमनालाच इतका अपशकुन ती नोकरी आपल्याला काय यश देणार हे दिसतंच आहे.

तोही नाद सोडला.

आठ दिवस नोकरीसाठी नुसते हेलपाटे मारण्यात गेले. खिशात पैसा नाही अशी स्थिती. मी निर्णय घेतला, घरात जास्त वेळ ठरायचं नाही; आपलं ओझं दुसऱ्यावर नको. निदान पुढं-मागं तशी भावना व्हायला नको. सकाळी आंघोळीपुरतं घरी यायचं, चहा झाल्यावर बाहेर बाहेर राहायचं. शक्य तोवर जेवण बाहेर काढायचं.

पण कसं?

ह्या मोक्यावर मला रेडकर भेटला. म्हणाला,

'डरू नकोस! आपली गँग आहे. इतके आहेत, त्यात तू. बाबूलाल चिक्कार श्रीमंत आहे. तो आपल्या खिमा-पावाचा खर्च करतो. आपल्याला त्याचं बॉदरेशन नाही. आपण आपलं गँगमध्ये एकमेकांना सांभाळून राहायचं!'

'पण गँगमध्ये राहून काय करायचं?' मी विचारलं.

'तू अगोदर यायला तर लाग, मग पाहू काय करायचं ते.'

मला खुमखुमी आली. म्हटलं हे छान आहे. गँगबरोबर राहायचं. बाबूलालच्या पैशांची खिमा-रोटी खायची. काम नाही, हजेरीपट नाही, काही नाही. आणि आपलं ओझं घरच्यांवर पडतंय ही रुखरुखही नाही. म्हणजे अवघा आनंदी आनंद की.

गँग चौपाटीच्या बँडस्टँडवर जमे. मी गेलो तेव्हा सर्वजण आलेले होते. त्रिलोकेकर होता, प्रभ्या होता, रेडकर तर होताच. शिवाय जॉनी होता. सनीही होता आणि कालू होता. माझी कुणीही कुणाला ओळख करून दिली नाही. मी आपोआप त्यांचा झालो. ते मला माझे वाटले, सर्वांनी नॅरो बॉटम पँटी घातलेल्या होत्या. शर्ट बाहेर सोडले होते. त्या वेळची ती फॅशन होती. पावलापाशी आवळत गेलेल्या चिंचोळ्या पँटी आणि आत न खोचून घेता पुढे बाहेर सोडलेले लांब हाताचे शर्ट्स्. पायांत पठाणी सँडल्स, डोळ्यांवर रे बानचा हिरवा गॉगल. इतक्या भांडवलावर हीरो होता येई. निदान आम्हाला तसं वाटे.

रेडकर म्हणाला, 'चला, आपण राउंड मारू या.'

'म्हणजे काय करू या?' मी विचारलं.

'राउंड म्हणजे रात्रीची चक्कर. इथून बाबुलनाथाच्या पायथ्यावरून केंप कॉर्नरकडे जायचं. तिकडून वळून गवालिया टँकवरून नाना चौकात उतरायचं. तिथून केनेडी ब्रिज, मग ऑपेरा हाउस. ऑपेरा हाउसच्या आयलंडमध्ये चहा मारायचा नि मग मध्यरात्री घरोबर परतायचं!'

'एवढा मोठा राउंड रोजच्या रोज मारायचा?'

'अरे यार, तू आमच्याबरोबर येऊन तर बघ. मग घरी जायची गोष्ट काढणार नाहीस!' रेडकर म्हणाला.

रेडकरची बत्तिशी खरी ठरली. त्या काळी मलबारहिलचा पायथाही अगदी शांत

असे. कडेवरच्या हिरवळीचा सुगंध रस्त्यावर येई. मोटरी क्वचित कधी येत. एरवी शुक-शुकाट असे.

गँगमधले सगळे जवान होते. त्रिलोकेकरचं माधवबागेत घर होतं. घरी वडील, सावत्र आई आणि ढबूस बहीण होती. वडिलांना पेन्शन होती. तेवढ्यात त्रिलोकेकर कुटुंबाचं भागे. बहीण बसल्या बसल्या शिवणकाम करी. महिन्याचे दहा–बारा रुपये मिळवी. तिच्या वेणी–फणीचा खर्च त्यामुळं परस्परच भागे. त्रिलोकेकर साहजिकच चिंतामुक्त होता. मला एकदा म्हणाला होता, 'माझ्या बापाजवळ रग्गड पैसा आहे; पण बाहेर काढीत नाही. मला बॅरिस्टर करायची ॲम्बिशन होती त्याची, ती काय पैसा असल्याशिवाय ?'

त्रिलोकेकरनं पाचवीत फ्रेंचला घाबरून शाळा सोडलेली होती.

खुद्द रेडकरला मॅट्रिकचा फॉर्म मिळालेला नव्हता. तो केळेवाडीतल्या गोखले हेड-मास्तरांना बोल लावी. सांगे, 'त्यांच्या नव्या कोऱ्या डगल्यावर साली कुणी तरी शाई उडवली. त्यांनी माझ्यावरच डूक धरला. फॉर्म नाही म्हणजे नाहीच दिला ! पक्का कोब्रा रे तो !'

बॉयलर रिपेअर करण्याच्या एका वर्कशॉपमध्ये रेडकर अर्धा वेळ काम करी. सकाळी नऊ ते दुपारी दीड. पगार तीस रुपये, त्यात त्याची खानावळ आनंदाने सुटून वर चैनीसाठी दहा रुपये उरत.

कालू काळाकुट्ट होता. त्याचं नाव वेगळं असणं शक्य आहे. रंगावरून तो मद्रासी वाटे. होता पंजाबी ख्रिश्चन. सिनेमात एक्स्ट्रॉचं काम मिळवायसाठी तो जलंधरहून आला होता. सिनेमाची तिकिटं ब्लॅकमध्ये विकून तो पोट भरी. डोअरकीपर्सच्या आश्रयानं थिएटरमध्येच राही. दिसायला मात्र तो तरतरीत होता; आणि त्याचे केस दोन वीत लांब होते.

सनी बहिणीच्या घरी राही. बहीण डान्सिंग स्कूलमध्ये बॉल-डान्सर होती. ती वीत भर उंचीचे ठोकळ्यासारखे बूट घाली आणि कसरत केल्यासारखी लुटूलुटू चाले. एकदा मी तिला कुलाब्याला ऑस्ट्रेलियन सोल्जरच्या हातात हात घालून चालताना पाहिलेली होती. पण तसं स्पष्टपणं बोलून दाखवायची माझी प्राज्ञा होत नव्हती. कारण सनीच्या खिशात नेहमी घाव असायचा. घाव म्हणजे सुरा.

प्रभ्या आणि जॉनीत काही अर्थच नव्हता. ती पाप्याची पितरं होती. प्रभ्याचे डोळे पिवळे होते. जॉनीच्या गालाचे द्रोण दिसत होते.

हे सगळे होते आणि बाबुलालही होता. बाबुलाल निदान मला तरी शिंपी वाटला. तसा तो नव्हता हा भाग वेगळा. वयानं चाळीस असेल नसेल. किडकिडीत. तलम पार-दर्शक धोतर. बाह्यांचा स्वच्छ गंजीफ्रॉक. त्यावर मलमलचं मुंडीछाट खमीस. डोक्यावर गांधी टोपी. गळ्यात सोन्याची चेन. खमीसाला लाल धाग्यात गुंफलेली सोन्याची बटणं, हातात सोन्याची अंगठी. मी पुन्हा पुन्हा विचारी, 'अहो, तुम्ही करता काय ?' उत्तर

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ
२२३७६
दा. क. निषेध

ठरलेलं असे, 'बिझिनेस.'

बिझिनेस असो वा नसो, बाबुलालची चलती होती यात शंका नाही. कारण कधी तो आमच्या सगळ्या गँगला भेळ खिलवी. कधी 'किंग'कडला 'अर्धा खिमा स्लाइस' आम्हां सगळ्यांना स्वत:च्या पैशानं वाली. वेळेला तीत तीन रुपये बिल झालेलं मी पाहिलेलं आहे; पण बाबुलालनं कधी पाय मागं घेतला नाही. आम्ही पोटभर खावं–प्यावं ही त्याची खरीखुरी इच्छा असे. एकदा त्यानं दोन व्हिक्टोरिया केल्या नि आम्हांला महालक्ष्मीला नेऊन उडदाच्या डाळीची बोरासारखी वाटोळी भजी खायला घातली. मला वाटतं, त्यानं त्या रात्रीत आमच्यासाठी दहा तरी रुपये उडविले असले पाहिजेत. एकदा तर त्यानं कमालच केली. त्रिलोकेकरांच्या माधववागेतल्या घरी त्यानं आम्हांला कोंबडीवडे खायला घातले. सर्व खर्च बाबुलालनं हौसेनं केला. ते दिवस नवरात्रानंतरचे होते. रात्री स्वच्छ, नीरव असतं. बाबुलाल म्हणाला, 'दिवाळीची आधली रात्र आपण त्रिलोकेकरांकडे चंगळ करून काढू; तुम्ही रात्र जागवायच्या तयारीनं जमा. मी सगळा खर्च करीन.'

आम्ही गेलो. म्हातारे त्रिलोकेकर पानाचा खलबत्ता पुढ्यात घेऊन बसलेले होते. आम्हांला पाहताच हसून म्हणाले, 'तुम्ही आजकालचे छोकरे कसलं लाइफ एन्जॉय करता कर्माचं! आम्ही नवरात्रापासून दिवाळीपर्यंत झोपलेलो नाही. रोज रात्री पार्ट्या, कुत्प्या; पण आता सगळंच बदललं. कोंबडीचं कौतुक करावं लागतंय. आमच्या वेळी आठवड्यातून दोनदा तरी भरली कोंबडी असेच. आम्ही लाइफ खूप एन्जॉय केलं; तुम्हांला कल्पना येणार नाही. माधववागेपासून चिरेबाजारापर्यंत प्रत्येक घर आमचं परभांचं होतं. ही मुंबई आमची हाय!'

मुंबईचे मालक असलेल्या परभू त्रिलोकेकरांच्या माडीवर आम्ही गँगवाल्यांनी मनसोक्त कोंबडी हाणली.

आमच्या गँगवर बाबुलालचा कंट्रोल होता. कारण आमचा वरकड खर्च तोच करी. कालूला बिडीकाडी लागे. बाबुलाल पाच पाच रुपये त्याला देई. सनीला बिअरची हुक्की येई, पैसे बाबुलाल मोजी. रेडकरचे आजोबा आरवलीला कोकणात होते. सणासुदीला त्यांना पाच रुपयांची मनिऑर्डर लागे. बॉयलरवाला थोडेच ते पैसे देणार होता? बाबुलाल आपखुषीनं रेडकरची नड भागवी. अशा परोपकारी बाबुलालवर गँगवाले का लट्टू नसतील? व्यक्तिश: मला त्याची दिडकीही लागत नसे. पण मला लॅमिंग्टन रोडवरला खिमा फार आवडे. त्यात वेलदोडे असत, त्यामुळं स्वाद मस्त खुले. हे सर्व खरं; पण द्रव्य कुठून आणायचं? अशा वेळी मी बाबुलालच्या वाटेकडे डोळे लावी. तो नवसाला हमखास पावे. न मागता खिमापाव देई!

असे आम्ही एकमेकांना धरून होतो. रात्रीच्या वेळी रस्त्यात नुसतं निरुद्देश भटकणं हे आमचं काम. आम्ही आतूनच अस्तरासारखे एकमेकांना जोडले गेलो. लहानसहान गरजा उद्भवत. त्या आम्ही एकमेकांच्या कलानं भागवीत असू. कुणाला कडक

इस्त्रीचा शर्ट हवा असे. कालू आपल्या अंगावरचा शर्ट प्रभ्याला देई, आणि प्रभ्याचं काही रेशनिंग कार्डाचं काम निघालं तर जॉनी लायनीत उभं राहून ते आनंदानं करून देई. असे आम्ही एकमेकांना धरून होतो.

मला सारखा एक प्रश्न सतावी : अरे, हा बाबुलाल कुणाचा कोण आणि आम्हांला खुषीत का ठेवतो ?

एक दिवस प्रभ्यानं मला एकट्यालाच सांगितलं,

'साला विट्वीन यू अँड मी हं. त्रिलोकेकरांच्या बहिणीचं नि बाबुलालचं काही तरी आहे. त्याचा कपड्यांचा बिझिनेस आहे नि ती त्याचे कपडे शिवून देते. तो ते झांजिबारला पाठवितो. अरे, शिवाय त्रिलोकेकरचं घर चाललंय ! पण हे बोलायचं नाही हं. नाही तर बाबुलाल सनीला सांगून तुझा काटा काढून टाकील. सनी साला घाववाला आहे. तुला माहीत आहे नं, सनीवर मर्डर चार्ज होता. एका पठाणाला खतम केलान् ; पण मॅजिस्ट्रेट त्याचा जातवाला निघाला. त्यानं त्याला सोडविला, तरी पण तो जेलमध्ये जाऊन आलायच. पोलिस स्टेशनवर फोटो आहे त्याचा !

गँगमध्ये मला बसलेला हा पहिला धक्का. तरीही गँगमध्ये मी होतोच; पण चिमूटभर भीतीही वाटायला लागली. न जाणो, पोलिसांनी राउंड अप केलं तर ? मग शाळेत बाबांची स्थिती काय होईल ?

एक दिवस रेडकर म्हणाला, 'साला, तकदीशिवाय सगळं फुकट आहे रे. साली, मोठमोठ्यांची पोरं मोटरी घेऊन पोरींवर लायनी मारतात. कुठं काय जमतंय त्यांना. बापांनी कमवायचं नि ह्यांनी उडवायचं. तोच आपला कालू बघ. साला ब्लॅकवाला माणूस. कोण आहे त्याला ? काय आहे त्याच्याजवळ ? पण त्याच्यावरसुद्धा पारशीण भाळली !'

थक्क होऊन मी विचारलं, 'म्हणजे ? खरं सांगतोस ?'

'खोटं वाटत असेल तर जॉनीला विचार. कालू साला सेंट्रलच्या बाहेर गॉगल लावून उभा असायचा. पारशाची ती पोरगी शाळेतून परतताना त्या रस्त्यानं जायची. बस्स. फक्त इतकाच संबंध. कालूला काहीही करावं लागलं नाही. फक्त सेंट्रलपासून पाववाला स्ट्रीटपर्यंत फॉलो केला न् जमवलं. आहे की नाही ? तिच्या बापाला कळल्याबरोबर त्यानं तिला नवसारीला बोर्डिंगात घातली. काल् चारसोबीस. तो नवसारीला विदाउट टिकिट जाऊन तिला भेटून यायचा ! बोल ! ती पारशीण, हा ब्लॅकवाला. पंजाबी खिश्चन; पण कुठं काय आड आलं ? नाही तर हे साले कॉलेजकुमार ! बाप कमावतोय नि हे उडवतायत !'

कॉलेजकुमारांचं सोडा, आपणही नशीबवान नसल्याचं माझ्या लक्षात आलं. आतल्या आत खट्टावलो. विचारलं,

'हे लोक इतके जिगरबाज कसे रे ?'

'जिगरबाज ?' रेडकर म्हणाला, 'तुला पाहायचंय काय ? तू म्हणशील त्या

पोरीवर हे हात टाकू शकतात. त्यात त्यांना इंटरेस्ट नाही हे वेगळं; पण एरवी आपले गँगवाले काय वाट्टेल ते करतील. तू फक्त 'किंग'कडे खिमा-पाव द्यायचा नि वर एक बर्कले.'

'मला त्यांचं एक डेमॉन्स्ट्रेशन बघायचंय!'

'ठीक आहे. सनीला सांगू या. तो तिथल्या तिथं तुला पराक्रम करून दाखवील. अरे, एवढा पोलिस-स्टेशनवर फोटो लागलेला माणूस तो; पण कधी कुणाला डरलाय काय?'

रेडकरनं सनीला माझी मनीषा सांगितली. सनी मुक्त हसला नि म्हणाला, 'व्हॉट इज देअर? उद्या साडेसहाला केंप कॉर्नरजवळ जमू या. वुई विल मेक फन.'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता रेडकर, सनी आणि मी असे तिघेजण केंप कॉर्नरजवळ उभे राहिलो. मी हातात काळीज घेऊन.

संध्याकाळ झालेली होती. काळोख चांगलाच उतरला होता. मलबार हिलच्या पायथ्याचा तो भाग जवळजवळ निर्मनुष्य होता.

समोरून एक शांत दिसणारी शाळकरी मुलगी आली. सनी सावध झाला. तिच्या काहीच लक्षात आलं नाही. ती जवळ आल्याबरोबर सनी तिला म्हणाला,

'हॅलो, डोन्ट यू रेकग्नाइज मी?'

ती क्षणभर गोंधळून उभी राहिली. भानावर येण्याची तिला संधी न देताच सनीनं क्षणात तिचा भर रस्त्यात मुका घेतला.

आम्ही धूम पळालो. तिच्या शिव्या मला चांगल्या ऐकू आल्या. रेडकर म्हणाला, 'त्या शिव्या नव्हत्या रे. काही तरीच तुझं.'

सनी, रेडकर आणि मी नाना चौकाला वळसा घालून लॅमिंग्टन रोडवरल्या 'किंग'मध्ये स्थिरावलो. दोन प्लेट खिमा-पाव मागवले आणि तिघात वाटून खाल्लं. त्या दोघांना बर्कले दिल्या. खुषी केली.

त्यानंतर मी गँगवर कधीच गेलो नाही. त्यांनीही हा का येत नाही अशी चौकशी केली नाही. आमचे प्रवास समांतर नव्हते.

माझी गँग सुटली.

योगायोगानं त्याच्याच मागं-मागं नगरपालिकेच्या निवडणुका उपटल्या. याद्यांचं काम मारे जोरात सुरू झालं. मी म्युनिसिपाल्टीत चिकटलो. यातायात न करता. सुखेनैव.

नोकरी मिळाल्यामुळं माझं घर मला पुन्हा एकदा परत मिळालं. फावल्या वेळात मी बी. ए.चा अभ्यास सुरू केला. अर्थशास्त्रावरची पुस्तकं उघडली.

योगायोगानं त्याच्याच आगं-मागं मी लिहायलाही प्रारंभ केला, आणि ते चक्क छापूनही यायला लागलं!

इथून माझ्या डोक्यात गॅस जायला सुरुवात झाली. वाटू लागलं, अरे, आपण

स्वतःला लेखक म्हणवतो अणि लेखक मंडळीत ऊठबस करीत नाही, हा काय प्रकार आहे ? अशानं मागं पडू नं.

केळेवाडीतल्या तेव्हाच्या त्या छप्परवाल्या साहित्य संघाच्या गेटावर लेखकांची एक गँग असे. मी त्या गँगच्या आत-बाहेर करू लागलो. फार मजा यायची. त्या काळात आचार्य दादा धर्माधिकाऱ्यांची आणि आचार्य भागवतांची लेखक मंडळीत मोठी जबरदस्त वट होती. ते दिसायचे. ढेपाळलेले पार्श्वनाथ अळतेकर यायचे. हातभर केस वाढवलेला पोरसवदा पाडगावकर दिसायचा. त्या काळातसुद्धा पां. वा. गाडगीळ थकलेले, उतरलेले दिसायचे. वा. ल. भलतेच स्मार्ट दिसत; आणि माधव मनोहरांच्या तोंडातल्या चिरूटामुळं आणि हातातल्या लठ्ठ ग्रंथांमुळं निदान मी तरी त्यांना मराठी वाङ्मयातले विन्स्टन चर्चिल समजत होतो ! त्यांच्याशी बोलायची प्राज्ञा नसे.

पुढे भीड चेपली. मी गँगमधलाच एक झालो. पहाटे उठून कॉलेज करायचं. दुपारी हाती असेल ती नोकरी करायची, आणि संध्याकाळी साहित्य संघाच्या गेटावर गँगच्या अवती भोवती झुलायचं, हाच माझा नित्यधर्म झाला. मी सुखी होतो. अर्थात सगळ्या चेलेचा असा खुर्दा होत असल्यामुळं माझ्या लेखनाला टाळं बसलं. पण आपण लेखकांच्या गँगमध्ये आहोत ह्याचा अभिमान आणि आनंद उदंड होता, प्रभाकर पाध्यांनी गेटावर 'काय पिंगे, कोकणातलं पत्रबित्र आलबतं काय ? परवा नानासाहेब गोऱ्यांनी आठवण काढलीबती तुमची,' असं नुसतं म्हटलं तरी दोन घास जास्ती जात.

असे ते गँगमधले मलईदार दिवस.

आता वीस पंचवीस वर्षांचा काळ वाहून गेलेला आहे. माझ्या हातात एथिल मॅनिनचं 'स्टोरीज् फ्रॉम माय् लाइफ' आहे. तिनं लिहिलं आहे :

"अड्डा नाक्यावरच असतो असं नाही. तो कुठंही असू शकतो. अनेकदा तो घाबरलेल्या मनामध्येच असतो.

अड्ड्यावर जाऊन ड्रिंक्स पिऊन अखेर काय मिळतं ? तिथं आपण एकमेकांना चांगलं म्हटलं आणि समोर नव्हते त्यांची ऐशीतैशी केली, त्यामुळं काय साधलं ?

समजा, आज मी जर अड्ड्याला दांडी मारली असती तर घरी बसून निदान चार परिच्छेद तरी लिहिले असते. जे अड्ड्यावर आले नाहीत ते आपापल्या घरी बसून शांतपणं लिहिताहेत. बावभर पुढं सरकताहेत. जे लिहितील तेच पुढं जातील. कुणी अंगुळभर, कुणी मैलभर; पण त्यांचे रथ सदाचे दौडत जातील हे निश्चित. त्यांच्या भरधाव रथाच्या धुरोळ्यात गुरफटलेले आम्ही अड्डेवाले,— कुणाला दिसू तरी काय ? आमचं काय होईल ? अखेर अड्ड्यांचं काय होतं ?"

ह्या समेपाशी मी थांबलो आहे. पुस्तक मिटून बाहेर पाहिलं. संध्याकाळ उतरत आहे.

एथिल मॅनिनच्या विचारधारेच्या संदर्भात मी माझ्याच कमाईच्या हिशेबाला बसलो आहे. दुसऱ्याचे संदर्भ आपल्या आयुष्यात गैरलागू ठरतात, हे काय मला कळत नाही ?

सारं काही ठीक कळतं. आणि हेही कळतं की माणसाला अखेर हिशेबाला बसावंच लागतं. निःस्पृह उत्तराकडें निघतानाचा प्रवास मात्र मन झाकोळणारा आहे. जो जो विचार करावा तो तो खिन्नच वाटत जातं.

हिप्पींचा सहवास

पणजी.

दहा-बारा हिप्पी तरुण-तरुणी बोटीवर चढल्या. कदाचित ते सगळेच हिप्पी नसतील. काही नुसते हौशी बांड प्रवासी असतील. पण दिसतात एकाच माळेचे मणी. त्यांचे गडद रंगी चटेरीपटेरी मळकट कपडे, पिंजारलेल्या पिंगट जटा, वाढलेल्या दाढ्या, पाठीवरली आटोपशीर बिऱ्हाडं, चंट अवतार, आणि भरीला एकानं खांद्याला अडकवलेला गाबठी पखवाज आणि दुसऱ्याच्या खांद्यावरलं माकडाचं मोकळं पोर, हया सर्वांच्या मिश्रणामुळं प्रथमदर्शनी तरी तमाम मंडळी हिप्पी वाटली. सगळेच जवान होते. एकानं उडुपी पद्धतीनं गुडघ्यापर्यंत जांभळ्या फुलांची रंगीत लुंगी पेहेनली होती. वर उघडाबंब. एकाचा खादीचा मळलेला लेंगा. वर बिनबटणांचं हिरवंजर्द मुंडेछाट जाकीट. दोन तरुणींपैकी एकीनं भलताच पारदर्शक सफेत चिंचोळा लेंगा घातला होता. वरती काळ्या रंगाची सैल चोळी होती. गुटगुटीत देहभाग यथेच्छ मोकळा. दुसऱ्या तरुणीनं तांबडी लुंगी आणि पिवळा तोकडा कुडता घातला होता. उन्हाची तिरीप अंगावर पडली की त्या दोघांचीही वस्त्रं क्षणात पारदर्शक होत. पण त्यांच्या सवंगड्यांच्या नजरेत कुठं हपाप दिसला नाही. ते सारेजण आपापल्यातच दंग होते. शांत आणि तृप्त. उन्हाची तिरीप अंगावर पडली की त्यांची द्राक्षांसारखी तजेलदार बुबुळं पारदर्शक होत. पण त्यांच्या साथीदारिणींच्या नजरेत चलबिचल झालेली दिसली नाही.

पश्चिमेच्या तुरेदार कुरणात भगंग हिप्पींचं हे पीक अचानक कसं काय उगवलं ? ही तरुण, ताजी पुष्पजमात डामडौलाला आणि भापूगिरीला काट मारून अनवाणी वाटचाल का करू लागली ? त्यांच्यावर अध्यात्माची भूल पडलेली आहे ? विरक्तीचं वारं त्यांच्या मनावरून अखंड वहात असतं ? पाखरांसारखे ते सदा अलिप्त-अलिप्त का असतात ? दिल्लीचे दिलीप पाडगावकर फ्रान्समधल्या हिप्पींबद्दल एकदा म्हणाले होते, 'फ्रान्समध्ये सुबत्ता भरमसाट आहे. सर्वत्र भरभराट आहे. पण तिथं कुणाचा टिकाव

लागतो ? जो चलाख, चपळ, कार्यतत्पर, आणि वृत्तीनं आक्रमक असून शिवाय चढा-ओढीच्या मामल्यात जो हुशारीनं अग्रक्रम टिकवू शकतो, त्या हिंमतबाजांचंच ते जग आहे. फ्रान्समध्ये नुसती पोटापाण्यापुरती नोकरी करायची म्हटली तरी सकाळपासून थेट संध्याकाळपर्यंत सतत धावपळ करावी लागते. चटपटीत आणि चलाख माणसालाच ते जमतं. दूरदूरवरच्या उपनगरांतून माणसं आगगाडीच्या डब्यातून चेपून, तासन्‌तास प्रवास करीत शहरात येतात. रात्री परततात. इन्‌एफिशिएंट माणसांचं तिथं मरणच आहे. ज्यांना धक्काधक्की जमत नाही ते तिथल्या स्पर्धामय जीवनापासून आपोआपच अलग पडतात. स्पर्धेत टिकू न शकणारे पराभूत भिडू मग पुढं स्वतःत गर्क होतात. निःशब्द होतात. त्यांना कुणाचंच काही देणंघेणं उरत नाही. दोन घास कुठं मिळाले तर जेवा; न मिळाले तर उपाशी राहा, असा त्यांचा खाक्या असतो. रागा-लोभाच्या ते पलीकडे असतात. दुसऱ्याला त्रास न देता आणि जगावर न डाफरता ते नुसते आला दिवस सुखाचा करतात. सभोवतालचं जग विसरून ते पूर्णपणं स्वेछेनं जगतात. तेच हिप्पी.'

व्यक्तिशः मला हिप्पी लोक फार पसंत आहेत. ते कधीही कुणालाही काडीचाही त्रास देत नाहीत. ते एकमेकांवर विधिनिषेधातीत यथेच्छ प्रेम करतात; तरुण तरुणांवर करतात; तरुण तरुणींवर करतात; तरुणी तरुणींवर करतात; तरुणी तरुणांवर प्रेम करतात; सगळे एकट्टा कुत्र्यामांजरांवर, पशुपक्ष्यांवर प्रेम करतात; कुत्री, मांजरं नि पशुपक्षी आपापल्यापरीनं हव्या दोस्त मंडळींमध्ये लुडबुडत असतात. हव्यात उनाडपणा नाही. खरं तर हे अंतःस्थ ताकदीचं काम आहे. पवित्रा न घेता दुसऱ्याला जीव लावणं ही काय साधी गोष्ट आहे ? ते कुणाच्याही आल्यागेल्यात नसतात. कूळ, कुंडली, भूत, भविष्य, जात, गोत, देव, धर्म, देश, वेश, स्पर्धा आणि सत्ता, ही सारी उपांगं त्यांनी चक्क गुंडाळून ठेवलेली असतात. प्रतिष्ठेच्या कल्पनांना फाटा देऊन ते फक्त वर्तमानकाळात अवसानशून्य जीवन जाणतात. तो आनंद भोगतात. दुसऱ्यांनी मळलेल्या चाकोरीतून बळे-बळे दौडत नाहीत. कारण त्यांना कुठंही पोहोचायचं म्हणून कसं ते नसतंच. ते नीतिग्रस्त नसतात. प्रेमिक असतात. पाखरं पाळतात. पायांत पैंजण घालतात. वाद्यं धमाल वाजवतात. गातात. झुरके मारतात. मुके घेतात. उन्हातान्हातून फिरतात. चांदण्यात लोळतात. नाचतात. सदैव अनवाणी चालतात. त्यांच्या आयुष्यातला प्रत्येक क्षण चंद्रोदय असतो. काठोकाठ तृप्त असलेले हिप्पी कुणापाशीही कसलीही याचना करीत नाहीत. त्यांच्यापुरते पैसे त्यांच्यापाशी हमेशा असतात. आणि नसले तरी त्यांचं काही बिघडत नाही. उपाशी राहण्याची आणि त्याचा गाजावाजा न करण्याची अमोघ ताकद त्यांच्यापाशी असते. शिवाय कृपाळू देवानं त्यांच्या पोटांचे आकार कसे आटोपशीर ठेवले आहेत ! स्वतःच्या पोटाचा लहान आकार आणि विश्वाचा अपरंपार विस्तार ज्यांच्या लक्षात आलेला असतो, त्यांच्यावर आपण सदाचेच खुष आहोत.

बोटीवरल्या एका हिप्पीच्या कानात काय वारं भरलं कळत नाही. तो चक्क कमरेत नाचायला लागला. त्याच्या इतर साथीदारांनी त्याच्या चाळ्यांकडे ढुंकूनही पाहिलं नाही.

आम्ही तमासगीर मात्र गोळा झालो. इतक्यात फण्या, उदबत्त्या, गंध, वगैरे विकणारा एक अगदी म्हातारा माणूस डेकवर उगवला. त्या नाचणाऱ्या हिप्पीचं लक्ष त्या म्हाताऱ्यावर गेलं मात्र, आणि झडप घालून त्यानं त्या म्हाताऱ्या विक्रेत्याला गच्च कवेत घेतलं. म्हातारा रडकुंडीला आला, पण हिप्पी त्याला सोडीच ना. उलट म्हाताऱ्याला बगलेत धरून इतरांना तारस्वरात सांगू लागला, 'अरे, हा बघा प्रेषित! अखेर प्रेषित सापडला!' म्हातारा दीनवाणेपणानं गयावया करू लागला, 'सोड रे, माका सोड रे.' पण हिप्प्याचं पालुपद आपलं एकच, 'अरे, बघा– बघा, हश्या प्रेषिताकडे पाहून घ्या!' म्हाताऱ्याची सोडवणूक करण्याची हिंमत कुणाला होईना. आम्ही सगळे नाटक बघत जागच्या जागी ढेपाळत उभे राहिलो होतो. चक्रावलेला म्हातारा गयावया करीत होता. मला तर एकूण चिन्ह भयप्रद वाटलं. हिप्पीचं डोकं पार कामातून गेलं असावंसं वाटलं. इतक्यात डेकवरचा सुटाबुटातला पंजाबी पुढं झाला. पंजाब्याचा आक्रमक पवित्रा पाहिल्याबरोबर क्षणात त्यानं कवेतल्या म्हाताऱ्याला सोडलं. म्हाताऱ्यानं पोबारा केला. मग तो हिप्पी त्या पंजाब्याला कळवळून तारस्वरात सांगू लागला, 'अरे यार, तो प्रेषित होता रे, तो प्रेषितच होता. मी दिल्लीच्या एका पुस्तकात प्रेषिताचं वर्णन वाचलंय, तसाच तो होता. तो प्रेषितच होता!'

आमची छान करमणूक झाली.

त्या हिप्पीनं मग डेकवर झकासपैकी स्पॅनिश टॅप डान्स केला. आमच्या पावलांनी ठेका धरला. मजा आली. पण पुन्हा त्याचा तोल गेला. डेकवर त्या पंजाब्याच्या परिवारातली कुणी तरी तरुण बाई होती. तिच्याजवळ त्यानं नाचत नाचत लघळपणा केला. तिनं चक्क पायतणच काढलं. हिप्पी भडकला. त्यानं खिशातून स्प्रिंगचा चाकूच बाहेर काढला!

आमची करमणूक कोमेजली. डेकवर रौद्रपर्व सुरू झाला. पाच-सहा बघ्यांनी त्याच्यावर क्षणात झडप घातली नि हिप्पीला पुरता लोळवला. प्रथम त्याच्या मुठीतला चाकू काढून घेतला नि मग बुटांनी यथेच्छ तुडवला. बोटीचे अंमलदार धावले. त्यांनी उताणा पडलेल्या हिप्पीला बकोट धरून उभं करून पुन्हा पिटून काढलं. हिप्पी आडवा झाला. एकानं त्याची एक तंगडी धरली. दुसऱ्यानं दुसरी. तिसऱ्यानं एक हात पिरगळून धरला. चौथ्यानं दुसरा हात गच्च पकडला. एका खलाशानं त्याच्या झिंज्या घट्ट पकडल्या आणि पाचही जणांनी आक्रोश करणाऱ्या त्या आडदांड हिप्पीचा पाळणा केला. तेवढ्यात धक्क्यावरून दोन शिरस्त्राणधारी पोलिस धावत वर आले. त्यांनी आल्या आल्याच त्या लोंबकळलेल्या हिप्पीची कणीक यथेच्छ तिंबवली. हिप्पीनं आकान्त केला. पोलिसांनी त्याचं थोबाड फोडलं. त्याला भुईसपाट केलं. मग पुन्हा चौघांनी त्याचा पाळणा करून डेकवरून जिन्यावर, जिन्यावरून धक्क्यावर आणि धक्क्यावरून रस्त्यावर फरफटत नेलं. तिथं पुन्हा त्याची मारपीट केली. चौथ्यांदा फरफटतच नेलं. इतर हिप्पी हे क्रौर्य निःशब्दपणं डेकवरून पाहात होते.

त्याचं पाळलेलं माकडाचं पोर हा प्रकार बघून गर्भगळित झालं. रडू लागलं. एका खलाशानं ते पाहिलं. त्यानं दुसऱ्या खलाशांना हाका मारल्या आणि मालकावरोवर माकडालाही पोलिस चौकीवर पाठवावं म्हणून ते त्या पोराला पकडायला धावले. माकड निसटलं. उड्या मारीत मारीत, शेपूट नाचवीत थेट बोटीच्या डोलकाठीवर चढून बसलं. त्याला खाली बोलविण्यासाठी मग नाना प्रकारची आमिषं सुरू झाली. कुणी केळं देऊ केलं, कुणी शेंगा, तर कुणी पाव. पण डोलकाठीवर ठिपक्याएवढं दिसणारं ते माकडाचं इवलालं पोर ढिम करेना. उलट उंचावरून रडू लागलं. चीत्कारू लागलं. आम्ही सारेजण डोळे किलकिले करून ते कौतुक पाहात होतो. ब्रिजवरून कॅप्टन दुर्बिणीनं पाहात होता. त्याला युक्ती सुचली. त्यानं फर्मान सोडलं. सुकाणूवाल्यानं जोरानं बोटीचा भोंगा वाजवला. मात्रा लागू पडली. ते भयभीत माकड क्षणार्धात खाली उतरलं, आणि डेकवरच राहिलेल्या मालकाच्या पिशवीच्या आडोशाला गुपचूप बसलं.

आम्ही ती औटघटकेची मजा डेकवरून डोळे भरून बघितली नि माकडावर कडी करणाऱ्या दुर्बिणवाल्या कॅप्टनच्या डोकेबाजीची पुन्हा पुन्हा तोंडभर वाहवा केली.

काळ्या चोळीवाल्या हिप्पिणीनं मग त्या माकडाच्या भेदरलेल्या पोराला हृदयाशी घेतलं. गोंजारलं. पण माकडाला तो लडिवाळपणा मंजूर नव्हता. त्यानं त्या स्नेहाळ युवतीलाच खांद्यावर वचावचा बोचकारलं. तिनं धीर सोडला नाही. त्याला खूप बाबापुता केलं. पावाची खाप दिली. बसायला मांडी दिली. पण माकडाचं एक नाही की दोन नाही. ते तिच्या खांद्यावर बसून कण्हू लागलं. मालकाला चौफेर शोधू लागलं. जोरजोरानं चीत्कारीत रडूं लागलं.

तिला ते सहन झालं नसावं. माकडाला कडेवर घेऊन ती थेट वर कॅप्टनकडे गेली. कॅप्टननं तत्काळ माणूस पाठवला. त्या माणसानं डेकच्या पिछाडीचा मोठा थोरला पिंजरा उघडला. हिप्पिणीनं माकड त्या पिंजऱ्यात सोडलं. नोकरानं पिंजऱ्याचं दार लावून घेतलं. कडी-कुलूप केलं. मागं न बघता हिप्पीण शांतपणं आपल्या जागेवर गेली.

बंदिस्त माकडानं पिंजऱ्यात आकान्त केला.

मला तर वाटलं, रडून ओरडून माकड मरणार! त्याचं ते पिंजऱ्यातलं रडणं मला ऐकवेना, की त्याच्या जिवाची तडफड बघवेना. अर्धा तास बधिर चित्तानं त्याची केविलवाणी तडफड पाहिली. शेवटी असह्य झालं तेव्हा ठरवलं, आपलीच जागा बदलायची; माकडाच्या मूक मृत्यूचं हताश साक्षीदार व्हायचं नाही.

सुकाणूवर होता तो बाडबिस्तरा घेऊन थेट नाळेवर गेलो. रात्री नाळेवर कुणीच नव्हतं. मी एकटाच काळोखात चांदण्या मोजीत पडलो होतो. तितक्यात त्या काळ्याकुट्ट अंधारात एक हिप्पी आणि हिप्पीण टपकली. थेट माझ्याच समोर ते जोडपं बसलं. मी क्षणात ताजातवाना झालो. अंधारातल्या त्यांच्या यथासांग क्रीडा बघणं नशिबीच आलं. सलामीचे सारे व्यवहार बाळबोधच होते. काळोख वाढत होता. वाऱ्याला उधाण आलं होतं. तिचे भुरभुरे केस वाऱ्यावर उडताना तशा त्या काळोखातही स्पष्ट दिसत होतं.

त्यानं तिचे भराभर मुके घेऊन तिला तृप्ती दिली. तिनं त्याचे सटासट मुके घेऊन त्याला दिलासा दिला. मला त्यात काडीइतकाही रस नव्हता. असण्याचं कारणही नव्हतं. ह्या फार मामुली गोष्टी आहेत. पण मग थोड्या वेळानं तिनं आपल्या बॅगमधून काही तरी वस्तू काढली आणि एकान्त आणि कडेकोट काळोख माखलेला असतानाही तिनं दोघांच्या डोक्यांवरून एक पांघरूण लपेटून घेतलं आणि आडोशाला काही तरी अगम्य चाळवाचाळव सुरू केली. पांघरुणाआड काय प्रकार चालला असावा त्याचा मला धड अंदाज येईना. बॅगमधून तिनं काढलेली ती वस्तू काय बरं असणार? सगळे तर्क फुकट गेले. अगदीच चैन पडेना, तेव्हा दबकत दबकत चार पावलं बाजूला जाऊन, त्यांना माझी चाहूल न लागेल अशा बेतानं जिवाची शहानिशा करून घेतली. डोक्यावरून ओढून घेतलेल्या पांघरुणात गुरफटलेल्या त्या तरुणीनं हातात हिंगाच्या डबीसारखी एक डबी धरली होती आणि ती जोडगोळी त्या टिचभर डबीतलं काही तरी चाटण एकमेकांना बोटांनी भरवीत होती. माझ्या कल्पनेप्रमाणं ते काही तरी अंमली पदार्थाचं चाटण असावं. ते काळोखातलं रम्य चाटण संपल्यावर मात्र त्या टवटवीत मंडळींनी वेगवेगळे प्रवासी बिछाने तिथंच अंथरले. दोघांच्यामध्ये चांगलं हातभर अंतर होतं.

मी शांत चित्तानं झोपी जायला मोकळा झालो.

सकाळी जाग आल्यावर पाहतो तर ती दुक्कल तिथून नाहीशी झालेली! चक्रावलो.

माकड जिवंत आहे की नाही ते बघायला धडपडत पुन्हा सुकाणूवर आलो. पाहतो तर ते माकड त्या काळ्या चोळीवाल्या हिप्पिणीच्या खांद्यावर बसून मजेत बागडत होतं. दर्यात नजर बुडवून हिप्पीण शांतपणं झुरके मारीत होती. भूतकाळावरून तिनं बोळा फिरवला होता. हा चमत्कार बघून मला हायसं वाटलं. तिचा चिमूटभर हेवाही वाटला. माकडाचा खेळ थोडा वेळ बघितला, इतक्यात सकाळी–सकाळीच कुणी तरी सोडा मागवला. तो गट्ट करून उरलेलं सोड्याचं पाणी त्यानं माकडाला दिलं. माकडानं हिप्पिणीला सोडलं आणि त्या सोड्याच्या पाण्याचा त्यानं चाटूनमाटून मिट्टा केला. नंतर सोडा पिणारं ते अजब लडिवाळ माकड पुन्हा हिप्पिणीच्या खांद्यावर चढून बसलं. हिप्पिणीनं त्याला कुरवाळलं. ते खूष झालं.

एका अलौकिक ग्रंथाचा खडतर प्रवास

एका बाजूनं वैभवाची निखळ प्रसन्नता अणि दुसऱ्या दिशेनं उलगडत जाणारी दैवाची सदाची उफराटी करणी ह्यांचं जगावेगळं संगमस्थान पाहायचं असेल, तर रस्किनसारखं झपाटलेलं चमत्कारिक जीवित दुसरं शोधूनही सापडणार नाही. एकाच वेळी त्यांचं आयुष्य कृतार्थ वाटावं इतकं आतूनच प्रकाशमान होत गेलं. आणि दुसऱ्या बाजूनं, अपयशाच्या काळोख्या दरीत आजन्म वेदना सहन करीत तो नुसत्या दिशा चाचपडत राहिला. त्याचे आजोबा ठार वेडे होते. वडील वेडसर होते. त्याला स्वतःला विमनस्कतेचे अधूनमधून झटके येत. म्हणजे लौकिकवान घराण्याचा अभिमान वाटावा असं त्याच्यापाशी काहीही नव्हतं. उलट मिळू नये तो वारसा त्याला लाभला. परंतु त्याचं कूळ संपत्तिमान होतं. मद्यनिर्मितीचा धंदा त्याच्या घराण्यात पिढ्यान् पिढ्या चालत आलेला होता; आणि धंद्यात बरकत मिळविलेल्या बापाचा तो एकुलता एक लेक होता. त्यामुळं चरितार्थासाठी पैसे मिळवण्याचा खटाटोप त्याला जन्मात कधीच करावा लागला नाही. घरात कडेलोट सुबत्ता नांदत होती. विवंचनारहित ऐषआराम होता, भ्रान्त नव्हती. धनदौलतीचं असं जबरदस्त पाठबळ रकिनला हलाखीचं, ओढग्रस्त जीवन जगणाऱ्या कंगाल लोकांची आठवण झाली आणि त्यांच्या आर्थिक उद्धाराच्या नैतिक वाटा शोधण्याचा त्यानं ईश्वर-साक्षीनं नेट लावला, ही त्याच्या आयुष्याचं सोनं करणारी घटना म्हणावी लागेल. त्याच्या वाट्याला आलेली संपत्ती भोगीत तो ख्यालीखुशालीचं आयुष्य जगला असता, तर त्याला कोण बोल लावणार होतं ? त्याच्या जिंदगीचा तोच मालिक होता, हे तो नीट जाणून होता; आणि म्हणूनच आपल्या अखत्यारीतलं आपलं जीवित काही धार्मिक प्रेरणेतून लाभलेल्या मूल्यांच्या आराधनेत व्यतीत करायचं त्यानं पक्कं केलं. भांडवलदार आणि श्रमिक ह्यांच्या नात्यातलं शोषण अडग काढून तिथं अगत्यशील औदार्याची आणि कल्याणकारी कळकळीची प्रतिष्ठापना करायची त्यानं ठरविलं आणि लेखणी उचलली. आपण एका नव्या धर्मसदृश आर्थिक आचारप्रणालीचे आद्य शंकराचार्य

ठरणार आहोत ह्याची त्याला तेव्हा अंधुकशी कल्पनाही नव्हती. मात्र जेव्हा त्यानं ह्या अंतःस्फूर्त विचाराच्या प्रसारासाठी लेखणी उचलली, त्या उड्डाणाच्या क्षणापासून तो जगातल्या कल्याणकारी प्रतिभावंतांच्या पंगतीला जाऊन बसला. इतिहासाला मंजूर असलेलं रस्किनचं ते उंच स्थान आता अढळ आहे.

थेट कल्याणकारी प्रतिभावंतांच्या प्रभावळीत विराजमान झालेल्या ह्या उदारमनस्क विचारवंताला ऐन सलामीला ज्या विटंबनेला तोंड द्यावं लागलं त्याला तोड नाही.

निसर्गाचा सहवास

ही १८६० सालची घटना आहे. जॉन रस्किन तेव्हा एकेचाळीस वर्षांचा होता. कलाकोविद आणि महान चित्र-शिल्पकृतींचा आस्वादक भाष्यकार म्हणून त्याची कीर्ती जाणकारांच्या वर्तुळात पसरलेली होती. प्रथम त्याचा अभ्यास धोपटमार्गी होता. पण प्लुरसीच्या विकारानं ऐन पंचविशीत गाठल्यामुळं त्यानं पुस्तकी शिक्षणाला टाळं ठोकलं आणि तो बसल्या बसल्या शांत चित्तानं चित्रं रेखाटू लागला. निसर्ग त्याचा बालपणापासूनचाच सोबती होता. अगदी लहानपणापासूनच त्यानं परत परत युरोपातल्या सहली केवळ निसर्गदृश्यांची जादू पाहण्यासाठी काढलेल्या होत्या. तो सगळा कोवळा अनुभव त्याच्या आता कामी आला. तो निसर्गचित्रं काढू लागला. टर्नर ह्या महान निसर्ग-चित्रकाराचा तो भोक्ता होता. टर्नरची महती जगाला पटवून देण्यासाठी त्यानं लेख लिहिले होते, व्याख्यानं दिली होती. 'मॉडर्न पेंटर्स' हे त्याचं चित्रकलेच्या समीक्षेचं पुस्तक जॉर्ज स्मिथ नावाच्या प्रकाशकानं प्रकाशित केलेलं होतं. ह्या जॉर्ज स्मिथनं 'कॉर्नहिल' नावाचं मासिक सुरू केलं. थॅकरेला संपादक केलं. अंक सुरू झाल्यावर रस्किननं आपला लेख संपादकाकडे पाठवला. त्या पहिल्या लेखाचं शीर्षक होतं, "रूटस् ऑफ् ऑनर," म्हणजेच प्रतिष्ठेचं मूळ किंवा प्रतिष्ठेचा पाया. म्हणजेच दूरार्थानं नैतिक अधिष्ठान.

हा लेख वाचून संपादक थॅकरे बिथरला. कारण आजवर कुणी मांडले नव्हते असे विचार ह्या लेखात होते. अत्यावश्यक किंवा तात्कालिक गरज काय आहे ह्याचा विचार बिलकुल न करता, न्याय्य काय आहे याचाच विचार झाला पाहिजे; संपत्ती ह्या शब्दाचा अर्थ धनदौलत असा संकुचित, कोता न करता, सर्व संबंधितांच्या अंतिम कल्याणाची क्षमता असा लावला पाहिजे, निखळ प्रामाणिकपणा हा सर्व व्यवहारांचा पाया झाला पाहिजे, आणि सर्व व्यवहार देवाच्या साक्षित्वाच्या भावनेनं कल्याणमयच झाले पाहिजेत, असे हे धर्मोपदेशकाच्या थाटात सांगितलेले आर्थिक बाबतीतले सूत्रमय विचार आहेत.

हेटाळणीचा धनी

बेदिक्कत नफेखोरीमुळं होणारी भांडवलशाहीची भराभराट प्रत्यक्ष डोळ्यांसमोर दिसत असल्यामुळं, देवाचा हवाला पुढं केलेले रस्किनचे हे विचार ऐकायला त्या

काळच्या इंग्लंडमध्ये कुणी तयार होईना. भांडवलदारानं श्रमिकाला पिळणं, लुबाडणं, निव्वळ नफ्याकडे डोळा ठेवून मालाच्या किंमती आकारणं, हे औद्योगिक क्रांतीच्या त्या काळात गृहीतच धरलेलं होतं. तोच न्याय होता. आपल्या पोळीवर बेशक तूप ओढून घ्या हा त्या काळाचा वेदान्त होता. श्रमाला प्रतिष्ठा हे सात्त्विक शब्द कुणी कधी ऐकलेले नव्हते. साहजिकच, नफेखोरीच्या अंगानं चाललेल्या आर्थिक व्यवहारात अध्यात्म गुंफू पाहणाऱ्या रस्किनची सगळ्या बाजूनं हेटाळणी झाली. "शुद्ध मूर्खपणा", "बावळटपणाचा अर्क", "असह्य वरळणं", ही शेलकी विशेषणं इतर पत्रकारांनी रस्किनच्या लेखांना लावली. एकानं तर लिहिलं, "असला पोरकटपणा छापायला संपादकांना लाज वाटायला हवी होती!"

ह्या तडाख्यानं संपादक थॅकरे हादरला. त्यानं वाचकांची जाहीर माफी मागितली आणि मालिकेतला चौथा लेख जो रस्किन लिहीत होता तोच शेवटचा ठरेल आणि लेखमाला समाप्त करण्यात येईल असं त्यानं आपल्या अधिकारात जाहीर करून टाकलं.

रस्किनला खंत वाटली.

चार छोटेखानी लेखांची ही लेखमालिका संपल्यानंतर दीड वर्षानं रस्किननं त्या लेखांचं "अण्टु धिस लास्ट" हे शंभर पानांचं लहानसं पुस्तक प्रसिद्ध केलं. १८६२ साली प्रसिद्ध केलेल्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यानं लिहिलं, "फार क्रूर मार्गानं माझ्या ह्या लेखांचं प्रकाशन बंद करण्यात आलं, असो. परंतु माझ्या सर्व विचारांचा अर्क ह्या पुस्तकात ग्रथित केलेला आहे. सत्याला स्मरून मी शब्द न् शब्द लिहिला आहे. आजपर्यंत मी खूप लिहिलं. हा कळस आहे. संपत्ती कशाला मानायची याची व्याख्या मी केली आहे. प्रामाणिक कळकळ हा मूलभूत पाया स्वीकारून शासनानं तीन गोष्टी ताबडतोब केल्या पाहिजेत :

(१) प्रत्येक मुलाला शालेय शिक्षण सरकारनं मोफत दिलं पाहिजे. (२) प्रत्येक कामगाराला मालकीच्या कारखान्यात तत्काळ सामावून घेतला पाहिजे. (३) प्रत्येक गरज आणि वृद्ध माणसाला सरकारतर्फे आश्रमीय सुखसोयी पुरवल्या पाहिजेत. चिरकालीन न्यायाकडे पाहून ही कल्याणकारी योजना सादर केली आहे."

श्रमिकांच्या कल्याणाची विशाल दृष्टी ठेवून लिहिलेल्या रस्किनच्या ह्या "अण्टु धिस लास्ट" ह्या पुस्तकाचा उठाव म्हणून कसा तो होईना! पहिली आवृत्ती एक हजार प्रतींची काढली. ती संपायला लेखक-प्रकाशकांना चक्क पंधरा वर्षे थांबावं लागलं! आर्थिक नियमांची तपासणी करणाऱ्या त्या लहानशा पुस्तकात बायबलमधले पन्नास उतारे दिलेले होते! म्हणजे उघडउघड त्या अर्थशास्त्रीय पुस्तकाचा तोंडवळा धार्मिक होता आणि नफेबाजीत धुंद असलेल्यांना त्या विचारांचं सोयरसुतक नव्हतं; उलट वावडंच होतं...

पुन्हा तोच अनुभव

आपल्या विचारधनाच्या झालेल्या ह्या थंड स्वागतानं रस्किन अजिबात कोमे-

जला नाही; त्यानं विचारांचं तेच सूत्र घेऊन त्याच विषयातले आणखी सहा पुरवणी लेख अन्यत्र प्रसिद्ध केले. पण तिथल्या भीरू संपादकानंही वाचकांची सरसहा नापसंती लक्षात घेऊन ते सहा लेख प्रसिद्ध झाल्यावर लेखमाला बंद करून टाकली. पुरवणी पुस्तकाचं नाव आहे 'मुनेरा पलव्हेरीस'. 'अण्टु धिस लास्ट'ची डाळ न शिजल्यामुळं हे पुस्तक बाजारात आणायला कुणी धजेना. शेवटी १८७२ साली ते कसंबसं प्रसिद्ध झालं.

मात्र रस्किनच्या पुस्तकाच्या प्रती जरी हालल्या नाहीत, आणि 'लेखकांची अशी कुचंबणा व्हायला लागली तर सटरफटर आणि वाईट लिहून पैसा मिळविण्याचा मार्गच चांगल्या लेखकांना चोखाळावा लागेल,' असं जरी तो उपरोधानं सर्वांना सांगायला लागलेला होता, तरी त्याचं विचारधन मजल दरमजल करीत एका वाचकाकडून दुसऱ्या वाचकाकडे असं मूकपणं पण निश्चितपणं पसरत चाललेलं होतं. आणि त्याचा प्रभावही वैचारिक जाणत्यांमध्ये जाणवू लागला होता. १९०६ साली, म्हणजे मूळ पुस्तक प्रकाशित झाल्यावर पंचेचाळीस वर्षांनी विल्यम स्टेड नावाच्या संशोधकानं एक चाचपणी केली. त्यात त्याला आढळून आलं की, जगाला उदार विचारांचं दर्शन घडविणाऱ्या अनेक आचारशील जीवनवीरांवर "अण्टु धिस लास्ट" ह्या ग्रंथातील कल्याणकारी विचारांची छाया पडलेली होती. त्यांनी तसा स्पष्ट शब्दांत हवाला तरी दिला होता किंवा त्यांच्या कृतीनं तसा निर्वाळा मिळालेला होता. त्यात महात्मा गांधी, समाजवादी विल्यम मॉरिस, आणि इतिहासतज्ज्ञ अर्नोल्ड टॉयनबी यांचा समावेश होता. महात्माजींचा सर्वोदयाचा सिद्धान्त हाही रस्किनच्या शिकवणीवर आधारलेला आहे, आणि असं थोर विचारधन मराठीत आलंच पाहिजे ह्या हेतूनं आचार्य जावडेकरांनी त्याचा अनुवाद आवर्जून केला. रस्किनचं पुस्तक हे गांधीवादी विचारांची गंगोत्री आहे. त्यात टॉलस्टॉयची उभ्या आयुष्याची सत्यव्रती धडपड मिळवली की गांधीवादी आचार पूर्ण होतो.

इंग्लंडमध्ये मजूर पक्षाची रीतसर स्थापना झाल्यावर त्या पक्षाचे छप्पन्न खासदार पार्लमेंटमध्ये निवडून आले. "तुम्हाला कुठल्या पुस्तकानं सर्वांत जास्त प्रभावित केलं आहे?" ह्या प्रश्नाला त्यांनी जी उत्तरं दिली, त्यांत "अण्टु धिस लास्ट"चा १९०६ साली वारंवार उल्लेख झाला. तिथून बोलबाला सुरू झाला. पुस्तकाच्या आवृत्त्या काढाव्या लागल्या. सामान्यजनांच्या कल्याणाचा मार्ग दाखवणारा ग्रंथ म्हणून रस्किनच्या या ग्रंथाला थोर मान्यता प्राप्त झाली. मात्र हा सन्मान पाहण्याच्या अगोदरच १९०० साली रस्किननं डोळे मिटलेले होते!

लेखकाच्या मृत्यूनंतर ग्रंथाचं भाग्य उजळल्याचं हे एक ठळक उदाहरण आहे. लोककल्याणाचं उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवणाऱ्या अनेक प्रागतिक सरकारांनी रस्किनकडून विचार उचलले. रस्किनची लेखणी कृतार्थ झाली. पण त्याची तहानभूक वेगळी होती. त्याला जीवनवीर व्हायचं होतं. नुसते विचार लिहून मोकळं होणाऱ्यांपैकी तो नव्हता. आपले उदार विचार प्रत्यक्ष आचरणात आणायचं त्यानं ठरवलं. बेचाळिसाव्या वर्षी

त्यानं पुस्तक लिहिलं. बावन्नाव्या वर्षी पुस्तकातले विचार कृतीत आणून दाखवायला तो लेखनवीर कटिबद्ध झाला.

श्रमांची महती

प्रथम त्यानं एक आवाहन प्रसिद्ध केलं. त्यात लिहिलं, " सध्याच्या औद्योगिक भरभराटीमुळं यांत्रिक जीवनाचा ज्यांना उबग आलेला आहे, आणि ज्यांना साधं, सोज्ज्वळ, निरामय ग्रामीण जीवन जगण्याची इच्छा आहे अशा प्रामाणिक मंडळींचा एक संघ मला स्थापायचा आहे. ह्या संघाचं नाव ' सेंट जॉर्जेस कंपनी '. संघाच्या सदस्यांनी आपल्या एकूण मिळकतीचा एक दशांश भाग संघाला अर्पण करावा आणि त्या पैशांतून विकत घेतल्या जाणाऱ्या शेतीवाडीवर राहायला यावं. तिथं यांत्रिक सुधारणेचा लवलेश नसेल. हातांनी शेती कसली जाईल. रेल्वेचा फाटा तिकडे नसेल. शेतावर सर्वांना प्रत्यक्ष श्रम करावे लागतील. स्पर्धा नसेल. गुणग्राहकता असेल. मागणी तसा पुरवठा हे तत्त्व अजिबात मान्य केलं जाणार नाही. या, आणि जमेल ते स्वतः श्रमून निर्माण करा. सर्वांना अभय आहे."

एक प्रकारच्या आश्रमाचीच रस्किन मांडामांड करू लागला. पदरमोडीला सुरुवात त्यानं स्वतःपासून केली. स्वतःच्या खतावण्या तपासल्या. त्यात दहा हजार पौंडांची मालमत्ता स्वतःकडे असल्याचं त्याला दिसून आलं. लागलीच, त्या रकमेचा एक-दशांश हिस्सा म्हणून त्यानं आपले श्रीकाराचे एक हजार पौंड ' सेंट जॉर्जेस संघा 'ला विनाअट बहाल केले. नंतर आईच्या इस्टेटीतले सत्तर हजार पौंडांचे शेअर्स त्याला वारसा हक्कानं मिळाले. त्यांतला दहावा हिस्सा म्हणून सात हजार पौंडांचे शेअर्स त्यानं संघाला दिले. म्हणजे त्याची नमनाची देणगी आठ हजार पौंडांची झाली. पण इतरांच्या प्रतिसादाचं काय ?

सगळीकडे शुक्र होतं.

दोन वर्षं अशीच गेल्यावर रस्किननं खिन्न मनानं एक लेख लिहून जाहीर केलं की, आपण इतकं रक्त आटवितो, पण कुणाचंच तिकडे लक्ष नाही; दोन वर्षांत एकही पत्र आलेलं नाही. ही इतकी घोर उपेक्षा का ?

ह्या फेर-आवाहनाला प्रतिसाद म्हणून फक्त सहा मंडळी संघाची सभासद झाली आणि त्यांची वर्गणी जवळपास शंभर पौंड झाली !

पुन्हा एक वर्ष सुनं गेलं.

पुन्हा एक आवाहन; पुन्हा शेदीडशे पौंड जमले.

पुन्हा एक वर्ष सुनं गेलं.

पुन्हा एक आवाहन; ह्या वेळी संघाचे एकूण उत्पन्न जवळपास पावणेचारशे पौंड असल्याचं आढळून आलं. आणि सभासद होते चोवीस. चोवीस मंडळींचा योगक्षेम इतक्या तुटपुंजा भांडवलावर कसा चालणार ? अखेर रस्किननं जाहीर केलं की, आश्रमाचा

गाशा गुंडाळण्यात येत आहे.

ध्येयवादी विक्रेता

दरम्यानच्या काळात त्यानं ग्रामीण भागात समाजसेवेच्या बुद्धीनं निरपेक्षपणं खपणाऱ्यांचा एक 'कंपनियन्स ऑफ सेंट जॉर्ज' नावाचा व्रती सेवकांचा समूह तयार करण्याचाही यत्न करून पाहिला. पण तिथंही त्याला घोर अपयश आलं. अखेरीस त्यानं ग्रामीण भागाचा नाद सोडून खुद्द लंडनमध्ये गरीब कामगारांच्या सोयीसाठी चहाची भुकटी विकण्याचं 'मिस्टर रस्किन्स टी शॉप' नावाचं एक दुकान वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी थाटलं. त्याच्या आईच्या दोन कामकरणी होत्या. त्यांना ह्या दुकानात चिकटवलं. चहाच्या बुक्कीची छोटी छोटी पाकिटं फायदा न घेता कामगारांना विकायची हे त्याचं उद्दिष्ट होतं. परंतु ह्या दुकानाला गिऱ्हाइकी म्हणून कशी ती लाभेना. तरीही रस्किननं तोट्यात चालणारं दुकान चालूच ठेवलं. इतक्यात दुकानातली एक कामकरीण मेली. त्यानंतर रस्किननं चहाच्या ध्येयवादी दुकानाच्या फळ्या कायमच्या आवरून घेतल्या.

ध्येयवादी दुकानाचा बोऱ्या वाजल्यावर रस्किननं विद्यार्थ्यांचं एक सेवापथक काढलं.

तो ऑक्सफोर्ड विद्यापीठात चित्रकला-शिक्षक होता. तिथले काही रस्ते खराब झालेले होते. त्यानं मुलांना सांगितलं, "तुम्ही खेळात वेळ का दवडता? त्यापेक्षा तुम्ही श्रमदानानं रस्ता करा म्हणजे लोकांचीही सोय होईल आणि तुमचाही वेळ जाईल. व्यायाम अनायसंच होईल." त्याच्या सूचनेचं हसू झालं. श्रमदान हा शब्द तेव्हा लोकांना ऐकूनही माहीत नव्हता. तरीही काही विद्यार्थी सेवापथकात सामील झाले आणि त्यांनी सांघिक श्रमदानानं एक रस्ताही तयार केला. विशेष म्हणजे त्या सेवापथकात नाटककार ऑस्कर वाइल्ड हा विद्यार्थीदशेत कुदळ-फावडं घेऊन सामील झालेला होता.

त्यानंतर रस्किन आजारी पडला. तसा तो आणखी वीस वर्षं जगला. पण ते खरं नव्हतं. त्याला सतत वेडाचे झटके येऊ लागले. पुढ्यात कागद घेऊन तो लिहायला बसे. पण त्याला शब्दच आठवेनात. पुढं पुढं माणसांची ओळख पटेना. वेडाचा सहावा झटका जोरात आला. तिथपासून त्याचं प्रदीर्घ मरण सुरू झालं. एक्याऐंशीव्या वर्षी श्वासोच्छ्वास बंद पडल्यावर ते संपलं. तो नेहमी सांगायचा, माणसांचं मरण वर्षानुवर्षं संथपणं चालू असतं. ते लक्षात येत नाही. श्वास बंद झाल्यावर आपण म्हणतो 'हा मेला'. पण ते खरं नसतं. श्वास बंद पडणं ही ते प्रदीर्घ मरण संपल्याची शेवटची खूण असते! अशी ही रस्किनची जिंदगी.

अपयशी जीवन

शोषणविरहित, न्यायाधिष्ठित आणि नैतिक अधिष्ठान असलेल्या कल्याणकारी समाजरचनेचं स्वप्न पाहणारा तो पहिला भाग्यवान पुरुष. त्याच्या लेखनात मानवतेच्या

सेवकांच्या पुढच्या पिढ्यांना स्फूर्तीचे झरे आढळले. त्याचे उदार विचार प्रगत मजूर पक्षाने धोरण म्हणून स्वीकारले. तो जन्मभर झिजला. त्यानं सतत श्रमिकांचा कैवार घेतला. त्यांच्यासाठी ग्रंथालयं काढली. म्यूझियम काढलं. कंटाळलेल्यांसाठी आश्रम काढला. गरिबांसाठी दुकान चालवलं. सेवापथक काढलं. सतत दीनदुबळ्यांच्या संघटना बांधण्याचा विचार केला. आपल्या आचाराविचारात सुसंगती राखण्याची त्यानं पराकाष्ठा केली. आणि स्वार्थ तर त्याला उभ्या जन्मात कधी शिवलाच नाही. जमेच्या या भक्कम बाजूमुळं रस्किनचं जीवन म्हणजे तेजोदीपच ठरला. परंतु दुसऱ्या बाजूनं त्याची घसरगुंडी होत गेली. बायको सोडून गेली. मूलबाळ झालं नाही. पुस्तकं खपली नाहीत. हाताला यश लागलं नाही. प्रेम केलं त्याची माती झाली. आणि शेवटी वेडाच्या झटक्यांच्या चक्रव्यूहात तो म्हातारपणी अडकला, आणि त्यातच एकाकी अवस्थेत मेला! ह्या घोर अवस्थेला काय म्हणायचं? बोल कुणाला लावायचा?

युद्धनौकेवरला एक दिवस

वरून हुकूम आला, " नौदलाच्या गेटापाशी उदईक हजर असा." बोलून चालून आम्ही हुकुमाचे बंदे. आकाशवाणीच्या चाकरमान्यांना घडीचा टेप-रेकॉर्डर हाच बाड-बिस्तारा. तो पाठुंगळीस मारून पंच पंच उषःकालीच आरमारी गोदीचा चेकनाका गाठला. रस्त्यात चिटपाखरू नव्हतं. फार एकटं वाटायला लागलं. रावांनी कशासाठी बोलावलं आहे, कुठं नेणार आहेत, काय दाखवणार आहेत, कुणाचं ध्वनिमुद्रण करायचं आहे, काहीही कल्पना येईना. मनाची पाटी कोरी होती. नव्या अनुभवासाठी ओंजळ पसरली होती.

घरातला सर्वांत जुना डगला जसा बोचक्यात कोंबून कपाटात ठेवलेला असतो, तसा मुंबईतला सर्वांत जुना भाग म्यूझियमच्या पिछाडीला असलेल्या आरमारी गोदीच्या आस-मंतात जपून ठेवलेला आहे. कोवळ्या शेंदरी किरणांची जाळी त्या बाळबोध टापूवर पडली होती. जुन्या ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात बांधलेल्या, पण अलीकडे सफेद रंगरंगोरोटीचा काळाहीन मुलामा चढवलेल्या उभट दाराखिडक्यांच्या लांबोडक्या बखारी चेकनाक्याच्या आतल्या अंगाला खड्या होत्या. इमारतीचं हे साफ निगर्वी रूप आपल्याच कुटुंबातल्या दिमाखहीन म्हाताऱ्या माणसासारखं, जितकं अधिक काळ टिकेल तितकं टिको, असं वाटलं; वेगडी बनावटीच्या नव्या तकलादू जगात त्यांचा निरुपद्रवी घरगुती-पणा केवळ शोभादायकच नव्हे, तर दिलासादायकही वाटतो. इतिहास सांगतो, लालबुंद टोपीकरांची पहिलीवहिली तारवं इथंच मुंबई बंदराला लागली. टोपीकरानं आपलं चंबु-गबाळं इथंच सोडलं. साहेबाची पहिली व्यापारी वस्ती ह्या गोदीविभागातच झाली. इथंच कुठं तरी त्यांचं निशाण फडकलं असणार. इथंच कुठं तरी नेटिवांनी त्यांच्याकडे आशेनं पाहिलं असणार. भाकरीतुकड्याच्या नव्हे, हेलमजुरी मिळण्याच्या.

इतिहास सांगणाऱ्या त्या वखारीमध्ये सामसूम आहे.

चेकनाक्याच्या लाकडी फाटकाचं जुनं बाळबोध रूप मुद्दामच शाबूत ठेवलेलं आहे.

गेटापाशी एक प्रचंड पितळी घंटा लट्ठ ओंडक्यांना टांगून ठेवलेली आहे. आकारानं नाशिकच्या नारोशंकराच्या घंटेपेक्षा मोठी आणि डेरेदार. दोनचारशे वर्षांपूर्वीच्या गोऱ्या सारंगांनी मिळवलेली ही दर्यावरची लूट असणार. ती वाहून नेण्यात दहा रेड्यांची दमछाक झाली असणार. गोदीत पाऊल टाकणाऱ्यावर प्रथमदर्शनी छाप पडावी म्हणून ती अशी दिमाखात अधान्तरी विराजमान झाली असावी. ही वाजवता येणं शक्यच नाही, कारण हिचा टोला उचलणार कोण, नि किती वेळा ? तिच्या चकाकत्या घेरावर काही मूळाक्षरं पुसटशी खोदलेली दिसत होती. त्यांचा अन्वय नीट लागेना, कारण तिच्यावर सूर्यकिरणांचा तिरपा तळपता कवडसा पडला होता. गेटाच्या आतल्या अंगाला एक मुद्दाम जतन करून ठेवलेलं जीर्ण निवडुंगाचं आटोपशीर बन होतं. दोन माड्या उंच गेलेल्या त्या निवडुंगाच्या टोकाच्या फडांवर लालेलाल फुलं लुकलुकत होती. निवडुंगांचे बुंधे हत्तीच्या पायांसारखे भासले. हा निवडुंग किती जुना असेल ? कदाचित ह्याचे काटे पहिल्या टोपीकरांच्या पायात मोडले असतील ! नि पलीकडले गोदीतले ते प्रचंड वटवृक्ष ? साहेब तर आल्या आल्या नक्कीच त्यांच्या सावलीत चिरूट शिलगावून विसावला असणार !

ह्या गोदीशी तसा माझा थोडासा पूर्वपरिचय आहेच. पद्माकर नागपूरकर हा माझा मित्र वीस वर्षांपूर्वी ह्याच गोदीत मुनीमकी करायचा. हजारो गोदीकामगारांच्या पगाराचे पैसे वाटून वाटून त्याची बोटं काळी पडलेली असायची ! एकदा ह्याच हद्दीत तो त्या काळी मला म्हणाला होता, 'गोदीकामगाराची स्थिती विलक्षण हलाखीची असते. व्यसनापायी ते सतत कर्ज काढीत असतात. त्याचे हप्ते त्यांच्या मजुरीतून कापले जातात. त्यामुळं काही काही कामगारांना तर अख्ख्या महिन्याचा पगार म्हणून हातावर जेमतेम रुपया-दोन रुपये सुटतात !' ह्यात अतिशयोक्ती नसेल. मी स्वतः शाही आरमाराच्या हिशोबखात्यात काम करीत होतो. तेव्हा मी सतत पाहात होतो की आरमाराचे बडे अंमलदार ट्रक्स करून ईर्षेनं हसत खेळत महालक्ष्मीला शर्यतींना जात. तिथं चढाओढीपायी त्यांचे खिसे फोकस होत. हात हालवीत ते विमनस्कपणं गुपचूप परतत. नंतर उदंड उसनवारी करत महिन्याच्या लट्ठ पगारातली फार मामुली रक्कम त्यांच्या खात्यावर पडे. ते हवालदिल होत. कपड्यालत्त्यातला भपका मात्र टवटवीत असे. वागणूक गुलहौशी असे.

ही बाब पंचवीस वर्षांपूर्वीची आहे, की जेव्हा शाही आरमारी दलावर गोऱ्यांचा युनियन जॅक फडफडत होता, आणि त्याच्या सावलीत मेजापाशी बसलेल्या माझ्या कानाला बोरू होता.

पंचवीस वर्षांच्या धडधडत्या काळाची थंड वाळू पायाखालून निसटून गेलेला मी त्याच नौदलाच्या गोदीत भारतीय तिरंग्याच्या छायेत आज काखोटीला टेप रेकॉर्डर मारून सेवेसी सादर उभा आहे.

गेटावर नोंदानोंदी झाली.

गोदीकामगारांच्या तारांबळीकडे आणि ठोकाठोकीकडे कानाडोळा करीत आम्ही तरीवर आलो आहोत. गावाकडे आपल्या घरासमोर जेवढ्या आकाराची अंगणं असतात, तेवढ्याच आकाराच्या एका तरंगणाऱ्या पोकळ लोखंडी चौरंगावर आम्ही उभे आहोत. बोटीत चढा-उतरायला सोयीस्कर जावं म्हणून हे तरंगते चौरंग तराफ्यासारखे वापरतात. तराफ्याच्या कडेला एक सुशोभित लाँच उभी आहे. तिच्या आतल्या सीट्स झकपक आहेत. छोटंसं केबिन आहे. प्रवेशद्वारावर चांदीचा मुलामा दिलेले दोन उसळते मासे शोभेसाठी लावलेले आहेत. लाँचचा रंग मोगऱ्याच्या फुलासारखा धवल आहे. कुणीही न सांगता मी ओळखलं आहे की ही लाँच आमच्यासारख्या सटरफटरांसाठी नाही; ज्याची जय्यत बडदास्त ठेवावी लागते अशा अक्कडबाज हुद्देदारांसाठी आहे.

'आम्हांला तुम्ही कुठं नेणार आहात?'

'ते तुम्हाला तिथं प्रत्यक्ष गेल्यावर कळेल.'

बावचळलेला मी एका ऐसपैस खपाट्यात बसलो. पाचपन्नास टिपटॉप अंमलदार बसले. सगळे सीट्स नीट बसल्याचं इंजिनवाल्यानं पाहिलं आणि जोरदार हँडल मारलं. खपाटा फुरफुरला. त्याला एकदम रेसच्या घोड्यासारखा चेव चढला. हिरव्या निळ्या लाटा चिरत आम्ही धूमधडाक्यानं समुद्रात घुसलो. दूर धुक्यात 'मैसोर' ही भारतीय आरमाराची अजस्र नौका नांगरून ठेवलेली दिसली. खपाटा तिच्या रोखानं वळला. तोंडावर उडालेलं लाटांचं पाणी पुसतो न पुसतो तोपर्यंत खपाटा 'मैसोर'ला खेटून डुचमळू लागला. एका लोंबत्या शिडीवरून आम्ही प्रशस्त, उघड्या डेकवर आलो. डेकवर दुतर्फा तोफा डागून ठेवल्या आहेत. बोटीला दोन अजस्र धडधडणारे बंब आहेत. गुंता-गुंतीची यंत्रं चहूबाजूंना आहेत. पुढे एक उंच मनोरा आहे. डोळ्यांना दुर्बिणी लावून बडे अंमलदार तिथून आम्हांला न्याहाळीत आहेत.

'फ्लॅगशिप म्हणजे नौदलाच्या ह्या विभागातल्या काफिल्याची मुख्य युद्धनौका. क्वचित काही खास कामगिरी असली तरच युद्धनौका एकट्या-दुकट्या संचार करतात. नाही तर एरव्ही युद्धनौकांचा काफिला बदकासारखा टोळी करून किनाऱ्यावर गस्त घालीत असतो. कुठंही मोहिमेवर जाताना फ्लॅगशिप– म्हणजेच ध्वजनौका मधोमध राहते, आणि तिच्या सभोवताली इतर युद्धनौका कोंडाळे करतात. त्याला Protective screen म्हणतात. हेतू हा की, शत्रूच्या पाणसुरुंगांनी किंवा पाणतीरांनी ध्वजनौकेचं नुकसान होऊ नये. संरक्षक पडद्यातल्या आजूबाजूच्या ज्या इतर युद्धनौका असतात त्या पाणसुरुंग शोधून काढणं, पाणबुड्यांचा शोध करणं, वगैरे कामं करतात. प्रत्येक युद्धनौकेवर एक एक बडा कप्तान असतो. खुद्द ध्वजनौकेवरसुद्धा बडा कप्तान असतोच, पण शिवाय त्याच्या वर एक ॲडमिरलही असतो. ध्वजनौकेवरला ॲडमिरल हा काफिल्यातल्या सर्व युद्धनौकांवर बिनतारी संदेशानं नियंत्रण ठेवतो. म्हणजे बोटी कप्तान चालवतात. ॲडमिरल त्यांना मार्गदर्शन करतो.' आम्हांला माहिती पुरवली जाते.

डेकवर ऊबदार उन्हात उभे राहण्यात वेगळाच आनंद आहे. हवेत गारवा आहे.

धुवट आभाळात ढग स्थिर झाले आहेत. बोटीच्या धुराचं दाट वेटोळं थेट ढगांना भिडलं आहे, सभोवार धुक्याचं पटल आहे. नारिंगी चोचीचे सफेद बगळे पंख विस्फारून जागच्या जागीच तरंगत आहेत, त्यांचे टोकाकडे खाली वळलेले पंख लटकणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या हातासारखे वाटत आहेत. कोकणाची डोंगरमाळ धुवयात अस्पष्टशी दिसत आहे. तिच्यावर धुकट सूर्योदय झालेला आहे. हवेतली ऊब वाढत आहे. स्वतःच्या तोऱ्याचं भान सतत जागरूक असणाऱ्या झकपक अंमलदारांच्या घोळक्यात आमच्यातलं अपरिहार्य अंतर मापीत मी डेकवर उतरलेल्या किरणांची ऊब लुटतो आहे.

'तुम्ही आता आमच्याबरोबर रांगेत उभे राहा, कारण आता ॲडमिरल येतील. त्यांना सलामी आहे.'

ह्या स्वाबदार मंडळींच्या रांगेत उभं राहताना कुठंतरी आपण कमालीचे तोकडे पडतो ह्या sense of inadequacy नं मी दुभंगत असतानाच अंमलदारांनी डेकवर लायनी केल्या. शिट्या वाजल्या, सूं सूं करीत मोगऱ्यासारखी शुभ्र लाँच उसळत 'मैसोर 'जवळ आली. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच ॲडमिरल खाड खाड बूट वाजवीत हजर झाले. बिगुल वाजले, सलाम झाले. सन्मानार्थ बंदुकीची फैर सुटली.

हा धष्टपुष्ट सावळा अंमलदार, अंमलदारांचा अंमलदार आहे. कुणी वेगळं सांगण्याची गरज नाही. इतरांनी त्याच्यापासून जे अदबशीर अंतर ठेवलेलं आहे, ते बोलकं आहे. त्याची गर्दन घट्ट आहे, पण आवाज फार सौम्य आहे. मग्रूर नाही. वय पन्नाशीच्या आसपासचं. नजर स्थिर केंद्रित. मर्माचे तेवढे दोन शब्द बोलतो. जितक्यास तितका आहे. फाफटपसारा नाही, देवाचा प्रसाद स्वीकारावा, तसे त्याचे छोटे छोटे हुकूम शिरोधार्य मानले जात आहेत. ह्या ध्वजनौकेचा तो राणा आहे हे त्याच्या तडफदार चालीतही दिसून आलं आहे. त्याच्या तगडेपणाचा हेवा वाटतो.

ह्या वरिष्ठ अंमलदाराचं नाव रिअर ॲडमिरल कुरुविला. केरळीय ख्रिश्चन, ही जातच दर्यासारंगाची. हा त्यांच्यातला प्रभू.

ताठ मानेनं तो उंच मनोऱ्याच्या शिड्या सटसट चढून गेला. पुन्हा एकदा उंचावरला तो आणि खालचे इतर ह्यांच्यातलं अंतर मी मापून घेतलं. तो डोळ्यांना दुर्बिण लावून बंदर उंचावरून न्याहाळू लागला.

'थोडी कॉफी घेऊ या.'

खालच्या मजल्यावरल्या भोजनालयात गेलो. पेटीबंद भोजनालय अद्ययावत् पण दाटीवाटीचं आहे. ह्याच युद्धनौकेनं परदेशांना वेळोवेळी दिलेल्या भेटीच्या वेळी मिळविलेल्या चांदीच्या स्मृतिचिन्हांची शोभिवंत आरास कडेच्या कपाटात मांडून ठेवली आहे. चामड्यानं मढवलेले मऊमऊ प्रशस्त कोच जुन्या धाटणीचे आहेत. पायाखालचा गालिचा उत्तम बनावटीचा आहे. वैभवात काडीचीही कमतरता नाही. दालनातच कोपऱ्यात मद्यपानाचा कठडा आहे. तिथं पण कठड्यावर देणारा व घेणारा कुणीच नव्हता. कदाचित रामप्रहर असल्यामुळंही असेल.

कॉफी पिताना बाजूच्या पोर्टहोलमधून समुद्राचं पाणी उलटं उलटं वाहताना दिसलं. म्हटलं, ही काय भुताटकी आहे? शेजारच्या अंमलदारानं सांगितलं, 'आपली बोट केव्हाच सुरू झालीय मिस्टर! तुमच्या लक्षात आलेलं दिसत नाही.' विश्वास बसेना म्हणून डेकवर गेलो. पाहतो तर आमची अजस्र बोट खरंच भर वेगात पाणी कापीत अलिबागेच्या किल्ल्याच्या दिशेनं निघाली होती. धुक्याच्या टोपऱ्याखाली लपलेलं मुंबई शहर भराभर मागं पडत होतं. लांबवर दिसणारे मचवे सरसर जवळ येत नि पाहता पाहता मागं जात. बोट तुफान वेगानं निघाली आहे पण आमच्या पोटातलं पाणीसुद्धा हालत नाही.

'ॲडमिरलसाहेबांनी सर्वांना त्यांच्या मनोऱ्यावर बोलावलं आहे.'

ॲडमिरलचा मनोरा.

साधारणपणं उंच इमारतीचा दहावा मजला भरेल इतक्या उंचावर आम्ही सारे जमलो आहोत. वीस चौरस फुटांची सर्व बाजूंनी मोकळी जागा आहे. मध्ये एक उंचावर कोच ठेवला आहे. त्यात रियर ॲडमिरल कुरुविला डोळ्याला दुर्बिण लावून ऐटीत बसला आहे. आजूबाजूला एकही खुर्ची नाही. त्यामुळं सर्वांना उभं राहणं प्राप्त आहे. ॲडमिरलच्या बाजूला एक कडक इस्त्रीतला तरुण तडफदार अधिकारी आहे. सेकंदा-सेकंदाला, मिनिटा-मिनिटाला तो अत्यंत आदबीनं ॲडमिरलला काही तरी सांगतो, विचारतो. अत्यंत थंड स्वरात शांतपणं ॲडमिरल मोजकंच एक-दोन शब्दांचं उत्तर देतो. मग तो अधिकारी ते उत्तर समोरच बसलेल्या तारायंत्रावरल्या लेखनिकाला सांगतो, लेखनिक तारायंत्रावरून ते उत्तर खालच्या डेकवर बोटीचा कप्तान आहे त्याला सांगतो आणि आमच्या बोटीच्या बाजूनं सहा बोटींचा जो काफिला चालला आहे त्यांच्या कप्तानांनाही तारायंत्रावरून सांगतो. सर्व हुकूम दोन-तीन शब्दांचे navigation बद्दलचे आहेत. ॲडमिरल प्रवासाची दिशा आणि वेग सांगतो. इतर सारेजण ते हुकूम तंतोतंत पाळतात. काफिल्यातल्या सर्व बोटींच्या नियंत्रणावर ॲडमिरलची नजर आहे. तो एकसारखा त्या कप्तानांकडे दुर्बिणींनी पाहात आहे. 'मैसोर'च्या समोर तीनशे फुटांवर 'दीपक' नावाचं नौदलाचं मालवाहू जहाज मार्गदर्शक म्हणून चालत आहे. एका अंगाला अंशभर फुटांवर 'कुडमठ' नावाची पाणतीरफेकी प्रचंड चिलखती किल्ल्यासारखी दिसणारी युद्धनौका आहे, दुसऱ्या अंगाला शंभर फुटांवर 'कुठार' नावाची प्रचंड विनाशिका आहे. त्यांच्या पलीकडे समान अंतरावर इतर युद्धनौका आहेत. आम्ही टोळी करून भर वेगात निघालो आहोत. एखाद्या नौकेचा वेग जरा कमी-जास्ती झाला किंवा किंचित जरी दिशा बदलली तर एका मिनिटात बोटींची भयंकर टक्कर होईल. पण टक्कर तर सोडाच, एक इंचसुद्धा अंतर कमी जास्त होऊ न देण्याची ॲडमिरल डोळ्यांत तेल घालून दक्षता घेतो आहे.

'Ask KUTHAR to turn thirty six degrees South West.'

'Ask DEEPAK to reduce speed by one Knot.'

'Ask KHUKRI to move hundred feet towards left.'

'Ask KUNJAR what is the depth of water.'

तारायंत्र सतत क्षणभरही न विसावता खडखडत आहे. ॲडमिरलचे हुकूम मिळाल्याचे आणि ते पाळल्याचे संदेश क्षणाक्षणाला त्या नौकांवरून येत आहेत. ॲडमिरलच्या मनोऱ्यावर पंधरा वीस अधिकारी दुर्बिणी लावून उभे आहेत. मलाही एक दुर्बिण दिली आहे. ॲडमिरलचे हुकूम सर्वांना ऐकू येत आहेत. पण शिस्तीचा म्हणून काही भाग दिसतो आहे. ॲडमिरल आपले हुकूम फक्त एकाच नेमून दिलेल्या अधिकाऱ्याला सांगतो. तो अधिकारी मग तो हुकूम कागदावर लिहून इतरत्र पोहोचवितो. ही शिस्त वाखाणण्यासारखी आहे. त्यामुळं काफिल्याच्या वेगवान संचलनात एकसूत्रीपणा अखंड राहिला आहे. इतर सरकारी कचेऱ्यांत जसे चार साहेब चार परस्परविरोधी हुकूम सोडतात, तसे इथं सोडले तर अनर्थ होईल आणि बोटींच्या टकरी होऊन दारुगोळ्याचा भयंकर स्फोट होईल. तो धोका एकमुखी कारभार सोपवून साफ टाळला आहे.

ॲडमिरलनं एक हुकूम सोडला. तावडतोब सगळा काफिला दक्षिणेचा रोख बदलून पश्चिमेला अरबी सागरात घुसला. म्हणजे, 'मैसोर'ची नाळ जी अलिबागेच्या रोखानं होती ती आता एडनच्या रोखानं झाली असावी. आता आजूबाजूला, समोर, मागं अथांग पाण्याशिवाय काहीच दिसत नाही.

सिंधुसागर! निळा निळा भोर, तळयातल्या पाण्यासारखा शांत, पारदर्शक सिंधुसागर! आंघोळ घालून तीट लावलेलं बाळ पाळण्यात शांतपणं झोपी जावं तसा हा निळा निळा कोवळा सिंधुसागर अगदी शांतपणं झोपी गेलेला दिसतो. पाण्यावर लाटा अजिबात नाहीत. केवळ अस्फुट तरंग आहेत. झोपी गेलेल्या बाळानं गालातल्या गालात क्षणभर हसावं तसे हे कोवळे तरंग भासतात. आईचा त्याच्या अंगावर हात पडावा तसं धुकट ऊन ह्या पारदर्शक जलाशयावर पडलेलं आहे. ही अलौकिक मोत्याळ निळाई पाहून नीलकृष्णाची नाही तर कुणाची आठवण होणार? आपलं हिंदू मन आकाश पाहून, पाणी पाहून, श्रीकृष्णाला भिडतं. कृष्णकान्तीची भूल ह्या पारदर्शक नीलांगी जलासारखीच होती; असणार. किनाऱ्यावरून क्षितिजाकडे पसरलेला नेहेमी दिसणारा समुद्र हिरवा, राखी, निळासावळा, कबरा, असा कबुतराच्या मानेच्या रंगासारखा सरमिसळ छटांचा दिसतो. किनारा मागं टाकून पन्नास मैल सागराच्या ऐन गाभ्यात आल्यावर दर्याचा रूपपालट झालेला दिसतो. वर आभाळाचा निळा घुमट, मध्ये निळसर छटेच्या पांढुरक्या किरणांचं ऊबदार पटल आणि व्योमाला उचलून धरणारा सभोवतालचा गोलाकार कृष्णवर्णी अथांग जलाशय. चराचराचं फक्त एवढंच, एकच एक रूप तुमच्यासमोर तासन् तास पालवत राहतं. एका बाजूनं ही किमया पाहात राहता, नि सागराचं हे मोहिनीपर्व पुन्हा दिसणार नाही ह्या कठोर विचारानं भेगाळतही असता.

ॲडमिरलच्या मनोऱ्यावर एक सागरपृष्ठाचा नकाशा आहे. त्यात सागरतळावर

कुठं खडक आहेत, प्रवाह कसे आहेत, किनारा कुठल्या दिशेला किती अंतरावर आहे, ते दाखवलं आहे. कंपासपेटीतली उपकरणं घेऊन एक अधिकारी आला. त्यानं मापं घेऊन काही तरी गणित केलं आणि नकाशावर लाल पेन्सिलीनं खूण केली. विचारल्यावर त्यानं सांगितलं, 'आपलं जहाज ह्या क्षणी नेमक्या ह्या ठिकाणी आलं आहे.' माझ्या तर्काप्रमाणं आम्ही रेवदंड्याच्या किल्ल्याच्या बरोबर समोर पंचावन्न मैलांवर असू.

'आता युद्धात तोफांचा भडिमार कसा करतात ते तुम्हांला पाहायला मिळेल. आम्ही लहान तोफगोळे समुद्रात उडवू. तुम्ही बोटीचे कठडे घट्ट धरून ठेवा.'

इशारे झाले. 'मैसोर'च्या डाव्या अंगाच्या काफिल्यातल्या युद्धनौका वेग वाढवून आमच्या फार पुढं पळाल्या. डाव्या बाजूचा समुद्रपट्टा पूर्णपणं मोकळा झाला. ॲडमिरलच्या मनोऱ्याच्या पायथ्याशी तोफांचं झाड आहे. तिथं गोलंदाज हजर झाले. त्यांनी कान झाकणारी शिरस्त्राणं घातली आहेत. अंगात मळकट बॉयलर्स सूट आहेत. हातात चामड्याचे मोजे आहेत. तोफेत भरायला त्यांनी बॉम्बची नळकांडी काढली आहेत. ती कोपरापासून मनगटापर्यंत आपल्या हाताचा भाग असतो तेवढ्याच लांबीरुंदीची आहेत. बॉम्ब् निमुळते असून टोकाला पितळेचं टोपण आहे. आम्ही कठडे घट्ट पकडून आता काय चमत्कार दिसणार ते पाहात आहोत. गोलंदाज हुश्शार झाले.

प्रथम एका बंदुकीनं आकाशात उंच कसली तरी गोळी मारली गेली. गोळी कुठून कुणी सोडली कळलंच नाही. फक्त आवाज तेवढा कानी पडला. नंतर आमच्या समोरच उंच आकाशात ती गोळी फुटून तिचं लखलखीत चमकणाऱ्या तेजस्वी ताऱ्यात रूपांतर झालं आणि तो धगधगीत शुभ्र प्रकाशगोल आकाशातल्या उंचावरून अगदी कमालीच्या मंद गतीनं खाली पाण्याच्या दिशेनं घसरू लागला. आम्ही हे चमत्कारिक दृश्य पाहतो न पाहतो तोच बोटीवरून त्या प्रकाशगोलाला भेदून पलीकडे सट्सट् जाणारे बॉम्ब्स् धडाधड उडू लागले. आम्ही वरून श्वास रोखून पाहात होतो खालच्या डेकवरल्या गडगडणाऱ्या तोफांकडे, तोफांचे खटके खेचणाऱ्या गोलंदाजांच्या हाताकडे, आणि त्या घसरणाऱ्या तेजःपुंज प्रकाशगोलाला नेमकं टिपणाऱ्या बॉम्ब्स्च्या अविरत वर्षावाकडे. तो घसरणारा तेजगोल समुद्रात बुडायला चार पाच मिनिटं लागली असतील, नसतील. त्या तेवढ्या निसटत्या कालावधीत 'मैसोर'च्या तोफांनी गडगडाट करून शेकडो बॉम्ब्स्चा नुसता पाऊस पडला!

'आता तुम्हांला भर समुद्रात प्रवास करीत असतानाच एका जहाजावरून दुसऱ्या जहाजावर मालाचा, तेलाचा, इतकेच नव्हे तर माणसांचाही पुरवठा कसा करतात ते पाहायला मिळेल.'

ॲडमिरलनं हुकूम सोडले. 'मैसोर'च्या दोन्ही बाजूंना दोन युद्धनौका शंभर फुटांच्या अंतरावरून तुफान वेगानं चालू लागल्या. डाव्या अंगाला 'कुडमठ' ही रशियन बनावटीची भारतीय टारपेडो शिप आली. लांबच लांब पण फार उंच नसलेली ही युद्धनौका सरपटणाऱ्या बिबट्या वाघासारखी वाटते. तिच्यावर अडगळही नाही. प्रचंड लांबीचे

पाइपांसारखे दिसणारे टॉरपेडो मागच्या बाजूला रचून ठेवलेले आहेत. तिच्या डेकवर एक वाळूचं पोतं आहे. आमच्या बोटीवरून त्या वाळूच्या पोत्यावर एक बंदुकीची गोळी मारण्यात आली. त्या गोळीला एका तारेनं एक जाडजूड दोरखंड बांधला होता. त्यामुळं गोळीबरोबर त्या दोरखंडाचं एक टोकही आमच्या बोटीवरून 'कुडमठ'वर जाऊन पोहोचलं. ते पकडून तिथल्या नाविकांनी मग आमच्या दोन बोटींना जोडणारा एक दोरखंडाचा झुलता मार्गच तयार केला आणि त्याच्यावरून मालाच्या पोत्यांची भराभर अदलाबदल करून दाखविली. एका नाविकाच्या पाठीला पट्टे बांधून त्याला दोरखंडाला एकानं लटकावला आणि पुलीच्या साहाय्यानं भर समुद्रात बोटी चालू असताना लोंबकळत दुसऱ्या बोटीवर अलगद नेऊन पोचवला. दुसऱ्या अंगाला पाणी कापीत 'कुठार' येऊन समान वेगानं धावू लागली. पुन्हा तिच्यावरल्या वाळूच्या पोत्यावर गोळीच्या साहाय्यानं तेलाचा जाडजूड अजस्र पाइप फेकण्यात आला. 'कुठार' मग त्या झुलत्या पाइपमधून आमच्या बोटीला तेलाचा पुरवठा करू लागली. एकमेकांना झुलत्या मार्गांनी जोडलेल्या तीन युद्धनौकांचा देवाणघेवाणीचा समांतर प्रवास तासभर चालू होता.

'आता आपल्या जहाजावरल्या एका माणसाला 'दीपक'वरचं हेलिकॉप्टर उचलून उंचावर नेईल.'

आम्ही मागच्या मोकळ्या डेकवर जमलो. एकजण मधोमध सुटा उभा राहिला. ॲडमिरलनं हुकूम सोडला. क्षणात एक हेलिकॉप्टर गरगरत डोक्यावर तरंगू लागलं. हेलिकॉप्टर प्रचंड आहे. सगळ्या बाजूंनी मोकळं आहे. गिधाडासारखी त्यानं डेकवर झडप मारली आणि आतल्या माणसानं डेकवरल्या माणसाला क्षणात कवेत धरून, भाजीची पिशवी उचलावी तसा उचलून आत घेतला. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोवर त्या माणसासकट तो घोंघावणारा पोलादी पक्षी काहीच्या काही उंच उडाला नि समोर चाललेल्या 'दीपक'वर पंख पसरून स्थिर झाला. काही क्षणांच्या अवधीत आमच्या घोळक्यातला माणूस पलीकडच्या जहाजावरून आमच्याकडे दुर्बिणीनं पाहू लागला!

'तुम्हांला पाणबुडी पाहायची आहे? पाहा.'

उन्हात तापू लागलेल्या सागराकडे आम्ही पाहात होतो. कुठं चिटपाखरू दिसत नव्हतं. वारा पडला होता.

'पाणबुडी आपल्या रोखानं येत आहे.'

'अरे, पण कुठं दिसत नाही ती?'

'पाणबुडी दिसणार कशी? ती पाण्याच्या खालून भर वेगानं येत आहे.'

समुद्र अगदी शांत आहे. लख्ख ऊन पडलं आहे. धुकं साफ विरलं आहे. उन्हाचे चकाकते कवडसे पाण्यावर लखलखत आहेत. दुर्बिणीनं मी आसमंत न्याहाळतो आहे. कुठंही काही वस्तू मात्र दिसत नाही.

मग आगपेटीच्या काडीसारखी एक काडी क्षितिजरेषेपासून आमच्या जहाजाच्या

रोखाने येताना दिसली.

'समुद्रात ती डोकं वर काढून आपल्याकडे येणारी काठी दिसत आहे, तो पाणबुडीचा पेरिस्कोप आहे, म्हणजेच तो पाणबुडीचा डोळा आहे.'

हळूहळू ती काठी जवळ, अगदी हाकेच्या अंतरावर आली. फक्त साधी काठी, मग तिच्या पाठोपाठ किल्ल्याच्या बुरुजासारखा काळा कुळकुळीत बंब आमच्या बाजूनं पाण्यातून तरंगत तरंगत, पाण्यातून वर येऊ लागला. ती काठी, तो चिलखती बुरूज आणि आमची बोट ह्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. मग पाच सहा सफेत वेष धारण केलेले नाविक त्या बंबाच्या धुराड्यातून माना डोकावून दुर्बिणीनं आमच्याकडे पाहू लागले! इशारे झाले, आणि मग हळूहळू त्या पाणबुडीचा दुधीभोपळ्याच्या आकाराचा काळाकुट्ट पोलादी देहच आमच्यासमोर तरंगू लागला.

पाणबुडी प्रचंड देवमाशासारखी सरपटत चालते. तिला खिडक्या दारे नसतात. अवघ्या तीन मिनिटांत ती पृष्ठभागावर येऊ शकते. अवघ्या तीन मिनिटांत ती खोलवर बुडू शकते. तिच्यावर पन्नास पाऊणशे नाविक असतात. प्राणवायूचा, गोड्या पाण्याचा, खाद्यपदार्थांचा, अद्ययावत यंत्राचा आणि दारूगोळ्याचा पुरवठा घेऊन होकायंत्राच्या साहाय्यानं सागराच्या पोटामधून तिची विनथोभाट गस्त सतत चालू असते.

ॲडमिरल हुकूम देत होता. ती वर येत होती. पुन्हा बुडत होती. पुन्हा वर येत होती.

ती मगरीसारखी ताकदवान वाटते. मगरीसारखीच कर्दनकाळ वाटते. मगरीसारखीच काळीकुट्ट असते. पाणी कापणाऱ्या तिच्या नाळेला लखलखणारा पितळेचा भक्कम पट्टा असतो. सागरतळावर किरणांचा फवारा टाकून ती पाण्याची खोली अजमावते. पाण्यातल्या वस्तूंचा ठावठिकाणा हेरण्याची तिच्या पोटात यंत्रं असतात. पाण्यात बुडाली की परमेश्वरासारखीच ती दिसत नाही;– पण असते!

तिचं नाव 'कुंजारे.'

दुपारच्या भोजनाची वेळ झाली. जाता जाता एक अंमलदार सांगू लागला,

'भारतीय नौदलात अनेक जातींच्या युद्धनौका आहेत. त्यांची वैशिष्ट्यवार विभागणी केलेली आहे. विशिष्ट विभागातल्या नौकांची नावं विशिष्ट आद्याक्षरांनीच सुरू होतात. रजपूत, राणा, रणजीत हा R गट; गोदावरी, गंगा, गोमटी हा G गट; ब्रह्मपुत्रा, ब्रिआस, बेतवा, बेसीन, ब्रिमलीपट्टम हा B गट; त्रिशूळ, तलवार T गट; कुकरी, कुठार, कृपाण वगैरे K गट. विक्रान्त ही सर्वांत मोठी विमानवाहू नौका. तिच्यावर चौदाशे अधिकाऱ्यांची व्यवस्था आहे. मैसोर आणि दिल्ली त्याच्या खालोखाल येतात. त्यांच्यावर आठशे अधिकाऱ्यांची व्यवस्था आहे. ह्या आपल्या 'मैसोर'नं गोव्याच्या लढ्यात मोठी कामगिरी केली होती.'

'तुमच्या बदल्या निरनिराळ्या नौकांवर होतात?'

'अर्थात. सर्वसाधारणपणं एका अधिकाऱ्याची एका जहाजावर दीड वर्ष नेमणूक

होते. आज मी इथं आहे. पुढच्या महिन्यात मी 'विक्रान्त'वर असणं शक्य आहे. त्याच्या पुढल्या वर्षात 'दिल्ली'वर असणंही शक्य आहे. नौदलात बदल्यांचं चक्र सतत फिरत असतं.'

ॲडमिरलच्या मनोऱ्यावर ज्यांची व्यक्तिमत्त्वं परीटघडीची वाटली होती, ते सारेजण भोजनगृहात ऐसपैस विसावले होते. सर्वांनी आपल्या हॅटस् काढून ठेवल्या, सिगरेटी पेटवल्या आणि मद्यसेवकाच्या बारीसमोर खुर्च्या ओढल्या. ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणं जो तो आपापल्या आवडीच्या पेयांचे पेले भरू लागला. कुणीही कुणाला आग्रह करीत नव्हता.

मद्य न पिणारेही दोन-चार अधिकारी दिसले.

जेवणाचा थाट पाहूनच पोट भरलं.

गरमागरम मटणसूपाचे पेले, बकऱ्याच्या आणि डुकराच्या मटणाच्या थंडगार लुसलुशीत चकत्या, उकडलेली अंडी, पुलाव, मटार उसळ, सॅलड, साय, लोणी, मुरांबे, पुडिंग, वारभर लांबीचा गोडा पाव. जेवणात मसाल्यांचा वाससुद्धा नाही. सर्व पदार्थ उकडलेले, वाफवलेले, भाजलेले. तळलेलं काहीही नाही. वाटेल तिथं बसून किंवा उभ्यानं जेवावं. कुणीही बकाबका जेवत नव्हतं. सर्वजण मांसाहारी आहेत. रुचीनं, पण मर्यादित जेवतात. कष्टाची कामं करायला शरीर तरतरीत ठेवणं हा त्या मर्यादित आहारामागचा उद्देश आहे.

जेवणानंतर मोजून पाच मिनिटं विश्रान्ती.

पुन्हा ॲडमिरलचा मनोरा. सकाळपासून पाहतो आहे, कुरुविला खुर्चीतून एकदाही इंचभरसुद्धा हाललेला नाही. डोळ्यांना दुर्बीण लावून थंड आवाजात मोजक्या चारपाच शब्दात सर्व युद्धनौकांच्या संचलनाचे हुकूम देत आहे; तारायंत्रावरून आलेले संदेश ऐकत आहे.

समुद्र तापला आहे. गरम वाफारे अंग भाजून काढताहेत. पाण्याची निळीभोर कान्ती अधिक गडद झाली आहे.

'आता बोटीची यंत्रं पाहूया.'

रडार. लाखदा हा शब्द वापरला, उच्चारला, ऐकला. पण चित्रातही रडार कसं असतं ते पाहिलेलं नव्हतं.

रडार म्हणजे सागराच्या पृष्ठभागावर आलेल्या वस्तूचं नेमकं ठिकाण दर्शविणारं घड्याळ. भिंतीवरल्या घड्याळाच्या तबकडीसारखी एक जांभळ्या रंगाची एक-दीड फूट व्यासाची तबकडी असते. तिच्यावर अक्षांश रेखांश दाखविणारा नकाशा असतो. बोटीच्या आजूबाजूच्या तीस मैलांच्या टापूत बोट, जहाज, खडक, वाहून येणारा पेटारा, दीपस्तंभ, अशी काहीही वस्तू आली, तरी तिचं नेमकं ठिकाण दर्शविणारा मोहोरीच्या कणाएवढा बारीक पिवळ्या प्रकाशाचा थेंब त्या जांभळ्या तबकडीवर उमटतो. समजा, बोटीच्या आजूबाजूला चार खडक, पाच मचवे, आणि एक वाहून येणारा खोका तरंगत आहे, तर

तबकडीवर चार खडकांचे चार, पाच मचव्यांचे पाच आणि एका खोक्याचा एक, असे पिवळ्या प्रकाशाचे दहा ठेंब त्या तबकडीवर उमटलेले दिसतील. रडार हे असं चाहूल देणारं घड्याळासारखं यंत्र आहे. मात्र वस्तू कुठल्या प्रकारची आहे ते रडारवरून अजिबात कळत नाही. कदाचित तो खडक असेल, कदाचित एखादी बोट असेल. रडार फक्त वस्तूचं अस्तित्व तेवढं प्रकाशाच्या ठिपक्यानं अचूक दाखवतो; कप्तानाला सावध करतो. रडार अहोरात्र चालू असतं. अधिकाऱ्यांचं त्याच्यावर लक्ष असतं.

दहा-पंधरा चिंचोळ्या शिड्या उतरून बोटीच्या पोटात गेलो. बोट चालविण्याची गुंतागुंतीची असंख्य यंत्रं इथं आहेत.

अजस्र इंजिनांची धडधड चालू आहे. एक तरतरीत तरुण इंजिनीयर कमालीच्या मळक्या बॉयलर सुटात आहे. हसतमुख. म्हणाला, 'महाशय, बोट ही खरी इथूनच चालवली जाते. मनोऱ्यावरून फक्त हुकूम सुटतात. ते नीट ऐकून त्याप्रमाणं यंत्रांकडून कामं इथून करवून घेतली जातात. पाहण्यासारखं असं जे काही आहे ते सारं इथंच आहे. माझ्याबरोबर आणखी खाली या. तुम्हाला बॉयलर दाखवतो.'

बोटीच्या पोटात, पाण्याच्या पातळीच्या खाली एक पेटलेली गुहा आहे. प्रचंड इंजिनं धडधडत आहेत. दोन नाविक हातात सळ्या घेऊन आगीच्या झोतासमोर डोळे किलकिले करून इंधन पुरवीत आहेत. सर्व गुहा वाफांनी भरून गेलेली आहे. ही गुहा म्हणजे बोटीचं हृदय आहे. ते सतत धडधडत आहे. सभोवार असंख्य तापलेल्या नळ्या आणि तोट्या आहेत. त्या बोटीच्या छाताडाच्या फासळ्या.

'चला. ते इंजिनमेन कसं इंधन भरतात ते तुम्हांला दाखवतो.'

मी गुहेत डोकावलो मात्र, माझं सारं अंग वाफाऱ्यानं क्षणात पोळून निघालं. गरम वाफा नाका तोंडात घुसल्या. हातपाय थरथरायला लागले. मागं वळून पहावं तर मागचा अजस्र पोलादी दरवाजा बंद झालेला! मला ब्रह्मांड आठवलं. आपण बेशुद्ध पडणार असं वाटलं. लटपटत लोंबत्या शिडीच्या तीन पायऱ्या उतरलो. खाली शंभर पायऱ्या शिल्लक होत्या. ज्वाळांच्या शेकानं शरीराचं रंध्र नि रंध्र भाजून निघालं. बसकण मारावी म्हटलं, तर पन्नास फूट खोल कोसळून कपाळमोक्ष होणार; सावकाश उतरावं तर अंग भाजून निघतं. शेवटी थेट वर पळून आलो. म्हटलं, 'impossible!'

'तुम्ही impossible म्हणता, मग आम्ही चार चार तास कसं घुसमटत आगीच्या समोर काम करतो?'

प्रश्नच आहे. केवळ दोनप्रहरीच्या भाजीभाकरीसाठी हे तगडे लोक आगीच्या लोळासमोर रक्त आटवणार नाहीत. दर्यावर्दी जीवनाची म्हणून काही अगम्य भूल असेल. तिचं ह्यांच्यावर चेटूक होत असेल, म्हणून हे आगीच्या हौदात सराईतपणं पोहोचतात. जन्मभर!

आणि त्या चेटुकाच्या कक्षेबाहेरचे आम्ही वाफांनी आम्हांला हुंगताक्षणीच तिसऱ्या पावटणीवरून माघार घेऊन मागच्या मागं पसार होतो!

पळालो तो तडक कप्तानाच्या निर्धास्त मनोऱ्यावर येऊन थडकलो. वाटेत अधिकाऱ्यांची छोटी छोटी केबिन्स पाहिली. स्वच्छ पण चिंचोळी वाटली. केबिन्सच्या बाहेर रायफली उभ्या ठेवण्याचे स्टॅन्डस् होते. तिथं हारीनं बंदुका उभ्या ठेवलेल्या होत्या. त्यांची तोंडं, चहाच्या किटलीवर टिपोझी ठेवतात तशी टोपरं घालून झाकलेली होती.

कॅप्टन गांधी 'मैसोर'चे कप्तान आहेत. ताठ, तरतरीत, नाकेले, गोरे, शिडशिडीत. डोळे तेजस्वी. नजर धारदार. चर्या विलक्षण प्रसन्न, रुबाबदार. गळ्यात दुर्बिण अडकवलेली. वरच्या मजल्यावरून कुरुविलाचे हुकूम ह्यांना मिळतात; त्याप्रमाणं हे हाताखालच्या माणसांकडून बोट चालवून घेतात.

'आता तुम्हांला सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम बघायला मिळेल.'

'कोणता?'

'आता आम्ही सर्वांत मोठ्या तोफा डागणार.'

'मोठ्या म्हणजे किती मोठ्या?'

'ते बार तुम्ही आता ऐकाच. मात्र एक सूचना : तुम्ही कान झाकण्याचे फ्लस घट्ट लावा आणि कठडे घट्ट धरा. आमच्या तोफांचा पल्ला पंधरा मैलांचा आहे. तोफगोळा प्रकाशाच्या वेगानं उडतो, त्यामुळं तो दृष्टीला पडत नाही. आवाज प्रचंड होईल. पण घाबरू नका. तुमच्या कानठळ्या बसू नयेत म्हणून तोफांची जी शक्ती आहे, तिचा फक्त एक तृतीयांश भागच आम्ही वापरू. तुम्ही वर ॲडमिरलच्या मनोऱ्यावर जा. तोफगोळे समुद्रात नेमके कुठं पडताहेत ते मी रडारवर पाहीन.'

लाल रंगाची सुबक कर्णाच्छादनं सर्वांनी कानांना लावली. कुरुविलांनीसुद्धा.

सावधानतेचा इशारा सर्व बोटभर गेला. सर्वांनी कठडे घट्ट पकडले. कुरुविलांनीसुद्धा.

टेलिफोनच्या घंटेसारखी एक घंटी वाजली आणि पाठोपाठ आकाश फोडणारा प्रचंड आवाज करून तोफ उडाली. त्या कचक्यानं एवढी प्रचंड बोटही आरपार हादरून गेली. हा एका तोफेच्या एक-तृतीयांश शक्तीचा प्रताप! मग, एकाच वेळी सगळ्या तोफा सर्व शक्ती एकवटून एकदम डागल्या तर काय कल्लोळ होईल? मला वाटतं, डेकवरच्यांची बुबुळं बाहेर येतील.

मी शरण गेलो.

सांगावंसं वाटलं, 'महाराज, कल्पना आली. आता कृपा करून बार म्हणून कसा तो उडवू नका बुवा!' पण माझं कोण ऐकणार?

बोबडी वळवणारे लागोपाठ पाच बार वाजले. माझी खातरजमा झाली. 'युद्ध नको' ह्या निष्कर्षावर मी क्षणात आलो.

'Ask the ships to turn hundred and eighty degrees.'

ह्याचा अर्थ उघड होता. आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. सारंगानं चाक जोरात मारलं. बाबानं जीव घेऊन पळावं तसं आमचं जहाज सर्व बळ एकवटून दर्या

फाडत घराकडे निघालं.

सायंकाळचे थंड वारे वाहू लागले. पाण्याची निळाई अधिक गडद झाली. पाहावं तिकडे निळंभोर विलोरी पाणीच पाणी दिसू लागलं. कृष्णरंग असाच असेल असं परत परत मनात डोकावू लागलं. चैतन्य अस्तमान होऊ लागलं. घसरता लालेलाल सूर्यगोल शांत भासू लागला. सोनेरी उन्हं कणाकणानं नारिंगी होऊ लागली.

'आपला प्रवास संपत आला. तुम्हांला ॲडमिरलनं त्यांच्या केबिनमध्ये संध्याकाळी चहाला बोलावलं आहे.'

ॲडमिरल संध्याकाळी कसला अमृततुल्य चहा देणार त्याची कल्पना आली. जीव मोहोरला.

ॲडमिरलचं जहाजाच्या अगदी शेवटच्या टोकाला असलेलं केबिन ऐसपैस आणि अद्ययावत आहे. एका कोपऱ्यात मद्यालयाची खिडकी आहे. तिथं रंगीबेरंगी बाटल्या आमच्यासाठी नीट रचून ठेवल्या आहेत.

आता अधिकार दर्शविणारी टोपी काढून ठेवलेले कुरुविला अगदी वेगळे वाटतात. खेळाडू दिसतात. हसणं, खिदळणं सुरू आहे. सगळे अधिकारी आपापले हुद्दे विसरून पेयपानासाठी एकत्र आले आहेत. अरे–तुरे चालू आहे.

Cheers !

इतक्यात बाहेर डेकवर गडबड झाली. बाहेर आलो. काय झालं ? ही धावाधाव कशासाठी ?

'सी–इन्–सी येणार आहेत.'

'इथं ? समुद्रातल्या जहाजावर ?'

'त्यात काय अवघड आहे ? हेलिकॉप्टरनं उतरतील.'

क्षणभर सगळे सावध झाले. वर्दी आली. पाठोपाठ नौदलप्रमुख नंदा ताठ चालत आले. हेलिकॉप्टरनं आले असणार. फोटोत ते गुबगुबीत दिसतात. प्रत्यक्षात ते तसे नाहीत. गृहस्थ प्रौढ दिसतो. पोट किंचित सुटलेलं आहे. डोक्यावर कॅप नाही. गणवेषाचा खास दिमाख नाही. चेहरा प्रेमळ आहे. नजरेत बेरकेपणाची छटा आहे. प्रत्येकाला त्यांनी ओळखलेलं दिसलं. कचेरीत साधा ॲक्टिंग मामलेदार आला तरी चार चाकरमाने आजूबाजूला कडमडतात. मानपान होतात. इथं हा एवढा मोठा नौदलप्रमुख आला आहे, पण कुणीही गांगरलेलं नाही. उत्तेजित वातावरणात त्यांनी पहिला आनंददायक घुटका घेतला.

'मित्रांनो, तुमचा दिवस कसा काय गेला ?'

'आनंदात !'

'मग लिहिणार असालच.'

'अर्थातच.'

'आगे बढो; आता मला ह्या अधिकाऱ्यांशी थोडी चर्चा करायची आहे. तेव्हा

११

एका प्रेमवीराची अवतार-समाप्ती

आयुष्याच्या माळरानावरून आपला फेरफटका अखंड चालू असतो. आपण आपल्याच तंद्रीत भटकत असतो. आपल्या पावलांखाली नियतीनं एक आपल्यापुरतीच पाऊलवाट रेखलेली असते. आजूबाजूला कर्मकटकट असते. गर्दी, गोंगाट, गदारोळ सतत चालू असतो. खरं तर अशा गोंधळात कानांवर धड असं काही पडूच नये. पण नाही; त्या तशा उकळत्या गदारोळातही आपल्या कानांवर काही हाका अगदी स्पष्ट–स्पष्ट पडतात. नगाऱ्याच्या पडघमसारख्या दूरवरून. उत्स्फूर्तपणं आपण त्यांना 'ओ' देतो. कुणाला धरित्रीची हाक ऐकू येते आणि तो उभा जन्म, शहरी सुखासीन जीवन जगण्याच्या सर्व सुविधा उपलब्ध असूनही, एखाद्या दूरच्या नीरव खेड्यात पाखरांच्या संगतीत कांदाभाकर खात काढतो. आपण म्हणतो, हे असं कसं झालं? नागरी जीवनाला ह्यानं फाटा कसा काय दिला? डोंगरमाळांनी वेढलेल्या उजाड पडक्या खेड्यात ह्याला कसा काय दिलासा लाभला? ह्या साऱ्या प्रश्नांचं उत्तर एकच असतं. आपल्या कानांवर न पडलेली सृष्टीची आर्द्र साद नेमकी त्याच्या कानांवर पडलेली असते. त्यानं तिचा स्वधर्म ओळखून तिला 'ओ' दिलेली असते. कुणाला कुटुंबाची हाक ऐकू येते नि अनेक मोहांवर लाथा मारून तो दांडगं, कलंदरी जीवन जगण्याच्या शक्यता असलेला असामी साधं, सरळ रेषेसारखं बाळबोध, कुटुंबवत्सल संसारी जिणं आजन्म जगतो. कुणाला ग्रंथांची हाक ऐकू येते आणि उभा जन्म ते विद्याव्यासंगात व्यतीत करतात. जीर्णशीर्ण किल्ल्यांच्या पडक्या बुरुजांच्या आणि फुटक्या भिंताडांच्या हाका कुणाच्या कानी पडतात. ते गडपर्यटन आणि इतिहाससंशोधन ह्यांच्या दरम्यान मोकाट पायपीट करतात, तर कुणाच्या कानांवर घायाळ मानवांच्या हाकांच्या लाटांवर लाटा पडतात आणि दुभंगलेल्या आपल्या काळजाचे तुकडे ओंजळीत घेऊन ते दुःखितांची आसवं पुसण्यात कृतार्थ होतात. काहीजणांना तर खुद्द देवाची हाक ऐकू येते. चांदण्यानं आकाश ओतप्रोत भरलेलं असावं तसं त्यांचं अंतःकरण करुणेनं टाकोटाक भरलेलं असतं. देवाच्या हाकेची जीव शांत करणारी झुळूक चांदण्यात

बुडालेल्या त्या तळ्यावरून वाहू लागते. त्या शीतल झुळकेच्या अलगद दैवी स्पर्शानं वाद्याच्या तारा झंकारू लागतात. त्यांनी विचार वगैरे करण्याचा प्रश्नच नसतो. देवाचं नाव मुखी घेऊन, ते हाक आलेल्या दिशेनं एकट्याच्या बेभान प्रवासाचं प्रस्थान ठेवतात. त्यांच्या ओंजळीत श्रद्धेचा दिवा असतो. डोळ्यांसमोर देवाचा आशीर्वादाचा खुणावणारा हात असतो आणि पायांखाली हिरव्यागार फुलवेलीसारखी एक चिंचोळी पाऊलवाट सारवलेल्या अंगणात रांगोळीनं स्वस्तिक काढावं तशी नियतीनं रेखलेली असते.

डेव्हिडसनच्या कानावर अशीच एकदा देवाची हाक पडली. तो खडबडून जागा झाला. त्याला काय शक्य नव्हतं ? शिक्षक, वकील, कारकून, गुमास्ता, सैनिक, नाविक, अडत्या, पत्रकार,—असा कुठलाही पेशा त्याला सहज पेलला असता. त्याची वाटचाल सुसह्य झाली असती. इतर चार लोकांसारखा पोटभरू संसार करून तो कृतकृत्य झाला असता. पण देवाच्या आर्द्र हाकेपुढं इतर मोहमार्ग वितळून गेले. उरला फक्त खिस्ताचा एकमेव सेवामार्ग. ख्रिस्त त्याचा माता-पिता, सर्व काही होता. भवतारक होता. त्याचा स्वतःचा तसाच त्याच्या मते अलम् दुनियेचाही. अशा भगवानाला शरण जाण्यातच जिवाचं सोनं होणार होतं. पोराबाळांचं लेंढार काय कुणीही वाढवतो. अंगी थोडंसं कसब असेल तर गाडी-वाडी-माडी ह्या त्रिकोणातली मुशाफरी करणं मुष्किल नाही. पण देवाची हाक ऐकू यायला मात्र खास नियतीचाच अनुग्रह असावा लागतो; ते भाग्य ललाटी असावं लागतं. त्याचा destiny वर अढळ विश्वास होता. गळ्यात क्रॉस अडकवून रंजल्यागांजल्यांची सेवा करणं, सेवेनं त्यांची मनं जिंकणं आणि खिस्तचरणी त्यांना वळती करणं, ह्यातच त्याचा स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीही होते. नियतीनं त्याच्यासाठी खिस्तसेवेचा सोनमार्ग राखून ठेवलेला होता. दुःखितांच्या आणि वंचितांच्या डोळ्यांमधली आसवं त्याच्या डोळ्यांसमोर तरळत होती. चुकीच्या मार्गानं चाललेले शापित मानवांचे आक्रंदनाचा गाडा ओढणारे कळप त्याला दिसत होते. त्या अभागी यात्रिकांना ख्रिस्ताचा मार्ग त्याच्याशिवाय कोण दाखवणार होतं ? त्यांचा उद्धार दुसरं कोण करणार होतं ? Destiny नं ती सगळी जबाबदारी आपल्या गळ्यात अडकवलेली आहे अशी डेव्हिडसनची वज्रलेप खात्री होऊन चुकली. त्याचा देव त्याला हाका मारत होता. पहिल्याच हाकेला क्षणाचाही विलंब न करता तो जागा झाला. त्यानं क्रॉस ओंजळीत घेतला. कुरवाळला. त्याचा मुका घेतला आणि तो गळ्यात अडकवला. डेव्हिडसन त्या क्षणापासून ख्रिस्ताचा बंदा झाला. त्याचा हात धरून नियती त्याला ख्रिस्तमार्गावरून चालवू लागली.

ख्रिस्तसेवेचं अम्लान प्रस्थान ठेवलेला डेव्हिडसन धर्मोपदेशकाचा झगा घालून डोंगरमाळेतल्या स्टिफकी गावात धुक्यातून वाट काढीत दाखल झाला. स्टिफकीची वेस ओलांडताना त्याला अनंत अडचणी आल्या. हिमसेक होऊन गावातले रस्ते बुजले होते. ढोपरं-ढोपरं बर्फ साचलं होतं. ते कुदळीनं फोडावं लागलं. पिवळसर धुक्याचं कोंदट पटल इतकं दाट झालं होतं की त्याचा श्वासच कोंडला गेला. लाकडं ओलीचिंब होऊन

जळगाला पार निरुपयोगी झाली होती. झोळीतल्या पावाचा गोठून दगड झाला होता. पैशांचा तर ठणठणाटच होता. गावकऱ्यांची ओळखदेख नव्हती. गावात फक्त एक चर्च होतं,– जिथं करुणानिधी ख्रिस्ताच्या समाधानी चर्येवर मेणबत्ती जळत होती. दाट अंधारातला तेवढा अंधुक प्रकाश डेव्हिडसनला पुरेसा प्रेरक भासला. ख्रिस्तचरण तर त्याचे पंचप्राणच होते. केवळ ख्रिस्तकृपेनंच हे स्टिफकी गाव आपल्या वाट्याला आलं आहे अशी त्याची भावना झाली. त्यानं तिथंच ख्रिस्तासमोर गुडघे टेकले.

यथावकाश ख्रिस्तकृपा झाली. ऋतुचक्र फिरू लागलं. दिशा उजळल्या. ढगांच्या प्रवाही किनारी उजळल्या. बर्फकाळ ओसरला. पाणगळ थांबली. बालींची पिवळी शेतं डुलू लागली. डॅफोडिल्सचे घवघवीत ताटवे कोवळ्या केशरी उन्हात तरंगू लागले. पाखरं भिरभिरू लागली. गाऊ लागली. स्टिफकीत उपदेशक म्हणून आलेला डेव्हिडसन तिथल्या गावठी मठाचा महंत झाला. त्याची प्रवचनं झडू लागली. गावकरी ऐकायला जमू लागले. हा आला, तो आला, असं होऊ लागलं.

त्या घोळक्यामधूनच एके दिवशी नभाळ निळ्या डोळ्यांची नीरांजनं तेववीत बार्बाराही प्रवचनाला आली! त्या ज्योतींच्या किरणांनी डेव्हिडसनच्या हृदयाचा कोपरान् कोपरा उजळून निघाला. त्याचा उपदेश सर्वांना उद्देशून असे. नजर मात्र परत परत त्या शांत, तृप्त तेज-ज्योतीकडे वळे. बार्बारा चित्त हरखून त्याचे शब्द झेले.

धर्मोपदेशकाचं चित्त असं विचलित झालेलं शोभून दिसतं? एका तरतरीत तरुणीला आपल्या काळजाचा कबजा घेऊ देणं ख्रिस्तसेवकाला शोभतं? धर्मोपदेशकाचं लग्न चर्चबरोबर लागलेलं असतं ना? तो ख्रिस्ताचा संसार करतो ना? धर्मप्रचार आणि धर्मप्रसार ह्याविना अन्य स्वर्ग धर्मोपदेशकाला मंजूर नसतो. गळ्यात क्रॉस, हातात पवित्र पोथी आणि नजरेसमोर ख्रिस्तध्यान ह्या चिंचोळ्या चाकोरीतूनच धर्मोपदेशकांची वहिवाट चालू असते. मग डेव्हिडसनचं मन बार्बाराकडे पुनः पुन्हा झेपावे हा त्याचा नैतिक अधःपात आहे?

त्यानं थेट तिलाच एका बाजूला घेऊन सवाल केला,

'बार्बारा, आपली ओळख होऊन किती दिवस झाले असतील?'

'सहा महिने होऊन गेले की. पाहा, काळ कसा पळतोय ते कळतच नाही.'

'तू प्रेमात पडल्याचं तर हे लक्षण नव्हे?'

'नुसत्या प्रेमात काय म्हणता? सदान् कदा माझ्या डोक्यात फक्त तुमचाच विचार असतो. दुसरं काही सुचतच नाही. अन्नही गोड लागत नाही.'

'अगदी खरं सांगायचं तर माझ्या मनाची अवस्थाही काही फार वेगळी नाही.'

'मग आपण राजरोसपणं एकत्र राहू या की. माझं मन मी तुमच्या चरणी अर्पण केलंय.'

'काय बोलतेस काय तू बार्बारा? माझा पेशा कोणता? धर्मोपदेशकच जर चळला तर इतरांनी कुणाकडे पाहायचं?'

'आपण आपल्या सुखाकडे पाहू या. लोकांचं लोक पाहून घेतील.'

'लोकांचं सोडून दे. पण भगवान खिस्ताला मी काय सांगू? संसाराचा मला मोह झाला म्हणून सांगू?'

'मग हे असं अधान्तरी लोंबकळणं मी कुठवर साहू? माझा सारा जीव तुमच्या चरणांवर आहे.'

'अगदी खरं?'

'माझ्या स्पर्शानं ते तुम्हाला आजवर कधीही सांगितलं नाही? शब्द फसवू शकतील, पण स्पर्शापाशी आटोकाट इमान आहे. तशात, आम्हा बायकांच्या स्पर्शात तर फक्त इमानच असतं. स्त्री आपलं प्रेम एका क्षणाच्या स्पर्शानं व्यक्त करू शकते. माझ्या-बाबतीत तुम्हाला तो अनुभव आला नाही?'

'आला ग, परत परत आला.'

'मग आता विलंब कशासाठी करताहात तुम्ही?'

'खिस्त काय म्हणेल?'

'तो दयाघन प्रभू क्षमाशील आहे असं तुम्हीच सांगता नं प्रवचनामधून? ते खोटं?'

'देव दया करील. क्षमा करील. पण लोक फाडून खातील. तोंडाला काळं फासतील.'

'देवाला सामोरे जायला तयार असणारे तुम्ही लोकांना घाबरता?'

'हो. कारण देव दयाळू असतो नि लोक क्रूर असतात.'

'हिंमत नसलेले प्रेमिक अखेरीस चोरटं जीवन जगू लागतात. डेव्हिडसन-बार्बारा त्याच काळोख्या मार्गाचे पथिक झाले. अंधाराच्या आडोशात त्यांच्या गाठीभेटी होऊ लागल्या.

माणूस देवासारखाच क्षमाशील असतो. फरक इतकाच असतो की प्रभू सर्व-शक्तिमान असूनही समदाता असतो. समदृष्टी असतो. पाखर घालणारा असतो. एकट्या-दुकट्या माणसाच्या शक्ती क्षीण असतात. क्षमा करण्यावाचून त्याला गत्यंतरच नसतं. त्याचं स्वतःचं स्खलनही त्याला भेडसावीत असतं. ह्या सर्व त्रुटींची गोळाबेरीज माणूस क्षमाशील होण्याकडे होते. मात्र, माणसांचा जमाव क्रूर असतो. तो डूख धरतो आणि घात करतो. पारव्यासारखी स्वतःच्याच नादात असलेली टिचभर प्राणांची निरुपद्रवी माणसं एकत्र झाली की रंगरूप पालटतात. त्यांच्यात हत्तीचं बळ संचारतं.

शंभर हत्तींचं बळ अंगी संचारलेला स्टिफकीच्या गावकऱ्यांचा लोंढा डेव्हिडसनच्या मठाचं दार ठोठावू लागला. प्रकार काय काहे, जाब कसला विचारला जाणार आहे, ते सारं डेव्हिडसनच्या लक्षात आलं. दार उघडून तो शांतपणं म्हणाला,

'या! मठात मी तुमचं स्वागत करतो. भगवान खिस्ताच्या कृपेनं सर्व काही ठीक होईल.'

'आणि सर्व काही ठीक होण्याला भगवान खिस्ताची कृपा जर लोकडी पडली तर

'आम्ही आमची शक्ती पणाला लावून सर्व काही ठीक करून घेऊ.'

'भगवान ख्रिस्तापेक्षा तुम्ही शक्तिमान आहात ?'

'त्याची खात्री पटवून देण्यासाठीच तर आम्ही इथं आलो आहोत.'

'म्हणजे ?'

'म्हणजे असं की, सूर्योदय होण्याच्या आत तुम्ही आमचं हे गाव, हे चर्च, हा मठ, हा परिसर वगैरे सारं काही सोडून नेसत्या वस्त्रानिशी गावाच्या बाहेर पडलं पाहिजे. सूर्योदय होण्याच्या आत ! कळलं ?'

'मला प्रभूची आज्ञा होईल तसा मी वागेन. मी बंदा आहे खुद्द देवाचा. त्याच्या आज्ञेनं मी इथं तुमच्या सेवेसाठी आलो आहे. त्याची फेरआज्ञा होईतोवर मी हा मठ सोडणार नाही. जर त्यानं तशी आज्ञा केलीच, तर मग तुम्ही कितीही आग्रह केलात तरी मी इथं क्षणभरही रेंगाळणार नाही. देवाच्या इच्छेनुसार माझा मार्ग चालू लागेन. माझी सर्व सूत्रं मी देवाच्या हवाली केली आहेत.'

'आणि देवांनी ती तुमची सूत्रं आमच्या हवाली केली आहेत. तुम्ही निमूटपणं हा गाव, हे चर्च, हा मठ सोडता की नाही तेवढं सांगा.'

'नाही. मी देवाच्या आज्ञेची वाट पाहीन.'

'तुम्ही ढीग वाट पाहाल; पण आम्ही ती तुम्हाला सेकंदभरही पाहू देणार नाही. कारण तितका वेळ तुम्हाला दिला तर आमच्या मुलीबाळींची वाट लागेल एखादे वेळी. त्यांचीही लग्नकार्यं व्हायची आहेत. आज तुम्ही त्या बार्बाराला भ्रष्टविलंत, उद्या आमच्या मुलींकडे वळाल. तुमच्यासारख्या भोंदूचा नेम काय ?'

'तुमचा गैरसमज झालाय.'

'तो गुंता आपण नंतर सोडवू. तूर्त तुम्ही बऱ्या बोलानं हा मठ आत्ताच्या आत्ता खाली करा.'

'प्रभूची इच्छा तशी नाही. त्याची तशी आज्ञा नाही.'

'प्रभूची तशीच इच्छा आहे; नि आज्ञासुद्धा आहे. आमच्या लेकीसुनांचं जीवन निर्धास्त असावं अशी आमची गावकऱ्यांची इच्छा आहे, आणि भगवान ख्रिस्ताचीही इच्छा आहे.' इतकं बोलून गर्दीचा तो म्होरक्या गर्दीला उद्देशून म्हणाला, 'उचला रे ह्या भोंदूला नि नेऊन टाका ह्या लुच्चा भोंदूला डोंगराच्या पार पलीकडे.'

गर्दी डेव्हिडसनवर तुटून पडली. त्यांनी जणू त्याला खांदाच दिला आणि आरडा-ओरडा करीत नेसत्या कपड्यांनिशी, त्या तशा निबिड अंधारातून त्याला उचलून सीमापार केला. डोंगराच्या उतरणीवर त्याला सोडून गर्दी गावाकडे माघारी वळली. लांडग्याच्या तोंडून कोकरांचा कळप सोडविल्याचा आनंद त्याच्या डोळ्यांवर फेसाळत होता.

स्टिफ्कीच्या मठातली महंताची गादी रिकामी झाली.

गावकऱ्यांनी गचांडी देऊन हाकलून लावलेला डेव्हिडसन जणू बेवारशी झाला. खरा प्रकार काय आहे, बार्बाराच्या बाबतीत आपण कसे निर्दोष आहोत, ख्रिस्ताचे बंदे

सेवक म्हणून आपलं ह्या जगातलं कर्तव्य नेमकं काय आहे, वगैरे हकिकती ऐकून घेतील त्या लोकांना सांगत तो गावोगाव हिंडू लागला. दरम्यानच्या काळात धर्मगुरूनंही त्याचा हुद्दा हिसकावून घेतला. त्यामुळं डेव्हिडसनची स्थिती फारच केविलवाणी झाली. एक चावट गोष्ट फजिती झालेला माणूस स्वतःच सांगतो, म्हणून करमणुकीसाठी ती ऐकायला चार लोक त्याच्या व्याख्यानाला जमत. पण त्याच्या इभ्रतीची तटबंदी जी ढासळली ती ढासळलीच. आपल्या मुलीचं नाव बद्दू होतं म्हणून बार्बाराच्या बापानं आपल्या नभाळ-निळ्या डोळ्यांच्या लेकीला दूरच्या गावाला नेऊन उजवून टाकली. बार्बाराचा सुखी संसार दूरच्या खेड्यात निर्वेधपणं सुरू झाला. डेव्हिडसन देशोधडीला लागला.

खुद्द धर्मगुरूचाच रोष झाल्यामुळं डेव्हिडसनच्या खाण्याचेही वांधे होऊ लागले. फाटके कपडे घालून तो दऱ्याखोऱ्या तुडवू लागला. ह्या निरुद्देश भ्रमंतीत त्याला एक फिरत्या नाटककंपनीचा व्यवस्थापक भेटला. त्यानं ह्या धर्मोपदेशकाला उपदेश केला, 'हे पाहा, दोन वेळा पोटात अन्न पडणं हे सर्वांत महत्त्वाचं आहे. धर्म वगैरे त्यानंतरच्या गोष्टी. तुमच्या आयुष्याची गोष्ट मोठी मसालेदार आहे. तर तुम्ही असं करा, आमच्या नाटकाचा पडदा वर जाण्यापूर्वी दहापंधरा मिनिटं तुमच्या आयुष्याची गोष्ट जमलेल्या पब्लिकला थिएटरात रोज सांगत जा. लोकांचाही वेळ मजेत जाईल. दरम्यानच्या काळात पडद्यामागं तयारी करायला आम्हालाही फावेल. तुम्हाला आम्ही किरकोळ पगार सुरू करू. त्यामुळं तुमची हलाखी थांवेल.'

डेव्हिडसनला ह्यातलं अक्षरन् अक्षर पटलं! दुसऱ्या दिवसापासून त्यानं फिरती नाटकमंडळी आपली मानली. खेळाचा पडदा वर जाण्याच्या अगोदर प्रेक्षकांसमोर प्रकट होऊन तो आपल्या अंगलटी आलेल्या प्रेमप्रकरणाची सुरस कथा सांगे. आपण निष्पाप कसे आहोत तेही सांगे. लोक ती गोष्ट ऐकत. हसत. पण पुढं पुढं बहर ओसरला. तीच तीच गोष्ट दरदिवशी ऐकून घ्यायला लोक कंटाळले. डेव्हिडसन आत्मकथनासाठी उभा राहिला की लोक त्याची रेवडी उडवू लागले. नाटककंपनीच्या व्यवस्थापकाच्या ते लक्षात आलं. थंडपणं त्यानं डेव्हिडसनला सांगितलं, 'हे पाहा, तुमच्या प्रेमकथेतलं नाविन्य आता शिळं झालंय. तुम्हाला आता आम्ही तीच तीच गोष्ट सांगायला पुढं केलं तर आमच्या उत्पन्नावर त्याचा वाईट परिणाम होईल. तेव्हा आपला ऋणानुबंध आजपासून तुटला.'

'ते माझ्याही लक्षात आलं आहे. पण मी खाऊ काय? धर्मगुरूनं मला डच्चू दिल्यामुळं आता मला कुणी नोकरीसुद्धा देत नाही.'

'तो नवा मार्ग दाखवणं माझ्याकडे लागलं. तू असं कर. समुद्रकाठच्या एखाद्या हवेच्या ठिकाणी जा. तिथं जीव रमवायला आजकाल अनेक माणसं येतात. तिथं तू त्यांना प्राणायामाचे प्रयोग करून दाखव. प्राणायाम म्हणजे श्वास कोंडून ठेवायचा. हे प्राणायामाचे प्रयोग बघायला लोक अगदी अवश्य गर्दी करतील. माझं ऐक.'

'पण माझा नि प्राणायामाचा संबंध काय?'

'तुझा नि दोन वेळा जेवणाचा संबंध आहे; जेवणाचा गर्दीशी संबंध आहे, नि

गर्दीचा प्राणायामाच्या करमणुकीशी संबंध आहे. तेव्हा तू ही नवी योगविद्या शीक नि समुद्रकाठच्या हवेच्या ठिकाणी प्रयोग कर. गर्दी नाही जमली तर मला विचार.'

डेव्हिडसनला पटलं. त्यानं एक लाकडी पिंप विकत घेतलं आणि त्यात बसून तो गावोगाव प्राणायाम करू लागला! बाहेर बोर्ड लावलेला असे :

'आत एक साधू प्राणायाम करीत आहे. दर्शनोत्सुकांनी एक शिलिंगचं नाणं बाजूच्या पेटीत टाकावं आणि पाहावा.'

बघ्ये गर्दी करू लागले. इतकी की, रहदारीत अडथळे येऊ लागले. गर्दी हटवण्यासाठी पोलिस आले. त्यांनी दंडुका दाखवून रहदारीला अडथळा करतो ह्या सबबीखाली डेव्हिडसनला पिटाळून लावला!

पिंप टाकून डेव्हिडसन पळून गेला!

पण पोटापाण्याचं काय?

पळता पळता डेव्हिडसन एका गावात थांबला. तिथं फिरती सर्कस आली होती. त्या सर्कसच्या व्यवस्थापकाला डेव्हिडसननं कर्मकहाणी सुनावली. सर्कसवाला ती ऐकून थरारून गेला. म्हणाला, 'लेका, तुझ्या कुप्रसिद्धीचा फायदा आपण उठवू या. तू आमच्या सर्कशीत ये. मी तुला वाघ-सिंहाचे खेळ शिकवतो!'

'ते खरं आहे. पण वाघ–सिंहाचा नि माझा संबंध काय? मी एक एकमार्गी धर्मोपदेशक आहे. माझ्यावर नसतं बालंट आलं नि मी असा फेकलो गेलोय. खरं म्हणजे मला न्याय मिळाला पाहिजे न्याय!'

'न्याय तुला मिळायचा असेल तेव्हा मिळेल. पण त्याअगोदर तुला भाकरतुकडा मिळणं हे अधिक न्यायाचं आहे. तुझ्या शरीराला तू न्याय देणार की नाही? भाकरतुकडा कमावणार की नाही?'

'तुम्ही म्हणाल ते करतो!'

'मग आजपासून आमच्या सर्कशीत मी तुला दाखल करून घेतलं. मी स्वतः तुला वाघसिंहाचे खेळ शिकवतो. नंतर तू सिंहाच्या पिंजऱ्यात उभं रहावं नि सिंहाच्या पाठीवर एक हात ठेवून दुसऱ्या हातानं पब्लिकला सलाम करायचा. अरे, लोक उड्या मारतील उड्या तुझा खेळ बघायला!'

डेव्हिडसन वाघ-सिंहाचे खेळ शिकला. तो डावा हात सिंहाच्या पाठीवर ठेवी आणि उजव्या हातानं हॅट काढून पब्लिककडे माथा नम्र करी! सर्कशीच्या बाहेर मोठा बोर्ड लावलेला असे :

'अपूर्व संधी! सिंहाच्या पिंजऱ्यात धर्मोपदेशक? अपूर्व संधी! तुमच्या लाडक्या धर्मोपदेशकाचे जगाच्या लाडक्या प्राण्यांबरोबर दर्शन घ्या! अपूर्व संधी!'

बोर्ड वाचून लोक चक्रावून गेले. कुठला धर्मोपदेशक? कुणाचा लाडका? कुठले सिंह? किती सिंह आहेत? पिंजऱ्यात धर्मोपदेशक काय करतो?'

खेळांना तुडुंब गर्दी होऊ लागली. सर्कसवाल्याचं उत्पन्न वाढलं. सर्वांच्या नजरा

डेव्हिडसनकडे लागलेल्या असत. धर्मोपदेशकाचा स्वच्छ पांढरा झगा घालून तो ऐटीत पिंजऱ्यात शिरे. सिंहाच्या पाठीवर थोपटी. त्याच्याशी गुजगोष्टी केल्याचा देखावा करी आणि दोस्ताच्या पाठीवर हात ठेवावा तसा त्या रागीट सिंहाच्या पाठीवर डावा हात ठेवून उजव्या हातानं पब्लिकला नम्र अभिवादन करी. लोक खूष होत. त्यांच्या डोळ्यांची पारणी फिटत. टाळ्यांचा कडकडाट होई. खेळ संपे, डेव्हिडसन धर्मोपदेशकाचा झगा उतरवून ठेवी, आणि मटणपावावर तुटून पडे!

चर्चकडून सर्कसकडे आणि वाचाराकडून सिंहाकडे वळलेल्या डेव्हिडसनला चांगले दिवस आले. दोन-तीन वेळा मस्त खावं–प्यावं आणि रात्री सिंहाशी गुजगोष्टी कराव्यात, असे त्याचे दिवस आरामात जाऊ लागले. आता त्याला कशाचीही काळजी नव्हती.

सर्कसचा व्यवस्थापकही बारा बंदरांतलं पाणी चाखलेला बेरक्या होता. त्यानं नवीच शक्कल काढली. सर्कस स्टिफकीला न्यायची! त्यानं गणित बांधलं. आपण ज्याला गचांडी दिली त्या धर्मोपदेशकाला सिंहाच्या सान्निध्यात पाहायला बायकापोरं एकच गर्दी करतील नि उत्पन्न बघता बघता वाढेल.

सर्कशीचो तंबू स्टिफकी गावात उभा राहिला. बोर्ड झळकले. डेव्हिडसनला बघायला लोकांनी तुफान गर्दी केली. खेळ सुरू झाला. बँड वाजला. विदूषक नाचले. झुल्यावरच्या उड्या झाल्या. घोडे धावले. हत्ती डमरूवर उभे राहिले. कुत्र्यांनी कसरती केल्या. ढेंगूंनी लठालठ्ठी केली. माकडांनी करमणूक केली आणि शेवटी पिंजरा बाहेर आला. त्यात सिंह आपल्या आसनावर नेहमीप्रमाणं बसला. त्यानं सलामीची डरकाळी फोडली. लोक खूष झाले. नजरा स्थिर झाल्या.

डेव्हिडसन ऐटीत आला. त्यानं धर्मोपदेशकाचा स्वच्छ सफेद झगा घातला होता. त्यानं मनाशी ठरवलं होतं की स्टिफकीच्या कृतघ्न गावकऱ्यांना अभिवादन करायचं नाही. आपली दोस्ती फक्त उदारहृदयी सिंहाशीच काय ती आहे, आणि सिंहच सिंहाला ओळखतो ह्याची त्यांना खात्री पटवून द्यायची. त्याप्रमाणं डेव्हिडसन ऐटीत आला. त्यानं सिंहाशी हस्तान्दोलन केलं. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. पण इतक्या मोठ्यानं की सिंह भेदरला. लोकांना गंमत वाटली. त्यांनी आरोळ्या मारल्या. तंबू हादरून गेला. सिंह बावचळला. त्याला शांत करण्यासाठी डेव्हिडसन पुढं झाला. क्षण, दोन क्षण असे गेले. घाबरलेल्या सिंहानं थेट डेव्हिडसनचं गर्दन आपल्या जबड्यात करकचून पकडलं. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. पशु-शिक्षक भाले घेऊन धावले. सिंह ढीम करीना की डेव्हिडसनला जबड्यातून सोडीना. लोकांची त्रेधातिरपीट उडाली. मिळेल त्या दिशेनं ते तंबूतून बाहेर सटकले. गदारोळ झाला. तंबू रिकामा झाला. चवताळलेल्या सिंहानं डेव्हिडसनची चावून चावून चोथा केलेली गर्दन सोडली! तोपर्यंत रक्ताची नदी वाहून गेली.

ओंजळीत श्रद्धेचा दिवा, गळ्यात क्रॉस, नजरेसमोर ख्रिस्त-चरण आणि हातात पवित्र पोथी घेऊन धर्मोपदेशक डेव्हिडसन स्टिफकी गावात आला होता. जाताना तो कोण म्हणून गेला?

सध्या जोरात आहे. इतका की, तुम्हाला शूटिंगसाठी त्याची तारीख हवी असेल तर सत्त्याहत्तर सालातल्या मध्यावरची मिळेल. तीही सरळ सरळ नाही. मिनतवारीनं. कारण धर्मेंद्राचं पुढल्या पाचशे दिवसांचं शूटिंगचं वेळापत्रक पूर्णपणं भरलेलं आहे. पैशात न्हातोय नुसता. अडीनडीला कुणी एक दिवस मागितला तर तोंडाला येईल ती नाइट मागतो. वीस—वीस हजारसुद्धा मागतो. चारपाच तासांचे!

आता खरं सांगायचं तर आर. के. स्टुडिओत घुटमळणाऱ्यांपैकी निम्म्यावर माणसं गोरीगोमटी आहेत. धष्टपुष्ट आहेत. सगळ्यांचे दात मोत्यासारखे आहेत. नेत्र पाणीदार आहेत. बोलणं म्हणजे तर ऐकत राहा. अगदी साखरपाणी. हीरोपाशी असायला हवं ते जवळपास सर्व काही त्यांच्यापाशी रगड आहे. फक्त त्यांचं दैव कुठं तरी पेंड खातंय! म्हणून धर्मेंद्र–शशीकपूर फार फार पुढं, आणि उरलेला चोथा धुरोळा खात मागं, अशी व्यस्त विभागणी आहे. सगळेच कलावंत. पण देवाचे लाडके कलावंत म्हणून एक वेगळा कळप आहे.

चलती आणि चंगळ असलेले टॉप क्लास हीरो–हिरॉइन्स फार फार तर दोन डझन आहेत. पैकी, बहुतेक मुंबईतच ठिय्या देऊन आहेत. मुंबई हीच त्यांची मक्का.

फालतू ॲक्टर-लोक अंदाजानं साडेतीनशे भरतील. आपलं नशीब उघडण्याची ते त्यांच्या पद्धतीनं वाट पाहात आहेत.

ह्या दोन सर्वस्वी भिन्न गटांमध्ये जी फट आहे, तिच्यात धड ना हीरो, धड न एक्स्ट्रॉ, असा साइड ॲक्टर्सचा एक गट आहे. हे लोक सपोर्टिंग भूमिका करतात. म्हणजे एक जया भादुरी असते. ती अर्थातच मुख्य नायिका. चित्रपटाच्या गोष्टीत तिची सासू, आई किंवा सहेली असते. सबंध चित्रपटात मिळून तिला फार तर दहा वाक्यं असतात. तर ही सपोर्टिंग भूमिका करायला अगदीच डबडी नटी असून चालत नाही. निदान सुलोचनाबाईइतकी तरी उजवी असावी लागते. कारण तिला कधी कोर्टातल्या देखाव्यात साक्षीदार म्हणून उभं राहावं लागतं, तर कधी परदेशी निघालेल्या जावयाच्या हातावर सद्गदित स्वरानं दही वाढावं लागतं. कधी अमिताभ हीरो असला तर त्याची ज्याच्याशी गाठ पडते असा एखादा चतुर पोलिस इन्स्पेक्टरही पिक्चरमध्ये असतो. ती भूमिका हे साइड ॲक्टर्स करतात. हे चुकूनसुद्धा कधी हीरो होत नाहीत. आपल्या नशिबाची दारं तशी आतून बाहेरून बंद आहेत हे त्यांच्या लक्षात आलेलं असतं. त्याचंप्रमाणं हे लोक कधीही एक्स्ट्रॉ होत नाहीत. मध्येच लोंबकळत असतात, जन्मभर!

ह्या मध्यम कुवतीच्या मधल्या दर्जाच्या सिनेकलावंतांना Minor Artists म्हणतात. म्हणजेच छोटे कलावंत. छोट्या कलावंतांचं करारपत्र संपूर्ण चित्रपटासाठी करतात. साधारणपणं तीन-चार हजारांपासून एक लाख रुपयांपर्यंत एका संपूर्ण चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी ह्या मंडळींना प्रत्येकी मिळतात. ह्या मायनर आर्टिस्टपैकी नवख्या सिनेकलावंताला तीन हजार देतात. जॉनी वॉकर, असराणी, प्राण वगैरे एका चित्रपटासाठी एक लक्ष रुपये मोजून घेतात. ह्या मंडळींचं एक युनियन आहे. त्याचं नाव

'Cine Artists' Association.'

देवनाथ नावाचा एक मायनर आर्टिस्ट म्हणाला,

'व्हावं तर हीरो तरी व्हावं, नाही तर सरळ सरळ एक्स्ट्रॉ तरी व्हावं. छोटा कलावंत होऊ नये. कारण हीरोचे पैसे बुडवायची प्रोड्यूसरची टाप नसते. हिरोंची वट फार मोठी असते. ते कुठल्याही प्रोड्यूसरला मार्केटमधून दादागिरी करून उठवून लावू शकतात. तसंच एक्स्ट्रॉंची संख्या जास्त. त्यामुळं त्यांच्या संघटना बलवान असतात. मधल्या मध्ये मरण आहे आम्हा छोट्यांचं. पैशासाठी आम्ही तगादे लावले तर प्रोड्यूसर्स आम्हांला पुढच्या पिक्चरमध्ये घेत नाहीत. तगादे न लावावेत तर चालू चित्राचे पैसे बुडतात. वास्तविक पाहता संजीवकुमारसारखा दादा माणूस आमच्या सिने आर्टिस्ट युनियनचा सभासद आहे. पण त्याच्या नावाचा उपयोग आमच्या युनियनची शक्ती वाढविण्याकडे अजिबात होत नाही. कारण तो स्वतःच्या शूटिंगमध्ये गळ्यापर्यंत बुडालेला असतो. त्याला आमच्याकडे बघायला फावतच नाही. धर्मेंद्रही आमचा सभासद आहे. पण उपयोग काय? बरं, हल्ली लहानसहान कामं निघाली तर प्रोड्यूसर्स नि डायरेक्टर्स ती आपल्या नात्यातल्या किंवा मर्जीतल्या लोकांना देतात. नगाला नग उभा केल्याशी कारण, इतकीच त्यांची दृष्टी असते. आमचं युनियन काहीच करू शकत नाही. बरं, आमच्या मायनर आर्टिस्टांच्या वर्गात इतकी गर्दी झाली आहे की विचारूच नका. असराणी हा आमच्यातलाच एक्का. सगळ्या प्रोड्यूसर्सना असराणी साइड रोलसाठी हवाच असतो. सगळे निर्माते त्याच्या मागं मागं होते. तो त्यांना शेवटी कंटाळला, प्रोड्यूसर्सचा ससेमिरा टाळावा म्हणून त्यानं आपली फी वाढवत वाढवत एका लाखापर्यंत नेली, पण प्रोड्यूसर्स त्याचा पाठलाग थांबवायला तयार नाहीत. ते त्याला एक एक लाख रुपये देतात, कारण जरी तो हीरो नसला तरी पडद्यावर असराणी दिसला रे दिसला की पब्लिक एकदम खूष होऊन जातं, आता बोला! ह्या अशा परिस्थितीत सामान्य मायनर आर्टिस्टनं कसं निभावून न्यायचं?'

मायनर आर्टिस्टच्या जगात बेकारी फार मोठी आहे. त्याहीपेक्षा त्यांच्या दुनियेत क्रमप्राप्त येणारं हिंपुटवाणेपण आलेलं आहे. प्रोड्यूसरला खूष ठेवावं लागतं. एका चित्रपटाचा करार समजा चार हजारांचा झाला, तर महिन्याकाठी मायनर ॲक्टरला जेमतेम अडीचशे रुपये सुटतात, कारण एका चित्रपटाचं छायाचित्रण साधारणपणं अठरा महिने चालतं. मुंबईसारख्या महानगरात अडीचशे रुपड्यांत काय होणार फत्रे? शिवाय कलावंत म्हणून भपका दाखवायचाच असतो. तेव्हा एकाच वेळी दोन, तीन, चार चित्रपटांत चान्स मिळवावा लागतो. प्रदीर्घ सूत्रसंचालन आणि लागेबांधे लक्षात घेऊन तो तसा मिळतोही. सर्व बेत नीट जमला तर महिन्याकाठी सुमार मायनर ॲक्टरला सहाशे रुपये सुटत असतील. पाचपन्नास कमी–जास्त.

मायनर आर्टिस्टांना तब्येत उत्तम ठेवावीच लागते. तरतरीत राहून सतत रात्रंदिवस धावपळ करावी लागते. चित्रपटसृष्टीतला 'हूज हू' त्यांच्या जिव्हाग्री असतो. आजी,

काय होती त्याचा धड पत्ता लागत नाही. एक तर आता जुनी माणसंही काळाच्या ओघात कुठल्या कुठं फेकली गेली आहेत.

मराठी चित्रपट-व्यवसाय एके काळी कोल्हापुरात ऐन जोमात होता. गोविंदराव टेंब्यांच्या काळात तानीबाई नावाची एक नटी होती. तिच्याविषयी सध्याच्या मंडळींना सांगोवांगीसुद्धा माहिती नाही. तशी जुन्या माणसांची, विशेषतः आपल्याच व्यवसायातल्या बड्या असामींची त्रोटक माहिती आपल्याला असावी असं चित्रसृष्टीतल्या ताज्या दमाच्या मंडळींना बिलकुल वाटत नाही. फक्त दादरचे रणजित बुधकर तेवढे जुन्या बहादुरांची अगत्यानं आठवण ठेवतात निं पुण्यतिथ्या वगैरे लोकांच्या लक्षात वर्तमान-पत्रांतून आणून देतात. हे एक वरवर पाहता चेष्टेचं वाटणारं, पण वस्तुतः सांस्कृतिक महत्त्वाचं काम ते उपेक्षा सहन करीत करीत निष्ठेने करतात. बाकी सर्वत्र रामा शिवा गोविंदा! भालजी पेंढरकरांविषयी आपण एरव्ही केवढं शाब्दिक कौतुक ऐकतो. पण एकाही चालू कलावंताच्या मनात त्यांच्याविषयी कृतज्ञता अंकुरलेली दिसली नाही. त्यांच्या चित्रात कामं केलेलेसुद्धा त्यांच्याविषयी चांगला किंवा वाईट ब्र काढायला राजी नाहीत. ह्या कचकडी जगात कोण कुणाचं नाही हेच खरं असावं. एवढा मोठा पृथ्वीराज. स्वतः स्वयंभू नट. राज कपूरसारख्या टॉप लेव्हलच्या सिनेमावाल्याचा प्रत्यक्ष जन्मदाता. ते जाऊ द्या. पण पृथ्वीराजची सारी हयात चित्रसृष्टीत गेली हे तर खरं? पण त्याच्याबद्दल कुणाच्या पोटात मायेचा ओलावा आहे असं आढळलं नाही. उलट एक छोटा कलावंत ताड्कन म्हणाला, 'पृथ्वीराज झाला म्हणून काय झालं? एके काळी तोही आमच्या-सारखाच तंबूच्या बाहेर भाला धरून उभा राहायचा शूटिंगसाठी. रेषा उमटली, दिवस फिरले नि हीरो झाला. गबर झाला. पण आमच्यासाठी त्यानं काय केलं? छोट्या कलावंतांची त्यानं आठवण ठेवली?'

माझ्याकडे उत्तर नव्हतं.

आता साठीकडे झुकत चाललेले वसंतराव पुसाळकर नावाचे एक कोल्हापूरकडले कलावंत माझे दोस्त आहेत. त्यांनी स्वतः तर खूपच उन्हाळे-पावसाळे पाहिले आहेत. शिवाय कलावंतांच्या नशिबाच्या भरत्या ओहोट्याही त्यांनी फार जवळून पाहिल्या आहेत. कोल्हापूरच्या चित्रसृष्टीत ते ध्वनिमुद्रकांना तंत्रज्ञ म्हणून साहाय्य करीत. त्या वेळी साहाय्यक तंत्रज्ञांचा पगार महिना फक्त पंधरा रुपये असे. एक्स्ट्रॉंच्या तेव्हाच्या कोल्हापुरी जगाबद्दल ते म्हणाले,

'चाळीस वर्षांपूर्वी कोल्हापुरात एक्स्ट्रॉंना त्यांच्या कामाबद्दल पैसे देण्याची मुळी रीतच नव्हती. सिनेमात मॉब सीन असायचा. त्यात पन्नासाठ लोकांना बोलवायचं. ते तोंड रंगवून मावळ्यांची वगैरे कामं करायचे. त्याबद्दल त्यांना फक्त पोटभर जेवायला द्यायचं. नुसत्या जेवणावारी एक्स्ट्रॉ लोक कामं करायचे. जेवण चांगलं मटणाचं असायचं. पोटभर पुलावा नि मटणाचा लालेलाल रस्सा पदरात पडला की सगळे खुष असायचे.

'कधी कधी मुंबईचे सिनेमावाले कोल्हापुरात शूटिंगला येत. त्यांना मोठी जत्रा लागे.

वाडिया वगैरे मंडळी मग कोल्हापूरच्या बाळासाहेब यादवांना सांगत की, बुवा, आम्हाला शंभर माणसांचा थवा हवा. मग बाळासाहेब यादव तात्पुरते एक्स्ट्रॉ सप्लायर बनत. ते मुंबईवाल्यांकडून ठोक रक्कम घेत नि गरजेप्रमाणं माणसं पुरवीत. ते कुणाला आठ बारा आणे टिकवीत असतील तर देव जाणे. मात्र सर्वांना जेवण मोफत देत. मोठ्या हंड्यांमधून आणि परातींमधून घमघमीत पुलावा आणि मटण ट्रकमधून येई. प्रथम तो माल काचेच्या फॅन्सी बश्यांमधून हीरो, हिरॉइन आणि कुशल तंत्रज्ञांना देण्यात येई. तो अंक संपला की उरलेल्यांची लांबच लांब पंगत मटण झोडायला बसे. त्यांना पत्रावळींवर वाढण्यात येई. जेवण म्हणजे पोटभर जेवण हे गृहीतच धरलेलं होतं. राइस-प्लेट हा प्रकार तेव्हा ऐकूनसुद्धा माहीत नव्हता. सगळे एक्स्ट्रॉवाले मस्तपैकी जेवीत. तीच त्यांची कमाई.'

सौभाग्यवती मालिनीबाई नावाच्या एका सुखवस्तू संसारी बाईनी एक मौज म्हणून तीस वर्षांपूर्वी मराठी चित्रपटात एक्स्ट्रॉ म्हणून काम केलं होतं. त्या आपले जुने अनुभव सांगताना म्हणाल्या,

'विनायकांच्या एका पिक्चरसाठी कॉलेजच्या वर्गाचा सीन हवा होता. त्यांचा माणूस आला आणि आम्हांला घेऊन गेला. आम्हांला भयंकर हौस. आम्ही पंचवीस तीस बाया गेलो. आम्ही घरचेच कपडे घातले होते. तिथं आम्हांला रंगवलं नि वर्गात बसवलं. शूटिंग झालं आणि घरी आलो. आम्हांला दमडीही कुणी दिली नाही. चहासुद्धा दिला नाही. पण आम्ही हौशी ना ? ते आम्ही मनावर घेतलं नाही. आणि पिक्चर लागल्यावर तिकिटं काढून पाहायला गेलो. तर त्यात आमचा तो कॉलेजमधला सीनच नव्हता ! तो एडिटिंगच्या वेळी कापून टाकला असणार. पण त्यांनी आम्हांला कळवायचं तरी की नाही ? आमचे पैसे निष्कारणी फुकट गेले हो !'

'पुन्हा एकदा बोलावलं. आम्ही गेलो. शूटिंगही झालं. आम्हांला एक आणासुद्धा दिला नाही. पण अनुभवानं आम्ही सगळ्याजणी शहाण्या झालो होतो. आम्ही त्यांची ट्रिक ओळखली नि तो सिनेमा मुळी पाहिलाच नाही !'

'तसंच एकदा विनायकरावांची माणसं धावत धावत आली. म्हणाली, कोरस म्हणायला चला. आम्ही गेलो. कोरस गायलो. रेकॉर्डिंगही झालं. आम्ही घरी आलो. आम्ही इतके घसे खरवडले, पण आम्हांला एक पैसासुद्धा दिला नाही.'

तात्पर्य, हौशी कलावंतांचं सर्वत्र समान मरण असतं.

चित्रपटसृष्टीतल्या ताकदहीन आणि मुख्यत्वे नशीबहीन एक्ट्रॉ मंडळींच्यापुढं नुसता काळोख होता, तो पाच-पंचवीस वर्षांपूर्वी असं नाही. अगदी काल-परवापर्यंत तिथं हीच रड होती.

साठ साली एका नाट्यगृहात मी चहाकॉफीचं कॅन्टीन चालवीत होतो. खेळाला गर्दी असली की मला हाताखाली एखादा जादा माणूस लागे. काम तीन तासांचं असे. रात्री साडेआठ ते साडेअकरा. त्या तीन तासांचे मी दीड रुपया मोल देई. बर्वे

नावाचा एक कोकणस्थ तरुण त्या वेळी मोठ्या आनंदानं दीड रुपया पगारावर मदत करी. मुळात हा माणूस फार सुसंस्कृत होता. अक्षर म्हणजे मोत्याच्या पंक्ती. मुंबईत किती पाहात राहावा. बंगल्या सरकारी कचेरीत नोकरी होती. त्याचे डोळे फारच बटबटीत होते. डोळ्यांवर जाड भिंगांचा चष्मा होता. डोक्यावरचे केस होते आणि वाणी फारच जड होती. काही काही वेळा तर चक्क शेवडे बोलतं म्हणजे मट्ट झालेला वर्ग सर्वस्वेच नालायक होता. पण अचानक त्याला चित्रपटसृष्टी उद्ध्वस्त करायची महत्त्वाकांक्षा सुचली आणि विवेक न करता त्यानं सरळ सरळ सरकारी नोकरीचा राजीनामा खरडला. त्यानं मग तळापासून सुरुवात केली. पण एक्स्ट्रा म्हणूनही वर्षेला चान्स मिळाला नाही. त्याच गोमट्ट अक्षर बघून बाबुराव पेंढारकरांनी काही दिवस त्याला फलज्योतिषी म्हणून आसरा दिला. पण बाबुराव स्वतः तेवढे ॲक्टिव्ह करतात नि आपल्याला संधी देत नाहीत असा त्यानं ग्रह करून घेतला. बाबुरावांनी त्याला वाचवायचा प्रयत्न केला. पण त्यानं पोबारा केला. मग माझ्याकडे आला. एक दिवस नाईलाज झाला. पुढं कळलं की अन्नपाण्याविना जगण्याची वर्षेची जिद्द संपली आणि त्यानं स्वखुषीनं देहत्याग केला!

आता काय म्हणायचं? एक्स्ट्रांचं जिणं असं भयानक असतं असं म्हणायचं, की चुकीच्या मुहूर्तावरील पाऊलाचं करणारे वाळू स्वतःच उद्ध्वस्त होतात म्हणायचं?

अंधेरीचा एक शांत स्टूडिओ. मी तिथल्या कॅन्टीनमध्ये ताटकळत बसलो आहे. सभोवार गर्द झाडी आहे. झाडांच्या पानांत उन्हाचे लोलक सळसळत आहेत. मी बसलो आहे तिथून आकाशाचा एक निळाभोर तुकडा दिसतो आहे.

एका मध्यस्थानं माझ्यासमोर एक अतिशय शालीन रूपाची आणि मंजुळ आवाजाची तरुणी उभी केली आहे. रंग गोरा, देहयष्टी सडपातळ, काळी शिरशिरीत साडी, दिसावं शून्य. माझ्या मनातला पहिला विचार : ज्या कुणाची ही गृहिणी असेल तो सुखी-सुखी असेल!

'तुम्ही ह्या लाइनीत किती वर्षं आहात?'

'तीन वर्षं होऊन गेली.'

'तुम्ही नेमकी हीच सिनेमाची लाइन का पकडलीत?'

'आमच्या ओळखी होत्या.'

'पण तुम्हाला ह्या पेशात का उतरावं लागलं?'

'कारण आमचे हे घराकडे पूर्ण दुर्लक्ष करायला लागले, रेशन कुठून आणायचं? घर कसं चालवायचं?'

'घरवाले दुर्लक्ष का करायला लागले?'

'त्यांना पतंगाचा नाद लागला.- चोवीस तास पतंग. एकसारखे बाहेर बाहेर. देणेकरी आले. शेवटी मी ठरवलं की आपणास पैसे मिळवले पाहिजेत.'

'त्याचा घरसंसारावर परिणाम काय झाला?'

'त्यांना उलट आयतंच खायला मिळू लागलं!'

'तुम्हाला वर्‍यापैकी पैसे सुटतात?'

'जशी अल्लाची इच्छा असेल तसं होतं. असं नाही तसं पोट भरतंच. उपास काही पडत नाहीत.'

'तुम्हाला फार मोठं नाव कमवायचंय?'

'छे हो! पोट भरल्याशी कारण.'

'खुदा हफीज.'

ती गेल्यानंतर मध्यस्थानं सांगितलं, कधी कधी तिला काम मिळतं. जेव्हा काम नसतं आणि पैशांचा खडखडाट असतो तेव्हा ती चोरून देहविक्रय करते. तिला बाहेरच्या जगातले छक्केपंजे माहीत नसल्यामुळं ती. अल्पस्वल्प रेट लावते.

आता काय म्हणायचं? एक्ट्रॅचं जिणं असं भयानक असतं म्हणायचं, की कुटुंबाचं रक्षण करण्यासाठी गृहिणी पडेल ती किंमत मोजते म्हणायचं? बेजबाबदार कोण? पतंग उडविणारा तिचा नवरा की बंद दरवाजासमोर उभी असलेली ती कुटुंबप्रमुख?

आणि ह्याच सिनेमाच्या क्षेत्रात दुसरीकडे संपत्तीचा साक्षात कडेलोट आहे!

दोन अनुभव सांगतो:

दीड-दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. माझ्या लेकाची मुंज उभी राहिली. साहजिकच पैसे जमवणं आलं. बरं, लेखक-माणूस पैसे जमवणार-जमवणार म्हणजे कुठून? नि किती? शेवटी सिनेमावाल्यांबद्दल लिहून झटपट दिडक्या करायचं ठरवलं. हेतू पक्का होता. तेव्हा लपवाछपवी करण्याचं कारण नव्हतं. शिवाय गरजेपोटी लेखन करण्यात पाप नाही. आणि नाही तरी पाप-पुण्य आम्ही केव्हाच खुंटीला टांगलेलं आहे. तेव्हा तो प्रश्नच नव्हता. पण बेटा मूड लागेना. स्वतःच्या पायानं नटाच्या दारात जाऊन लोटांगण घालावंस वाटेना. शिवाय, तो देखणा पुरुषसिंह आपल्याला पहिल्या नमस्कार-चमत्कारातच झिडकारील, हा Sense of inadequacy चा भुंगा पाठीचा कणा पोखरायला लागला म्हणून नटनटींचा प्रांत कटाप केला आणि चित्रपट लेखकांकडे वळलो. तेव्हा बळ आलं, म्हटलं पैसे असोत-नसोत, आपली पंगत एकच आहे. आगे बढो!

तेव्हा गुलशन नंदा भलताच जोरात होता. व्यूहरचना करून मी भेटीचा मुहूर्त ठरवला. त्याचं अलिशान मकान बाहेरून पाहूनच माघारी वळण्याचा बेत केला. पण म्हटलं, सिनेमातले लकी लेखक कसे जगतात ते पाहून घेऊ या. गेलो; अपेक्षेप्रमाणं श्रीमान घरी नव्हतेच. केव्हा परतणार हेही नक्की नव्हतं. मग कोचावर टेकलो नि फर्निचर मोजलं, कोचांची बनावट न्याहाळली, गार गार पाणी पोटभर प्यायलो, समोर फेसाळणारा समुद्र गॅलरीतून डोळे भरून पाहिला, खाली रस्त्यावर सरपटणाऱ्या गाड्या उंचावरून पाहिल्या. घारींची आभाळातली संथ रिंगणं पाहिली. भिंतींचा रंग बोट लावून पाहिला. छानच होता. लेखकाची मुलं व्हॉलीबॉल घेऊन परतली, तेव्हा त्यांची टवटवीत कान्ती न्याहाळली. नोकरांचे चटेरीपटेरी कपडे पाहून घेतले. मग डोळे मिटून शांतपणं कोचावर देवासारखा पडून राहिलो.

अमळशानं गुबगुबीत नंदाजी उगवले. त्यांच्या तब्येतीचा हेवा वाटला. आल्या आल्या म्हणाले, 'मी फिल्मी दुनियेत वावरतो. पण मी फिल्मी माणूस नाही. मी साधा तुमच्यासारखा लेखक माणूस आहे.' त्यांच्या नरम बोलण्याचं आश्चर्य वाटलं. वाटलं, लेखकानं मूलतः साधंच असलं पाहिजे. असे सरसकट सगळ्याच लेखकांवर वज्रलेप संस्कार झालेले असतात काय? बहुतेक असावेत. भपकेबाज राहणी आणि प्रसन्न लेखणी ह्यांचं सूत जमत नाही. नकली, कृत्रिम आणि सहजता ह्यांचा मेळ कसा बसणार?

प्रस्तावना वगैरे न करता मी त्यांच्या मानधनाच्या हिशेबालाच हात घातला. ते म्हणाले, 'मी सपाटून पैसे मिळवतो. पूर्वी मी खंक होतो. ह्या सिनेमानं मला हात दिला. माझी प्रत्येक स्टोरी हिट गेली. प्रत्येक स्टोरीनं रौप्य महोत्सवी यश मिळवलं. पंचवीस स्टोऱ्या लिहिल्या. पंचवीस चालू आहेत. प्रत्येक स्टोरीचे चाळीस पन्नास हजार तरी होतातच. झालेच पाहिजेत. नाही तर लिहायचं कशाला? पण लेखनाचा हा बोजा आता फार वाढलाय. म्हणून मी चार पोट-लेखक नेमलेयत. घरी नोकरीलाच ठेवले आहेत. त्यांना कथानकांचे दुवे सांगतो. ते त्यांच्या त्यांच्या मगदुराप्रमाणं संवादांचे कच्चे खर्डे तयार करतात. मी त्यांच्यात दुरुस्ती करतो नि कप्प्यांची साखळी लावतो; की झाली नवी स्टोरी तयार! हं, मी कॉम्प्रोमाइज करीत नाही. सटासट लिहितो. मूल्यविवेक माझ्यापाशी आहे!'

तर, यशस्वी सिनेमावाल्यांवर पैशाचा हा असा पाऊस कोसळत असतो. शिवाय मूल्यविवेकाच्याही सात्त्विक गोष्टी ते ठासून करतात. आम्ही त्यांची टिपणं तयार करतो. ह्या इहलोकी त्यांचेही पैसे होतात!

दुसरी आठवण पंधरा वर्षांपूर्वीची आहे. सिनेमावाल्यांचं एक शिष्टमंडळ अमेरिकेहून आलं होतं. देवाणघेवाणीची खलबतं होणार होती. राज कपूर, दिलीपकुमार वगैरे मंडळींनी त्या शिष्टमंडळाला मेजवानी देण्याचा आखाडा घातला. जागा– महालक्ष्मीचं रेसकोर्सचं उघडं टर्फ. वेळ रात्री साडेआठ.

मी त्या वेळी तिथं मुकादम म्हणून होतो.

पाच-पन्नास पाहुणे जमले होते. नटनट्यांची जत्रा सजली होती. यजमान जातीनं देखरेख करीत होते. पण ज्यांचा एवढा टोलेजंग सत्कार ते हॉलीवुडवालेच गायब झाले होते! शेवटी, खूप वेळानंतर ते प्रकटले. बरं, प्रकटले तेसुद्धा बाहेरून कुठून तरी भरपेट चापून. पाहुणे धरून आम्ही शेदीडशे मंडळी होतो आणि उत्तमोत्तम तिखटामिठाचा स्वयंपाक तयार होता एक हजार माणसांचा. नामवंत चित्र्यांकडून तो करून घेण्यात आल होता.

प्रथम चायनीज सूपचे हौदे रिकामे करणे प्राप्तच झाले. मुकादम ह्या नात्यानं दुय्यम दर्जाच्या झाडून साऱ्या उपस्थितांना मी तब्बल तीन तीन कप चिनी चिकन सूप चापायला भाग पाडलं. मंडळींनीही अनमान केला नाही.

कपडेपटातले कर्मचारी, सारे कसे भेदाभेद न मानता, आपल्या पगारी कामाचाच एक भाग म्हणून तात्पुरते एक्स्ट्रॉ बनत. दिनकर द. पाटील हे मास्टर विनायकांकडे स्टोरी डिपार्टमेंटमध्ये पगारी साहाय्यक लेखक होते. त्यांचा नि ॲक्टिंगचा काहीही संबंध नव्हता. पण 'सरकारी पाहुणे' चित्रपटात वत्सला कुमठेकरच्या मैफलीचा एक प्रवेश आहे. त्यात पाठीमागे जे रसिक लोक माना वेळावीत बसलेले दाखवले होते, त्यांत लेखक दिनकर द. पाटीलही होते नि शाहीर अमर शेखही होते. चाळीस-एकेचाळीसच्या सुमाराचा तो काळच असा होता की, 'माझं'–'तुझं' न करता सगळी मंडळी एकजुटीनं आपलंच काम समजून कंपनीचं पडेल ते काम करीत. सारेच कंपनीचे पगारी नोकर असत. पंधरापासून पंचाहत्तरपर्यंत पगार असे. सर्वसाधारण पगार तीस असे. ह्या पगारात गाणी लिहिणं, त्यांना चाली लावणं, तबला बडवणं, लहानमोठ्या भूमिका सेटवर करणं, संवादाच्या कॉप्या तयार करणं, बड्या लोकांची देखभाल करणं, निरोप पोचवणं, सगळं नीट समजून घेणं आणि पगाराचे तगादे न लावणं इतक्या कर्तव्यांचा समावेश असे. कंपनीच्या पदरी नोकरीला असून पटावर नाव असण्याचा तो जमाना होता.

प्रभात फिल्म कंपनीच्या पदरी नोकरीला असून तिच्या पटांवर नाव असलेला अभिनेता चंद्रमोहन याने एका ठोकरीसरशी ते एकोप्याचं जुनं विश्व दुभंगून टाकलं! त्यानं महिन्याच्या महिन्याला पगार देणाऱ्या 'प्रभात'च्या नोकरीवर लाथ मारली आणि त्या मोक्ष्यापासून एका विशिष्ट चित्रपटापुरता कलावंतांचा करार करण्याची पद्धत हिंदी चित्रसृष्टीत सुरू झाली असं नंदू खोटे म्हणतात. चंद्रमोहनांच्या अगोदर सर्व संच कंपनीचा पगारी नोकर असे. आता करारावर एका चित्रपटापुरतं काम करणारा कारागीर कलावंतांचा वर्ग सुरू झाला. कंपनीच्या पदरी नोकरदार वर्ग नसल्यामुळं नगण्य भूमिकांसाठी बाहेरच्या माणसांना एका विशिष्ट दृश्यासाठी 'एक्स्ट्रॉ' म्हणून पाचारण करण्यात येऊ लागलं.

एक्स्ट्रॉ ह्या चित्रपटीय शब्दाला मराठी पर्याय 'फालतू' हाच आहे. 'अतिरिक्त' नव्हे. फालतू म्हणजे पडेल ते नगण्य काम करणारा कुणीही नगण्य. म्हणजेच बिनचेहऱ्याचा अभिनेता. पण फालतू शब्दातून प्रगट होणारा समर्पक अर्थ फार अपमानकारक आहे; म्हणून त्या शब्दावर फुली मारूया.

आजच्या सिनेमा धंद्यामध्ये 'एक्स्ट्रा' म्हणजे तोंडाने एकही शब्द न उच्चारता, सामूहिक दृश्यामध्ये ठोकळेबाज काम करणारा नगण्य अभिनेता, अशी व्याख्या ढोबळमानानं करण्यात येते. म्हणजे समजा, जत्रेचं चित्रीकरण आहे. तर जाणारा येणारा जो मॉब दाखवावा लागतो त्यात काम करणारा तो एक्स्ट्रॉ. एक्स्ट्रॉ सुटा काम करीत नाही. नेहेमी टोळीनं मूक अभिनय करतो. त्याला जर एखादा शब्द बोलावा लागला तर त्याबद्दल दहा रुपये अधिक द्यावे लागतात. समजा, 'महात्मा गांधी की जय' अशी आरोळी द्यायची आहे, तर एक नट 'महात्मा गांधी की जय' हे तीन शब्द उच्चारील नि 'जय' ह्या शब्दाचा पल्लास्फोट एका आवाजात वीर करतील. तर जय शब्दाचा घोष सामुदायिक

दा. क. निंबे

करण्याबद्दल त्या पन्नासजणांना जादा वेतन मिळणार नाही. पण 'महात्मा गांधी की' हे तीन शब्द एकाला समूहापासून अलग राहून एकट्याने केकाटावे लागतील. म्हणून हे तीन शब्द उच्चारण्याबद्दल त्याला दहा रुपये जादा मिळतील.

मुंबईत आज जवळ जवळ साडेतीनशे एक्स्ट्रॉ नट असून त्यांचं भक्कम युनियन आहे. एखाद्या दिग्दर्शकाला किंवा निर्मात्याला जर सामूहिक दृश्यासाठी एक्स्ट्रॉ नटांची टोळी किंवा पथक हवं असेल तर त्याला एक्स्ट्रॉ सप्लायरच्या मार्फतच माणसं बोलवावी लागतात आणि त्यांची ठरलेली बिदागीही रोखठोक मोजावी लागते. दरडोई पंधरा ते पस्तीस रुपयांपर्यंत बिदागी ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणं मिळते. शब्द अगर वाक्य उच्चारावं लागलंच तर बिदागीत दहा रुपये वाढवून देतात.

काही मोठे वलयवाले फिल्मी लोक ह्या एक्स्ट्रॉमधूनच पुढं नावारूपाला आले. उदा.–कालची मीनाकुमारी आणि आजची मुमताज किंवा मेहमूद. काही एकेकाळचे मोठे नामांकित हीरो लोक घसरत घसरत आज एक्स्ट्रॉ बनले आहेत. उदा.–एकेकाळचा दुर्गा खोटेबरोबर काम केलेला आय. टी. निंबाळकर किंवा बिलिमोरिया. मात्र जागच्या जागीच राहिलेले एक्स्ट्रॉ नटनटीच अधिक आहेत. सुरुवातीला त्यांना दिवसाचे पंधरा मिळत. आता पस्तीस मिळतात. पण त्यांच्या नशिबी लिहिलेलं एक्स्ट्रॉपण संपलेलं नाही. पण त्यातही काहीजण स्पेशालिस्ट झाले आहेत. उदा.– मूलचंद हा एक्स्ट्रॉ नट मारवाड्याचीच भूमिका करतो. सुपारीवाला म्हणून एक वृद्ध पारशी एक्स्ट्रॉ आहे. तो फक्त अँग्लोइंडियन माणसाचं काम करतो; कारण त्याच्या चेहऱ्याची ठेवण डिट्टो अँग्लो-इंडियन माणसासारखी आहे. एक पारशी जोडपं आहे, ते फक्त लग्नसमारंभाच्या वगैरे समूहदृश्यात पारशी जोडप्याची तेवढी भूमिका करतात. दुसरं कुठलंही काम त्यांना जमतही नाही आणि त्यांना कुणी देतही नाही. मात्र पारशी जोडप्यांच्या भूमिका निघाल्या की पालखी नेमकी त्यांच्या दारातच उतरते.

ह्या एक्स्ट्रॉ मंडळींच्या प्रारब्धाची चाचपणी करीत करीत मी दादरला रणजित स्टुडिओच्या पिछाडीच्या लल्लूभाई मॅन्शनमध्ये आलो आहे. तिथं चाळीतल्या तिसऱ्या मजल्यावरच्या त्या औटक्या दुखापी खोलीत हळूहळू नावारूपाला येत चाललेल्या भूषण तिवारी ह्या तरुण 'फायटर'चा संसार विसावला आहे. ह्या जागेत एक फिल्मी माणूस राहतो ह्यावर विश्वास बसणार नाही. एखाद्या नवख्या वकीलाची किंवा टापटिपीत राहणाऱ्या शिक्षकाची ती खोली वाटते. अगदी माफक फर्निचर, चार मुलं, एक बाळबोध अगत्यशील गृहिणी, काळ्याभोर केसांचं एक कुत्र्याचं गोंडस पिल्लू आणि सुदृढ बांध्याचा, कुरळ्या केसांचा काळासावळा भूषण. त्याला माझा प्रथमदर्शनीच वास आला आहे. मी जर्नालिस्ट आहे असं त्याचं म्हणणं. असो.

'भूषणजी, तुम्ही ह्या फिल्मी लायनीत किती वर्षं खपताहात?'

'गेला बाजार पंधरा वर्षं तरी असेन.'

'सुरुवातीपासूनच तुम्ही एक्स्ट्रॉ होतात काय?'

आता गाणी नको, फाइट्स पाहिजेत. पडद्यावर गाणं सुरू झालं की लोक बिड्या फुंकायला जातात. उलट फाइट दिसली की लोक खुर्चीतल्या खुर्चीत आनंदानं उड्या मारतात. शिट्या फुंकतात. चित्रपटात ज्यानं पैसे गुंतवलेले असतात, त्यांना दुसरं काय हवं असतं ? म्हणून सिनेमाच्या लायनीतला ह्यापुढचा काळ हा तगड्या नि निधड्या छातीच्या फायटर्सचा आहे.'

असं हे फायटर्सचं नव्यानं उदयाला येत असलेलं हाणामारीचं जग.

ज्या वृंदगायकांच्या, म्हणजे कोरस-सिंगर्सच्या आणि वाद्यकारांच्या मुळावरच हे नवे फायटर्स प्रहार करणार आहेत त्यांचीही एक्स्ट्रॉच्या सारखीच ऐसपैस दुनिया आहे. मुंबईत जवळजवळ चारशे वादक आहेत. सव्वाशे गाणारे तरुण-तरुणी आहेत. चारशे वादकांपैकी सत्तर-ऐंशी वादनकारांना कामं मिळतात. उरलेले पंचाहत्तर टक्के वाद्यकार आज अक्षरशः बेकार आहेत. मंगेशकर भगिनी इतक्या प्रबळ आहेत की इतर कुणाला पार्श्वगीत गायनाला संधी मिळणं जवळपास अशक्यच आहे. तेव्हा नव्या गायक-गायिकेनं गायचं म्हणजे कोरसमध्येच. दहा आघाडीवरले संगीत दिग्दर्शक ह्या पाचशे गायक-वादकांना कामं पुरवीत असतात. म्हणजे असं की—समजा, आर. डी. बर्मनला एक कोरस बसवायचं असलं, तर चांगले गायक आणि कसबी वादक यांना सगळा गाव धुंडाळून गोळा करण्याची कामगिरी तो एका 'निरोप्या'वर पूर्णपणं सोपवतो. ह्या निरोप्याला इण्डस्ट्रीमध्ये 'मेसेंजर' म्हणतात. ही मेसेंजर माणसं प्रत्येक संगीत दिग्दर्शकाची ठरलेली असतात. त्यांना सांगितलं जातं, 'बीस व्हायलिनवाले, पाच बासरीवाले, तीन सतारिये, चार तालवाद्यवाले, एक पियानोवाला, एक इलेक्ट्रिक गिटारवाला, सोळा पातळ आवाजीवाल्या गायिका, आठ ढाल्या आवाजातले गायक उद्या अमुक अमुक स्टुडिओत सकाळी अकराच्या ठोक्याला हजर कर.'

मेसेंजर एकदम तैय्यार गडी असतात. सर्व याद्या त्यांच्या खिशात असतात. ते जिवाचं रान करतात. रात्रीचा दिवस करतात नि असेल तिथं आणि असेल त्या अवस्थेत आर्टिस्टांना गाठतात नि त्यांना सांगितलेल्या वेळी सांगितलेल्या स्टुडिओत वाद्यांसहित हजर करतात. मेसेंजरचं काम काहीच्या काही श्रमाचं असतं. कारण एक व्हायोलिनवाला विरारला राहतो, दुसरा गिटारवाला कुलाब्याला असतो, तर तिसरा पियानोवाला उमरखाडीला असतो. मेसेंजर अक्षरशः पळापळ करून कलावंत दहा दिशांतून गोळा करतो. त्यांचे ठराविक अड्डे असतात, नि नेमके तिथं कलावंत मिळतात. ह्या अपूर्व कामगिरीबद्दल त्याला सव्वाशे ते दीडशे रुपये दिग्दर्शकाकडून मिळतात. आणि अपेक्षित ते कलावंत तो गोळा करू न शकल्यास दिग्दर्शक सर्वांसमक्ष त्याचं श्राद्धही करतात. हे मेसेंजर्स मोठे वस्ताद असतात. कुठले कलावंत निवडायचे आणि कुठले गाळायचे हे तो मेसेंजर धूर्तपणं ठरवतो, आणि जमेल तसं प्रत्येक आर्टिस्टकडून कमिशन खातो. मेसेंजरनं इतकी आडवाट करून आपल्या घरी खेप टाकल्याबद्दल टॅक्सीचं भाडं म्हणून कलावंत एक-दोन रुपये आनंदानं त्याच्या हातावर टेकवतो. म्हणजे पन्नासाचं

पथक उभं केलं तर मेसेंजरला संगीत दिग्दर्शकाकडून सव्वाशे-दीडशे, नि नेमकं आपल्यालाच निवडल्याबद्दल कलावंतांकडून एकूण शे-पाऊणशे रुपये मिळतात. म्हणजे मेसेंजरला एका वृन्दगानासाठी माणसं जमवण्यासाठी दोनशे रुपये सुटतात. सात तासांच्या एका शिफ्टसाठी वाद्य वाजवण्यासाठी वादनकाराला प्रत्येकी साडेबासष्ट रुपये बिदागी मिळते. त्याच वेळात वृंदगानात भाग घेणाऱ्या गायक तरुण-तरुणींना प्रत्येकी शंभर ते सव्वाशे रुपये मानधन मिळतं. अधिक काम केलं तर ओव्हरटाइम भत्ता बांधलेल्या दरानं मिळतो. ह्यात चालढकल होत नाही. पैसे रोखीनं मिळतात. कारण युनियनचा धाक दिग्दर्शकांना फार असतो.

ह्या समस्त फिल्मी दुनियेतल्या एकूण व्यवहारांची उभारणी हात आणि हात-मोजा ह्या तत्त्वांवर झालेली आहे. तुमच्यापाशी ढीग विद्या असेल. त्याचा छदाम उपयोग नाही. मधल्या निरोप्याचं नि तुमचं साटंलोटं असलं तरच तरणोपाय असतो. कारण दिग्दर्शक किंवा निर्माता किरकोळ मंडळींची नावं लक्षात ठेवत नाहीत. त्यांच्या काळजाला वेगळेच भुंगे कुरतडत असतात. ते आपल्या गरजा ह्या मधल्या मेसेंजरांना किंवा सप्लायर्सना फक्त चोवीस तास अगोदर सांगतात. कधीकधी बारा तासच अगोदर सांगतात. मग मेसेंजरांची नि सप्लायर्सच्या डोक्यांतली चक्रं सुरू होतात नि ते भराभर कळप तयार करतात. सर्वांच्या कुंडल्या त्यांच्यापाशी असतात. मागणी तसा पुरवठा होतो. चार फायटर्स हवेत ? हे घ्या चार तगडे फायटर्स; उद्याच्या सीनमध्ये पाच मारवाडी लागणार आहेत ? हे घ्या पाच मारवाड्यांचं टोळकं. तुम्हाला पार्श्वसंगीताला तीस वाद्यकारांचा ताफा हवा ? ही घ्या तीस कलावंत मंडळी,—त्यांच्या वाद्यांसह आली आहेत. किती नृत्यांगना हव्यात ? वीस ? हवा घ्या वीस फीमेल डान्सर्स.

कळपांची ही सारी जमवाजमव हे मधले खटपटये करतात. साहजिकच ते लोणीही खातात. कलावंतांना ह्या मेसेंजरची नि सप्लायर्स लोकांची मर्जी सतत राखावी लागते. थेट दिग्दर्शकांशी लागेबांधे असून फारसा उपयोग होत नाही. तो एक तर असल्या फालतू बाबींत लक्ष घालीत नाही, किंवा सप्लायरला भेटायला सांगतो. म्हणजे पुन्हा ह्या मधल्या माणसाच्या पायावर दंडवत घालणं गरजूंना भागच पडतं. फक्त जयकिसन हा गरीबांविषयी पोटात माया असलेला एक कनवाळू संगीत दिग्दर्शक होता. त्याच्या दारात जर एखादा गरजू कलावंत काम मागायला गेला तर तो त्याला छोटंसं काम द्यायचा. नीट वाजवता येत नसेल तर हातात व्हायोलिन देऊन शेवटच्या रांगेत उभं करायचा नि त्याच्या पोटापाण्याची परस्पर सोय लावून द्यायचा. एरव्ही सर्व शक्ती ह्या मधल्या कारभाऱ्यांच्या हाती एकवटली आहे. ते साक्षात भटजी. तेच हात धरून देवळात नेतात आणि तुम्हाला यथासांग देवदर्शन घडवतात. त्याची त्यांना अपेक्षित असलेली दक्षिणा देणं आणि त्यांना सर्व प्रकारे तृप्त ठेवणं भागच असतं.

ताठरपणा, निस्पृहता, निष्कलंक निष्ठा वगैरे शब्द फिल्मी दुनियेत हास्यास्पद मानतात. पडेल ते काम जिवाचा हियां करून पूर्ण करणं आणि आपल्या अंगच्या

क्रान्तिकारकाचा मुलगा

क्रान्तिकारकाची जन्मशताब्दी अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपली तेव्हा मी जागा झालो. वर्तमानपत्री लेखकाला असं खडबडून जागं व्हावंच लागतं. मोठ्या लोकांच्या जन्ममृत्यूचा मोका साधून चार परिच्छेद लिहिले, तर दोन पैसे हमखास सुटण्याची संधी असते. बरं, त्यासाठी फार धडपडावं लागतं अशातलाही भाग नाही. संग्रहालयात चार घटका बसायचं, दोन-चार शालोपयोगी चरित्राची बुकं चाळायची, टिपणं काढायची आणि चार ज्वालाग्राही अक्षरांची आरास मांडायची, की उग्र क्रांतिकारकावरचा एक नवा शोभिवंत लेख तयार होतो. इतरांचे असे शैलीबाज लेख आजूबाजूला तयार होताना मी पाहात होतो. तेव्हा म्हटलं, क्रांतिकारकाच्या जन्मशताब्दीचा मणिकांचन योग जर दारात चालून आला आहे, तर आपण त्याचा फायदा का न उठवा ? दिडक्यांसारखा मित्र नाही !

मी तयारीला लागलो.

प्रथम संग्रहालयात गेलो. ग्रंथपालाजवळ त्या उग्र क्रांतिकारकाचं चरित्र मागितलं. हसता येणाऱ्या ग्रंथपालांपैकी तो एक होता. त्यानं हसत हसत विचारलं,

'तुम्हीसुद्धा त्यांपैकीच का ?'

'म्हणजे ?' मी आश्चर्यानं विचारलं.

'गेला महिनाभर मी पाहतोय, जो उठतो तो त्या क्रांतिकारकाचंच चरित्र मागतोय ! एक क्रांतिकारक तुम्ही कितीजण मोडून खाणार ?'

मी खट्टावलो. विचारलं—

'सध्या पुस्तक इथं नाही ?'

'सध्या नाही नि लवकर मिळण्याची शक्यताही नाही. जवळ जवळ चौदा मंडळींचा क्लेम आहे. ते सगळेजण संथपणं वाचणार, टिपणं काढणार, लेख तयार करणार नि आठवण झालीच तर सुट्टीच्या दिवशी हस्ते-परहस्ते पुस्तक परत लाबून देणार. प्रत्येकजण असंच करणार. वाटल्यास माझे शब्द लिहून ठेवा. अशा ह्या चक्रात तुमचा

नंबर केव्हा लागणार ? बरं, त्या क्रांतिकारकाचं चरित्रसुद्धा अवघं एकच आहे.'

'पण इथं पुस्तकाची स्थळप्रत असेल ना ?'

'अहो, सध्या फिरतेय ती इथली रेफरन्सची स्थळप्रतच फिरतेय! होम डिलिव्हरीची प्रत होती ती मागं जुनी पुस्तकं काढून टाकली त्यातच उडाली.'

'बरं, दुसरीकडे कुठं मिळेल ते पुस्तक ?'

'अशक्य! चाळीस वर्षांपूर्वीचं चोपडं कोण कशाला सांभाळणार ? आणि चाळीस वर्षांपूर्वी तरी त्याला कोण विचारीत होतं ? मी सांगतो, वीरकरांनी त्या पुस्तकात नग्गद चारशेची खोट खाल्ली. शेवटी लॉट रद्दीत निघाला. आपल्याकडच्या पुस्तकांची हालत ही अशी आहे. शताब्दी-बिताब्दी निघालीच कुणाची तर चार टाळकी आठवण काढतात. एरव्ही असली पुस्तकं म्हणजे रद्दीच.'

रद्दी ह्या गोष्टीबद्दल जातिवंत लेखकाला कधीच घृणा वाटत नाही. तो मुळी रद्दीच्या जगातच जगत असतो. तेव्हा वीरकरशेटचा लॉट रद्दीत निघाला ह्याचा माझ्यावर काडीइतकाही परिणाम झाला नाही. चुटपूट लागली ती ह्याची, की क्रांतिकारकाच्या धाडशी जीवनावर जो लेख मी चुटकीसरशी बसल्या बसल्या लिहिणार होतो, त्याचं ऑफस् होण्याची पाळी आली!

मी काढता पाय घेतला. ग्रंथपाल हसत हसत म्हणाला,

'पाहा, काय मजा आहे! चाळीस वर्षांत त्या क्रांतिकारकाची साधी आठवणही कुणी काढली नाही. आणि आता एकाच दिवशी तो सर्वांना हवाहवासा झाला! असो म्हणा! ह्या योगायोगाच्या गोष्टी आहेत. तुमचा पैसे मिळवायचा चान्स हुकला ह्याबद्दल मात्र मला सहानुभूती वाटते.'

मी पाठ फिरवली. संग्रहालयाची माडी उतरताना ग्रंथपालाच्या छद्मी हास्याच्या प्रतिध्वनीनं माझी रस्त्यापर्यंत सोबत केली. मी स्वतःशीच म्हटलं, 'बच्चंजी, मी अशी माघार नाही घेणार. कितीही झालं तरी मी लेखक आहे. क्रांतिकारकावर लेख लिहिण्याच्या मार्गात कशी आणि किती विघ्नं उभी राहतात ह्यावरच दोन कॉलम्स खरडून मी दिडक्या करीन हे लक्षात असू द्या!'

रस्त्यावर आलो. चहाचे दोन कडक घोट प्यालो. तत्काळ मला नामी कल्पना सुचली. म्हटलं, असं करावं; त्या क्रांतिकारकाचा एखादा वारसच गाठावा. त्याच्याकडून त्यांच्या घराण्यात चालत आलेल्या क्रांतिकारकांच्या अद्‌भुत आठवणी ऐकाव्यात नि दोन कॉलम्स मॅटर तयार करावी.

मी माझ्यावर खूष झालो. क्रांतिकारकाच्या वारसाच्या वासावर सुटलो. त्या वेळी नियतीचा पारिजात माझ्या अंगणात झुकलेला असणार. कारण दुधात साखर अशी की क्रांतिकारकाचा खुद्द मुलगाच हयात असल्याचं कळलं. तशात तो दादरच्या नारळीबनाच्या जुन्या भागात राहतो हेही कळलं. मी हुरळून गेलो. कैफाच्या भरात एक कच्ची प्रश्नावली तयार केली. प्रश्न क्रांतिकारकाच्या जनमानसातल्या उज्ज्वल प्रतिमेला साजेसेच

होती. तिसऱ्या मजल्यावरल्या दोन खोल्यांत त्याचा संसार मांडलेला होता.

नमस्कार चमत्कार झाल्यावर मी म्हटले,

'आपणच क्रांतिकारकाचे चिरंजीव काय?'

'बरं बुवा तुम्ही ओळखलंत! कैक लोकांना मीच सांगतो की अहो, मीच तो क्रांतिकारकाचा मुलगा म्हणून! पण त्यावर त्यांचा विश्वासच बसत नाही. म्हणतात, क्रांतिकारकाच्या मुलानं कसं बेफाम, तेजस्वी दिसलं पाहिजे! मी म्हणतो, दिसलं पाहिजे वगैरे ठीक आहे; पण आहे हे असं आहे– मी हा असा शेकटाच्या शेंगेसारखा सडसडीत आहे. वाटल्यास विश्वास ठेवा. वाटल्यास ठेवू नका.'

'दिसण्यावर काय आहे महाराज?' मी चावी मारण्याच्या उद्देशानं म्हणालो.

'ते तुम्ही लोकांना पटवा.'

'गळ्यातच बांधतो त्यांच्या. पण ते जाऊ दे. तुमचं वय काय?'

'सतरा वर्षं पेन्शन खातोय, त्यावरून ओळखा.'

पेन्शन हा शब्द ऐकून मला धक्काच बसला. म्हातारदाम सरकारी नोकरीत मिळतं. म्हणजे ब्रिटिशांची सत्ता ज्यानं उलटून टाकण्यासाठी हाती शस्त्र आणि गळ्याभोवती फासाची दोरी गुंडाळून घेतली, त्याच्या औरस संतानानं त्याच ब्रिटिशांची चाकरमानेगिरी भाकरीच्या चार चतकोरांसाठी करावी? हा सूर्यापोटी शनैश्चर तर जन्माला आला नाही ना? मी कोमेजलो.

'पंचावन्न अधिक सतरा, म्हणजे तुम्ही सध्या बहात्तर वर्षांचे असाल.'

'असाल नव्हे, आहेच.'

'क्रांतिकारकाचा मुलगा सरकारी नोकरीत म्हणजे—'

'ऐकायला चमत्कारिक वाटतंय, असंच्न की नाही?'

'हो.'

'शिवाय, आम्ही आमच्या जन्मदात्या बापाशी बेइमान झालो, निमकहराम झालो, असंही वाटत असेल.'

'तसंच जरी नाही, तरी गैर वाटतं हे नक्की.'

'आता खरा प्रकार सांगतो. आमच्या वडिलांनी देशभक्तीची हद्द केली. देशासाठी आपले प्राण फुंकले.'

'म्हणून तर त्यांची जन्मशताब्दी साजरी होणार!'

'त्यांना प्रामाणिकपणानं जे पटलं, ते कृत्य त्यांनी कर्तव्य मानून केलं. मागं पाहिलं नाही, पुढं पाहिलं नाही, की आजूबाजूलाही पाहिलं नाही. त्यांच्यापुरतं ते दिव्यत्व होतं. लोकांनीही त्यांना हुतात्मा म्हटलं. त्यांचा जयजयकार झाला. त्यांना सद्गतीच मिळाली.'

'मिळणारच. तळहातावर शिर घेतलं त्यांनी.'

'बरोबर आहे. पण दोन-चार लेख लिहून नि जयजयकार करून सर्व समाज गप्प बसला, हे क्रांतिकारकाच्या विधवेला, म्हणजेच माझ्या आईला नडलं! माझ्या आईनंच

हे मला मी जाणता झाल्यावर सांगितलं. अरे, आम्ही सगळे धर्मबांधव म्हणवतो, पण एक नातेवाईक तिचं हवं-नको पाहायला पुढं येईल तर हराम! म्हणे, प्रत्येकाला ब्रिटिश सरकारच्या वक्रदृष्टीची भीती वाटे! जसा काही ह्यांच्यापैकी प्रत्येकजण सरकारात बडा अंमलदार होणार होता नि क्रांतिकारकाच्या विधवेची तो विचारपूस करता, तर ते त्याच्या नोकरीच्या आड येणार होतं! खरं सांगायचं तर मुळात आम्ही मंडळी गरीबच. सागाचे चार माडे, समाईक घरातली एक पडवी नि चिऱ्यांची एक बाव, हीच काय ती इस्टेट आमच्या वडिलांच्या वाट्यास आलेली. तशात ह्यांचं सारं लक्ष पिस्तुल उडवतो कसा ह्याच्याकडे. मला त्याचा अभिमान वाटतो. देशासाठी माझ्या जन्मदात्यानं प्राण पणाला लावले– त्यांचं सोनं झालं. पण मागं राहिलेल्या माझ्या निराधार आईचं काय? तशात आम्ही दोन मुलं तिच्या पदरात! तो काळही लक्षात घ्या. ब्राह्मणाची बाई घराहेर पडत नसे त्या काळात. शिक्षणाचा गंध नाही. रूढीचं रान फोफावलेलं. काय केलं असेल त्या माउलीनं?'

'विचार करण्यासारखाच प्रश्न आहे.'

'हे तुम्ही पाऊणशे वर्षांनंतर थंड माथ्यानं म्हणता! माझी आई मात्र तेव्हा दोन गोळे पदरात असताना असा विचार करू शकत नव्हती. तिनं पदर खोवला. दोन पोरं बकोटीला मारली आणि ज्या अंमलदाराचा तिच्या नवऱ्यानं कानशिलात वार उडवून वध केला होता त्याच्या रिकाम्या जागी नेमलेल्या नव्या गोऱ्या साहेबासमोर ती उभी राहिली! आता पाऊणशे वर्षांनंतर तुम्हाला ह्यात लाचारी दिसेल, पण मी सांगतो, ती लाचारी नव्हती. आणि असलीच, तर आपला दांभिक हिंदू समाजच त्याला कारणीभूत आहे. तिनं स्वयंपाकासाठी पोळपाट लाटणं हातात घेतलं असतं तरी समाज म्हणाला असता,– पाहा, क्रांतिकारकाची बायको स्वयंपाकीण झाली!'

'आपला समाज असं दोन्ही बाजूंनी बोलतो बुवा!'

'म्हणूनच मी आपल्या समाजाला दांभिक म्हटलं. त्या नव्या गोऱ्या साहेबानं आईला हिडिसफिडिस केलं नाही, की तिच्यावर डूख ठेवला नाही. त्यानं तिच्या आईपणाचा मान ठेवला.'

'काय म्हणता!'

'हो–हो. तो गोरा अंमलदार म्हणजे अस्सल औलाद होती. अडचणीत सापडलेल्या लेकुरवाळ्या बाईला राज्यकर्त्यानं निरपेक्षपणं मदत केली पाहिजे, ही उमज त्याच्या संस्कृतीनं त्याला लखलाभ केलेली होती. तू दरम्यानचा काळ कसाबसा ओढून काढ, मीही माझ्याकडून हस्तेपरहस्ते मदत करीन नि तुझी मुलं मोठी झाली की त्यांना नोकऱ्या लावून देईन, असं अभिवचन त्यानं आमच्या आईला दिलं. आईला तरी आणखी काय हवं होतं? पुराचं पाणी कापावं तसं तिनं आम्हाला अक्षरशः रेटून मोठं केलं. क्रांतिकारकाचं शाब्दिक कौतुक करणाऱ्या आपल्या समाजानं तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं. पण काळ कुणासाठी थांबतो थोडाच! आम्ही दोन्ही भावंडं मोठी झालो. आई मला

नातू केवळ देवी-डॉक्टर नि टायपिस्ट आहेत असं म्हणताना जरा संकोचल्यासारखं होतं. क्रांतिकारकाची नातवंडं नि पतवंडंसुद्धा तेजस्वी असावीत असं समाजाला वाटतं. देवी-डॉक्टर नि टायपिस्ट लाखांनी आहेत.'

'हे मलाही कळतं. पूर्वीही कळलं होतं. मलाही वाटत होतं की देशाच्या स्वातंत्र्याचं स्वप्न फासावर लटकलेल्या क्रांतिकारकाच्या नातवांच्या हातून तरी साकार व्हावं. निदान त्याचं आयुष्य देशकार्यात व्यतीत व्हावं. पण अचानक स्वातंत्र्य आलं नि देशाचं राजकारण बदलून गेलं. गावातल्या साध्या पाटलालासुद्धा वाटायला लागलं की आपण खरे स्वातंत्र्यसैनिक आहोत नि सत्ता आता राखलीच पाहिजे. ह्या भाऊगर्दीत आमच्या डाळभातखाऊ पोरांचा काय पाड लागणार? आमच्या पोरांनी देशकार्य करायचं म्हणजे ह्याच आगंतुक समाजसेवकांची पर्यायानं चाकरी करायची! तेव्हा म्हटलं, समाज समाजाची काळजी घेण्याला समर्थ आहे, आपण आपली स्वतःचीच काळजी घेतलेली बरी! खरं की नाही?'

'खरं तर आहेच.'

'मग खरं तेच लिहा नि खरं तेच छापा. निष्कारण रंगरंगोटी करण्यात अर्थ नाही.' क्रांतिकारकाचा वृद्ध मुलगा ठामपणं म्हणाला.

'तथास्तु.' मी म्हणालो. घरी आलो; ही हकीकत लिहायला सुरुवात केली. इथं ह्या हकीगतीची मर्यादा झाली.

विरंगुळ्याचे ते अफलातून दिवस

नाटक्यांच्या भाषेत सांगायचं म्हणजे शाही आरमारी दल हे ब्रिटिशांच्या सार्वभौम सत्तेचं पताकास्थान होतं. पंचेचाळीस साली मुंबई बंदरातल्या काफिल्यात आरमारी बंडाची पहिली ठिणगी पडली. नंतर वन्ही चेतवला गेला. साहेबी सत्तेची पकड प्रथमतः ढिली झाली ती युनियन जॅकची खासी मिजास सातासमुद्रांवर गर्जून सांगणाऱ्या त्या शाही आरमारावरच. प्रथम ब्रिटिश आरमारातले हिंदी खलाशी बिथरले. त्यांनी दारूगोळ्यानं ठासून भरलेल्या तोफा-बंदुकांवर हात ठेवला. काहींनी हौतात्म्य वंद्य मानून मागं राहिलेल्यांना कृतार्थतेचा मार्ग दाखवला आणि मग अपस्माराचे पेटके यावेत त्याप्रमाणं धसका घेत घेत साहेबांचं साम्राज्य लयाला गेलं. हा इतिहास आहे– ह्याला पर्याय नाही.

इतिहासाला पर्याय नसतो. तथापि टोपीकरांच्या साम्राज्याच्या विनाशाचं कर्तेपण अनेकांनी आजवर आपल्याकडे घेतलं आहे. हवेत वायबार काढून माकडांच्या टोळीची पांगापांग करणारा नवखा शिकारी आल्यागेल्याला ज्याप्रमाणं आपल्या त्या अमोघ कर्तृत्वाच्या कथा ऐकवतो, त्याप्रमाणं अनेक मंडळी साहेबाला आपण स्वतःच्या बाहुबलानं सात सागरांच्या मागं मागं रेटीत नेल्याची बहादुरी सांगतात. ठीक आहे. सांगणाऱ्यानं सांगावं, ऐकणाऱ्यानं ऐकावं अगर सोडावं. पण दे. भ. शंकरराव देवांनी सांगितलं की चरख्यानं भारताला स्वातंत्र्य दिलं ! इथवर जर मजल जाऊ शकते, तर कोणे एके काळी ब्रिटिशांच्या शाही आरमारात चाकरमान्या असलेल्या अस्मादिकांनी आरमारातं पाऊल टाकलं मात्र आणि आमच्या पायगुणाच्या प्रभावामुळं ते धूड अंगूळ अंगूळ बुडायला लागलं, असं मी म्हटलं तर त्यात वावगं ते काय आहे ?

एक गोष्ट सांगायची राहिलीच. स्वातंत्र्य मिळायच्या अलीकडल्या वर्षी हा लेखकू ब्रिटिशांच्या शाही आरमारात चिकटला होता. अर्थात आम्ही जन्मजात कारकुंडे असल्यामुळं पाच खंडांवरल्या साम्राज्यावर सूर्य मावळू न देण्याच्या प्रतिज्ञेनं सातासमुद्रांवर गस्त घालणाऱ्या त्या विक्रमशाली आरमारात धाडसाची कामगिरी पत्करण्याऐवजी आम्ही एका

डेस्कामागं निर्धोक जागा पकडून कानांवर बोरूच ठेवला! त्या अफलातून दिवसांच्या स्मृतीवर तरंगणारा फेस गोळा करताना ओंजळीत उरलेले हे काही थेंब...

स्वातंत्र्यप्राप्तीच्या अलीकडचा तो काळ म्हणजे नोकऱ्यांच्या बाबतीत तरी अगदी रामराज्यच होतं. रेल्वे, पोस्ट, टेलेग्राफ्स, रेशनिंग, म्युनिसिपालिटी, मिलिटरी अकौंटस्, गॅरिसन इंजिनीयर, ऑर्डनन्स डेपो अशा एका नव्हे, सतरा ठिकाणी कारकुनांच्या टेंपरवारी जागा त्या काळात अगदी मोकळ्या मोकळ्या असत. हातात मॅट्रिकचं सर्टिफिकेट, पोटऱ्यांत चार खेटे मारण्याची ताकद आणि अंगात थोडासा आगाऊपणात जमा होईल न होईल इतका चुणचुणीतपणा असला, तर पन्नास-साठ रुपयांच्या नोकरीला त्या आरामराज्यात मरण नव्हतं. बरं, तो काळही अशा अलौकिक स्वास्थ्याचा होता की रेशनिंगमध्ये मिळणारे अठ्ठावन्न रुपये कनवटीला लावणारा तरुण स्वतःला नशिबाचा बडा शिकंदर समजायचा. खिमा, पाव आणि पावणा चाय हे कलंदर कारकुनांचं घराच्या उंबरठ्याबाहेर चापायचं आन्हिक कुठल्याही तुर्क्याकडं त्या वेळी फक्त पावलीत मिळे. आणि त्या काळी पावलीही चांदीची होती! गोदी विभागातल्या मोगलांकडे तर वाडगाभर मटण, अधिक एक सुका कबाब फक्त तीन आण्यांत फस्त करता येई.

भटजीवृत्तीच्या भोजनभाऊंचीही चंगळ नव्हती असं नाही. ठाकुरद्वारच्या नाक्यावरल्या मामाच्या हॉटेलातली अडीच आण्यांत मिळणारी स्वादिष्ट श्रीखंडपुरी आणि पिलाहाउसच्या नाक्यावरच्या 'रामभरोसे'मधली दीड अळूवडीसकट मिळणारी आठ प्रकारची भजी विसरण्याचा अरसिकपणा कोण करील? आठ नंबरच्या ट्रॅबेनं न येता, गिरगावातल्या बिऱ्हाडी पायीच परतून वाचवलेल्या एका आण्यात शेवबुंदीचं तेव्हा मोठं बंडल यायचं. चाकरी करावी आणि खाण्यापिण्यातली मजा मारावी, अशा त्या बिनधोक काळात, म्युनिसिपालिटीच्या शाळेची शिपाईगिरी करण्यापासून जनरल पोस्टातल्या गुदामावरली मुकादमी करण्यापर्यंतचा विनासायास प्रवास करून मी ब्रिटिशांच्या शाही आरमारी कचेरीत चिकटलो. माणसाला विनासायास म्हणजे किती विनासायास नोकरी मिळू शकते ह्याची माझी ती नोकरी म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे.

इंटरच्या परीक्षेचा शेवटचा पेपर टाकून दुपारी दोनच्या सुमाराला मी बाहेर पडलो. तिथं फूटपाथवर राऊत नावाचा एक मित्र भेटला. चहा वगैरे पिण्याची मला सवड न देता तो म्हणाला, "चल, आता आमच्या ऑफिसात नोकरीला लाग!" त्याच्या ऑफिसचं नावगाव मला माहीत नव्हतं. तो नेईल तिकडे जायचं ठरवून त्याच्या मागून मी कोटातल्या एका इमारतीचे जिने चढलो. तिथल्या शाही आरमाराच्या हिशेबतपासनिसांच्या कचेरीत नेऊन त्यानं मला एका मद्रासी हपीसराच्या समोर उभं केलं. कामात गढून गेलेल्या त्या हपीसरानं अर्जाची एक चळत काढली आणि त्यांतला माझ्या सहीचा एक वाईट अक्षरातला अर्ज दाखवून मला विचारलं, "हाच ना तुमचा अर्ज?"

माझ्या डोळ्यांना माझं नाव दिसत होतं. पण ते अक्षर माझं नसल्यामुळं 'हे नाव माझंच आहे, मात्र हे अक्षर आणि हा अर्ज माझ्या हातचा नाही' हे शब्द माझ्या

अगदी तोंडावर आले होते. पण, क्षणात मला वाटलं, ह्या माझ्या मित्रानंच माझ्या सहीचा अर्ज माझ्या अपरोक्ष खरडला असणार! तेव्हा मी म्हटलं, 'होय.' त्यावर तो हपीसर चेहेऱ्याची बडी बिस्कटू न देता माझ्याकडे दुर्लक्ष करीत म्हणाला, "ठीक आहे. आजपासून तुम्ही कामाला लागलात!"

नंतर त्यानं स्पष्टीकरणार्थ सांगितलं, "गोदीसमोरच्या आमच्या शाखेत तुम्ही कामाला जा."

अशा रीतीनं स्वतः अर्ज न करता चाचणीत एकही प्रश्न विचारला न जाता आणि लेखी हुकूम वगैरे न मिळता, तोंडी हवाल्यावरच दुपारी तीन वाजता, कसलीही यातायात न करता मी ब्रिटिशांच्या शाही आरमारी कारकुनांच्या काफिल्याला चिकटलो! माझ्यावरोबरच भन्साळी नावाचा एक आडदांड टग्याही चिकटला. पगार किती वगैरे फालतू प्रश्न उत्साहाच्या भरात विचारायचं राहून गेलं. राऊत म्हणाला, "साडे-सत्त्याऐंशी रुपयांवर घेतलाय तुला!"

हे ऐकून मला केवळ हर्षवायूच व्हायचा बाकी राहिला! संध्याकाळी घरी परतल्यावर मी नोकरीचं शुभवर्तमान प्रथम सांगितलं. त्या आनंदापुढं, पेपर कसे गेले ते विचारायचं कुणाला सुचलंही नाही; आणि त्याची आवश्यकताही वाटली नसावी.

आता ती गोदीसमोरची कचेरीची शाखा कशी शोधून काढायची? राऊतला विचारलं. तो म्हणाला, "हत् लेका! आजपासून तुझा पगार सुरू झाला. आजपासून काम केलंच पाहिजे असं नाही. आता हे हेड-ऑफिस त्या शाखेला कळवील की अमुक-अमुक गण्यागंप्याला काम द्यावं, पगार सुरू केला आहे. हे करायला हे लोक कमीत कमी पंधरवडा घेतील. तोपर्यंत कुणालाच पत्ता लागणार नाही. परीक्षेचे पेपर्स वगैरे लिहून तू दमला आहेस. तेव्हा आता घरीच आठपंधरा दिवस विश्रांती घे नि हळूच एखाद दिवशी कामावर ये! इथली ही रीतच आहे. सगळेजण असंच करतात."

म्युनिसिपालिटीपासून पोस्टापर्यंत सर्वत्र संचार केला असल्यामुळं अनागोंदी कारभाराचा अनुभव काही मला नवा नव्हता. पण आठ-पंधरा दिवस घरीच राहून पगार खाणं म्हणजे केवळ हद्द होती. बुट्टी मारायचा मला धीर होईना. दुसऱ्या दिवशी गोदीसमोरची ती कचेरी मी हुडकून काढली. सर्व कचेरी मद्रासी कारकुनांनी अगदी ठासून भरली होती. दुसऱ्या दालनात पांढऱ्यासफेत गणवेषात आरमारी अधिकारी आणि सैनिक डेस्कांजवळ काम करीत बसले होते. त्यांच्यापैकी काहीजण इंग्रज होते. तपकिरी रंगांचे भारतीय आणि लालबुंद साहेब मंडळी ह्यांचा तो समुद्र मला फार चमत्कारिक दिसू लागला. कांद्याच्या ढिगात सफरचंदं मिसळलेली असावीत तसा काही तरी तो गंगाजमनी प्रकार मला भासला. त्या गर्दीत कुणी महाराष्ट्रीय माणूस दिसतो काय ते धुंडाळण्यातच माझा आख्खा एक तास गेला.

शेवटी कुळकर्णी नावाचे एक पोक्त, टक्कलवाले गृहस्थ अर्धी खाकी पँट घालून जाताना दिसले. त्यांना मी नरम आवाजात सांगितलं, "मला हेड-ऑफिसनं इथं काम

करायला सांगितलंय." त्याचं त्यांना सोयरसुतक नव्हतं. ते थंडपणं म्हणाले, "मग बसा तर त्या खुर्चीवर!"

त्या खुर्चीवर स्थानापन्न झाल्यावर सबंध दिवसात कुणी माझ्याकडे पाहिलंही नाही, की कोण, कुठले म्हणून चौकशीही केली नाही. फक्त एकदा मध्येच भटानं मोठा ग्लास भरून उकळता चहा माझ्या पुढ्यात आणून ठेवला आणि सांगितलं, "कुलकरणी शेठनं पाठवलाय."

माझ्या कारकुनी व्यवसायातला हा पहिला मेवाडी मसालानुं टेसदार ईस्पेशियल चाय! फुकटात गळ्यात पडलेला हा अनोळखी पाहुणा पुढं जन्मभर जिवाभावाचा सगा-सोयरा झाला! सगळ्या मित्रांची पानगळ झाली. हा मात्र नवे उन्मेष पालवीत आला आहे.

'एच. एम. एस. तलवार' ह्या आरमारी कचेरीतले दिवस एकामागून एक सरकू लागले. रोज सकाळी मी माझ्या खुर्चीवर जाऊन बसायचा. संध्याकाळी घरी परतायचा. त्या आठ तासांच्या बंदिवासात कुणीही माझ्याशी चकार शब्द काढीत नसे, की कुणी मला कधी कसलं काम सांगितलं नाही. मी कोण, कुठला, इथं का आलो, केव्हा आलो ह्याची औपचारिक चौकशीही करण्याची कुणी तसदी घेतली नाही. सगळे स्थितप्रज्ञाचे अवतार होते. तशात कचेरीचा हजेरीपटही नव्हता. त्यामुळं आला कोण नि गेला कोण ह्याचा तिथं ताळाच जमत नसे. ती कीर्द मांडून ठेवण्याची कुणी फिकीरही केली नाही. कुंडलीतल्या ग्रहासारखा जो तो आपापल्या स्थानी घट्ट बसून होता.

त्या स्थानाचा मला फारच कंटाळा येऊ लागला, म्हणून एकदा जिवाचा हिय्या करून मी आमच्या कचेरीच्या तळघरात आतल्या अंगाच्या अंधेऱ्या दादरानं उतरलो. त्या प्रशस्त मोकळ्या जागेत अंधुक प्रकाशाची पिसं विखुरलेली होती. भिंतीच्या एका अंगाला लोखंडी रेऱ्यांचा एक भलामोठा पिंजरा होता. तळघरात हा एवढा मोठा पिंजरा का असावा हे माझ्या ध्यानात येईना. पुढं कळलं की उद्दाम आणि बेशिस्त आरमारी सैनिकांना कोंडून ठेवायचा तो एक तात्पुरता तुरुंग होता. तात्पुरत्या नोकऱ्या, तात्पुरते मित्र, तात्पुरती बिऱ्हाडं वगैरे तात्पुरत्या गोष्टी मी अनेक पाहिल्या होत्या. नाटकात का होईना, पण तात्पुरते नवरे किंवा तात्पुरत्या बायकाही पाहिल्या होत्या. पण तात्पुरता तुरुंग मी आयुष्यात प्रथमच बघत होतो. तळघरात हा लोखंडी रेऱ्यांचा तुरुंग आणि वर ऑफिसमध्ये प्रतिष्ठेचा तुरुंग!

ह्या इथूनतिथून तुरुंगमय वातावरणानं मन अगदी उबून निघालं. वेळ जावा म्हणून मी कचेरीच्या वेळात आस्ते आस्ते बाहेर पडू लागलो. मग मला तीच हवा आवडायला लागली. गोदीत जहाजं गोठ्यातल्या गुरांसारखी ओळीनं बांधून ठेवलेली असत. ती मी पाहात पाहात भटकायचा. माझी ती रोजचीच भटकंती झाली. इंग्लंड, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया वगैरे दूरच्या देशांच्या आलिशान प्रवासी बोटी बघायचा मला जणू ध्यासच लागला. पुढंपुढं हे वेड इतकं वाढत गेलं की रात्रीच्या जेवणानंतर ठाकुरद्वारातून गोदी

विभागात मी पायीपायीच फिरायला निघून बरीच रात्र होईपर्यंत काळ्या सागरावर हिरव्या, जांभळ्या, तांबड्या, पिवळ्या दिव्यांची मंद आरास मांडून गौरीसारख्या सजून बसलेल्या त्या सागरकन्या न्याहाळात बसे. वर निळं आकाश पसरलं आहे; सोनशेंदरी चंद्रबिंब ढगांवर तरंगत आहे; सागर गाज घालतो आहे; थंडगार वारा वाहतो आहे; आणि कधी काळी समुद्रपर्यटणाची संधी आपल्याला लाभेल काय ह्या एकाच विचारात गढून गेलेला मी त्या सागरसम्राज्ञी शोभतील अशा प्रचंड बोटींकडे पाहात एकटाच बसलो आहे, हे दृश्य अजूनही माझ्या डोळ्यांसमोर ताजं आहे.

एक दुपार. धक्क्याला लागून उभी असलेली एक प्रवासी बोट सैनिकांनी ठासून भरलेली होती. सगळे हिंदी सैनिक होते. एकमेकांना खेटून तारेवर पाखरं बसावीत त्याप्रमाणं नाळेपासून सुकाणूपर्यंत रांगेनं खाकी वेषधारी सैनिकांची मुंडकी दिसत होती. ठीक चार वाजता हिंदी सैनिकांना घेऊन ते जहाज जपानला जाणार होतं. युद्ध संपलेलं होतं. त्यामुळं इथंच बायकामुलांसोबत राहावं असं त्या सैनिकांना वाटत असणार. इथल्या मातीच्या गाडग्यामडक्यांचा संसार ह्या इथल्या मातीतच करावा अशी ओढ त्यांच्या मनाला लागलेली नसणार काय? आपल्या गावची आपली माणसं, आपल्या गावचं आकाश, आपल्या गावाच्या खांद्यावर हात टाकून उभा असलेला नदीचा फाटा, आपल्या गावातली विटांची, मातीची, कुडांची, झापांची आणि धाब्याची घरं, आपल्या गावातली धूळ, धूर आणि धुकं ह्या साऱ्यांची संमिश्र मोहिनी त्यांच्या मनांना भुलवत नसेल काय? आपल्या अंगणातल्या चिमण्या आणि साळुंक्या त्यांना शीळ घालीत नसतील काय? आपल्या प्रियांच्या मखमली मिठ्या आणि बाळांची रेशमी जावळं त्यांना मायारी बोलवीत नसतील काय?

पण कायद्याचा पीळ पोलादी होता; आणि सरकार जालीम होतं. रंगरूट लेफ्ट-राइट पूर्वेकडे तोंड करीत निवाले होते. ठीक चार वाजता ते जहाज हिंदी सैनिकांना उरापोटाशी घेऊन जपानला निबगार होतं. धक्क्यावर पत्र्याच्या छपराचं चहाचं दुकान होतं. तिथं बसून मी चहा पीत होतो. बोट सुटायला अजून अर्ध्या तासाचा अवधी होता. तेवढ्यात एक गोरटेला सैनिक त्या दुकानात येऊन माझ्याच टेबलाजवळ बसला. त्याची नजर थरथरत होती. कावळ्यांनी पाठलाग केलेल्या पोपटासारखा तो अंग चोरून बसला. त्यानं चहा मागवला. मी मराठी माणूस आहे आणि सैन्यातला नाही अशी त्याची खात्री झाली असावी. आपलं स्वस्त सिगरेटीचं पाकीट माझ्यापुढं करीत तो म्हणाला, 'ओढणार काय?"

"थँक्स! मी ओढत नाही—" मी सांगितलं. त्याला काही तरी बोलायचंय हे त्याच्या थरथरणाऱ्या ओठांवरून माझ्या लक्षात आलं. तो म्हणाला, "हे लोक मला बळजबरीनं जपानला नेताहेत. पण मी आता इथंच लपून राहणार नि ह्यांना गुंगारा देणार!"

हे शब्द ऐकून आपण एखादा चित्रपटातला प्रसंग तर पाहात नाही ना, असंच

मला वाटलं. मी विचारलं, "तुमचं नाव काय ?"

"काळे."

"कुठले तुम्ही ? काय करता ?"

"मी काळे– पुण्याचा. फोटोग्राफर आहे."

"मग फोटोग्राफर सैन्याकडे कसा काय वळला ?"

"अरे वा ! सैन्याला फोटोग्राफर्स लागतात की."

"मला कल्पना नव्हती—"

"अनेक लोकांना तशी ती नसते."

"जपान म्हणजे फुलांचा देश म्हणे ! म्हणजे, खरं तर तुम्हाला हा चांगला चान्स आला आहे जपानला जायचा."

"कसला चान्स हो ! आपल्याला तर कंटाळा आला ह्या फिरतीचा. आमचा पुण्याला एक स्टूडिओ आहे. तिथं काम करून मी शांत आयुष्य घालवीन."

"पण तुम्ही सैन्यातून पळून कसं चालेल ? शिक्षा नाही होणार ?"

"नाही. कारण आता युद्ध संपलंय. तेव्हा जे पळून जातात त्यांना सरकार स्वतःच नोकरीवरून कमी करून टाकतं. आपल्यालाही तेच हवंय !" एवढं बोलून त्यानं खुर्ची फिरवून दरवाजाकडे पाठ केली आणि सांगितलं, "एकदा का ह्या बोटीनं नांगर उचलला की मी मोकळा झालो !"

त्याचे शब्द हवेत विरतात न विरतात तोच दोन दांडगे मिलिटरी पोलिस तिथं अकस्मात दाखल झाले. एका क्षणात त्यांनी आपलं लक्ष्य टिपलं. गिधाडासारखी झेप टाकून त्यांनी काळ्यांचे बावळे पकडले नि हातपाय झाडणारा तो मानवी देह अक्षरशः उचलून बोटीच्या जिन्यापर्यंत नेला ! तिथं काळेंच्या पाठीत एक दणका घातला. धडपडतच काळे बोटीच्या दारापर्यंत गेले. बोटीच्या दारातही गलेलठ्ठ मिलिटरी पोलिस उभे होते. त्यांनी अर्धमेले झालेल्या काळेंचा कब्जा घेतला आणि त्याला बुकलायला, ढकलायला सुरुवात केली.

चहाच्या खोपटातून ते दृश्य मी विस्मित होऊन पाहिलं. पुढचा हाणामारीचा प्रकार पाहणंच मला शक्य नव्हतं. काळेंच्या चहाच्या कपाचा आणा चुकता करून, बोटीच्या सुटण्याची वाट न बघता मी गोदीमधून बाहेर पडलो. उगवतीच्या दिशेचं प्रस्थान ठेवून निघालेल्या त्या बोटीचा क्रूर भोंगा मला वाटेतच कुठं तरी ऐकू आला. खरी गोष्ट अशी आहे की, त्यानंतर बरेच दिवसपर्यंत माझ्या कानांवर बोटीचा भोंगा पडला की मिलिटरी पोलिसांचे वार चुकवण्यासाठी डोक्यावर हात घेऊन मान खाली घातलेला काळे मला दिसत राहिला, भेटत राहिला ..

शाही आरमारी दलात हजारो अंमलदार आणि लाखावारी नौदल सैनिक होते. दुसरं महायुद्ध निकालात निघालं होतं. त्यामुळं आरमाराच्या ह्या अजस्र आखाड्यावर कोट्यवधी रुपयांचा होणारा उपसा ब्रिटिश सरकारला पेलवेनासा झाला. म्हणून त्या

खोगीरभरतीतल्या जास्तीत जास्त रिक्रूटांना त्यांनी 'डि-मॉब' म्हणजे नोकरीतून सन्मानपूर्वक कमी करण्याचा सपाटा चालवला होता. त्या नाविकदलाच्या सैनिकांच्या अखेरच्या देण्याघेण्याचा हिशोब ठेवण्याचं काम आमच्या कचेरीत होत होतं. आम्ही शंभरजण होतो. पैकी जवळपास नव्वद-पंच्याण्णव मद्रासेकडचे होते. काही केरळकडचे होते. ते सारेजण कळपानं राहात. कळपानं येत. कळपानंच जात. कळपानंच झोपत होते किंवा काय हरी जाणे! आम्ही चारपाचजण मराठी होतो. तो कळप आमच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत असे. अर्थात सुखदुःख आम्हांला असायचं काही कारण नव्हतं. आम्ही आमच्याच पगड्यांच्या झिरमिळ्यांत दंग होतो!

आमच्या खातेप्रमुखाचं नाव निघालं व्ही. के. कृष्णमेनन! त्याची पाटी वाचून पहिल्याच पावलाला मी चपापलो. म्हटलं, नेहरूंचा हा दोस्त इथं कुठं उपटला? नि हया ब्रह्मचारी ब्यालिस्टराला विश्वभ्रमंती करायची सोडून, ही आरमारी खर्चाची आकडेमोड करायची अवदसा का आठवली? पण अस्मादिकांचा संशय फिटायचा योग लवकरच आला. एकदा हया व्ही. के. कृष्णमेननने आमच्या खात्यात फेरी मारली. पाठीत वाकलेला, शरीराचा खुळखुळा झालेला, कानानं बहिरा, डोळ्यांनी अधू, अर्धी खाकी विजार घालून पायांची नळकांडी दाखवणारा आणि तोंड उघडं टाकून टकामका बघणारा तो मेनन पाहून मी फक्त झीट येऊन पडायचाच काय तो बाकी उरलो!

कचेरीत फक्त पुरुषवर्ग असल्यामुळं आणि त्यातल्या त्यात डोईस भस्माचे पट्टे ओढगारे, पुंड्र रेखाटणारे, अर्ध्या खाकी तुमानी वापरणारे वगैरे असल्यामुळं एकूण वातावरण बरंचसं नीरस होतं. सफेत फ्रॉक, सफेत मोजे आणि सफेत बूट घालणारी पुष्ट अंगाची एक किरीस्तावीण मुलगी केवळ अपवाद म्हणून खडेंबाशी करायला आली होती. आमच्या जवानीत प्रातःस्मरणीय वाटलेलं तिचं नाव आता विसरायला झालं आहे. आता तिचं नकटं नाक आणि सफरचंदी गाल आठवताहेत! सर्व दाक्षिणात्यांना रेसचं जबरदस्त व्यसन होतं. काही तलफी मंडळी महिन्याचा सगळा पगार पणाला लावत आणि बघताबघता कफल्लक होत. सर्वांच्या तोंडचा विडा फक्त दोन गोष्टींची चर्चा करताना रंगे– रेस आणि हॉकी-फुटबॉलचे सामने!

दुपारी दीडला जेवणाची मधली सुट्टी व्हायची, पण बहुतेकांची जेवणं त्याच्या अगोदरच कामाच्या वेळात पुरी व्हायची. प्रत्यक्ष सुटीच्या वेळात ते सगळेजण टेबलावर डोकी टेकून आणि डोळ्यांवर रुमाल टाकून उघड्या तोंडानं तासतास झोपा काढत. जे संसारी होते, गृहस्थ होते, ते घरून डोसे, पानपोळ्या, दहीभात आणीत. थर्मासमधून कॉफी आणीत. उंडार असत ते कांदाभाजी, पावमिसळ आणि चहा ही चार आण्यांत भटाकडे उधारीनं मिळणारी शाकाहारी चैन करीत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सर्वजण आळीपाळीनं भिंतीवरल्या आणि मनगटावरल्या घड्याळाकडे पाहात बसत. त्यांच्यातला एक मद्रासी भिडू मराठी अगदी सराईतपणं बोलायचा. त्याला म्हटलं, "काय रे, तुला मराठी इतकं चांगलं कसं रे येतं?" तर तो उत्तरला, "लेका, माझ्या बायकोचा जन्म

पुण्यात झालाय!"

आडव्या हाडाच्या भन्साळीलाही तोंडी निरोप दिला होता की गोदीसमोरच्या शाखेत जाऊन त्यानं कामाला लागावं. त्याचाही पगार सुरू झाला होता. नमुनालाच त्यानं दांडी मारली. नंतर कचेरीत येऊ लागला तो पांढऱ्याशुभ्र परीटघडीच्या कपड्यांत आणि पांढरे बूट खाडखाड वाजवीत. ऑफिसात आल्यावर इकडे तिकडे नजर टाकीत, कोरीव मिशांवरून हात फिरवीत तो कारकुनांच्या रांगांमधून पाचदहा फेऱ्या टाकायचा आणि नंतर जिना उतरून जो नाहीसा व्हायचा तो पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी बूट वाजवायला हजर व्हायचा! त्याचं गोटीबंद धिप्पाड शरीर, शुभ्र परीटघडीचा पोषाख, सफेत नालदार बूट, ताठ मान, कोरीव मिशा आणि घारे टपोरे डोळे, यामुळं कचेरीतल्या मंडळींना वाटलं की हा कुणी तरी शाही आरमारी दलातला वरिष्ठ हुद्देदार असामी असून गुप्त तपासणीसाठी तो ऑफिसात गुपचूप गस्त घालून जात असावा. संशयावर आधारलेला गैरसमज हा पेट्रोलसारखा शीघ्र ज्वालाग्राही असतो. त्यामुळं तो पेटत, पसरत गेला.

भन्साळीचं पाऊल वाजलं की सर्वत्र चिडीचूप व्हायचं. मंडळी माना मुडपून बोरू काम करू लागत. पेटत्या सिगारेटी पटापट विझवल्या जात. चहाचे ग्लास टेबलाखाली लपवले जात. असे आठदहा दिवस गेले. ही कोंडी किती दिवस सहन करायची? अखेर जिवाचा हियां करून स्वामिनाथन् नावाच्या एका लुकड्या पर्यवेक्षकानं पाखराच्या आवाजात भन्साळीला विचारलं, "सर, आपल्याला काय हवं आहे? आपण असे रस्त्यात उभे का?"

त्याला भन्साळीनं डरकाळी फोडल्यासारखं उत्तर दिलं– "यू इडियट! मी कुठंही उभा राहीन. त्याची पंचाईत तुला कशाला हव्याय?"

ह्या गुर्मीनं सरसकट सर्वांची खात्री झाली की हा आरमारी गुप्त हेरांचा अंमलदारच असावा! ओशाळलेला स्वामिनाथन् दाढेखाली जीभ आडवी घालून फायलीमध्ये डोकं खुपसून बसला. त्यानंतर भन्साळी ऑफिसला यायचा अचानक बंद झाला. स्वामिनाथन् सर्वांना मर्माची गोष्ट म्हणून सांगू लागला की, आपली ओळख पटल्याय असं गुप्त हेरांना वाटलं की ते पुन्हा आपलं दर्शन देत नाहीत. नाही तर बिंग फुटेल ना!

आणखी आठवडा गेला. हेड ऑफिसकडून कागद आला की भन्साळीनं राजीनामा पाठवला आहे. त्यानं तुमच्याकडे काम केलं की नाही ते कळवा, म्हणजे त्याप्रमाणं पगार आकारता येईल. मेननला प्रश्न पडला, हा भन्साळी कोण? कुठं बसायचा? काय काम करायचा? मेननने तपास केला तेव्हा ही प्रश्नचिन्हं सर्वांच्याच डोळ्यांपुढं नाचू लागली.

कुणी म्हणत, 'अहो भन्साळी ना? तो हत्या खुर्चीवर बसायचा.' कुणी म्हणाले, 'इथं नव्हे, त्या तिथं बसायचा.' पण नीट उलगडा कुणालाच होईना. हेड ऑफिसला जबाब जाणं भागच होतं. एरव्ही त्यांचा तगादा आला असता. शेवटी त्रासून मेनन

म्हणाला, " एवीतेवी फक्त तीसचाळीस रुपड्यांचाच काय तो प्रश्न आहे ना ? चला, हेड ऑफिसला कळवून टाका की भन्साळी तुम्ही म्हणता त्या तारखेला कामावर आला; आणि राजीनाम्यात लिहिलेल्या दिवसापर्यंत त्यानं काम केलं; त्याच्या पगाराची रक्कम तुम्हीच त्याला परस्पर रवाना करावी–"

हेड ऑफिसचं समाधान झालं. भन्साळीचा राजीनामा मंजूर झाला. तथापि त्याला पगार पाठवणं हेड ऑफिसच्या अखत्यारीतलं नव्हतं. त्यांनी पगार रीतसर आमच्या शाखेत पाठवला आणि भन्साळीला तो तिथं प्रत्यक्ष येऊन घेऊन जायला कळवलं. त्याप्रमाणं भन्साळी अंमलदाराच्या ऐटीत एके दिवशी पगार घेऊन जायला हजरही झाला. योगायोग असा की जनरल पोस्टाच्या समोरच्या इमारतीखाली पडलेली एक धुणी वाळत घालायची काठी त्याला येताना सापडली. ती चांगली भक्कम काठी घेऊनच तो पगार घ्यायला आला !

त्याला पगार देताना श्रॉफसकट सर्वांच्या चेहऱ्यावर अवर्णनीय भाव उमटले. मेनन तर त्याच्याकडे पाहायलाही तयार नव्हता. कुणाकडे न पाहता पगार घेऊन बूट वाजवीत भन्साळी चालता झाला. त्यानंतर तो विषय ऑफिसमध्ये कुणीही, कधीही काढला नाही. मोक्याच्या वेळी आळीमिळी गुपचिळी राखण्यात नोकरशाही तशी कुणाला हार जात नाही !

पुढं भन्साळीनं स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. बरेच दिवसांनंतर तो मला एकदा बोरीबंदरवर भेटला. म्हणाला, " काय रे, तुम्ही महाराष्ट्रियन लोक बिझिनेस का रे नाय करते ? "

त्याला काय सांगणार ? आमच्याकडे भांडवल नाही, की आमच्याकडे तो उरक नाही, की आमच्यापाशी बनियाबुद्धी नाही ? काहीच न सुचून मी सांगितलं, " त्याचं असं आहे,– नोकरदाराला मान मिळतो; म्हणून आम्ही नोकऱ्या करतो."

त्याला ते साफ नामंजूर होतं. म्हणाला, " अरे नाय–नाय. मान धंदेवालेला हाये. नोकरीवालेला नाय हाये."

मी म्हटलं, " सी. डी. देशमुख कोण आहेत ? धंदेवाले की नोकरीवाले ? " तो गोंधळला, तेव्हा मी पुढं म्हटलं, " आणि समजा, उद्यापासून मी स्वतंत्र धंदा सुरू केलाच, आणि समजा मला दर महिन्याला पाचशे रुपये नगद फायदाही व्हायला लागला तरी–"

हे ऐकून, माझं वाक्य पुरं करायची संधी मला न देताच तो हसत हसत म्हणाला, " अरे, काय बोलते काय तुमी ? पाचशे रुपाया फायदा ? फक्त पाचशे रुपाया ? अरे पाचशे रुपाया साला आम्ही नायकिंगीला देते ! पाच हजार रुपाया प्रॉफिट बोल, पाच हजार रुपाया ! "

मला त्या क्षणी रामरक्षेचे चरण आठवले ह्यात नवल काय ?

वेंबू नावाचा एक चकणा मद्रासी आमचा पर्यवेक्षक म्हणजे सुपरिंटेन्डेन्ट होता. मोठा डोकेबाज होता. आय. सी. एस. होण्यासाठी त्याला त्याच्या सासऱ्यानं विलायतेला

पाठवलं होतं. पण तिथं ठेचाळल्यामुळं त्याच्या साऱ्या स्वप्नांच्या पत्रावळी झाल्या. गणित, संख्याशास्त्र, विज्ञान अशा सर्व किचकट विषयांत त्याला रस होता, गती होती. एकट्या आय. सी. एस.मध्ये खो खाल्ल्यामुळं वेंबूच्या नशिबानं त्याला चक्रावून टाकलं. कलेक्टरच्या बंगल्यात केसाळ कुत्र्यांच्या सोबतीनं डबोलं जमवीत राहू पाहणारा वेंबू अखेर सोलापूरच्या कापडगिरणीत फक्त नव्वद रुपयांवर कारकून म्हणून लागला. पण दैवानं टाकलेला डाव त्यानं डावलला नाही. नाउमेद न होता कसोशीनं वागला. युद्ध झाल्यावर गिरणीतली नोकरी सोडून तो ह्या खात्यात शिरला. खात्याच्या सगळ्या परीक्षा चुटकीसरशी पास झाला. नव्वदाचे दोनशे झाले. गृहस्थाश्रम धन्य झाला. पण बुद्धीच्या चक्रपाणी असलेल्या त्या गणिती विद्वानाला समान पातळीवरचा भिडू भेटेना.

त्यामुळं तो लहरी झाला. आठवड्याचे मोजून साडेसत्तावन तास झोपायचा– कमी नाही आणि जास्ती नाही. उघडलेलं पुस्तक अखेरपर्यंत वाचायचा. वाचलेला मजकूर जवळजवळ मुखोद्गत करायचा. सरस्वती त्याच्यावर लुब्ध होती. उभ्याउभ्या येऊन जाईन असा लक्ष्मीचा निरोपही आला होता. बाकी माणूस बडा मिष्ठा होता. साहेबी वागणुकीचे त्याला अधूनमधून झटके येत. मग गरम सूट, टाय, फेल्ट हॅट अशा रुबाबात तो ऑफिसला येई. सर्वांवर छाप टाकी. पण हे वारं पहाटवाऱ्यासारखं अल्प काळ टिके. बहुतेक वेळा स्वजनसंपर्क साधायची त्याला जोरदार उबळ यायची. अशा वेळी भालप्रदेशावर भस्माचे बटबटीत आडवे फराटे तो श्रद्धापूर्वक ओढी. अर्धी खाकी विजार, अर्ध्या बाह्यांचा सफेत शर्ट, पोटावर संबाचा रुंद चामड्याचा बक्कलवाला पट्टा, हातात दहीभाताची केळीच्या पानाची पुरचुंडी, पायांत बूट–स्टॉकिंग्ज आणि गळ्यात थर्मास, असा त्याचा स्वजनसंमत अवतार असे. तेजस्वी बुद्धीमुळं लाभलेलं वेगळं व्यक्तिमत्त्व अशा वेळी तो हरवून बसे.

तो मग काम पाही न पाही. सुमार कुवतीच्या कारकुनांच्या गळ्यात गळा घालून हॉकीच्या सामन्यांची भविष्यं वर्तवी. त्यांना भराभर शब्दकोडी सोडवून देई. त्यांच्या गोतावळ्यात रमून त्यांचे इडली-डोसे खाई आणि त्या बिसमिल्लातच त्यांच्याबरोबर ढेकर देई. इतकी अवस्था झाली की सामान्यांतले सामान्य कारकुंडेही त्याची टर उडवीत. त्याच्या आय. सी. एस. मधल्या अपयशावरून त्याची छेड काढीत, नक्कल करीत. इतपत रेटतंय, पचतंय हे पाहून डोईची शेंडीही कबजात ठेवू न शकणारा चहावाला भटही त्याच्यावर खेकसून घेई आणि चिमणीएवढं तोंड करून वेंबू सारं हसऱ्यावारी नेई.

तेव्हापासून दोन गोष्टी माझ्या लक्षात आल्या. वेष बावळा असेल तर खुद्द तुमचे स्वजनही तुम्हाला किंमत देत नाहीत, अगदी संधी साधून तुमची रेवडी उडवतात; आणि व्यक्तित्वसंपन्न हुषार माणूस जर सामान्याशी खांदेघसट करू लागला, तर ती टुकार माणसं त्याला आपल्यापेक्षाही खालच्या थरातला लेखतात. म्हणून जो सामान्यापेक्षा निश्चितपणं वरच्या श्रेणीतला आहे, त्यानं लाखात एकालाच लाभणारं आपलं वेगळेपण नंदादीपासारखं श्रद्धापूर्वक जपलं पाहिजे आणि आपली पायरी कधीही सोडता कामा नये. संतोषाचीच गोष्ट आहे की, तो बृहस्पती आज केंद्रात वरिष्ठांचा वरिष्ठ अंमलदार आहे.

माझी खात्री आहे की दहीभाताच्या उंड्या उभ्याउभ्याच खायच्या आणि कपाळावर भस्माचे हात ओढायचे त्यानं त्या अत्युच्च श्रेणीच्या विरळ हवेत सोडून दिलं असलं पाहिजे. कारण एरवी जरी तो तिथं दैववशात पोचला, तरी टिकून राहणं महामुष्किल आहे! दैव सोबतीला येऊन मुक्कामाला पोचवतं. आंब्याचा टाळा बांधून तिथं बस्तान बसवणं हे कर्तृत्वावरच अवलंबून आहे.

वेंबू झपाटल्यासारखं काम करायचा. आम्हा पाचपन्नास तपासनिसांचं काम तासाभरात पाहून त्या सगळ्या फायली तो मेननकडे पाठवी. तो डोंगर पाहून मेननला ब्रह्म आठवायचं. त्यानं आपल्या खुर्चीला खेटून एक लाकडी घडवंची ठेवली होती. ज्याचे कागद चालू आहेत त्याला तो तिच्यावर बसवून घेई. केसची अगोदर तोंडी माहिती काढून घेई. मग अगदी पहिल्या ओळीपासून प्रकरण वाचून काढी. वेंबूकडे जाई. त्याच्या कानाला लागे. परत खुर्चीवर बसे. परत प्रकरण वाची. परत स्वामिनाथनला विश्वासात घेई. परत कागद उलटेसुलटे करी. ह्या घोळात अर्धा तास गेला की विष्णुपदांना स्मरून कापऱ्या हातानं सही ठोकी. सही केल्यानंतरसुद्धा प्रकरण मोहोरबंद करायचं धैर्य त्याच्यापाशी नव्हतं. पुन्हा तीच फाइल उघडून ती तोच तोच मजकूर पुनःपुन्हा वाची.

मी सटीसहामासी एखादी केस करायचा. एकदा एका अंमलदाराला ७८० रुपये पगार द्यायच्याऐवजी ७८१ रुपये दिला गेला. एक रुपया जास्त दिला गेल्याचं मी मेननला कागदोपत्री सिद्ध करून दिलं. ते अधिक वाटणावळीचे कागद पाहून त्याला जणू आनंदाचं भरतंच आलं. ते कागद त्यानं अपूर्वाईनं, परत परत वाचले आणि सर्व खात्याला सांगितलं, "असं काम हवं! लाखो रुपयांच्या चुका काय कुणीही शोधून काढील. एक रुपयाची क्षुल्लक वाटणारी चूक काढणं हे खरं कसबाचं काम आहे. आपण डोळ्यांत तेल घालून कामं करतो ह्याचा हा रोकडा पुरावा आहे. आता सरकारचा एक रुपया अधिक गेल्याचं हे प्रकरण मी विलायतेपर्यंत पोचवतो. त्यामुळं लंडनमध्ये आपली पत वाढेल!" –एवढं बोलून तो एकदम गप्प झाला.

काही तरी आठवल्यासारखं करून तो स्वतःच सांगू लागला, "पण नको! पाच रुपयांच्या आतल्या देण्याघेण्यातल्या चुकांना सरसकट माफी द्यावी असा सरकारचा एक ठराव आहे. तेव्हा हे प्रकरण मी इथंच मिटवून टाकतो. नाही तर आपण आपलं मारे कळकळीनं हे प्रकरण लंडनपर्यंत भिडवायचं आणि पदरी पडायचे साहेबाचे जोडे! त्यापेक्षा नकोच ना ते लचांड!"

कचेरीला चिमूटभर काम आणि पसाभर माणसं असा उफराटा प्रकार होता. असं असूनही सर्वांच्या टेबलावर फायली उघडलेल्या असायच्या. आपण काम करीत आहोत असं भासवायला मंडळी जुन्या फायली टेबलावर नुसत्या उघडून ठेवीत असत. असं सारं वातावरणच रिकामटेकडेपणाचं होतं. कंटाळा आल्यावर मी जुनी पगार-पत्रकं विरंगुळ्यासाठी तपासायला काढायचा. ह्याच विरंगुळ्याच्या काळात, पुढं भारतीय नौदलात नाव गाजवलेल्या अंमलदारांच्या पगाराचे हिशोब मी तपासले. अर्थात ह्यात

माझ्या कर्तृत्वाचा काडीमात्र भाग नाही. कारकुनी कामाचा तो एक कपचा होता.

कचेरीच्या दुसऱ्या दालनात झकपक, शुभ्र गणवेषधारी आरमारी अधिकारी बसत. ते कँप्समध्ये एकत्र राहात. चिलखती गाड्यांतून ऑफिसला एकत्र येत; एकत्रच जात. हाताखालच्या माणसाशी ते एकाही शब्दानं बोलत नसत. काही अधिकारी इंग्रज होते. एका क्षणाचीही उसंत न घेता ते मान मोडून कामाचे डोंगरच्या डोंगर उपसत. सर्वांना सकाळची न्याहारी, दुपारचा फराळ आणि रात्रीचं भोजन आरमारी मेसमध्ये मिळायचं. त्या स्वस्ताईच्या रामराज्यातसुद्धा निव्वळ जेवणावळीच्या पोटी त्यांच्या पगारतले सुमारे सव्वादोनशे रुपयांना कातर लावली जायची. सगळे अंमलदार रेसचे भोक्ते होते, भक्त होते. महालक्ष्मीची हिरवळपट्टी म्हणजे त्यांचं कैवल्य होतं. आरमारी मोटारींमधून ते त्या मोक्ष-मैदानावर भरतीच्या लाटेच्या आवेगात जात. खिसे मोकळे झाले की ओहोटी-च्या लाटेसारखे मंद गतीनं परत येत. पण आगापीछा म्हणून कसा तो नसल्यामुळं ते कधी कष्टी होत नसत. सर्वांची शिक्षणं ह्या ना त्या निमित्तानं परदेशांत झालेली होती. त्यामुळं दुसऱ्याच्या खाजगी बाबतीत न डोकावणं, आपलं काम चोख करणं, दुसऱ्याला त्याचं काम चोख करू देणं, आयुष्याचा यथेच्छ उपभोग घेणं हे सद्‌गुण त्यांच्या रक्तातच भिनले होते.

त्या शेकडो रंगेल आणि रंगेल अंमलदारांत फक्त एकच एक मराठी अंमलदार होता. सानेगुरुजींसारखा सोज्ज्वळ, पूर्णपणं व्यसनविन्मुख आणि सदैव हसतमुख असणारा, असा तो एके काळी विमा कंपनीचा कारकून असलेला आरमारी अंमलदार, सर्व नियम साफ गुंडाळून ठेवून दर शनिवारी मास्तीच्या शेंदराचा पुसट टिळा दोन भिवयांच्या मधोमध अगदी हलक्या हातानं रेखायचा !

आरमारी अंमलदारांच्या हाताखाली रेटिंग्ज म्हणजे सामान्य आरमारी सैनिक असत. त्यांचं जीवन खरोखरच फार खडतर होतं. चार बुकांचंही शिक्षण पदरी नसलेले ते कष्टी जीव सर्कशीतल्या प्राण्यांप्रमाणं अन्नावारी राबत आणि त्याचं सोयरसुतक कुणालाच नसे. खुद्द त्या रेटिंग्जनाही ते नसावं. अंमलदार त्यांना पायाखालच्या मातीइतकंही मोल देत नसत. हा सगळाच वर्ग चोवीस घंटे भीतीनं चेपलेला असे. इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाताखालचा सैनिक तर भुगा भरलेल्या पाखरासारखा बुबळं न हालवता मूक बसून राही. त्याच्या नशिबी एकच दुर्भाग्य कोरलेलं होतं– काम एके काम, काम दुर्गंही कामच !

त्यांची आर्थिक परिस्थिती भयानक दारिद्र्यात जमा होणारी असे. एकजात सगळे कोकणी मुसलमान किंवा दक्षिण भारतीय होते. केरळचे होते त्यांच्या गळ्यात क्रॉस असे. मराठी रेटिंग एकही नव्हता. दिसायला सगळेजण सारखेच तांबारलेले दिसत. सगळे रेस खेळत, आकडे लावीत, बिड्या पीत, भटाकडे उधारीनं मिळणाऱ्या चहाची ग्लासांवर ग्लासं झोकीत. चहावाल्या भटाच्या खांद्यावर सावकारीची महावस्त्रं लादून त्याच्याकडून आठवारा आण्यांपासून किरकोळ रकमा उसन्या काढीत. एक तारखेला परतफेडीची टाळाटाळ करीत. भट गुरगुरला की गयावया करीत. त्याचे पाय धरीत. वेळ मारून नेत.

रेस संपली की परत हात पसरीत. ज्या अधिकाऱ्यांच्या हातात त्यांच्या शैंड्या असत त्यांना बाटल्या पुरवण्यात त्यांचं सारं चातुर्य कामास येई. बाटल्या पुरवण्यात त्यांनी कधी कमीपणा मानला नाही. गळ्यातला एक क्रॉस वगळून पदरी असेल नसेल ते किडुक-मिडुक फुंकून एक बाटली नाताळात अंमलदाराला पोचती केली की निर्धास्त होऊन ते भटाकडचा हरहमेशा उधारीत मिळणारा उकळता चहा प्यायला मोकळे होत.

बोलवा तर होतीच की आपल्या सहधर्मचारिणींनाही काहीजण अंमलदारांच्या सरबराईसाठी बिनाशर्त पाठवीत असत. पण त्याला पुरावा नव्हता. कापडिया नावाच्या पुढचे सहा दात ओळीनं पडलेल्या पराकोटीच्या गरीब पारशी दफ्तरीला सारेजण ह्याच एका आरोपावरून मोका साधेल तेव्हा छेडीत. तो गरीब असला म्हणून काय झालं? आपल्या प्रिय असो वा अप्रिय असो, लग्नाच्या बायकोबद्दल असं उगं बोललेलं त्याला कसं खपावं? कधी तो चिडून लालबुंद व्हायचा, कधी डाफरायचा, कधी चेष्टेवारी न्यायचा. पण वाराला वार करायचं त्याला साधत नसे. जयरामननं एकदा सर्वांसमक्ष त्याला दुपारच्या सुटीत डिवचलं, "काय रे, काल तुझी बायको कुठं गेली होती?" तेव्हा तो दोन बुकं शिकलेला अजागळ मैनिक मोठ्यानं खो-खो करून हसायला लागला. ते हसणं नेहमीचं निर्मळ हसणं नव्हतं. थोडं भयानक होतं; कारण ते थांबेच ना! धबधब्याच्या पाण्यासारखा तो हसू लागला. आणि बघता बघता त्या अकाळविकाळ हसण्याचं रूपान्तर अगदी करुण अशा रडण्यात झालं. सर्वजण घाबरले, पळाले. अवघ्या दोन मिनिटांपूर्वी जिथलं वातावरण हास्यकल्लोळानं गदगदून गेलं होतं, तिथं कबरस्थानातल्यासारखी भयाण शांतता तवंग धरू लागली. दालन रिकामं पडलं.

हे सगळे रेटिंग्ज स्कॉटलंडला युद्धकाळात जाऊन आलेले होते. पण त्यांच्या झोळीत औटक्या शिक्षणापुरतं अन्य काहीच नसल्यामुळं अन्नावारी खंदक खणणं आणि पाणसुरुंग पेरणं ह्याशिवाय त्यांनी विलायतेत काही केलं नाही की काही पाहिलं नाही. संगीत ऐकलं नाही की चित्रकला पाहिली नाही. नाटकं पाहिली नाहीत की चार ओळी वाचल्या नाहीत. त्यांनी फक्त गोऱ्यांच्या पंगतीला बसून मटणं झोडली, फुकटात दाखवलेले दे-मार सिनेमे पाहिले आणि पिंगट-गोऱ्या अंमलदारांच्या काळ्या बॅकाय मुलींबरोबर मनसोक्त चालणाऱ्या कामक्रीडा अगदी पोटभर पाहून घेतल्या. फुरसतीच्या वेळात ते आम्हांला सांगत की आपण एडिंबरोला अमक्या गोरीला फिरवली आणि ग्लासगोत तमक्या गोरीला झुलवली. तथापि माझ्या तेव्हाच लक्षात आलं की हे सारं सांगणं केवळ विरंगुळ्यापुरतंच आहे. त्यांची कंगाल व्यक्तिमत्त्वं आणि खप्पड थोबाडं सर्वांची खात्री करून देत की दोनाच्या ठिकाणी चार बाटल्या बेवडा झोकण्यापलीकडे काही ह्यांच्या करामतीची झेप गेली नसणार!

कफल्लक माणूस कलंदर असू शकतो. किंबहुना, अनुभवही सांगतो की कलंदराला कामिनी वश असते. अवघं व्यक्तिमत्त्वच आतून बाहेरून पोखरून निघालेलं असल्यामुळं कंगाल माणूस चक्क कापुरुष होतो, सत्त्वहीन होतो. कमनशीब हात धुवून कंगालांचा

पिच्छा पुरवतं, कमनशिबी कंगालाला कामिनी कोणत्या अभिलाषेनं वश होणार ?

एके दिवशी गोदी-विभागातल्या आमच्या कचेरीची उचलबांगडी झाली. सप्तून डॉकजवळच्या खास आरमारी तळावर आम्ही आमचं प्रचंड बिऱ्हाड हालवलं. दिल्लीच्या हुकुमामागोमाग आरमाराचे मोठमोठे ट्रक्स आले आणि बघता बघता त्यांनी सामानाचं प्रचंड धूड नव्या वास्तूत वाऱ्याच्या गतीनं वाहून नेलं. मागं एक टाचणीसुद्धा शिल्लक टाकली नाही. हा नवा शाही आरमारी भू-तळ म्हणजे विस्तीर्ण आवार, कवाइतीचं फरसबंदी मैदान, कडुनिंबाची निगा राखलेली राई आणि कच्चा बराकी ह्यांचा समुच्चय होता.

देवडीवर पिस्तुलधारी आरमारी पोलिसांचा अहोरात्र पहारा असे. देवडीच्या आत आमचंच राज्य होतं. बसायला मोकळी जागा, दुतर्फा निंबाचं वन, बनात दाट सायीसारख्या छाया आणि त्या छायेत गाणाऱ्या साळुंक्या ह्यांची लयलूट होती. काम जवळपास नव्हतंच. बराकीत बसून कंटाळा आल्यावर मी रुमाल अंथरून त्या निंबाच्या राईत, दर्यावरच्या खाऱ्या वाऱ्याच्या झुळका अंगावांद्यावर घेत निवान्तपणं बसे. तिथं कंटाळा आला की गाज घालणाऱ्या कफ परेडच्या सागरतीरावर बसून नारिंगी रंगाच्या गल्ल पक्ष्यांचे मत्स्यवेध न्याहाळीत बसे. सुरुवातीला हे सारं काव्यमय वाटायचं, पण पुढं-पुढं पाखरांचाही कंटाळा आला. झाडांची गार सावली नको, समुद्राच्या लाटा नकोत, वाऱ्याच्या झुळकाही नकोत नि त्या पक्ष्यांची गाणीही नकोत. अशा विरक्त दशेला येऊन ठेपलो. तेव्हापासून दुपारचे तीन-साडेतीन वाजले की कुणालाही न सांगता-सवरता मी मांजराच्या पावलानं घरी पळायचा.

हा प्रकारही कुणाच्या लक्षात आला नाही. ह्या तळावरच्या कँटीनमध्ये बोटीवर कामं करणारे सैनिक कधी कधी चहासाठी येत. मोठमोठी विलायती चॉकोलेटस् तीन आण्यांना एक ह्या भावानं ते आम्हाला आडगिऱ्हाइकीत विकत. पण असल्या महागड्या चैनीवर तीन आणे उधळायला राजीखुषी कोण असणार ? त्यामुळं ती चॉकोलेटस् त्यांची त्यांनाच खावी लागत. सप्तून डॉकसमोर एका भंडाऱ्यानं मुख्यत्वेकरून कोळ्यांसाठी एक मांसाहारी खाणावळ काढली होती. तिथं अवघ्या एका आण्यात तळलेला अख्खा बांगडा मिळायचा. शिवाय, बाकड्यावर पाठ ताठ करून बसलेल्या गिऱ्हाइकांना फुकटच्या-तच कपभर जळतवणी रस्सासुद्धा वाढण्यात येई. केवळ तो लज्जतदार, लालसर, तिखट मटणाचा रस्सा ओरपायला मिळावा म्हणून तो तळलेला अख्खा बांगडा आम्ही एक आणा मोजून खायला जायचे; आमच्या शुभागमनामुळं आसमास नसताना गिऱ्हाईक वाढल्यामुळं आणि त्या समस्त गिऱ्हाइकाला भोनीचं मार्गदर्शन मी आमच्या सारस्वती व्रीदाला स्मरून निष्ठापूर्वक केलेलं असल्यामुळं बिनकाष्टयाचं धोतर नेसणारा तो भंडारी मालक माझ्यावर निहायत खूष होता. एका वर्षात त्यानं मला जितके सलाम केले, तितके सलाम मला माझ्या सबंध हयातीत रस्त्यावरल्या गोसाव्यांनीसुद्धा केले नसतील ! मी एकटा असलो म्हणजे तो दयाळू भंडारी मला मटणाचा चालू रस्सा न देता

कोंबडीचा बढा फर्मास लालेलाल रस्सा, हात आखडता न घेता मोफत देई. आमच्या शाही आरमारातील कारकुनी जीवनाची ही एकुलती एक कमाई– अर्थात ती कुठल्याही कोकणस्थ सारस्वताला भूषणास्पद आहे हा भाग वेगळा आणि आगळासुद्धा!

कुलाब्याचा आरमारी भू-तळ चर्चगेट–बोरीबंदराहून फार लांब पडतो म्हणून आरमाराचे ट्रक्स आमची ने-आण करायला मिळावेत असा एक नवा बूट निघाला. आरमाराकडेही युद्धकाळात घेतलेले ट्रक्स धूळ खात होतेच. त्यांना आयतंच काम मिळालं. दररोज साडेचार वाजता आमच्या बराकीच्या समोर उघड्या आरमारी ट्रक्सची रांग लागे. शेकडो कारकून आणि अधिकारी त्यात दाटीवाटीनं उभे राहात. मग आरमाराचे अट्टल ड्रायव्हर्स ते ट्रक्स अशा तुफान वेगानं समुद्राच्या कडेनं पिटाळीत नेत की एकीकडे जरी आम्ही तोंडात बोटं घालून घालून शिट्ट्या मारण्याची हौस पुरवून घेत असलो तरी दुसरीकडे आमच्या छातीत धस्स व्हायचं. वाहतुकीचे नियम आपल्यासाठी नाहीत, ही त्या आरमारी ड्रायव्हर्सनी नीट जतन केलेली श्रद्धा होती. पिसाट वेगाचं त्यांना जबरदस्त आकर्षण होतं. त्यांच्या उत्साहाचे आपण बळी होऊ म्हणून अनेकांनी पुढंपुढं त्या ट्रक्समध्ये पाऊल टाकायचं सोडून दिलं!

मी साडेतीनलाच कचेरीला रामराम ठोकायला सुरुवात केल्यामुळं त्या तुफान दौडीचं भीतियुक्त सुख मला फार दिवस लाभलं नाही. अनेक मंडळींना दुपारच्या जेवणाचे डबे घरून यायचे. मी सकाळी भरणाऱ्या सिद्धार्थ महाविद्यालयात बुक्का लावलेला असल्यामुळं माझाही डबा घरून दुपारी यायचा. तो डबा घेऊन मी निंबाच्या सावल्यांत बसून दररोज वनभोजन करायचा. साळुंक्या दररोज पंगतीला यायच्या. पण त्यांच्यापैकी एकही कृतज्ञतेनं अंगाखांद्यावर बसली नाही. 'खाण्याला पुढं, प्रेमाला मागं' ह्या आमच्या पाचवीला पुजलेल्या अनुभवामृताची दररोज उजळणी व्हायची. मात्र दिवस मोठ्या सुखासमाधानात चालले होते हे मान्यच केलं पाहिजे.

एकदा काही तरी गडबड होऊन माझा डबेवाला आला नाही. एक वाजेपर्यंत डब्याची वाट बघून, त्या दोस्त झालेल्या भंडाऱ्याला मी उदार आश्रय देऊन आलो. तेव्हा दोन वाजून गेले असावेत. परत आल्यावर पाहतो तो देवडीवरल्या पिस्तुलधारी पोलिसांनी माझ्यासाठी इतक्या लांबून जेवणाचा मोठा टिफिनकॅरियर घेऊन आलेल्या माझ्या वयस्क वडिलांना उन्हातच रोखून ठेवलेलं होतं. तो डबा मी घेतला. बाबा उन्हातून परत गेले. ते हेडमास्तर होते. साधे हेडमास्तर नव्हते– लायकी सिद्ध केलेले लौकिकवान हेडमास्तर; पण आपला सारा मानसन्मान आणि हुद्दा बाजूस सारून ते माझ्यासाठी उन्हातान्हातून दमछाक करीत, घाम गाळीत, मोठा डबा पेलवत पेलवत कुलाब्याच्या आरमारी भू-तळावर आले. ऑफिसमधले माझे मित्र, नाही म्हटलं तरी थोडेसे द्रवलेच. भरल्या पोटी ते अन्न मी परत मटकावलं. सायंकाळी परत जाताना देवडीवरल्या त्या पिस्तुलवाल्या पोलिसानं विचारलं, "ओ बुड्ढा कौन था?"

"वे हमारे पिताजी थे." मी अभिमानानं सांगितलं. त्यावर तो पोलिस असूनही

म्हणाला, " हां. आखिर दूसरा कौन होगा ? ये काम सिर्फ पिताजी कर सकते हैं. दुसरे सब लोक चायपानीवाले और बिडीतंबाखूवाले."

दरम्यानच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळणार अशी चिन्हं अगदी पहाट-ताऱ्यासारखी स्पष्ट दिसू लागली. व्ही फॉर व्हिक्टरीनं जे बेहोष झाले होते त्यांची नशा उतरायला प्रारंभ झाला. तिशी--पंचविशीतले तरुण खूष झाले. त्यांच्या आशा पल्लवित झाल्या. आकांक्षांना पंख फुटले. बुड्ढे गोंधळून अकाली बुड्ढे झालेले त्रस्त झाले. बुजले. अहिंसावादी हिंदी नेटिव्ह स्वतंत्र झाले तर कदाचित ते अलम् आरमारच्च सहीच्या एका फटकाऱ्यासरशी बरखास्त करतील आणि कुणाच्या अध्यात-मध्यात नसलेले आपण आरमारी कारकून मात्र मधल्यामध्ये बेकार होऊ, अशीही भीती अनेकांनी घेतली.

देशभर स्वातंत्र्याच्या आगमनापूर्वीचे उद्दीपक वारे वाहू लागले, तसतसे आमचे लोक अधिकच गोंधळू लागले. मुळात आमच्याकडे फारसं काम असं नव्हतंच. ह्या नव्या तडाख्यानं ते पार मंदावलं. दिवसभर मंडळी कोंडाळी करून, आपल्या नोकऱ्यांचं यापुढं काय होणार हा एकच प्रश्न एकमेकांना विचारीत. एकदा हूल आली की गांधीजींनी साहेबाला गुप्तपणं कळवलं आहे की सर्व भवितव्यतेचा कर्ता करविता परमेश्वरच एकमात्र असल्यामुळं हिंदुस्थानच्या संरक्षणासाठी आरमाराची गरज नाही; एवंच, आपण ते मोडीत काढणार ! त्यामुळं गांधींच्या नावं बोटं मोडून झाली. कुणी म्हणालं की, राजाजींनी योजना आखली आहे आणि तिच्याप्रमाणं सर्व लष्कर आणि आरमार बरखास्त होऊन सारे सैनिक शेती-विकासाचा कार्यक्रम हाती घेतील; आणि अशा रीतीनं भारतमातेचे पांग फेडतील !

म्हणजे, अखेर आमच्या नशिबी बैलंच हाकायची होती ! त्यामुळं राजाजींच्या नावेही बोटं मोडून झाली. पायांखालची वाट कुठं जातेय तेच कळेना. सर्वत्र सांवेमोड झाली. नंबियार नावाचा एक म्हातारा अधिकारी होता. त्यानं तावातावानं जाहीर केलं, " प्राण गेला तरी मी हिंदी माणसाच्या हाताखाली काम करणार नाही. यदाकदाचित दुर्दैवानं स्वातंत्र्य आलंच तर पेन्शन घेईन नि विलायतेला जाईन. मग तिथं रेल्वेचा गार्ड झालो तरी बेहत्तर ! पुढं कचेरीच्या कामासाठी आठ दिवसांनीच त्याला विशाखापट्टमला दौऱ्यावर जावं लागलं. काय नशीब पाहा ! कर्मधर्मसंयोगानं तिथं तो नंबियार हृदयक्रिया बंद पडून आकस्मिक मरण पावला ! कुठं ? एका रस्त्यावर बेवारशी माणसासारखा. कसा ? तर, कमरेला लुंगी आणि खमीस ह्या अवतारात ! त्या नव्या गावात त्याला कुणीही ओळखलं नाही. बिचाऱ्याचं प्रेत सार्वजनिक शवागारात ठेवण्यात आलं. पोलिसी चौकशीचे धिंडवडे झाले. बऱ्याच प्रयासानंतर त्याची ओळख पटली आणि मग एर्नाकुलमला जन्मलेला, मद्रास आणि लंडन येथे उच्च शिक्षणानं विद्याविभूषित झालेला, दिल्ली, कोचीन, पुणं आणि मुंबई इथं परक्यांसाठी झिजलेला असा तो नंबियार विशाखापट्टमच्या थंड सागरतीरावर अनोळखी माणसांच्या साक्षीनं पंचतत्त्वांत गुपचूपपणं विलीन झाला !

ही सगळी साग्रसंगीत बातमी आमच्या तळावर येऊन पोचली तेव्हा सर्वांना

आश्चर्याचा जबरदस्त तडाखाच बसला! शोकात मौज अशी की, येणाऱ्या स्वातंत्र्याचा धसका घेऊन नंबियारनं आत्मविसर्जन केलं असाच सर्वत्र प्रचार होत राहिला– आणि बहुतेकांचा त्यावर विश्वासही बसला. तो डेप्युटीच्या हुद्द्यावर असल्यामुळं त्याच्या दुःखद मृत्यूनिमित्त संध्याकाळी साडेचार वाजता शोकसभा घ्यायचं ठरलं. सभेची व्यवस्थाही झाली. आणि हे सर्व होत आहे, सराईत मंडळी भाषणाचे मुद्दे टिपून काढताहेत तोच ते उघडे आरमारी ट्रक्स आमच्या बराकींसमोर येऊन थडकले! त्या मोटारी पाहून कार-कुनांना राहवेना. ब्रिटिश साम्राज्याच्या धर्मयुगात नंबियार मेला. चला! त्याचं सोनं झालं. आता स्वकीयांच्या कलियुगात आम्हांला जिवंतपणी मरण सहन करायचं आहे त्याचं काय? आमच्या शोकसभा कोण घेणार? कुणीच नाही ना? मग नंबियारच्या शोक-सभेशीही आम्हांला कर्तव्य नाही!

ती चंद्रबळ एकवटून मांडलेली शोकसभा सोडून सारेजण ट्रक्समध्ये चढले. त्यांना विनवलं, फर्मावलं तरी कुणी खाली उतरायला म्हणून कसा तो राजी होईना! शोकसभा अखेर दुसऱ्या दिवशी आल्याआल्याच घ्यायची ठरलं. सभेनंतर मेनन म्हणाला, "जस्ट सी द फेट ऑफ धिस नंबियार! बॉर्न व्हेअर? स्टडिड व्हेअर? वर्क्ड व्हेअर? अँड डाइड व्हेअर? बट अल्टिमेटली लकी इनफ टु डाय इन् द ब्रिटिश रेजिम अँड दॅट टू इन ब्रिटिश इंडिया!" ही रडकथा झाली आम्हा आकडेमोड करणाऱ्या हिशेब-तपासनिसाची. तथापि, शाही आरमारी दलातले अंमलदारही बावचळले नव्हते असं नाही. पूर्वी मान मोडून काम करणारे ते तगडे जवान आता कामातून मनाला सवड करून देऊ लागले. चारचार आठआठांची कोंडाळी करून तासन् तास गप्पा पिसू लागले. साहेब गेल्यानंतर त्यांच्या खुर्च्या आपल्यासाठीच राखून ठेवलेल्या आहेत याचा त्यांना वास लागला होता. त्यामुळं त्यांच्यापैकी काही बेरके अधिकारी मारे खुषीत होते. त्यांच्या बायका म्हणा किंवा प्रिया म्हणा, फॅन्सी ड्रेस घालून मिरवायला लागल्या होत्या.

एका शनिवारी दोन प्रहरी, रेशमाच्या लड्यांसारख्या मऊ आणि मखमलीच्या रुमालावर ठेवलेल्या मोत्यासारख्या तेजस्वी आणि टपोऱ्या दिसणाऱ्या त्यांच्या गौरकाय बायका आमच्या बराकीत येऊन थडकल्या. त्या पंचरंगी रानपाखरांचा गोड चिवचिवाट आम्ही खिडक्यांच्या तावदानांतून कानांत प्राण ओतून ऐकला. बराकीच्या एका टोका-कडच्या दालनात त्या जमल्या. त्यांचे नवरे आले. नवऱ्यांचे अंमलदार मित्र आले. पाठो-पाठ ड्रिंक्स आली. ती पिऊन तृप्त झाल्यावर त्या पुरंध्रींनी ऐशा मोकळेपणानं आणि लडिवाळपणानं परपुरुषांशी अंग घासटीत गप्पा मारायला सुरुवात केली, गळ्याला मिठ्या मारमार मारणाऱ्या लाघवी हास्याच्या इतक्या मोहक फैरी झाडल्या, इतक्या सहजपणानं त्या भाग्यवान परपुरुषांचे हात कुरवाळले गेले, आणि आपल्या विपुल केसांचा त्यांना इतका मादक गंध लुटू दिला, की निदान त्या रात्री तरी आम्ही शांत चित्तानं झोपी गेलो असं म्हणणं अप्रामाणिकपणाची हद्द होईल! व्यक्तिशः माझं तर हृदय त्या मोकळ्या-मोकळ्या पुष्परागी वातावरणानं इतकं पुलकित झालं, की त्या प्रसंगाची स्मृती पुढं अनेक

उन्हाळ्यापावसाळ्यांत मला दिलासा देत राहिली!

शाही आरमाराच्या आमच्या खात्याचे वासे हे असे फिरत गेले. ते फिरत असतानाच रातोरात स्वातंत्र्य आलं. होत्याचं नव्हतं झालं. नव्हत्याचं होतं झालं. ह्या लंकेत आपणाला सोन्याच्या विटा मिळणार असा बहुतेकांना भ्रम झाला. रॉयल नेव्ही रद्द-बातल झाली. युनियन जॅक निश्रेष्ट पडला. भारतीय नौदलाचा पाळणा हालला. तिच्या पाचवीच्या घुगऱ्या खाण्यात आम्ही धन्यता मानली. भारतीय तिरंगा ध्वज सातासमुद्रांवर दिग्विजय गाजवायला फडफडत निघाला. ४५ सालच्या मुंबईच्या आरमारी बंडानं प्रज्वलित केलेल्या ठिणगीचं रूपांतर हे अशा लखलखीत प्रकाशझोतात झालं! गोरे अधिकारी हिंदी राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन गेले. हजारो स्वातंत्र्यवीरांचं हौतात्म्य सुफळ झालं. आमच्याच रक्ताच्या भाईबंदांना भराभर बढत्या मिळाल्या. सारे कसे हिरवागार चारा मिळालेल्या सशासारखे खुशाल झाले.

त्या जयघोषातच अचानक माझ्या लक्षात आलं की ह्या साली आपण बी. ए. झालेलं बरं. कारण स्वतंत्र भारतातली ती पहिलीच पदवी-परीक्षा ठरायची होती. उत्तीर्ण झालो तर स्वतंत्र भारताचे आम्ही पहिले पदवीधर ठरणार होतो! साधायची का ही संधी? होय. साधायची– नव्हे साधलीच पाहिजे. अभ्यास करायचा. हात न लावलेल्या पुस्तकांचं आता पीठ पाडायचं. नोकरी सोडली तरच हे शक्य होतं. मनाचा निश्चय झाला. एका तंद्रीतच मी माझ्या त्या अफलातून नोकरीचा राजीनामा खरडला. मेननचं नजरेच्या एका कटाक्षात मंजुरीची जोरदार शिफारस करून तो स्पेशल मेसेंजरबरोबर हेड ऑफिसला पाठवला. झालं! स्वतंत्र भारताच्या नौदलाच्या चाकरीतून एका शांत संध्याकाळी मी मुक्त झालो. तो प्रचंड आरमारी भू-तळ, त्या बराकी, ते पटांगण, ती दाट छाया देणारी निंबवृक्षांची हिरवीगार राई, तो चैतन्यानं पुलकित झालेला सागरकिनारा, त्या साळुंक्या, ते देवडीवरले पिस्तुलधारी पोलिस, ते अक्कडबाज कलंदर अंमलदार, ते पोरके नौदल सैनिक, आणि कपाळावर भस्माचे चार फराटे ओढण्यातच काय तो धर्म साठवलेला आहे असं मानणारे ते कारकून,–हे सगळं विश्व मला एका क्षणात परकं झालं. मी 'आउटसायडर' झालो.

रीतीप्रमाणं चहा-शंकरपाळे झालं. सूर्यनारायण नावाच्या एका तरतरीत कारकुनाचं नि माझं मेतकूट जमलं होतं. तो हळहळला. त्यानं विचारलं, "तू इतकी चांगली नोकरी का सोडतोस? आता नेव्ही आपली झाल्याय. आता यापुढं नवेनवे हुद्दे येतील; नव्या-नव्या जागा निर्माण होतील नि बघताबघता तू पर्मनंट होऊन जाशील!"

मी शांतपणं त्याला म्हटलं, "मी उच्च शिक्षण घेणाराय."

त्या विचाऱ्याचा पूर्ण गैरसमज झाला. त्या लोभी जिवाला वाटलं, मी विलायतेची तयारी करतोय. सर्वांना उद्देशून तो म्हणाला, "मित्रहो, उच्च शिक्षण घेण्यासाठी पिंगे-महाराज आपल्यातून जात आहेत. मी आशा व्यक्त करतो की तेथून परत आल्यावर ते स्वतंत्र भारताचे शिक्षणमंत्री होतील नि आमच्यावर राज्य करतील!"

मी ठार झालो!

" ही शुभेच्छा ठीक आहे, पण तो दिवस उगवेपर्यंत आम्हांला जिवंत ठेवण्याची काही तरी व्यवस्था करा बुवा. नाही तर फ्री इंडियात टेंपररी क्लार्क म्हणून आम्ही मरून जायचे! " सुळेनी आपल्यापरी विनोदी पुरती जोडली आणि चहाची चव अधिक गोड केली. विद्वांस नावाचा एक विद्याप्रेमी कारकून एका ज्योतिष्याचा मुलगा होता. तो तळमळीनं म्हणाला, " अरे लेका, ही नेव्ही-बिव्ही तुझी लाइन नाही. तुझा भाग्योदय बाहेर आहे! "

नेव्ही-बिव्ही माझी लाइन नसलेला मी, माझ्या भाग्योदयाच्या शोधार्थ त्या विरंगुळ्याच्या अफलातून नोकरीवर तुळशीपत्र ठेवून बाहेर पडलो. नमूद करावयास परम संतोष होतो की, भारताचा शिक्षणमंत्री काही मी झालो नाही– होणारही नाही. शिक्षणखात्याशी मात्र माझं नाळ-नातंच असणार. कारण शिक्षकाच्या पोटी जन्म घेण्याचं भाग्य लाभलेलं हे बहुगुणी बालक स्वतंत्र भारताच्या पहिल्या पदवीधरांच्या माळेतला एक मणी होऊन राज्यसरकारच्या शिक्षणखात्यातच अखेर सर्वकर्मकुशल कारकून म्हणून दीर्घसूत्री बोरूकाम करू लागलं!

एक अप्रतिम आत्मचरित्र

आपलं मन कसं असतं ? झाडासारखं. मातीतून उगवून आलेलं झाड आपल्या आर्जवी फांद्या पसरून हवेत डुलत असतं. फिरती पाखरं, कधी एकटी-दुकटी तर कधी थव्यानं त्याच्यावर येऊन बसतात. खेळतात, बागडतात, फांद्या कुरतडतात, फांद्यांवर घरटी बांधतात. ऋतू पालटले की ही गाणारी मंडळी दाही दिशांत पंख विस्फारतात. गुपचूप नाहीशी होतात. त्यांना आठवण झालीच तर परत झाडाला भेट देतात. नाही तर निळेभोर आभाळ हेच त्यांचं घर ठरतं. मात्र काही पक्षी मूळ भूमी सोडत नाहीत. ते पुन्हापुन्हा त्याच त्या झाडावर जीव रमवायला येतात. झाडाला जणू काही जीव लावतात. आपलं मन आणि पुस्तकं ह्याचे लागेबांधे असेच असतात. अनेक पुस्तकं मनाला भिडतात. पण कालान्तरानं त्यांचा विसर पडतो. विस्मृतीच्या निळ्याभोर आभाळात ती पंख विस्फारतात. गुपचूप नाहीशी होतात. क्वचित त्यांतल्या एखाद्याच्या पिसाऱ्याची, कंठाची आठवण होते. पण पुन्हा सामसूम. झाड फांद्या पसरून उभं राहतं. मात्र मधूनच एखादं पुस्तक असं निघतं की ते बेटं पुन्हा पुन्हा मनाच्या डहाळीवर बसतं. हिंदकळतं. गाणं गातं. पिसारा फुलवतं. 'माय सन्स फादर' हे डॉम मोरेसचं खुल्लंखुल्लं आत्मचरित्र ह्याच जातकुळीचं आहे. वाचून संपलं की ते मनात भरतं आणि मग तिथंच ते स्वतःसाठी स्वतःचंच असं घरटं बांधतं.

तेहतीस वर्षांच्या डॉम मोरेसचं इंग्रजी नवकवितेतलं स्थान मोठं मानाचं आहे. जन्मानं तो मुंबईकर भारतीय ख्रिश्चन. आता मात्र त्यानं निधर्मी ब्रिटिश नागरिकत्व स्वीकारलं आहे, पौरुषत्वाकडे झेप घेताना टिपलेले अनुभव म्हणजेच माझं आत्मचरित्र, असं तो म्हणतो. हे पुस्तक वाचताना आपल्याला पटत राहतं की दुःखाचे घाव आणि सुखाचे वर्षाव सारख्याच अलिप्ततेनं भोगणाऱ्या कविमनाच्या बहराची ही एक कलंदर कहाणी आहे.

'टाइम्स ऑफ इंडिया'चे माजी आणि दिल्लीच्या 'इंडियन एक्सप्रेस'चे आजी

नंतर डॉम आईबरोबर घरी परतला. त्याच्या ध्यानात आलं– आपल्या आईला मनोविकृती जडली आहे. संशयानं तिला पछाडलं आहे. शरीरानंही ती खंगत आहे.

दुसऱ्यावर पाळत ठेवण्याचं वेडच डॉमच्या आईला लागलं. त्याचं इथून पुढलं सारं आयुष्य वेड्या मातेच्या छायेत, मनाच्या चिंधड्या उडालेल्या स्थितीत गेलं. नेमक्या ह्याच मोक्यावर पित्याच्या चांदण्यासारख्या शांत प्रेमाचं अलोट धन त्याच्या वाटणीला आलं. त्याच्या वडिलांनी त्याला चित्रांची, गोष्टींची पुस्तकं दिली. आपल्याबरोबर आलिशान हॉटेलातून नेलं. कुत्रं घेऊन दिलं. खूप हिंडवून आणलं. वेडी बायको आणि मुलगा ह्यांना घेऊन ते सिलोनला गेले, ऑस्ट्रेलियाला गेले. न्यूझीलंड, इंडोनेशिया, ब्रह्मदेश वगैरे देशांची ह्या सर्व कुटुंबानं सफर केली. डॉमनं प्रवासात विषुववृत्तावरला पाऊस नावाचा धबधबा पाहिला, गाणारे रंगीत मासे पाहिले, उकळणारा चिखल पाहिला, क्रिकेटर राजदूत दुलीपसिंग पाहिले. सर्व प्रवासवर्णन पद्यात लिहून काढलं. लेखनशक्तीचा त्याला साक्षात्कार झाला. पण मनःस्थिती सुधारलेली आई तो पाहू शकला नाही. बापानं पाण्यासारखा पैसा वेचला.

पण मुंबईला परतल्यावर त्याची आई दिवसेंदिवस भडकतच गेली. एकदा घरात कुणी नसताना तिनं डॉमवर सुऱ्याचा वार केला! जिवावरचं बोटावर निभावलं. वस्तूंची मोडतोड तर नित्याची झाली होती. तिनं भिंतीवरला खिस्ताचा फोटो फोडला. माशांची हंडी फोडली. डॉमच्या कुत्र्याचा उच्छेद आरंभला. नोकरांना मारहाण होऊ लागली. एकदा फ्रॅंक झोपलेले असताना ती उघडा सुरा घेऊन त्यांच्या बिछान्यावर चढली. डॉक्टर्स सांगू लागले, आईना इस्पितळात घाला. वडिलांनी ठाम नकार दिला. पीडा विकोपास गेली. डॉमचं जीवनच धोक्यात आलं. नाइलाजानं आईला बंगलोरच्या पागलखान्यात इतमामानं ठेवलं. डॉम कविता वाचायला आणि पद्यरचना करायला मोकळा झाला. घरातल्या नोकरांनाही त्याचा फार लळा लागला.

कविता आणि कामिनी

ह्याच काळात डॉमच्या आयुष्यात झपाटलेली माणसं शतपावल्या घालू लागली. गांधीचरित्रकर्ते डी. जी. तेंडुलकर फटिंगासारखे अधीं तुमान घालून आले. ते त्याच्या वडिलांचे खास दोस्त. त्यांनी डॉमला पुस्तकांच्या जुन्या बाजारातून फिरवून आणलं, रशियन वाङ्मयाचा परिचय करून दिला. ज्ञानपिपासेचा धडा स्वतःच्या निखळ आचरणानं घालून दिला. त्याहीपलीकडे जाऊन त्यांनी डॉमला गरीब वस्ती दाखवली. माणसांनी असं राहता कामा नये, नव्हे,– माणसांना असं ठेवता कामा नये, हा उदात्त संस्कार त्याच्या मनावर कोरला. पुस्तकं कोंबून भरलेली तेंडुलकरांची मठी पाहून डॉमचं चित्त मोहरलं. कवी निस्सीम इझिकेलनी मोठ्या उमेदीनं डॉमची रचना अभ्यासली. ते म्हणाले, 'डॉम, ही कविता तर खासच नव्हे. पण तुझ्यापाशी काव्यशक्तीचे अंकुर आहेत.' डॉमची कविता इझिकेलनं जीव लावून जोपासली. गोंडांच्या जीवनाशी एकरूप झालेले

फादर वेरीयर एल्विन डॉमची कविता वाचून खूप झाले. त्यांनी जुनी-नवी इंग्रजी कविता डॉमकडून अभ्यासून घेतली. मनिषी डे हा कैफी चित्रकार डॉमच्या रचनेवर लट्टू झाला. त्यानं त्याच्या कवितांना चित्रं काढून दिली. वडिलांची मायेची पाखर तर सदाचीच होती. आपण कवी आहोत आणि कवी म्हणूनच आपण जगायचं ही त्याची श्रद्धा बळकट झाली.

कवितेनं आणि कामिनीनं डॉमच्या आयुष्यात एकाच वेळी पदार्पण केल्याचं त्यानं नमूद केलं आहे. वडिलांच्या ग्रंथालयात स्विनबर्नचा काव्यसंग्रह होता. तो वाचून त्यानं त्या रचनेचं अनुकरण करणारं प्रारंभीचं पद्य लिहिलं. शाळा अशी धड त्यानं केलीच नाही. एका कॉन्व्हेन्टमध्ये त्याचं नाव नोंदवलं होतं. पण चर्च वर्ज्य केलेल्या बापाचा हा अश्रद्ध मुलगा कॉन्व्हेन्टच्या धार्मिक वळणाच्या श्रीगणेशाला पुरता विटला. साहजिकच कवितेशी त्याची गट्टी झाली. काव्यानंदाचा आस्वाद घेणं चालू असतानाच डॉमनं विवस्त्र कमनीय स्त्रीदेहाचं पहिलं उन्मादक दर्शन घेतलं. त्याच्या घरी येणाऱ्या नात्यातल्या एका स्त्रीच्या कान्तीनं तो भाराबून गेला. त्याचं चित्त हरपलं. एकदा डॉम काळोखया खोलीत पडलेला असताना रात्रीची ती त्यांच्या घरी आली. घरातली मोठी मंडळी कुठं पार्टीला निघणार होती. म्हणून त्या बाईला कपडे बदलायचे होते. कुणी तरी सूचना केली की खोलीत मुलं झोपलेली आहेत. तिथं जा नि कपडे बदल. ती प्रौढा त्याप्रमाणं खोलीत आली. तिनं दार ओढून घेतलं. दिवा लावला आणि खोलीत कुणीही जागं नाही अशा समजुतीनं वस्त्रं उतरली. गुलाबी चोळी काढली. दुसरी घातली. हे सगळं अप्रूप, डॉम झोपी गेल्याचं सोंग करून किलकिल्या डोळ्यांनी पाहात होता. तिच्या दाहक दर्शनानं डॉमचं शरीर पेटून निघालं. आपण जणू मधात तरंगत आहोत असं त्याला वाटलं. आपल्यात काही तरी अद्‌भुत क्रान्ती झाल्यागत त्याला वाटलं. ह्या अवस्थेत त्यानं सहा वर्षं ढकलली! आता सोळावं वर्ष येऊन थडकलं. आई बंगलोरच्या पागलखान्यात क्लेश सोशीत होती. स्त्रीदर्शनानं वृत्ती मोहरून निघणारा डॉम त्या गुलाबी चोळीवाल्या बाईवर फिदा झाला होता. एकदा ती घरी आली असताना त्यानं तिला विचारलं,

"कृष्णकथेत कीटनं काय म्हटलंय माहीत आहे तुला?"

"कोण कीट? मला तर काहीच माहीत नाही." ती उत्तरली.

"सांगतो, ऐक. तो म्हणतो की वाऱ्यावर डुलणाऱ्या कलिंगडासारखी रावेची स्तनं होती. तुझीही–"

"ह्या वयात तुझ्या मनात असले घाणेरडे विचार असावेत ही बेशरमपणाची गोष्ट आहे." ती तिटकाऱ्यानं बोलली नि चालती झाली. डॉम शरमेनं अर्धमेला झाला. आपला लज्जास्पद चेहरा आरशात न्याहाळू लागला.

इतक्यात ओळखीची दुसरी बाई त्याच्या घरी आली आणि आईची खबरबात विचारू लागली. मग सान्त्वन करीत म्हणाली, "अरेरे! बरं, असं कर– तू उद्या माझ्या घरी ये. आपण थोडंसं ड्रिंक घेऊ."

दुसऱ्या दिवशी त्या बाईच्या घरी काय झालं ते वर्णन करताना डॉम म्हणतो, "तिच्या बिन्हाडी तिनं माझा उपभोग घेण्याचा प्रयत्न केला. मला आता निश्चित काहीच आठवत नाही. मात्र हे खरं की ती यशस्वी झाली नाही. तरीसुद्धा त्या स्त्रीबद्दल माझ्या हृदयात कृतज्ञताच आहे. मी सर्वांनाच नकोसा झालेलो नाही, ही उमेद मला तिच्यामुळंच आली."

स्त्री-प्रेमातली ठेच

उदारहृदयी वडिलांच्या सल्ल्यानं लंडनला निघाला. बोटीवर वडिलांनी नोकर-वर्गाला चिरीमिरी वाटली. मातृप्रेमाला आचवलेल्या आपल्या लाडक्या डॉमला जवळ घेऊन ते म्हणाले, "बाळ, नीट वाग."

लंडनच्या दिशेनं बोट निघाली. घुम्या स्वभावाचा पुस्तकवेडा डॉम कुणाशीही मिसळला नाही. एकदा एक प्रौढा त्याला म्हणाली, "मला वाटतं मी तुझ्या आई-वडिलांना ओळखते." मग जवळीक झाली. तिचं नाव ॲलीस. ती दोघं बोटीवर वाऱ्यावद्दल बोलू लागली. ॲलीसनं कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केलेला होता. तोला-मोलाच्या लेखकाबरोबर तिची जानपछान होती. ॲलीसचं नवऱ्याबरोबर बिनसलं होतं. इंग्लंडला गेल्यावर ती घटस्फोट घेणार होती. डॉम तिच्यात रमून गेला.

लंडनला पाऊल टाकल्याबरोबर त्यानं तिला एक उंची खाना दिला. स्वतः सपाटून प्याला नि ॲलीसच्या कानात पुटपुटला,

"ॲलीस, आय लव्ह यू!"

"काय म्हणालास?" तिनं कपाळाला आठ्या घालून विचारलं.

"माझं प्रेम आहे तुझ्यावर ॲलीस!"

"छे, भलतंच काही तरी काय? माझं दुसऱ्या एका पुरुषावर प्रेम आहे."

धुकाळ लंडनमध्ये डॉमला लागलेली ही पहिल्या दिवसाची पहिली ठेच!

लंडन त्याला खास करून आपलं वाटलं. तू विलायतेला जाशील, तिथंच राहशील, चारी दिशांना भटकशील, फार मोठं नाव कमावशील; मात्र तुझ्या मातृभूमीत तू कधीच राहणार नाहीस,– हा एका मांत्रिकेनं वर्तविलेला त्याचा प्रारब्धयोग खरा होणार असं त्याला वाटू लागलं. लंडनची हवा त्याच्यापुरती साहित्यमय झाली. काव्यरचनेचा त्याचा ध्यास ह्या भूमीवर सुफलित व्हावा असेच योग जुळून आले. स्टिफन स्पेंडरला तो भेटला. मुंबईत त्यांची भेट झालेलीच होती. आणि 'तू कवी होशील' ह्या त्याच्या शेऱ्यानं डॉमच्या वृत्ती पल्लवित झालेल्या होत्या. स्पेंडरनं त्याला ई. एम्. फॉर्स्टरला ओळखपत्र दिलं. हे ओळखपत्र म्हणजे आपल्याला लाभलेला आध्यात्मिक पासपोर्टच होता असं डॉमनं लिहिलं आहे. फॉर्स्टरनं डॉमला युरोपची सफर करून नंतर ऑक्सफर्डला येण्याचा सल्ला दिला. डॉमनं तो शिरोधार्य मानला.

इतर स्त्रिया

अनुभवाची शिदोरी बांधायला तो पॅरिसला आला. तिथं पहिल्याच दिवशी एका बारमध्ये एका अनोळखी अमेरिकन गिऱ्हाइकानं डॉमशी छोकरेबाजीचे संबंध जोडण्याची इच्छा दाखवली. त्याची समजूत काढता-काढता डॉमला पुरेवाट झाली. ह्यापूर्वी लंडनच्या पबमध्ये कॉल्कहाउन आणि मॅकब्राइड ह्या चित्रकारांच्या छोकरेबाज जोडगोळीनं डॉमला आपल्या कळपात ओढण्याचा प्रयत्न केला होता. पण आपण त्या गावचे नव्हेत ही समज डॉमनं दिल्यानंतर ते त्याच्या वाटेला गेले नव्हते. छोकरेबाजीची उद्ध्वस्त दुनिया लंडन--युरोपच्या काळोखात डॉमनं अगदी दुरून पाहिली. सोहोच्या नाइट लाइफवरोवर मात्र त्यानं हस्तान्दोलन केलं होतं.

भूमध्य समुद्रातल्या सासरी बेटावर त्याची राफेला ह्या इटालियन तरुणीशी गाठ-भेट झाली. तिनं आपण होऊन डॉमला सिनेमाला नेलं आणि काळोखात त्याचा हात कुरवाळला. मग विचारलं,

'बरं वाटलं ना?"

आपण कवी असल्याचं डॉमनं सांगताच् ती म्हणाली,

"तुझ्या सुरेख डोळ्यांनी मला ते केव्हाच सांगितलंय."

दुसऱ्या दिवशी निजानीज झाल्यावर रात्री ती डॉमच्या कविता वाचायला म्हणून त्याच्या खोलीवर आली नि म्हणाली,

"मी आज पुरती थकल्याय. इथं जरा पडू?"

डॉमच्या बिछान्यावर आडवी होऊन ती म्हणाली, "भारीच बाई उकडतंय." आणि ती उघडी होऊ लागली. तिकडे दुर्लक्ष करून डॉमनं काव्यवाचन सुरू केलं. अशा वेळी काय केलं पाहिजे हे डॉमला उमगलं होतं. पण वळलं नव्हतं. थोडीशी वाट पाहून सुस्कारा टाकीत राफेला निघून गेली!

डॉम युगोस्लाव्हियात गेला. बेलग्रेडमध्ये ड्रॅगिका नावाच्या प्रौढ विधवेच्या घरी पेइंगगेस्ट म्हणून उतरला. तिथं आजारी पडला. ड्रॅगिकानं याची मनोभावं सेवा केली. आपला बिछाना त्याला वापरू दिला. पूर्ण बरा झाल्यावर कृतज्ञतेनं डॉम म्हणाला,

"बाई, तुम्ही माझं खूप केलंत. आता तुमची गादी तुम्ही घ्या. मी आतल्या खोलीत निजेन." या बाईचा कावा वेगळा होता. या म्हातारीनं डॉमचा उपभोग घेतला असं त्यानं लिहिलं आहे.

पुरुषी अनुभवांच्या आस्वादांनी समृद्ध झालेला डॉम लंडनला परतला. नवकवी आणि नवचित्रकारांच्या भणंग ताफ्यात सामील झाला. त्यानं कलंदर कलावंताचं फटिंग जिणं पत्करलं. सर्व दिवस तो तुफान पिण्यातच घालवू लागला. तो नाइट लाइफ उपभोगीत असतानाच त्याची पंचवीस वर्षांच्या कुमारिकेशी गाठ पडली. के नवकवीची दोस्तगारीण होती. नवकवींचा अड्डा असलेल्या एका कॉफीपानगृहात ती नोकरीला होती. तिची भेट

केचं उत्तान वागणं वाढू लागलं. डॉमच्या मनातून ती उतरू लागली. पण तिला दूर सारणं त्याला जमेना. आपण बापकमाईवर जगतो आहोत ह्याची खंत सुरू झाली. केच्याही मनात अनाकलनीय अशी असूया निर्माण झाली. आनंदाची गोष्ट फक्त एक होती– त्याचा कवितासंग्रह अगदी हवा तसा प्रसिद्ध झाला होता. टाइप, कागद, छपाई, आकार– ह्या सर्व बाबतींत कफल्लक प्रकाशकानं त्याचं कोडकौतुक पुरवलं होतं. आणि कळस झाला तो, सर्वोत्कृष्ट कलाकृतीला लाभणारं 'हॉथर्डन' पारितोषिक त्याच्या काव्य-संग्रहाला बहाल करण्यात आलं, तेव्हा! कौतुकाचा वर्षाव त्याच्यावर केला गेला. डॉमचं ह्या विधिघटनेवरचं भाष्य असं आहे:

"माझं इतकं कौतुक झालं, त्याची कारणं चार आहेत. युद्धानंतर हे पारितोषिक प्रथमच देण्यात आलं होतं; ह्या पारितोषिकाच्या विजेत्यांत मी वयानं सर्वांत छोटा होतो; इंग्रजेतर लेखक ह्या पारितोषिकाचा प्रथमच धनी होत होता. आणि त्या वेळी छापायला दुसरी सनसनाटी बातमीच नव्हती! माझ्या कवितेचा बोलबाला व्हावा अशी माझी इच्छा अर्थातच होती. पण ज्यांना काव्य कशाशी खातात ते माहीत नाही अशा लोकां कडून गौरवून घेणं मला खटकत होतं. हा सबंग गाजावाजा मला पुन्हा जोमानं लेखनाकडे वळवू शकत नव्हता. ती प्रसिद्धी भाकड होती."

रीतीप्रमाणं डॉमनं साहित्यिक मित्रांना खाना खिलवला. स्टिफेन स्पेंडर, प्रकाशक आर्चर वगैरेंनी स्तुती गायली. समारंभ संपल्यावर के डॉमला म्हणाली, "आता तुझ्या आयुष्यातली माझी गरज संपलीच असणार!" नंतर ती धावत स्नानगृहात गेली आणि ब्लेडनं तिनं हाताच्या पंजाच्या रक्तवाहिन्या सपासप कापायला सुरुवात केली. डॉम धावला. त्यावर ती त्याला म्हणाली, "पाहिलंस? तुझ्यामुळं मला हे करावं लागलं!"

डॉम सर्द झाला!

केनं नोकरी बदलली. त्यानिमित्तानं ती परगावी जाऊ-येऊ लागली. डॉम तिला भेटायचा. ड्रिंक्स द्यायचा. पण भिंग जे फुटलं ते फुटलंच. एका मित्रानं मग टेलिफोन-वरून डॉमला थंडपणं कळवलं की अलीकडे के एका दुसऱ्याच पुरुषाच्या प्रेमात रमली आहे!' डॉम लिहितो,

"हे कळल्यावर मला सुटकेचा विलक्षण आनंद झाला. सभोवतालच्या तुरुंगाचे कुणी तरी गज काढून टाकल्यासारखं वाटलं. मी खऱ्याखोट्याची वाटसुद्धा पाहिली नाही. सरळ साहित्यिक अड्ड्यावर गेलो. तिथल्या एका सुंदर युवतीशी सूत जोडलं. तिला तियून बाहेर काढलं, आणि तिचा मनःपूत उपभोग घेतला. दुसऱ्या दिवशी ती मला म्हणाली,

"काय मजा आहे पाहा! खरं म्हणजे मी एका दुसऱ्याच व्यक्तीच्या प्रेमात आहे! आले मात्र तुझ्याबरोबर. तुझं असंच कुणावर प्रेमबीम आहे की नाही?"

"नाही—" मी ठामपणं सांगितलं.

त्यानंतर डॉमनं आपले स्त्रीविषयक तत्त्वज्ञान निश्चित केलं. ते असं की, आपण

नर आहोत; मिळतील तितक्या स्त्रियांचा आपण उपभोग घ्यायचा ! मात्र जीव कुणालाचं लावायचा नाही.'

शुद्ध प्रीतीला दगाफटका

पण हा निश्चयसुद्धा विरघळला. ऑक्सफर्डला पुन्हा त्याच्या जीवनात एक शालीन युवती आली. आपल्या भावुक प्रीतीची ओंजळ त्यानं तिच्या चरणावर वाहिली. आईला भेटायला तो भारतात यायला निघाला. ती शांत चेहऱ्याची त्याची प्रेयसी लंडनला त्याला निरोप द्यायला आली. तिच्या समाधानी नजरेत त्याला अलौकिक भाव दिसू लागले. निरोप देताना ती त्याला म्हणाली, " डॉम, सांभाळून जा. नि बरं का, फार पिऊ नकोस."

त्यानं गहिवरून तिला आश्वासन दिलं, " तुला भेटायला मी लवकरच परतेन."

भारतात आई–वडिलांना, निस्सीम ईझिकेलला भेटून तो लंडनला परत आला. आल्याबरोबर भेटीच्या वस्तू घेऊन त्या युवतीकडे गेला; म्हणाला, " पाहा मी तुझ्यासाठी काय काय आणलंय ! "

" किती सुंदर आहेत रे ह्या वस्तू ! पण डॉम, मी ह्या स्वीकारू शकत नाही."

" का ? "

" तुझा गैरसमज झालाय डॉम. अरे, मी दुसऱ्याच एका तरुणाच्या प्रेमात आहे."

चकार शब्द न बोलता त्या वस्तूंचं गाठोडं घेऊन डॉम तिथून निघून गेला. समोर थेम्स नदीचं पाणी संथपणं पुढं-पुढं वाहात होतं, आपलं प्रारब्ध आणखी काय काय वळणं घेतंय ते पाहात डॉमचा पुढचा प्रवास सुरू झाला.

अशी मुलुखगिरी करीत करीत संसारयात्रेला निघालेल्या डॉमला अखेरीस ज्युडीथ भेटली. त्यांचं शुभमंगल झालं. पॅरिसमध्ये तिला दिवस गेले. फ्रान्सची भेट म्हणून मुलाचं नाव कौतुकानं फ्रॅन्सिस ठेवण्यात आलं. आपल्या मुलाचा बाप म्हणून डॉम ताठ मानेनं चालू लागला.

वाङ्मयीन वैशिष्ट्य

ही झाली डॉम मोरेसच्या जीवनाची कलंदर कहाणी. समर्थ कादंबरीसारखीच ती मोठी हृदयस्पर्शी आहे. डॉमला इंग्रजी भाषा अक्षरशः वश आहे. शब्दांच्या अर्थच्छटांच्या बाबतीत तर तो केवळ रत्नपारखीच आहे. पण एवढ्याचमुळं हे आत्मचरित्र कीर्तिमंडित झालेलं नाही. डॉमनं दैववशात घेतला तितपत आयुष्याचा आस्वाद घेणारे लेखक, कलावंत, आपल्या अवतीभोवतीसुद्धा सापडू शकतील. मुद्दा तो नाही. डॉम मोरेसचं वैशिष्ट्य एक आहे; की त्यानं जे करायचं ठरवलं त्याचं मोल त्यानं पुऱ्या मापानं दिलं. इंग्लंडमध्ये स्थाइक होऊन इंग्लिश भाषेतला कवी म्हणून ख्यातकीर्त होण्याचं महान

स्वप्न त्यानं वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी पाहिलं. त्याच्या वडिलांनी समंजसपणा दाखवला. तेंडुलकर, फादर एल्वीन, ईझिकेल वगैरेनी त्याला पुस्ती गिरवायला लावली. त्यानं भारताकडे खेचणारे सगळे मायापाश तोडण्याचं पराकाष्ठेचं धैर्य दाखवून ती गिरवली. नव्या लेखकाच्या भाळी कोरलेली कफल्लक अवस्थाही त्यानं अनुभविली. पोट भरण्यासाठी सटरफटर लिहिलं. हे सर्व सोशीत असताना त्याला करुणेचा साक्षात्कार झाला. त्याची कविता म्हणजे त्या करुणेचाच कलात्मक आविष्कार आहे. वास्तविक पाहता भारतात त्याचा जन्म झाला. पण भारताविषयी त्याला उमाळा वाटला नाही. ह्या परकेपणानं त्याचा पिच्छा पुरवला. तशात भारतीय भाषांचा त्याला गंधही नव्हता. इंग्लंडनं मात्र त्यांचा स्वीकार केला. भारतात जन्मलेल्या एका संवेदनाक्षम मनाच्या बुद्धिमंताला इंग्लंडनं कसं खेचून नेलं त्याचा आलेख म्हणजे हे आत्मचरित्र होय.

डॉमला त्याच्या वेड्या पिसाट मातेबद्दल वाटणारी करुणा, सिंहाचं हृदय लाभलेल्या प्रतिष्ठित, पण वात्सल्यभावानं बहरून गेलेल्या साहित्यिक बापाबद्दल त्याला वाटणारी माया, ज्ञानार्जनासाठी आयुष्य पणाला लावणाऱ्या तेंडुलकर, ईझिकेल, एल्वीन वगैरे गुरुजनांबद्दल त्याला वाटणारा असीम आदर, फॉर्स्टर, स्पेंडर, ऑडेन, ईलियट ह्या कवींच्या पायापाशी बसण्यात त्याला वाटणारी धन्यता, जीवीचं श्रेय संपादण्यासाठी आयुष्य उधळण्याची त्याची तयारी, मुलाचं कौतुक करण्यात त्याची लागणारी ब्रह्मानंदी टाळी, लेखकाच्या पेशाविषयी त्याला वाटणारा अभिमान— ह्या सर्व निष्कलंक मानवी भावनांचं पंचामृत म्हणजे हे आत्मचरित्र आहे. कवी जगाकडे कसं अलिप्तपणं पाहतो, काय भोग सोसतो, काय भोग भोगतो, किती जागरूक राहतो, कुठलं मोल देतो, प्रसंगी कुर्बानीलाही कसा सिद्ध होतो ते पाहायचं असेल तर हे अप्रतिम पुस्तक वाचावं. एकदा का ते वाचलं की ते वाचकावर स्वार झालेच म्हणून समजावं.

सलल्या महत्त्वाकांक्षाही बाळगीत नाही. रोज सकाळी इथं बागेत घटकाभर येतो. उघड्या-वर बरं वाटतं. अरे, आम्ही झाडामाडांतली माणसं. वाडे नि बिल्डिंगा आमच्या रे काय कामाच्या बाबा? मी इथं येतो नि गावाकडच्या आठवणी काढतो. गावी माझी शेती आहे थोडीशी. तळं आहे, देऊळ आहे. आणखी काय हवं माणसाला?'

सावंतानं बसल्या बसल्या अनेक गप्पा मारल्या. आम्ही लहानपणच्या आठवणी काढल्या. सध्याच्या कोलाहलाबद्दल बोललो. पण माझ्या मनाचा पक्षी त्या शब्दांच्या गर्द झाडीतून केव्हाच निसटला होता. स्पर्धाहीन अशा समाधानी जीवनाचा हा महेश सावंत धनी झाला होता नि समाधान मिळवण्यासाठी मी महाराजांच्या शाब्दिक प्रवचनाला निघालो होतो! केवढा हा फरक! त्या क्षणी मी मनानं कुठं तरी निर्णय घेतला– प्रवचन वगैरे सगळे बाह्योपचार खुंटीला टांगून ठेवायचे. आयुष्याच्या जीववेण्या स्पर्धेतून अंग हलकेच बाजूला काढून घ्यायचं आणि साधं जीवन निसर्गाच्याबरोबर शांतपणं जगायचं. असं स्पर्धानिरपेक्ष जीवन जगणं हीच एक प्रार्थना असेल. नि मिळेल ते समाधान हाच देवाचा प्रसाद!

नऊ ऑगस्ट !

बेचाळीस साल उगवल्यापासूनच हिंदुस्थानभर क्रांतीचे वारे वाहू लागले, जिकडे तिकडे रणधुमाळी उडाली, लोकांनी स्वातंत्र्यसंग्रामात शड्डू ठोकून धूम उड्या टाकल्या, वगैरे शोभिवंत भारूड जे पुस्तकात लिहिलेलं असतं, ते पुस्तकापुरतंच ठीक आहे. आमचे खरेखुरे अनुभव मात्र खोटे वाटावेत इतके वेगळे आहेत. अगदी बेचाळीस सालचीच गोष्ट सांगतो. गिरगावातली सदाशिव गल्ली त्या काळात अक्षरशः सुगंधित असायची. तो एक बाळबोध बोळ होता. दुतर्फा छोट्या छोट्या घरांच्या बाहेर फुलझाडं फुललेली असायची. रात्री तर रेशमी हातरुमालाच्या स्पर्शासारखा जीव पुलकित करणारा रातराणीचा गंध सर्वत्र दरवळलेला असे. बोळात रहदारीचं नाव नव्हतं. सारा आसमंत शांत होता. पहाटेस चक्क दंव पडायचं. रात्री गारठा असे. अर्धवट ओलसर मातीच्या रस्त्यावरून आम्ही कोपऱ्यावरल्या बटाट्याच्या चाळीला काटकोन करून शाळेत जायचो. पोरंटोरं पाऊस-पाण्यात डुंबतात तसे आम्ही शाळेच्या वातावरणात डुंबलेलो होतो. खेळापलीकडे आम्हांला कशात काही गम्य नव्हतं. देशात हाणामारी चालली होती. पण ती आमच्यापर्यंत पोहोचलेली नव्हती आणि देशभक्तीशी तिचा काही संबंध नव्हता. दूर कुठं तरी युद्ध पेटलेलं होतं; रात्री दिवाबंदी असे; पिवळी पगडी गस्त घाली; टॉमीज घोडागाड्या उडवायचे; आणि नव्यानं निर्माण झालेल्या रेशनिंग खात्यात टेंपरवारी म्हणून भरणा झालेली यचयावत मंडळी पायीपायीच कोटातल्या कचेऱ्यांना निघायची. त्यात खूप प्रौढ मुली असायच्या– आमच्या बालजीवनाला घेरणारं वास्तव हे फक्त इतकंच होतं. पुन्हा त्यातही दोन-चार केशराच्या काड्या होत्याच. 'नवयुग' झाडून सगळेजण वाचीत. प्रत्येकाला तेवढा वेळ असे. क्वचित कुणी 'झंकार'ही वाची. खांडेकरांच्या कादंबऱ्या वाचून त्यांच्यातील वाङ्मयगुणांची चर्चा न करता, वाचक खांडेकरांच्या त्यागी जीवनाबद्दल गहिवरून बोलत. त्यांचा फोटो पुन्हा पुन्हा पाहात. त्यांचे सिनेमे पाहात, ते मस्त असत. त्यात गोरगरीबांबद्दल पुळका तर असेच पण शिवाय मीनाक्षीही असे. त्या चित्रपटात कुठं तरी

गांधीजींचा आडवळणानं हमखास उल्लेख येई. गांधीजींचा 'हरिजन' निघे. काही-जणांच्या हातात तो क्वचित प्रसंगी दिसेही. पण त्यांचे विषय भारीच पौष्टिक, पथ्यपाण्याचे आणि सोपेपणाचा निष्कारण गवगवा झालेल्या नेटक्या पण जटिल इंग्रजीत मांडलेले असत. गांधीजींची दोन इंग्रजी वाक्यं वाचायची म्हणजे चारदा शब्दकोश पाहावा लागे. त्यामुळं सर्वसाधारण वाचक 'हरिजन'च्या वाटेला जात नसत हेच सत्य आहे. ते खांडेकर वाचत. खांडेकर फार सोपं करून मांडीत. शिवाय उपमा घालीत. गांधीजींना काय म्हणायचं आहे हे मग वाचकांना अगदी विनासायास आपोआप कळे. गांधीजींचं नि आमच्या पिढीचं हस्तान्दोलन हे असं खांडेकरांच्या मध्यस्थीनंच झालं, हा इतिहास आहे.

मात्र चंद्र दिसला नाही तरी आकाशात कुठं तरी तो मिरवीत असतोच. तसं गांधीजी आम्हांला प्रत्यक्ष दिसले नाहीत तरी कुठं ना कुठं तरी ते गाजत असतच. त्यांचा, सावरकरांचा, सुभाषबाबूंचा, नेहरूंचा, जीनांचा बोलबाला सतत कुठं ना कुठं चालू असे. वर, तो काळही इतका भावडा होता की शंकरराव देव असोत की स. का. पाटील असोत, 'दे. भ.' ही दोन अक्षरं त्यांचा पिच्छा पुरवायचीच. वर्तमान-पत्रातला त्यांच्या भकास छबीभोवतालचा मजकूर अलगद ओलांडून आम्ही वजिफदार, वझिरअली, नायडू, गोडांबे, देवधर, अमरसिंग, निस्सार वगैरेंच्या अव्वल दर्जाच्या खेळांची बातमीपत्रं भाताच्या वाफेचा खरपूस वास परत परत घ्यावा त्याप्रमाणं पुन्हा पुन्हा वाचीत असू. देशभक्तांचे फोटो कधी कुणी खिशात बाळगले आहेत असं झालं नाही. बिब्बो, मीनाक्षी, काननबाला, नूरजहान, श्याम, आणि शाहू मोडक, ह्यांचे फोटो शौकीनांपाशी जरूर असत. क्रिकेटरांच्या फोटोंचे अल्बम एकजात सर्व शाळकरी मुलांकडे असत. बंद पडलेल्या घड्याळासारखं निरर्थक जीवन वाट्याला आलेली धडधाकट बेकार माणसं प्रत्येक घरात, प्रत्येक चाळीत असत. ती राजकारणा-बद्दल त्वासून बोलायची. बेचाळीस साली ह्यातल्या बहुतेकांना चाकऱ्या मिळाल्या. आनंदीआनंद झाला. ही केवळ हिटलरचीच कृपा असं सर्वांनी म्हटलं नि तोंड गोड केलं. आता राजकारणाच्या चर्चांना चांगलीच ओहोटी लागली होती. जी. पी. ओ., रेशनिंग, नेव्हल डॉकयार्ड, रेल्वे, मिलिटरी अकाउंटस् वगैरे सरकारी खात्यांत जो तो स्वतःला नि स्वतःबरोबर आपल्या मित्रमंडळींना चिकटवून घेत होता. अर्ज केला पण नोकरी मिळाली नाही असं त्या काळात घडलं नाही. हिटलरनं महाराष्ट्रातील बेकारांना अचानक सुगीचे दिवस अशा उफराट्या रीतीनं दाखवले हे त्या आद्य आर्याचं ऋण कसं विसरायचं! आजचं सोडा; तेव्हाही कुणी विसरलं नाही. ब्रिटिशानं जावं आणि हिटलरनं यावं अशी वांच्छा असलेल्यांची संख्या अजिबात उपेक्षणीय नव्हती. त्याचप्रमाणं शेळीच्या दुधाच्या चाऱ्यावर जगणाऱ्या नेटिवांच्याही हातात देशाचं सुकाणू जाऊ नये असं मानणारा फार मोठा वर्ग घसा खरडून बोलत होता आणि तरीही गांधीजी गाजत होते. त्यांचं येणं-जाणं वर्तमानपत्राच्या

मथळ्यांनी जाहीर व्हायचं. ते मुंबईला जुहूला आले की अर्धी मुंबई जागी व्हायची जो तो जुहूच्या चौपाटीवर निघायचा. गांधीजींना डोळे भरून पाहून तृप्त व्हायचा. बहुतेकदा खादी वापरण्याचं व्रत घ्यायचा. असंच एकदा ते येणार म्हणून कळलं. लाखो माणसं बोरीबंदरावर जमा झाली. मीही त्यांत होतो. तास गेला. दोन तास गेले. तीन तास गेले तरी गांधीजींचा पत्ता नाही.शेवटी कळलं की मध्येच कुठं तरी गाडी थांबवून गांधीजींना उतरविण्यात आलं होतं. सारा उसळलेला जनसागर हळहळला. पण नाराज झाला नाही. गांधीजींना मध्येच उतरवून बोरीबंदरात उशीरा आलेल्या गाडीतून काही ग्राम-पुढारी उतरले. लोकांनी त्यांचाही जयनाद केला! त्यात माझ्याही एक-दोन आरोळ्या होत्याच.

ही ऑगस्टच्या अगोदरची गोष्ट झाली. मुंबईत ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात गवालिया तलावावर काँग्रेसचा जंगी उरूस भरणार आहे हे आम्हा शाळकरी पोरांच्या कानावर दुरून दुरून आलं. त्याचा आमच्यावर काहीही परिणाम झाला नाही. सर्व-सामान्य मराठी मध्यम वर्गीयांवरही झाला नाही. चार पैसे कमवू लागलेली माणसं वेगळ्याच काळजीत गुरफटलेली होती. आजपर्यंत कुणी न ऐकलेल्या महागाईनं सामान्यांच्या धोपटमार्गी जीवनात चंचुप्रवेश केला होता. नारळाची कवड नानिवडेकरांच्या दुकानात तीन पैशांना मिळायची, तिचा दर एक आणा झाला होता. गोवेकरांच्या खानावळीत मटणाची सागुती एक आण्याला वाटीभर मिळायची, तिला आता दीड आणा पडू लागला. बदाम, पिस्ते घातलेल्या आटीव मसाल्याच्या दुधाचा दर एक आणा कपावरून चक्क दोन आणे कपावर गेला आणि सामान्य माणसांनी मसाल्याच्या दुधाचं नावच टाकलं! लोकांच्या खऱ्या काळज्या ह्या होत्या. घासलेटची बाटली भडकली होती, त्याच्याबद्दल लोक चिंतातुर झाले होते. देशाची किंवा स्वातंत्र्याची काळजी फारशी कुणा मध्यम वर्गीयाला लागली नव्हती. जो तो आपापल्या नोकऱ्या सांभाळून होता. पन्नास रुपये मूळ पगार आणि दोन रुपये महागाई भत्ता, मिळून बावन्न रुपये दरमहा कमवीत होता. त्याच्या पुरुषार्थाची ती हद्द होती.

मात्र जसजसा काँग्रेसचा प्रचंड मंडप उभा राहू लागला, तसतसं वारं बदलू लागलं. मंडपाची आरास बघायला म्हणून लोक केनेडी पूल ओलांडून गवालिया तलावाकडे जाऊ लागले. प्रवेशद्वाराचे मनोरे सुरेखच होते. शांतारामबापूंनी ते बनवले आहेत असं लोक तेव्हा कुजबुजत असत. आम्ही पोरंही गेलो. खूप वेळा तो शामियाना आतून बाहेरून पाहात रेंगाळलो. दिवेलागणी झाल्यावर बोलणी खायला घरी परतलो. मला वाटलं, नामी संधी आलीच आहे तर गांधीजींना एकदा पाहावं. नेहरूंना पाहावं. म्हणून अधिवेशनाच्या दिवशी गेलो. तेव्हा रस्ता माणसांनी नुसता फुलला होता. पाऊलही पुढं टाकणं अशक्य झालं. गर्दीत जीव घुसमटू लागला. माझ्या शेजारी एक उभट टोपी घातलेला माणूस गर्दीतून वाट काढीत मंडपाच्या दिशेनं पुढं सरसावीत होता. त्याच्या पुढ्यात एका स्वयंसेवकानं विक्रीसाठी म्हणून राजेन्द्रबाबू, सरोजिनी नायडू, सरदार

पटेल वगैरे काँग्रेस पुढाऱ्यांचे फोटो धरले, तेव्हा त्या माणसानं त्या स्वयंसेवकाला चुकविण्यासाठी म्हणून आपलं अंग कमालीचं आक्रसून घेतलं! मी सिद्ध करू शकणार नाही, पण बहुतांशी तो उभट टोपीचा माणूस म्हणजे कोल्हापूरचे माधवराव बागलच असावेत. असावेत नाही, माझी खात्री आहे की तेच ते होते! कारण तो चेहरा 'किर्लोस्कर' वगैरे मासिकांतून छापून आलेला मी पाहिलेला होता. त्या अफाट गर्दीतून मंडपापर्यंत कसं भिडायचं? मी युक्ती काढली. बाबुलनाथाच्या टेकडीकडून निघालो आणि कंबाला टेकडीच्या मागून घुसून मंडपाच्या पिछाडीला आलो. तिथं गर्दीही नव्हती. पहाराही नव्हता. कदाचित मीच स्वयंसेवकासारखा दिसलो असेन! पण मला मंडपात शिरायची कुणीही आडकाठी केली नाही. मंडपाच्या आतून दिवे प्रज्वलित झालेले होते; आणि त्यांच्या झोतात पं. नेहरू काहीच्या काहीच मारू दिसले.

त्या काळी ते गुलाबाच्या फुलासारखे दिसत असे म्हणण्यापेक्षा गेंददार गुलाबाचं फूल पं. नेहरूंसारखं उत्फुल्ल दिसे असंच म्हटलं पाहिजे. मात्र बाकीचे चेहरे पराकोटीचे खप्पड वाटले. कदाचित त्याचमुळं आपल्या सौंदर्याच्या बळावर पं. नेहरू आपली सुलतानी त्यांच्यावर यथेच्छ गाजवू शकले. सुंदर रूप ही बंदी नोट आहे, ती कुठंही वटवता येते हे देहाच्या सौंदर्याचं महत्त्व नेहरूंनी नीट जाणलं होतं. म्हणूनच रूपाकडून टुकार असलेल्यांना पंडितजींचा एकही होकार जन्मात मिळविता आला नाही. राजबिंडं रूप ही आपली अमोघ शक्ती आहे हे पंडितजींना ठाऊक होतं. त्यांचं जीवन हा ह्या शाश्वत सत्याचा प्रभावी आविष्कार आहे.

मला मंडपात करमलं नाही. कामकाजाची किचकट कळली नाही. म्हणून पुन्हा मागच्या कमानीतून बाहेर आलो. सभा सुटली, रात्र चढली, तरी तसाच बाहेर रेंगाळत उभा राहिलो. इतक्यात मौ. अबुल कलम आझाद मंडपाच्या बाहेर आले. त्यांना पाहून एका तरुण भैयानं त्यांच्या दिशेनं झेप घेतली आणि त्यांच्या गोऱ्यापान चरणांची धूळ स्वतःच्या मस्तकी लावली! मला गहिंवरून आलं. मात्र त्या थोर मौलानासाहेबांनी त्या भारावलेल्या किरकोळ भक्ताकडे साधं पाहिलंसुद्धा नाही. सिगरेटची राख झटकून ते तडक एका स्टेशनवॅगनमध्ये बसले. आमच्या नाकातोंडात धुराचा फवारा कोंबून त्या स्टेशनवॅगननं धूम ठोकली. मौलानासाहेब तिथूनच नव्हे तर माझ्यापासूनही दूर दूर गेले.

दुसऱ्या दिवसापासून युद्धकांडाला प्रारंभ झाला. गवालिया तलावावर गोळीबार होतोय हे कळल्यावर कुणालाच काही कळेना. जो तो त्या दिशेनं धावू लागला. ट्रॅम्स बंद झाल्या. आम्ही शाळेत होतो. काय गडबड आहे ते पाहण्यासाठी शिक्षक बाहेर गेले, ती संधी साधून सर्व वर्ग पाटीदतरं घेऊन पसार झाला! पळत पळतच आम्ही केनेडी पूल ओलांडला. तिथं गर्दी, गोंधळ आणि आकान्त ह्यांचा वणवाच पेटलेला होता. रस्त्यावर लोकांनी बसकण मारली होती. पोलिस बंदुकीच्या नळीतून धुराची नळकांडी उडवीत होते. फिक्कट निळसर रंगाच्या धुराचं एक पटलच त्या भागात तरंगत होतं. बंदुकीचे ठो-ठो आवाज आसमंतात उठत होते. शिट्ट्या मारीत पोलिसांच्या गाड्या बिरट्या घालीत होत्या.

आम्ही टरकलो. पाय काढता घेतला. पण पुन्हा शाळेत जावंसं वाटेना. तो दिवस आम्ही असा रस्त्यावर भटकूनच काढला. एका प्रौढ माणसाला विचारलं, 'ही मारामार का चालल्याय?' तो म्हणाला, 'काल गांधीजींना पकडलं म्हणून.' मग सगळा उलगडा झाला. रस्त्यावर खडूनं जिकडे तिकडे लिहून ठेवलेलं होतं, 'Quit India' इंडिया म्हणजे हिंदुस्थान हे आम्हांला कळलं. क्विट म्हणजे काय? आम्ही शाळेतली दोनशे मुलं होतो, पण एकालाही त्या शब्दाचा अर्थ माहीत नव्हता.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांत सगळीकडे दंगली पेटल्याच्या बातम्या झळकल्या. गांधीजींनी स्वातंत्र्याची निर्वाणीची मागणी केली होती. त्यांना हार्दिक पाठिंबा म्हणून देशभर सर्वत्र हरताळ पाळला गेला. जगात हरताळ चालू असताना शाळेत काय म्हणून जायचं?

पाटीदप्तरं घेऊन दुसरा दिवसही आम्ही रस्त्यावरच काढला! ह्यात गांधीजी-बद्दलचा पुळका होता अशातला भाग नाही. शाळेला हरताळ फासण्यात एक प्रकारची झिंग होती. मस्ती होती. ती आम्ही भोगीत होतो इतकंच.

कुणी तरी म्हणालं, 'गांधीजींना सोडीपर्यंत शाळेवर बहिष्कार!' आमच्या पाठीच्या कण्यातून आनंदाच्या झिणझिण्या लुकलुकल्या. लागोपाठ महिनोन् महिने शाळेला बुट्टी ही कल्पनाच केवढी तुफान रोमांचकारक होती! आम्ही पडत्या फळाची आज्ञा घेतली. मोठी मुलं त्यांच्यापरीनं विध्वंस करीतच होती. शाळेच्या भिंतीवर शाईच्या दौती आपटून फोडणं ही फार प्राथमिक अवस्थेतली गोष्ट झाली. मुलं त्याच्याही पुढं गेली आणि सामानाच्या, नकाशांच्या नासधुशीला प्रारंभ झाला. बाहेर रस्त्यावर संग्राम सुरूच होता. पोलिसांवर दगडफेक करणं, टेलिफोनच्या तारा कापणं, ट्रॅम्बा पेटवणं, गोऱ्या सोजिरांना एकटे-दुकटे गाठून बडवणं, हे काम सर्रास चालू होतं. घोळके करून फिरायचं आणि मोडतोडीचं महाभारत डोळे भरून पण कातडी वाचवीत पाहायचं एवढंच आमचं काम उरलं. ते आम्ही चोख बजावलं. एकदा दादर स्टेशनाचं भस्म झाल्याची बातमी गिरगावात आली. आम्ही गेलो. स्टेशन जसंच्या तस्सं उभं होतं! पण आम्ही निराश झालो नाही. आज जाळलं नाही तर उद्या जाळतील, इतका आशावाद आमच्यापाशी शिल्लक होता.

गांधीजी काही सुटेनात. शाळा आम्हांला भेटेना. मग बुलेटिन्सचे दिवस सुरू झाले. काँग्रेसतर्फे भूमिगत चळवळीची सनसनाटी इत्थंभूत माहिती देणारी पत्रकं निघत. ती वाटणं, वाचणं आणि तिखटमीठ लावून त्यातला मजकूर इतरांच्या कानांत कुजबुजणं, ही कामं आम्ही स्वतःच्या गळ्यात अडकवून घेतली. ती पत्रकं कोण लिहायचं नि ती कुठं टंकलिखित होत परमेश्वर जाणे. पण ती वाचताना आपण काही तरी क्रांतिकार्यच करीत आहोत असा समज होण्याइतकं आम्ही भाबडे होतो. बुलेटिन्सच्या मागोमाग काँग्रेसचा भूमिगत रेडिओ सुरू झाला. तिन्ही सांजा टळल्यानंतर काळोखात रेडिओला अक्षरशः कान चिकटवून कुठून तरी अज्ञात ठिकाणाहून ध्वनिक्षेपित होणारं छुपं बातमीपत्र ऐकणं हा

वा. मं. 22326 निषेध

आमचा एक नवाच उद्योग सुरू झाला. डॉ. लोहिया तो काँग्रेस रेडिओ चालवीत आहेत अशी कुणकुण होती. नंतर उषा मेहेतांचं नाव कानावर पडू लागलं. कुणी तरी बातमी आणली की, गिरगाव बॅक रोडवरच्या मेहेंदळे बिल्डिंगसमोरच्या इमारतीत पाचव्या मजल्यावरच्या शेवटच्या खोलीत गुप्त रेडिओचं केंद्र आहे. नंतर डॉ. लोहिया आणि उषा मेहेता दृष्टीला पडाव्यात म्हणून आम्ही मेहेंदळे बिल्डिंगवर अक्षरशः पहारा करू लागलो. पण ती मंडळी कधीच दिसली नाहीत. ती पाचव्या मजल्यावरची खोली मात्र नेहमी बंद असे! त्या भूमिगत आकाशवाणीवरून सुरुवातीला ध्वनिक्षेपित करण्यात येत असलेली 'वंदेमातरम्'ची चाल अक्षरशः मनावर रोमांचाची फुलं फुलविणारी होती. त्या द्रुत-गतीतल्या चालीला चपखल बसेल असं मराठी विशेषण एकच आहे– मर्द!

अशा गिरक्या घेणं आमचं चालूच होतं. घरची माणसं मात्र आमच्या नावानं ठणाणा करीत होती. पोरं शाळेत जात नाहीत ह्याचा अर्थ काय? नि गांधीजी ह्यांना काय डबोलं देणार? हे त्यांच्यापुढं दोन यक्ष– प्रश्न होते! आजी तर सांजसकाळ म्हणे, 'अरे निदान मॅट्रिक तरी व्हा रे; म्हणजे चार दिडक्या तरी मिळवाल; शिकलाच नाही तर काय खाल?' आम्ही मात्र प्रसंगविशेषी धोंडेही खायची तयारी ठेवली होती. कधी कधी वाटायचं, शाळेत जावं. पण पुन्हा वाटायचं, 'नको! तिकडे गांधीजी, नेहरूंसारखे देशभक्त तुरुंगात नि इकडे आम्ही शाळा करायच्या? थूः आमच्या जिनगानीवर!' आमच्यापैकी एकाच्या अंगात अचानक वीरश्री संचारली. तो म्हणाला, 'वेळ अशी येईल की आपल्याला जेवायलाही मिळायचं नाही. काय मिळेल ते पोटात ढकलून वेळ निभावून न्यावी लागेल.' आम्ही म्हटलं 'तथास्तु!' नुसता पाव ढोसून राहणं म्हणजे काय ते अनुभविण्याचं मी ठरविलं. पॅथे सिनेमासमोरचा मोगल तेव्हा दोन आण्यांत पोटभर खिमा-पावरोटी द्यायचा. वर बक्कळ कांदाही वाढायचा. मी गेलो. खिशातले दोन आणे पुन्हा पुन्हा पाहिले. ते खर्च करायचे नक्की केलं. गरम गरम पावरोटी-खिम्याचा फडशा पाडला. वर वशीभर कांदा फस्त केला. ते खाणं मला इतकं विलक्षण रुचकर लागलं की मोगलाकडची पावरोटी-खिमा चापायला मिळत असेल तर आजन्म क्रांतिकारक व्हायला मी एका पायावर तयार झालो! इतरांनाही ते ठिकाण सांगितलं. मग सगळेच काही दिवस तरी त्या मोगलाचे अगत्यशील आश्रयदाते झाले.

असे दोन महिने गेल्यावर डोळ्यांसमोर काजवे नाचायला लागले. मुंबईतल्या घातपाती चळवळीला ओहोटी लागली. अच्युत पटवर्धन, अरुणा असफअल्ली, जयप्रकाश नारायण, ही नावं नव्यानं कानावर पडू लागली. दूर कुठं कुठं मोडतोड होई, बॉम्ब उडवले जात, ब्रिटिशांना चांगलीच अद्दल घडवली जाई. पण ते पाणी ओहोटीचं वाटू लागलं. तरुण मंडळींच्या नोकऱ्या सुरळीत चालू होत्या. बायासुद्धा रेशनिंगमध्ये लागल्या होत्या, स्कॉलर मुलं व्यवस्थित शाळेला जात येत. सुंदर मुली त्यांच्याशी बोलत, वह्या–पुस्तकं देत घेत,–आणि आम्ही देशभक्त काय करीत होतो? तर, शाळेला दांड्या मारून चौपाटीच्या वाळवंटावर समंधासारखे भटकत होतो. चौपाटीचा कंटाळा आला की

कोर्टात चिरट्या मारायच्या. कोर्टाचा कंटाळा आला की राणीच्या बागेत चकरा मारायच्या ! एकदा तर आम्ही हायकोर्टात जाऊन एका पोटगीच्या दाव्याचं नीरस कामसुद्धा जांभया देत देत अथपासून इतिपर्यंत ऐकलं !

दिवस असे लटकले जात होते. क्रांतीचं महावस्त्र हळूहळू विरू लागलं होतं. आमच्या पायाखालची वाळू सरू लागली होती.

पाच महिन्यांनंतर एक दिवस कृतिसमितीनं घोर निर्णय घेतला, 'शाळांवरचा हरताळ मागं घ्या आणि सर्वांनी शाळांमध्ये जा ! देशात चालू असलेली घातपाताची चळवळ गांधीजींना बिलकुल पसंत नाही. गांधी महाराज की जय !'

माझी बोबडीच वळली !

आता कुठल्या तोंडानं प्रिन्सिपलसाहेबांसमोर नाक घासायचं ? फार शरमिंदा झालो. प्रथम क्रांतिकारकांवर चरफडलो. पण ते सातारा, फलटण भागात अगम्य उद्योग करीत होते. त्यांच्या कानांवर आमचा जळफळाट कसा जाणार ? त्यांना मनातल्या मनात चार दुगाण्या हासडल्या. माथं शांत केलं. पुस्तकं गोळा केली. अंगारा लावला. शर्ट बिजारीत खोवला आणि शाळेची पायरी पाच महिन्यांच्या प्रदीर्घ खाड्यानंतर मान खाली घालून चढलो. गेल्यावरोबर प्रिन्सिपलसाहेबांनी हातावर दोन छड्या इतक्या ताकदीनं ओढल्या की बिजार ओलीच व्हायची वेळ आली होती. पण बचावलो. वर्गात रफटफ करायला सुरुवात केली. माझी विद्यार्थीदशा पुनरपि सुरू झाली. बाहेर जगात कुणी काय झेंडे लावले होते ? पारतंत्र्यातला हिंदुस्थान पारतंत्र्यातच राहिला होता. जिवाचं रान करणारे बिचारे महात्माजी तुरुंगात आत्मक्लेश भोगीत होते. पंडितजी नगरला तुरुंगात खितपत पडले होते. पण ईश्वराला साक्ष ठेवून खरं सांगायचं तर त्याचंही मला फारसं वाईट वाटलं नाही, की जेवढं प्रचंड वाईट माझी शाळा पुन्हा सुरू झाल्यामुळं मला वाटलं ! किंबहुना पुन्हा शाळेत गेल्यानंतर तोंडावर आलेल्या मॅट्रिकच्या परीक्षेत आम्ही चारी मुंड्या चीत झालो त्याचं दुःखही, शाळा पुन्हा सुरू झाल्यामुळं झालेल्या दुःखाच्या मानानं अगदी किरकोळ आणि कोमट कोमट वाटलं !

१८

एका प्रेमप्रकरणाची शताब्दी

माणसं ढगांसारखी असतात. ढगांचे रंग बदलतात. आकार बदलतात. वाहवत जाण्याच्या दिशा बदलतात. स्तर बदलतात. कालचे ढग आज नसतात. आजचे ढग उद्या नसतात. उद्याचे परवा नसतील. त्या त्या वेळी ढगांचा जो काही आकार नि रंगाविष्कार सृष्टीत तयार झाला असेल तोच तेवढ्यापुरता खरा समजायचं. माणसांचंही तसंच असतं. माणसं तीच. ती एकसारखी बदलत असतात. बाहेरूनही बदलतात नि अंतर्यामीही पालटतात. कालची माणसं आज नसतात. आजची उद्या, परवा नसतील. ढगांप्रमाणंच माणसांच्या कर्तृत्त्वाचेही आकार बदलत असतात. वृत्तीचे रंगढंग तर हमेशा बदलत असतात. कालचा माणूस आज नसतो. त्याचा जीवनौघ सतत पात्रपालट करीत असतो. पाणी पालटण्याची क्रिया माणसांच्या आयुष्यात सतत चालू असते. ढगांसारखेच त्यांचे स्तरही बदलत असतात. आज जो माणूस वर असतो तो उद्या खाली सरकणारच नाही असं नाही. एकमेकांवर आदळत, आपटत, एकमेकांत गुंतत, एकमेकांना झाकत, साखळीपासून सुटत, परत जोडत, परत सुटत, भरकटत, थांबत, धावत माणसं यदृच्छेनं लाभलेल्या दिशेनं ढगांसारखी वाहतच असतात. माणसं ढगांसारखी घनगंभीर असतात. अंधारलेली असतात. चंचल असतात. आणि ढगांसारखी प्रकाशणारीही असतात. मात्र, काही माणसं ढगांसारखी नसतात.

काही माणसं असतात डोंगरमाथ्यावरल्या कोसळलेल्या किल्ल्यासारखी. ती भग्न पण भक्कम असतात. पायात मजबूत असतात. ऊन, वारा, पाणी, सारं काही सोशीत असतात. चांदण्याचा त्यांना उत्कृष्ट अनुभव असतो आणि त्यांच्या मागंमागं इतिहास-भूगोल असतो. काळाच्या पडद्याआड गेली तरी अनेकांचं चित्त त्यांनी आपल्याकडे बळंच ओढून घेतलेलं असतं. सारखी त्यांची आठवण ह्या नाही त्या कारणानं मागच्यांना येत नसते. अंगठीत हिरे असतात, तसे ते चित्तात स्थिरावतात. धर्मचक्रप्रवर्तक, शक-कर्ते, बाहुबली, द्रष्टे, दर्शनकार, सांख्य, वगैरेंची गणना यांच्यातच आहे. मात्र, एवढ्या-

वरच हे क्षेत्र सीमित होत नाही. चोरट्या प्रेमात पडून अकाळविकाळ प्राक्तनाचे भक्ष्य झालेल्या शापित बहादरांची गणनासुद्धा ह्याच गोमट्या गटात केलेली बरी. प्रेम लाभणं ही दैवी कृपेची बाब आहे. त्यातूनही मनपसंत व्यक्तीचंच प्रेम लाभगं हा तर शुद्ध नियतीच्या अनुग्रहाचाच भाग. अनिच्छया प्रेम करावं लागणं हा शाप आहे. आणि चोरटं प्रेम करणं हा गुन्हा नाही. चोरटं प्रेम भोगल्याची बतावणी करणं हे स्खलन आहे. तो हताशपगं स्वतःविरुद्ध केलेला क्षुल्लक कट आहे. मंत्र-तंत्र, जप-जाप्य, पोथीपुराण करून वात्सल्य लाभेल ? कदापिही लाभगार नाही. का ? कारण वात्सल्य हा पान्हा आहे. तो देवदयेनंच फुटावा लागतो. त्याचा लाभ आणि पुनर्लाभ ललाटीच लिहिलेला असावा लागतो. चोरट्या प्रेमाचंही तसंच आहे. देवाच्या ह्या अफाट दुनियेत तेसुद्धा ललाटीच असावं लागतं !

चार्लस डिल्केच्या ललाटी ते लिहिलेलं होतं.

शंभर वर्षांपूर्वीचा हा माणूस आहे. बरोबर शंभर वर्षांपूर्वी एकोणतिसाव्या वर्षी ह्या रावसाहेबांचं रीतीप्रमाणं लग्न झालं. ह्याची थोरवी ती नाही. ऐन तारुण्यातच तडफ, चातुर्य, निष्ठा आणि अविरत कष्ट ह्यांच्या बळावर तो ब्रिटिश पार्लमेंटमध्ये उदारमतवादी पक्षाचा इच्छुक म्हणून निवडून आला. वयाच्या अवघ्या एकुणचाळिसाव्या वर्षी तो ब्रिटिश मंत्रिमंडळातला कॅबिनेट दर्जाचा मंत्री झाला. त्याच्या अगोदर दोन वर्षे त्यानं परराष्ट्र विभागातही सचिव म्हणून काम पाहिलं होतं. त्याची तडफ पाहून डिझरायलीनं होरा वर्तवला होता की हा खासदार चार्लस डिल्के अगदी नजिकच्या काळात ब्रिटनचा पंतप्रधान होईल. ग्लॅडस्टनलाही तसं वाटलं होतं. आणि त्यात काय गैर होतं ? चाळिशीच्या आत जो अक्कलहुशारीनं मंत्रिपद भूषविता झाला, त्याला पंतप्रधानाची वस्त्रं अशी कितीशी दूर होती ?

दूर नव्हती, पण एक बारीकशी गोम होती. डिल्के स्त्री-सुखाबाबत वाजवीपेक्षा अधिक आसक्त आणि बेसावधही होता. आणि नेमकी स्त्रीच त्याच्या भाळीचा भाग्यश्रीचा कुंकुमतिलक पुसायला आडवी आली !

त्या वेळी स्मिथ नावाच्या घराण्याकडे जहाज बांधणीचा धंदा होता. त्यांच्या गोद्याही होत्या. केवळ नौकानयनावरच स्मिथ घराण्याच्या बाहुबलीचं उत्पन्न त्या स्वस्ताईच्या सुवर्णयुगात सालिना सात-आठ लाखाच्या घरात होतं. स्मिथसाहेबांना संसारसुखही बरबर पाहता विपुल लाभलं असावं. कारण त्यांना दहा मुलं झाली. पैकी सहा लावण्यवती कन्यका होत्या, तर चार गुटगुटीत मुलगे होते. पैसा, मानमरातब, संतती साऱ्याच बाजूनं स्मिथसाहेबांची चंगळ होती. मात्र इतकं असूनही स्मिथसाहेबांच्या गृहलक्ष्मीचा जीव ह्या डिल्केत गुंतलेला होता. अनायासं डिल्के त्या वेळी पंचविशीतला ब्रह्मचारी होता. सौ. स्मिथ चाणाक्ष असल्यामुळं ती घटस्फोटाच्या भानगडीत पडली नाही. ती फक्त डिल्केजवळ कंपॅनियन म्हणून राहिली.

डिल्के आणि लेडी स्मिथ ह्यांचा हा मधुर भक्तियोग फक्त वर्षभर टिकला. ह्या

एका वर्षाच्या काळात स्मिथ दांपत्याच्या थोरल्या मुलीला त्यानं आपला एकुलता एक धाकटा भाऊ ॲस्टन ह्याची वधू म्हणून आपल्या घरात आणली. म्हणजेच, प्रेयसीची थोरली लेक ही डिल्केची धाकटी वहिनी झाली.

डिल्केचं आणि लेडी स्मिथचं कशामुळं फिसकटलं कळत नाही. पण लेडी स्वतःच्या धनवान नवऱ्याकडे निघून गेली आणि डिल्के अन्य कुमारिकेशी रीतसर वाग्दिंग बांधायला मोकळा झाला. त्याप्रमाणं तीन वर्षं अशी तशी काढून एकुणतिसाव्या वर्षी डिल्केनं लग्न केलं. त्याचा गृहस्थाश्रम फक्त दोन वर्षंच काय तो टिकला. अवघ्या एकतिसाव्या वर्षी डिल्केवर विधुरावस्थेचा दारुण प्रसंग लोटला. ऐन तारुण्यातच डिल्के एकाकी पडला.

विधुरावस्था नशिबी आलेल्या डिल्केच्या पोळलेल्या हृदयावर प्रेमानं फुंकर घालायला म्हणून लेडी स्मिथ पुन्हा उगवली ! नियतीनं पुन्हा फासे टाकले. पुन्हा डिल्के आणि स्मिथबाई यांची कंपॅनियनशिप सुरू झाली. पुन्हा ती वर्षभरच टिकली. डिल्केचं आणि लेडी स्मिथचं ह्या दुसरेपणाच्या पर्वात कशामुळं फिसकटलं कळत नाही. पण झाल्या-गेल्या गोष्टींवर पडदा टाकून स्मिथसाहेबांची बायको आपल्या श्रीमंत नवऱ्याकडे निघून गेली. डिल्के राजकारणाची घडी उभारायला मोकळा झाला. त्यानं आपली ती आघाडी नीट सांभाळली.

ह्याच वेळी स्मिथ मंडळींची तिसऱ्या क्रमांकाची सौंदर्यवती मुलगी व्हर्जिनिया हिचं क्रॉफर्ड नावाच्या राणीच्या एका वयस्क सल्लागाराशी रीतसर लग्न झालं. क्रॉफर्ड कुटुंब उत्तर इंग्लंडमध्ये राहायचं. आपल्या आईचा कौटुंबिक मित्र ह्या नात्यानं डिल्केचा आणि व्हर्जिनियाचा स्नेहसंबंध जुळून आलेला होताच. त्यामुळं ह्या नवपरिणित क्रॉफर्ड कुटुंबात डिल्के आपलेपणानं मिसळून वागत होता. डिल्केची ताजीतवानी जीवनदृष्टी, चैतन्यदायी स्वभाव, विनोदी बोलणं आणि वरिष्ठ वर्तुळातली ऊठबस, ह्यांची त्या रूपवान व्हर्जिनिया-वर एवढी अमोघ छाप बसली की एकपदरी जीवन जगणारा आपला नवरा तिला अपेक्षेप्रमाणं अळणी वाटायला लागला. डिल्केवर तिचा जीव जडला. लोकसभेच्या कामानिमित्त डिल्केची वस्ती लंडनलाच असे. तेव्हा डिल्केचा डोंगरवाऱ्यासारखा आल्हाद-दायक सहवास अधिक मोकळेपणानं मनःपूत लाभावा आणि कर्तृत्ववान पुरुषाच्या सावलीत वावरण्यातल्या धन्य क्षणांचा पुन्हा पुन्हा पुनर्लाभ व्हावा म्हणून ती नवऱ्याची समजूत घालून एकटीच लंडनला राहायला आली.

खासदार खुशाल झाले.

तिकडे उत्तर इंग्लंडात क्रॉफर्डसाहेबांची झोप उडाली. त्यांच्यावर निनावी पत्रांचा पाऊस पडू लागला. हितचिंतकांचा मजकूर एकच असे : 'महाराज, सावध असा. तिकडे तो डिल्के तुमच्या बायकोला भ्रष्टवीत आहे. सावधान.' क्रॉफर्डनं सुरुवातीला मजकुरातल्या स्फुल्लिंगांकडे दुर्लक्ष केलं. आपल्या मनाला तो बजवायचा, अरे, विवाह-संस्थेचं पावित्र्य म्हणून काही आहे की नाही ? धर्माज्ञेनं जी माझी गृहस्वामिनी झाली ती परंपरागत नीतिनियमांचे बंध्य पाश तोडून परपुरुषाशी रत होणं शक्य आहे ? काल-

त्रयीही नाही. लोक गाढव आहेत. दोन मनामधल्या मोकळ्या सुखसंवादाचं रहस्य सामान्यांना काय कळणार? संशयाच्या गांधीलमाशीला क्रॉफर्डनं पार हाकलून लावलं. पण निनावी पत्रांचा ओघ वाढला. क्रॉफर्डसाहेबांनी हॅट घातली आणि शहानिशा करून घेण्यासाठी स्वारी स्वतः लंडनला येऊन थडकली. पत्रांचा जुडगा व्हर्जिनियाच्यासमोर ठेवला. तिनं अर्थातच कानावर हात ठेवले. त्यानं विचारलं,

'अग, तू पतिव्रता आहेस हे मी जाणतो ग, पण एकाच वेळी हे इतके लोक कसं काय वाईटसाईट बोलायला लागले? मुळात जर अग्नी नाही, तर हा धूर आला तरी कसा?'

'मी सांगत्ये बघा, हा कारभार माझ्या आईचाच असला पाहिजे! डिल्केची नि माझी मैत्री तिला खुपत असणार म्हणून तिनं हे असं कारस्थान रचून दावा साधलाय!' तिनं थंड उत्तर दिलं.

क्रॉफर्डनं सासूला शिव्या मोजल्या.

तरीही पत्रांचा ओघ चालूच राहिला. तेव्हा सासूवर चडफडलेला त्रस्त क्रॉफर्ड पुन्हा लंडनला आला नि त्यानं व्हर्जिनियाला आडवेतिडवे प्रश्न विचारून सत्याचा तळ गाठण्याचा चंग बांधला. सांजसकाळ नवराबायकोच्या बैठका व्हायच्या. पंचनामे व्हायचे. डिल्केशी तू हसतेस का? त्याला केव्हा भेटतेस? कुठं भेटतेस? किती वेळा भेटतेस? भेटतेसच का? तुम्ही काय बोलता? तुमच्या भेटीत कुणी तिऱ्हाईत असतो का? की तुम्ही फक्त दोघंच एकान्तात भेटता? तो तुला भेटी देतो का? तू त्याला भेटी देतेस का? देत असशील, तर त्या भेटीचं स्वरूप काय असतं? त्याचा फोटो तुझ्यापाशी आहे का? तुझा फोटो त्याच्यापाशी आहे का? तो पत्राचे मायने काय लिहितो? तू काय लिहितेस? तसंच का लिहितेस? ..माती आणि मसण...पार चक्राबून गेलेल्या क्रॉफर्डच्या प्रश्नांच्या सरबत्तीला व्हर्जिनिया शरण गेली. एक दिवस तिनं नवऱ्याला शांतपणे सांगितलं,

'तुझा संशय बरोबर आहे. मी गेली दोन वर्षं डिल्केची कंपॅनियन म्हणून राहते आहे. आमचं उभयतांचं रहस्य आहे!'

आता कानांवर हात ठेवण्याची पाळी डिल्केची होती.

क्रॉफर्ड पिसाळला. आपल्या धर्मपत्नीला फूस लावणाऱ्या डिल्केची पाळंमुळं खणून काढण्याची त्यानं प्रतिज्ञा घेतली. उग्र स्वरूप धारण केलं. आपली सोज्ज्वळ गृहलक्ष्मी व्हर्जिनिया हिला व्यभिचारकर्म करून भ्रष्टविल्याची फिर्याद त्यानं डिल्केवर गुदरली. डिल्केला तुडविण्याचा तो राजमार्गच होता.

कोर्टात तारीख लागली. खटला उभा राहिला. वादीप्रतिवादींचे साक्षी-पुरावे झाले नाहीत. उलट तपासण्या झाल्या नाहीत. फक्त वकील तेवढे झुंजले. तीन दिवसांच्या सुनावणीनंतर कोर्टानं उदास निर्णय दिला : 'ह्या प्रकरणात साधार असा प्रबळ पुरावा उपलब्ध नाही. व्हर्जिनिया स्वेच्छेनं लंडनला आली. व्यभिचार घडला असेल तर तो व्हर्जिनियानं डिल्केशी स्वेच्छेनं केलेला आहे; डिल्केनं व्हर्जिनियाशी केलेला नाही. डिल्के

दोषी आहे असा पुरावा नाही. स्त्रीचा व्यभिचार हा शिक्षापात्र गुन्हा नसतो. तेव्हा, वादी आणि प्रतिवादी निर्दोष आहेत.'

क्रॉफर्डनं कपाळावर हात आपटून घेतला!

डिल्केनं गूळ वाटला असेल.

प्रकरण एवढ्यावर मोहोरबंद व्हायला हवं होतं. पण समाजात कायद्याचा कीस काढणारे काही भडक आणि अस्वस्थ तज्ज्ञ असतातच. स्टीड नावाचा असा एक सत्य-शोधक ह्या खटल्याच्या वेळी भलताच जागा होता. त्यानं ह्या प्रकरणातील सर्व पुराव्याची खाजगी छाननी करून सरकारला कळवलं की प्रस्तुत सुनावणीत काही महत्त्वाचा पुरावा वादी-प्रतिवादींनी कोर्टापासून छपवून ठेवलेला आहे, आणि अर्धवट पुराव्याच्याच आधारे कोर्टानं निर्णय देणं हे न्यायतत्त्वाशी विसंगत आहे; एतदर्थ, वरिष्ठ कोर्टानं ह्या खटल्यातील वादी-प्रतिवादींची अमुक अमुक मुद्द्यांवर फेरसुनावणी करावी.

फेरसुनावणीचे हुकूम सुटले.

खटला वरिष्ठ कोर्टासमोर फेरसुनावणीसाठी उभा राहिला. पुराव्याची नव्यानं छाननी सुरू झाली. पहिल्या सुनावणीत फक्त वकील तेवढेच झुंजले होते. पक्षकारांची तेव्हा उलट तपासणी झाली नव्हती. ह्या फेरसुनावणीत वादी-प्रतिवादींची मुक्त उलट-तपासणी करण्याचा कोर्टानं हुकूम दिला आणि बकिलांना गप्प बसायला सांगितलं. डिल्के कसलेला राजकारणपटू होता. बारा बावड्यांचं पाणी चाखलेला होता. हजरजबाबी होता. पण उलटतपासणीत तो नेमका नको तिथं ढेपाळला. आपण अनेक बायकांशी चोरटे संबंध ठेवून आहोत हे त्यानं कोर्टाला त्या बायकांच्या नावागावांसह एका बेसावध क्षणी स्पष्ट शब्दांत सांगितलं. व्हर्जिनियाचाही तोल गेला. अनेक पुरुषांशी आपले चोरटे संबंध असल्याचं तिनं कोर्टात बेधडकपणं जाहीर केलं. त्या पुरुषसिंहांची नामावळीही कोर्टाला सादर केली. कोर्टानं सांगितलं, 'प्रश्न डिल्के व्यभिचारी आहे की नाही, किंवा व्हर्जिनिया व्यभिचारिणी आहे की नाही, हा नसून डिल्के आणि व्हर्जिनिया यांनी उभयता एकमेकांशी व्यभिचार केल्याचा सबळ पुरावा आहे की नाही, इतकाच आहे. डिल्के किंवा व्हर्जिनियाच्या पूर्वचारित्र्याशी कोर्टाला कर्तव्य नाही. तेव्हा, फालतू बटबट करू नका; मुद्द्याचं तेवढं बोला. तुम्ही उभयता व्यभिचार केला काय, आणि कुणी फूस लावली?'

पुन्हा प्रश्न निर्माण झाला! कोर्टापुढं सबळ पुरावा उपलब्ध झाला नाही. वादी-प्रतिवादी पुन्हा निर्दोष सुटण्याचा क्षण जवळ आला. इतक्यात व्हर्जिनियाची थोरली बहीण, की जिचं डिल्केनं आपला धाकटा भाऊ ॲस्टन ह्याच्याशी लग्न लावून दिलं होतं, ती कोर्टापुढं हजर झाली आणि तिनं सांगितलं, 'डिल्के नुकताच माझ्याकडे आला होता आणि त्यानं मला सांगितलं की व्हर्जिनिया जर खटला मागं घ्यायला कबूल असेल तर आपण तिला पैसे चारायला तयार आहोत! ह्यावरून दिसतं की डिल्केनं काही तरी काळेबेरं केलेलं असावं.'


इथून प्रकरणाला कलाटणी मिळाली. डिल्केच्या धाकट्या भावजयीची साक्ष कोर्टानं ग्राह्य ठरवली. व्यभिचारकर्माला आपण सरावलेले आहोत असा डिल्केच्या तोंडचा जबाब होताच. कोर्टानं पुन्हा साक्षी-पुरावे चाळले. वाचावाची झाली. डिल्के दोषी ठरला. एका गृहिणीशी स्वतः होऊन व्यभिचारकर्म केल्याचा गुन्हा डिल्केच्या हातून घडला आहे असा न्यायमूर्तींनी निकाल दिला. व्यभिचारकर्मात सहभागी होणाऱ्या स्त्रीला कायद्यात शिक्षा नसतेच. कायदा जरी सर्वांना समान असला तरी व्यभिचारकर्माच्या प्रकरणात अपवाद केलेला आहे. व्यभिचारकर्मात गुरफटलेली स्त्री कायद्याच्या दृष्टीनं नेहमीच निर्दोष असते. निदान, तिच्या बाबतीत तो दखलपात्र गुन्हा नसतो. त्यामुळं डिल्केच्या नशिबी शिक्षा आली. व्हर्जिनिया सुटली.


हा निवाडा जाहीर व्हायच्या दोन महिने अगोदरच डिल्केनं आपल्या मंत्रिपदाचा स्वेच्छेनं राजीनामा दिलेला होता. तेव्हा कायद्याच्या दृष्टीनं गुन्हेगार ठरल्यामुळं मंत्रिमंडळातून त्याला डिच्चू देण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही. देवदयेनं ती विटंबना टळली. मात्र ह्या क्षुल्लक प्रकरणानंतर डिल्के सार्वजनिक जीवनातून जो हुसकावला गेला तो कायमचाच. एरव्ही ज्याच्या अंगावर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या पंतप्रधानपदाची ऐश्वर्यमान्य वस्त्रं झुलण्याचा योग अगदी उंबरठ्यापर्यंत चालून आला होता, त्यानं खाजगी लैंगिक उपभोगांची वाच्यता न करण्याचा विवेक न दाखविल्यामुळं त्याच्यावर जन्मभर बागकाम करीत बसण्याची पाळी यावी ही परिसीमाच म्हटली पाहिजे.

पण डिल्के खरोखरच दोषी होता काय ? डिल्केनं विवाहसंस्थेचं पावित्र्य वगैरे सारं थोतांड गुंडाळून ठेवलेलं होतं, हा तर प्रत्यक्ष त्याच्याच तोंडचा जबाब आहे. प्रश्न तो नाही. व्हर्जिनियाचं नि त्याचं काही सूत होतं काय नि असल्यास त्यानं तिला फूस लावली होती काय, एवढाच प्रश्न आहे. त्या वेळीही अनेक विधितज्ज्ञांचं ठाम मत होतं की, आपल्या पंतप्रधानकीच्या मार्गातून डिल्केची संभाव्य अडगळ दूर करण्यासाठी, त्या वेळच्या महत्त्वाकांक्षी मंत्र्यांनी डिल्केवर हे कुभांड रचलं होतं. व्हर्जिनियानं डिल्केचं चारित्र्य हनन करण्यासाठी काही कारस्थानी राजकारणपटू मंत्र्यांकडून भाड खाल्ली होती, असा अनेकांचा सबळ तर्क आहे. पण कायदा बिनबुडाचा तर्कबिर्क जाणत नाही. कायदा फक्त समोर आलेला पुरावा जाणतो. पुढं व्हर्जिनियानं खरी भानगड किंवा सत्य काय आहे ते मॅनिंग नावाच्या रोमन कॅथॉलिक धर्मगुरूला पापक्षालनार्थ कन्फेशन देताना सांगितलं. पण पुन्हा, धर्माज्ञेप्रमाणं ईश्वरासाठी म्हणून केलेल्या कबुलीजबाबाची वाच्यता धर्मगुरू इतरांजवळ करू शकत नाही ! त्यामुळं मूळ सत्य अखेरपर्यंत गुलदस्तातच राहिलं. पुढं डिल्के वारला. विपण्ण स्मित करीत लेडी स्मिथ वारली ! क्रॉफर्ड धसका खाऊन वारला. नातवंडा-पतवंडांची तोंडं पाहून व्हर्जिनिया वारली. धर्मगुरू मॅनिंग तोंड बंद ठेवून वारला. डिल्केनं भोगलेल्या वायांनी शांतपणं डोळे मिटले. व्हर्जिनियानं ज्यांना भोग लुटू दिला ते पुरुष कृतार्थ होऊन थडग्यात गेले. आता मागं उरली आहेत फक्त ब्रिटिश म्यूझियममध्ये अभ्यासकांच्या सोईसाठी जपून ठेवलेली ह्या डिल्के प्रकरणाची वाळून पिवळी पडत चाललेली

कागदपत्रं. सत्य जे त्या वेळपासून सांडलं ते सांडलंच. आता ते कदापिही गवसणार नाही. शंभर वर्षं होऊन गेली आहेत. तेव्हा त्या सत्याचा नाद आपण सोडूया. तुमच्या-आमच्यापुरतं सत्य फक्त एकच आहे की,—

चोरट्या प्रेमप्रकरणांची कहाणी कधीही शिळी होत नाही; आणि व्यभिचार-कर्माच्या कथेचे गहिरे रंग टक्क उन्हात डुलणाऱ्या जास्वंदीच्या टवटवीत फुलासारखे सदैव ताजेच असतात !


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
२२३८७
दा. क्र. निबंध
२९९९
ग्रंथ शाखा स्थळ प्रत


REFBK-0022347